CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Letters and dispatches relating to the battle of Panipat.

G-1
69/2

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation,New Delhi. Chandigarh

G-1
69/2

occurre
rom a true hist
ay or a month, but as t
ately launched by

२

पानिपत प्रकरण

१७४७–१७६१

[किंमत रु: २ आ. ३]

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

"*Maratha Operations in Northern India*"
with reference to

THE PANIPAT CAMPAIGN, 1747-1761

layappa
subje*tion*

The disaster of Panipat occurred on Wednesday 14th January 1761, but rightly observed from a true historical perspective, it appears as the result not of a day or a month, but as the legitimate consequence of the aggressive policy deliberately launched by the first Peshwa and strenuously pursued by his two eminent successors Bajirao I and Balajirao. This ambition of the Peshwas in aiming at what in common parlance is termed "Hindu-Pad-Padshahi", naturally brought them into conflict with the various potentates, who were holding sway between the river Nerbudda on the south and the Himalayan range in the north. The power of the Great Moghal received its final fatal blow at the hands of Nadirshah in the early months of 1739, after which the Emperor's existence became so precarious that he was entirely at the mercy of any invader of superior strength. The Peshwa for a time gave promise of being able to keep peace and order between the various warring elements; but the distractions of the Poona Government due to the intrigues of Tarabai and the Nizam after the death of Shahu, and its defective organization in point of unity of purpose and of command, came in the way of his ambitious policy being carried to success in the north, where he had practically to give a free hand to his trusted lieutenants Malharrao Holker and the Scindia brothers, Jayappa and Dattaji. Among other troubles within the Delhi empire were (1) the wars of succession started by the claimants to the thrones of Jaipur and Jodhpur and (2) the attempt of the Nawab Vazir of Oudh to put down the rising and rebellious Rohilla chiefs, who were a constant menace to his possession of Oudh. To complicate the situation still further, Ahmadshah, the Abdali King of Kabul, began frequently to repeat the *rôle* of his late master Nadirshah. In this way, the Rajput Princes, the Rohilla chiefs, the Vazirs of the Emperor's court and the conquering Marathas represented by various commanders often at variance with one another, all contributed to the development of events that culminated in Panipat, not to mention at the same time the Jat, the Bundela and other petty chieftains, who often threatened to cut the Maratha lines of communication with the south.

Students of history will thus realize, what a huge affair both in length of time and the range and complexity of its parts this Panipat episode was, and what amount and variety of detailed information is necessary before one can study it in all its bearings.

The unpublished papers here presented, numbering about 150, are neither exhaustive nor do they supply all the links of the various problems; but they certainly make a weighty contribution towards elucidating many of the events and transactions and render necessary a revision of our former judgments on many points.

2. *Factions in the Imperial Court*

The first four letters contain news of the emperor's Court sent to the Peshwa by his agents, the Hingne brothers. The Emperor, like all weak men, seems to have been wavering between two opposite forces, the

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

Muhammadan factions urging Nadirshah to come and sa
Empire, and the rising power of the Marathas, who had been
terms at the gates of Delhi for over ten years. Raghoji Bho
his repeated invasions stopped the annual flow of revenue
into the Imperial treasury. Scindia and Holker had planted
firmly in Malwa and Rajputana. At the beginning of 1747 Nadirshah thus writes to the Mughal Emperor (No. 1): " It is now eight or nine years since I returned from India. You have not utilised this interval in improving your administration. Your officers do not obey you. They behave like independent lords. This has given the Marathas a free hand. With a loyal supporter like myself to stand by you, you can easily put your house in order. If you do not do it now, when will you do it? Put aside your pleasures for a while and start at once at the head of your forces. I will send you 25,000 troops under two able commanders; with their help you can in two years' time easily conquer the whole of the Deccan. If you need my presence too, I am quite ready to come. Do not delay." This letter was couched in most ardent and affectionate terms. In the struggle for the gadi of Jaipur, Malharrao Holker fighting on the side of Ishwarsing, inflicted a crushing defeat on Madhosing. An important letter giving news of the suicide of Ishwarsing by poison and the subsequent atrocities inflicted on the Maratha forces by the Rajputs, supplies the missing link and explains how the Marathas and the Rajputs came to be so entirely estranged (No. 31).

3. The Marathas enter the lists on behalf of Safdar-Jang

The serious illness of Shahu and his eventual death at the end of 1749 called away Scindia and Holker to the south for a year. They returned with renewed vigour at the end of 1750 after receiving an urgent call from Vazir Safdar-Jang who had been paralysed by the activities of the insatiable Rohillas,—which are illustrated by numerous letters (Nos. 14, 19, 20-24).

Jayappa and Malharrao joined their forces in the beginning of 1751 and marched against the Rohillas. In their first encounter with them they inflicted a defeat on Sadulla Khan in March (No. 32). No paper detailing the further progress of this campaign has been so far discovered and there is a distinct gap for the next few years in our knowledge of the subject, although we know already that the Rohillas were completely routed near Farrukhabad.

4. Raghunathrao and the Afgan menace

The next important project undertaken by Scindia and Holker was to persuade Ghaziuddin, the eldest son of the Nizam, to proceed to the Deccan to claim his father's dominion. Ghaziuddin was, however, murdered at Aurangabad and the project failed. The Peshwa soon after despatched his brother the young Raghunathrao to settle the affairs of the north, which were gradually taking a bad turn for the Marathas owing to serious differences between Jayappa Scindia and Malharrao Holker (No. 35). The various alternatives suggested for solution and the consequent orders are contained in No. 39. The next few papers (Nos. 46, 47) refer to the

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

athrao's expedition of 1755 and his sudden return to
layappa Scindia's entry into Marwar and his murder in
subjects already well known and authenticated in history.

*Introduc*ces of his murder and the manner in which it was avenged
n several letters (Nos. 48-56). Then followed a fierce
uggle resulting from the invasion of India by Ahmadshah Abdali in the
ter of 1756-57 (Nos. 68, 69, 71). His southern progress was, however,
uddenly arrested by the stubborn Jats near Agra (No. 72) and he returned
o his country in the summer, committing frightful atrocities on the way
o. 71). Thereupon the Rohilla Chief Najibkhan, who is described as
secret agent of the Abdali, is seen making overtures to Raghunathrao
(No. 77). Affairs began to take a serious turn after Raghunathrao had
left for the south, in the autumn of 1758, without having finally settled
the affairs of Northern India. No. 88 contains a warning. The coming
danger to the Maratha policy was foreseen and measures suggested for
averting it (No. 89). Mismanagement of Maratha affairs becomes
evident when responsible officers like Hingne and Antaji Mankeshwar
came to be severely handled by the Peshwa (Nos. 91, 97, 98, 105).
Najibkhan in the meantime was not idle ; he was for a long time creating
mischief. But what we learn for the first time in these papers is (No. 103)
that Abdali did not rashly enter into a conflict with the Marathas. He tried
his utmost to come to some amicable and workable understanding with
hem. The Peshwa at Poona did not realise the gravity of the situation
n the north, being engrossed in schemes for gathering money anyhow to
ay his debts in the south. He should have realised that in the distracted
ondition of affairs he could hardly expect to get his coffers filled.

The final struggle

Raghunathrao's penetration into the extreme west of the Punjab as
ar as Attock in the summer of 1758, changed the whole situation. The
Punjab had long been coveted by the Abdali, and if his officials had not
been driven away by the Marathas, the Sutlaj would possibly have been
fixed as dividing the spheres of influence of the Afgan and the Maratha
powers and the dispute would possibly have been amicably settled.
Dattaji Scindia again entered the Punjab and established his outposts
n the west, so that it became a point of honour with both powers, the
ne to keep what was once conquered, the other to reclaim what was lost.
The Abdali however was fully conscious of the Maratha strength and almost
ip to the last moment tried his utmost to come to an understanding with
hem. No. 106 contains an account of the first move of Abdali who
ent his agent Yakub-Ali-Khan to Delhi during the monsoon of 1759 to
ettle matters in the Emperor's presence between all the contending parties,
he Rohillas, the Rajputs, the Jats and others. Although this agent Yakub-
Ali-Khan stayed in India for some two years on this mission, he was not
ble to achieve any tangible results (No. 108). It was unfortunate that
he Peshwa himself, his brother and his cousin, who were mainly responsible
or the general policy in the north, did not promptly proceed to Delhi to
ettle the affairs of the empire, into which a further disturbing factor was
troduced by the growing estrangement between Scindia and Holker.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

6. *The Peshwa's neglect*

With the fresh light thrown by these papers, one can fix the responsibi for the Panipat disaster primarily on the Peshwa himself, who was eitl fast losing his health or over-confident of his power or too much addic to the pursuit of pleasure to spare his attention for graver concerns a distance. Few men in the south realised the situation that was developi in Bhau's forces in the north, and no one heeded the warnings on t point uttered by smaller men like Hingne, Antaji Mankeshwar or Bundele. Gangoba Chandrachud and his master Malharrao Holker were the only ones who gave the alarm of the coming danger (No. 116), but the haughty Bhau, relying too much on the efficacy of the artillery of Ibrahim-Khan, sneered at them as cowards. Overtures for peace were, however, continued by both the parties throughout the period of hostility. Matters began to assume a serious aspect for Bhau even during his victorious entry into Delhi (No. 130); and Nana Fadnis himself sounds an ominous note of alarm in his letter of September 15, 1760 (No. 131). Naro Gangadhar Mujumdar's letter (No. 133) confirms the culpable negligence of the Peshwa even after he was fully informed of the awkward predica-ment of Bhau's forces in the Delhi region. The absurdities of rumour are illustrated by a letter which announces a victory for Bhau on the field of Panipat (No. 138). Nothing has been discovered in the records so far which could materially add to our present knowledge of the final stage of the struggle. Possibly all such communications were intercepted by the enemy. Abdali, even after the crushing Maratha rout on January 14, 1761, tried to effect an understanding with the Peshwa in the following June (No. 146). The death of the Peshwa (No. 147) in the same month brings the whole episode to its dismal close.

7. *Minor points extracted from the Peshwas' Diaries*

In addition to the letters so far produced a few striking extracts from the Peshwas' Diaries are collected together in the last number (No. 149), which clear several small doubtful points. Laxmibai, wife of Vishwasrao, who is commonly supposed to have gone with her husband to Panipat, is now proved to have lived at Trimbakeshwar with her relatives at the time of the battle. Several entries refer to the marriage of the Peshwa witl Radhabai of the Vakhre family. The affair was being long considered at Sidhtek where the Peshwa spent some months. Many eligible girls were assembled for the Peshwa's inspection, of whom at least three were married on the occasion at Hiradpuri near Paithan, one by the Peshwa himself, another by Nilkanth Mahadeo Purandare, and the third by Vireshwar Dixit Manohar. The travelling expenses of the ladies, their dresses, their marriage festivities and the alms given away on the occasion, are all found entered in the Diaries. The entertainment of Abdali's agent Gulrai, the obsequies of Vishwasrao, the robes of honour sent to Abdali as a present, the visits paid by Malharrao Holker's wife, Gautamabai and his young grandson to the Peshwa, returning to the south, Narayanrao's attack of small-pox, and the rewarding of Janoji Bhintada for having safely conducted Parvatibai back from Panipat, are some of the items of fresh information given here which students of history would value.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

The letter of Kashiraj Shivdeo. (*Vide* No. 148)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] *[23-2-1747*

श्री.

पौ छ ९ रबिलाखर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामिचे सेवेसी.

विनंती सेवक बापूजी माहादेव व दामोदर माहादेव सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता।। छ २४ माहे सफर मुा। इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपावलोकने येथास्थित असे विशेष. स्वामीकडील कृपापत्रे छ ९ जिल्हेजची सरकारच्या जोडी-बराबर छ २० मोहरमी पावलीं. तेथें आज्ञा कीं, नादरशाहाकडील व दिलीच्या अमिराचें व हिंदुस्थानच्या राज्याचें वगैरे जें नवलविशेष वर्तमान येत जाईल तें लिहीत जाणें म्हणोन आज्ञा केली. यैसीयास पूर्वी नवाब उमदतुलमुलुक शांत जाले, तेव्हा मुजरद कासदांची जोडी सेवेसी रा। केली; व येक जोडी दुसरीहि पाठविली. त्या दोही जोड्याबराबर या प्रांताचें साकल्य वृत्त लिहीले आहे. सेवेसी श्रृत जाले असेल. सांप्रत नादरशाहाकडील वर्तमान यैसे आहे कीं, याचा रुमवाल्याचा सल्ढक जालियां हा स्वदेशास परतून आला. आपल्या मुलकाचा बंदोबस्त करून प्रस्तुत येकाच ठिकाणी काहीक दिवस छावणी करून राहिला आहे. मिर्जा नसरुला पातशाहजादा व तहमासकुलीखां या दोघास काबुलेकडे मार्गस्त केले. महमदशाहास व नवाब वजीर व नवाब मनसूर अलीखान यांस पत्रें पाठविली आहेत, जे मजला हिंदुस्थानातून येऊन आठ नव वर्षें जालीं. अद्याप तुम्ही स्वदेशाचा कांहीं बंदोबस्त केला नाहीं. परस्परें यैकतों जे, चाकर कोण्ही चाकरीच्या मार्गे वर्तत नाहींत, आपलाले ठिकाणीं खावंद होऊन राहिले आहेत. याकरितां मुलकांत गनिमाचा गलबला विशेष आहे. म्या इतकी तुम्हांस ताकीद केली असतां तुम्हीं मुलकाच्या बंदोबस्ताचा काहींहि प्रेत्न न केला. मजसारखा पक्षपाती असतां, सर्व प्रकारें मी तुम्हास अनकूल असतां, आज तुम्ही आपले पातशाहीचा बंदोबस्त न कराल तर कधीं करणार? अद्यापहि कांहीं गेले नाहीं. दोन दिवस सुखावर मन न ठेवितां मिरजा नसरला व तहमासकुलीखांनास पंचविसा हजारा स्वारानसी काबुलेहून बोलाऊन घेणें व स्वता तुम्ही बाहेर निघून हे व तुम्हीं दोन वर्षेपर्यंत श्रम करून दक्षण हिंदुस्थानचा बंदोबस्त करणें. माझी गरज असलियां मीहि तयारच

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहे आणीख फौज लागेल तर पाठवीन. यैसी बहूत दीलगरमीनें[1] पत्रें आलीं. पा(तशा)ह वजीर सफदरजंग, राजे अफजूखां, येह्याखां, मिरमुनसी यानी लाल बागांत येकांत केला. च्यार घटकापर्यंत परस्परे जाबसाल बहूत समाधान पावले. अधींच तर नादरशाह येकवचनी. जो यांसी करार केला त्यांत अंतराये तिलतुल्य केला नाहीं. आतांहि बंदोबस्त करूं इछितील तर साहित्य करावयास सिध आहेत. येवंच या प्रकारची पत्रें आलीं याकरितां समाधान पावले. अद्याप उतरें लिहीलीं नाहींत. पाहावें काये लिहीतात. दुसरें उमदुलमुलकाच्या जागिरा व तालुके कूल पातशाहजादियास जाले. अमीरखानाचे कदीम अमील होते. तूर्त त्याजवरच बहाल ठेविले आहे. सरदारानी माधोसिंगास च्यार परगणे, टोक, तोडा, मालपुरा, नेवाई अठरा लाखाची जागा, माधोसिंगासी मुकरर करून राजश्री खंडेराव होलकर यासी राणाजीकडे पाठविले; आणि रा॥. गोविंदराव तमाजी यांसी सरदारानी लिहीलें कीं, रा॥. निबाजी खाटके व रामराव मुनसी ईश्वरसिंगासमीप मार्गस्थ केले आहे. ते सांगतील त्याप्रमाणें ईश्वरसिंगास समजाऊन माधोसिंगास जागा देवणें. खावंदाची मरजी या प्रा॥ ठैराव जाला. हें वर्तमान ईश्वरसिंगास कलले. ते समई सेखावंताचा याचा कलह होता. हे वर्तमान पावतांच सिवसिंगासी सलूक केला. व त्यास आपले रफीक[2] केलें. कूल रा(ज्या)तील रजपूत जमा केले, व नवी फौज निगादास्त मांडली. राणाजीनी येक फौज भारतासिंगासांगाते देऊन जाजपुराकडे पाठविलें, व कोटेवाला व शाहापुरेवाला वगैरे यानी आपलाले जागां तयारी केली आहे. राणाजीहि मागून सिधता करून निघणार. हे वर्तमान यैकून ईश्वरसिंगानी राये नरायेणदासजीस भारी फौज समागमें देऊन पुढें पाठविलें; व त्या मागून कोठेवाला वगैरे याच्या मुकाबल्यावर राजामलजीस पाठवणार होते; व राणाजी निघाले तर त्याच्या मुकाबल्यावर स्वता ईश्वरसिंगानी निघावें, हे तजवीज ठैरली. इतक्यांत छ ९ सफरीं सोमवारी राजामलजीस देवअज्ञा जाली. ईश्वरसिंगास व सवाई जैपुरात लाहाणमोठ्यास परम खेद जाला. बलकी तमामं हिंदुस्थानास मलजीचा मातम[3] जाला. मोठा कर्ता माणूस होता. ईश्वरइछेस उपाये नाहीं. जे होणे ते तो जालें. तथापि ईश्वरसिंगाची वासना सुकलीस[4] सरदाराच्या नेमणुकी प्रा॥ माधोसिंगास जागा द्यावीसी नाहीं. येक लडाई मारावी. प्रस्तुत भारतसिंग दाहा बारा हजारानसीं पुढें आला आहे. यास जोवर खंडेराव होलकर सामील जाले नाहींत तोवर जरब द्यावी. मग होता होईल तें पाहावें. यैसा याचा मनोगत आहे. यास्तव राये नरायेणदास भावाची

---

१ प्रेमानें. २ दोस्त.
३ शोक. ४ समजुतीनें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मातम न करतां दर मजल चाललेच गेले. राणाजीच्या फौजेचा * * * (भातरसिंग) जीचा दो कोसाचा तफावत राहिला आहे. परस्परें दृष्टादृष्ट होते. पाहावें कैसा प्रसंग होतो. आभयेसिंगानी बख्तसिंगास लिहीलें होतें कीं राणाजी ईश्वरसिंगावर जातात. तुम्हासहि साहित्यविषईं त्यांनीं पत्रें लिहीलीं आहेत. कुमक करणें उचीत आहे. त्यास अभयेसिंगाची वासना कीं, बख्तसिंगाने राणाजी-कडे जावें, व आपण बिकानेरचे राज्य घ्यावें; व बख्तसिंगाची हेत कीं, बिकानेरचे राज्य निमे आपण घ्यावे, व निमे अभयेसिंगानी घ्यावे. यैसा त्यांचा यांचा परस्परे मनोविकल्पसा आहे. मातुश्री गयाश्राध करून श्रीप्रयागास आली. प्रयागी मकरस्नान संपादिले. सिमगी पौर्णिमा करून देशास चालणार. बहुधा चाललीं असावीं. दोन जोड्या आमच्या प्रयागास गेल्या आहेत. आज उद्या येतील. सफदरजंगाचे दरबारी वर्तमान आले कीं, पुत्रासी अजुर्दा आहेत; म्हणून वाराणसीसच राहूं म्हणतात. हे गोष्ट नवाबानी आम्हास पुसली. आम्हीं विनंति केली कीं, हे गोष्ट फटकाल आहे. हें स्थलें येसी आहेत कीं, हिंदू होत असतां या स्थलास गेलियावरी क्षेत्रास सोडावे यैसा हेत होत नाहीं. यास्तव राहूं म्हटले असेल. या गोष्टीवर लोकानी जी लबाडी केली असेल या प्राा विनंती केली. यावरी निशा जाली. परंतु जागजागां * * * वर्तमान आहेत. तथ्य वर्तमान आलियां लिहून पाठऊ *सेवेसी श्रृत होय बहूत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶ *This is an important letter giving news of the Imperial Court to the Peshwa at Poona. It is sent by the Maratha agents Hingne brothers from Delhi. The letter of Nadirshah quoted in the report will convince the student how closely Ahmadshah Abdali followed the policy of Nadirshah.*

No. 2] [पौ. *5-4-1747*

श्री.

पो छ ५ रबिलाखर

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरि उमदतुंनमुलुक शांत जालियावर नवाब सफदरजंग याची मुसाहेबत बहुत जाली. त्यास बेनुखालीफ यासी जोड केल्याखेरीज बंगालीयाचें काम कोणेप्रकारे होते? याकरितां पातशहास अर्ज केला कीं, नवाब सफदरजंग आम्हांसीं येकसुं असलियानें हजरतची उत्तमप्रकारें कामे होतील. नाहींतर

---

१ अमीरखान २५-१२-१७४६ ला खून जाहला. २ स्नेह.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे आणी[illegible]नीं येथें एक गोष्ट सांगितली. न कले, हजरतच्या ध्यानांत काय येईल ? म्हण[illegible]
पा(तशा)[illegible] पातशाही कामाचा डव्हला[1] होईल. त्यावरून पातशहा बोलले की, सफदरजगाच्या
बाग[illegible] व बाळाजीरायाच्या दरमीयान मी आहे. याप्रमाणें बोलून सफदरजंगास [illegible]
देव्हर्डाजवळ येकांती घेऊन सांगितले कीं, बाळाजीरायापासून मजला फारशी
उमेद आहे. आणि ते सत्यवादी आहेत. याकरितां त्यासी तुम्ही साफ राहून
पातशाही काम कर्णे. सफदरजंगानी विनंती केली कीं, 'पहिल्यापासून माझी
त्यांशी दुशमनी होती. हजूर आलियावर राव महादेव यांनीं बाळाजीरायाच्या
माझ्या दरम्यान ईश्वर दिल्हा; त्याप्रमाणें म्याही दिल्हा. कधीही कोणास शपथ
दिल्ही नव्हती, ते त्यांस दिल्ही. खज्याना लुटुन आणिला होता, तो राव
महादेव यांच्या पुत्राजवळ दिल्हा. वकील सरदारांजवळ पाठविला. त्यासी
वाराणसीची गोष्ट सांगितली. त्याजवरून मजला विशम वाटलें. अतःपर जे
हजरतची मर्जी तेच मजला करणें.' या प्रमाणें बोलणे जालियावर दुसरे दिवशी
पातशहानीं खालशाचे दिवाण नवाब यह्याखां यांसी सफदरजंगाकडे पाठविले.
आणि आम्हासही आज्ञा केली. त्यावरून सफदरजंगाचे घरीं आम्ही गेलों. बहुतसें
शिष्टाचारें बोलून सारांश हाच कीं ज्याप्रमाणें तुम्ही मसीं वर्ताल त्याप्रमाणें मी
तुम्हांसी वर्तेन आणि तामकेदूर[2] तुमचे कार्यास अंतर करणार नाहीं. याप्रमाणें
जालियावर तनखा वगैरे ठरली. इतकियांत वाराणसीचे लिहीलें बलवंतसिंगाचे
आलें कीं मातुश्री[3]नी दसाराम जमीदार यासी कविल्यासुद्धा घेऊन चालली; आणि
आम्हास सांगुन पाठविले कीं, यासीं अर्धे राज्य देणें, नाहींतर फौज उतरेल.
यासी आम्ही दसारामास आणून यासी शिक्षा द्यावी तर हजरत वारंवार लिहीतात
कीं, ते माझीच मातुश्री जाणून त्याचें साहित्य करणें. तुमची चार माणसे मारली
तऱ्ही त्यास हर्गीज[4] न बोलणें. कां कीं, माझ्या म्हटलियावर माझे घरांत आली.
त्यासी कव्हावत जालिया आम्हास शब्द लागेल यैसी हजरतची ताकीद, आणि हे
लोक ऐसी करितात की, हलक्याहून हलका असेल तेही ऐसे कर्म न करी. या
प्रमाणे अर्जी बलवंडसिंगाची आली. ते बजिनेस[5] आम्हास दाखविली. आणि हसून
बोलिले की, हे तुमची सत्यवादी भलेपण. तेव्हा आम्हीं विनंति केली कीं, मातुश्री
या प्रमाणे करितील ऐसे नाहीं. बराबरचे लोकानी कर्म करून नाव याचे बदनाम
केले. तरी नवाबानी बहुतच थोरपण केले. जमीदार आम्ही आणून देतो; परंतु
गोष्टीवर नवाबाची शुक्रगुजारीच[6] श्रीमंत करतील. याप्रमाणे जाले वर्तमान सेवे

---

१ बिघाड.
२ शक्ति आहे तों.
३ पेशव्याची आई काशीबाई.
४ बिलकूल.
५ खुद, हुबेहुब.
६ तारीफ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहिलें असें. मातुश्रीस जमीदाराचा मजकुर लिहिला. त्याचे वर्तमान नवाब सफदरजंगास आले कीं, राा कृष्णराऊ[1] याणी कागद गंगाप्रवाह केले; आणि मन मानेसे बोलले. आम्ही तो मातुश्रीच्या तर्फेनें सागितलें कीं, दसाराम पटणे-कराच्या कैदेत होता. त्यानी बहुत मीनत केली. याकरितां आम्ही सोडविला. अत:पर आम्हासी त्यासी गरज नाहीं. नवाबानीं आमचा बहुत अहेल[2] सोसून यात्रा उत्तम प्रकारे आमची केली. या गोष्टीची कोठपर्यंत शुक्रगुजारी करावी. याप्रमाणे जालें वर्तमान सेवेसी लिहिलें असें. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶ *Letter of Peshwa's agent at the Emperor's Court communicating to him the favourable impression the Emperor had obtained of the Peshwa's doings. His mother Kashibai's pilgrimage gave some offence to Safdarjang.*

No. 3] *[8-3-1747*

श्री

पौ छ ६ रबीलाखर

श्रीमंत राजश्रीपंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बापुजी महादेव व दामोदर महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा. छ ७ माहे रबिलावल मुा इंद्रप्रस्थ स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष. पुर्वी सरकारच्या जोडी बरोबर सविस्तर वर्तमान लिहून पाठविले आहे. पाऊन श्रुत होईल. सांप्रत सरदारांनीं स्वामीच्या आज्ञेप्रमाणे माधोसिंगास टोंक, तोडा, मालपुरा व नेवाई, हे चाऱ्ही परगणे नेमून बुंदी हाड्यास द्यावी व हाड्यानीं ईश्वरसिंगाची रफाकत[3] करावी; व सरकारचे पैसे द्यावे; व नेणवे, व समिधी, व करवार हे तिन्ही परगणे रावराजा व प्रतापसिंग यानी खावे. ऐसा तह करून राजश्री खंडेराव होळकर यांस हजारा स्वारानसी राणाजीकडे पाठविलें कीं; राणाजीची फौज सरदेवर आली आहे. ईश्वरसिंगानीहि आपली फौज त्याच्या मुकाबल्यावर पाठविली आहे. या दोही फौजेचे झुंज होऊन, [ा]वे. ज्याप्रमाणें नेमणुक केली आहे त्याप्रमाणें वर्तवणें; व इकडे राजश्री रामराव मुनसी व निबाजी खाटके, बक्षिराम ऐसे त्रिवर्ग महाराजा ईश्वरसिंगापासी पाठविले कीं, यास समजाऊन चार गोष्टी उत्तमप्रकारें सांगून तहाप्रमाणें फैसल करून [उ]परस्परे सौरश्य करून देणे. त्यास रामराव वगैरे जयनगरास आले; व खंडेराव

---

१ चांसकर काशीबाईचा भाऊ. २ आबाळ ? त्रास. ३ साहाय्य.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाऊन राणाजीचे फौजेत शामील जाले. राणाजीची फौज सरदेवर आली. इकडून राये नारायेणदासजीहि भारी फौजे सुधां जाऊन पावले. परस्परें कोसा कोसाचे अंतर राहिलें. राणाजीचे कारभारी यांनीं आपल्याआपल्यांत स्नेहाचा ठैराव करून नारायणदास सडेच फौजेंतून जयपुरास आले; व त्याचे कारभारी त्यांजकडे गेले. नारायणदासाच्या ईश्वरसिंगाच्या मसलती उदंड जाल्या. रायजीनें उदंड समजाऊन सांगितलें कीं, मल्हारबाचा लेक येऊन मधें पडला आहे, झुंज करू नका म्हणतो, व सरदाराची मर्जी खामखा स्नेह करवावयावरच आहे. झुंज केलियानें राणाजीची तो काय कथा परंतु मराठ्यासीं विरुध वाढते. यासी विरुध करणे सलाह नाहीं. याकरितां सांप्रत सलाच करावा. त्याहीवर रजपुत कोण्ही तन[1] देत नाहींत. कोणाच्या भरवसीयावर हा प्रसंग कर्तव्य? ऐसे नानाप्रकारें रायजीनें समजाऊन सांगितलें. ईश्वरसिंग सहसा न मानी. म्हणो लागले कीं, राज्य प्राप्तनी असल्याचें भोगावें. नाहीतर अशानें काय होतें. जे होणार तें हो. येकदां झुंझ तो केले पाहिजे. राजामलजी मेले. विद्याधरजी खाटेवर पडला. रजपूत तन देत नाहीं. तुम्ही सलाच्या गोष्टी सांगतां. तेव्हां राज्याचा भार माझ्या प्राप्तनास आला. अस्तु आतां मीच बाहेर निघतों. जें होणार असेल तें हो. यैसें बोलोन डेरे बाहेर केले. राजा बहुत दुरागृहांत पडला. व कोणेही प्रकारें संधी करीनासा जाणून राइजीनी लाइलाज झुंजतो हेच गोष्ट कबूल केली. तेव्हां राज्यानी रायेजीपासून मुचलका घेतला व सहज रायास लष्करां * * *

* * * *

¶ *This fragmentary letter of Hingne to the Peshwa from the Court of Delhi, gives news of the movements of Ishwarsingh, King of Jaipur, and the Marathas.*

No. 4] [*20-3-1747*

श्री.

पौ छ २१ रबिलाखर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान.

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बापुजी महादेव व दामोदर महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ माहे रबिलावल मु॥ इंद्रप्रस्थ स्वामीचे कृपा अवलोकनेकरून स्वस्तक्षेम असे विशेष. इकडील साकल्य वर्तमान अजुरदार

---

१ तन देणें=पुढाकार घेणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जोडियांबरोबर लिहून पाठविले आहे, त्याजवरून विदित जाले असेल. सांप्रत राजश्री माहाराव दुरजनसाल कोट्याहून स्वार होऊन उदेपुरास गेले. तेथुन राणाजी व एकत्र होऊन आपल्या फौजेच्या पुस्तगैरमीवर निघाले म्हणून वर्तमान आलें. त्याजवरून महाराज राजश्री ईश्वरसिंग यानीहि सवाई जैपुरीहून कूच केला. लोकांनीं बहुत मना केले. इतकी त्वरा करणें सला नाहीं. केवळ राणाजी येऊन निगृहावर पडले, ऐसे जाणावे, तेव्हांच कूच करावा, ऐसे उदंडानी म्हटलें. परंतु कोणाचेंहि नायकतां कूच करून दरकूच जाऊन आपलें फोजेत शामील जाले. चितांत आहे कीं, राणाजीचे फोजेस जंक[2] दिधलीच आहे. हली जोपर्यंत राणाजी आपले फोजेत सामील जाले नाहींत तोंवर उरली फौज मारून घ्यावी, ऐसें चितांत आहे. कोटेवाला परतून येऊन कोट्यांत पावला. राणाजी मागती उदेपुरांत दाखल जाले म्हणतात. ईश्वरसिंगांच्या चितांत कीं राणा युध्यास नच ये तर त्याच्या मुलकांत स्वाऱ्या करून ते अजीज करावे. जेरीदाही[3] होत जातो. पहावे ईश्वर ईच्छा काय आहे, व कैसा प्रसंग पडतो. यद्यपि राजश्री खंडेराव होळकर याजपासीं समुदाय थोडा आहे, तथापि तितक्यानसीच त्यांनीं यांस आडत्रासास आणिलें. खाण्यापिण्याची परम मर्यादा जाली आहे. त्रृण धान्य बहुत महर्ग आहे. जैपुरकर तो केवल स्वपराक्रमेंच या कर्मास प्रवर्तले आहेत. व राणाजी तो केवळ स्वामीचे आश्रयावर या कर्मास प्रवर्तले, ऐसा आबालवृद्धीपर्यंत लौकीक जाला आहे. प्रांती जे आपण करतील तेच ईश्वर इच्छेनें होईल. पुर्वी पातशहानी माहाबतजंगास[4] लिहिले होते कीं, बंगाल्याचा दारमदार बाळाजीरायाचे विद्यमानें राज्यासी जाला. तुम्ही खातरजमा राखून खजाना पाठऊन देणें. येथून कराराप्रमाणें बाळाजी-रायाचे रुो देवऊन ऐसा फर्मान गेला होता. त्याचें उत्तर आले कीं, हजरत या प्रमाणें लिहितात ; व बाळाजीराव याची पत्रें येतात कीं, जर रघोजी भोसले बंगाल्याकडे आलेच तरी सरदार फौजेसुधा तयार आहेत. तुमच्या कुमकेस येऊन पावतील व आम्हासहि रघोजीची पत्रें वरचेवर येतात कीं, मी येतो. तर हा बंदोबस्त कोणे प्रकारचा ? जर राज्यासीं चुकोता जाला तर रघोजी काय म्हणून येणार ? व बाळाजीराव ऐसे काय म्हणून लिहितात ? व हा संदेह अद्याप कीमर्थ दूर होत नाहीं ? जोवर हा संदेह दूर जाला नाहीं तोवर माझ्यानेहि फौज दूर करवत नाहीं. व मुलुकही आबाद होत नाहीं. गंगेच्या कांठचा पुलुक तो वैराण. येथे एक कवडी उत्पन्न नाहीं. पल्याडील पाच रुो येतात

---

१ साहाय्य, उपराला.
२ जक = पराभव.
३ खडा.
४ अलिवर्दीखान.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ते फौजेंस खर्चतात. खजाना कोठून येईल व कोठून पाठवावा? बरें यैसेहि असतां रघोजी अगर त्याची फौज या साली नच आली तर अखर सालपावेतों सिबंदी वजा जाऊन जो कांहीं ऐवज बाकी राहील तो हजूर रवाना करीन, ऐसे पत्र आले. यांत सारांश इतकाच कीं, जोपर्यंत रघोजीचा यावयाचा पुर्ता संदेह दूर जाला नाहीं, व मुलुक आबाद जाला नाहीं, तोंवर पुर्ता खजाना देवणार नाहीं. इतकें तात्पर्य दिसून आलें. त्यास येथून मागती ताकीद गेली आहे कीं, क्षेपनिक्षेप रघोजी येतच नाहीं. तुम्ही फौज काशास ठिवतां? दूर करा व मुलकासही उत्तम प्रकारें कौलबेल देऊन पुरती वसाहत करा. दुश्चित किमर्थ राहतां? व खजाना झाडियानसी पाठवा. जर उणा अधीक येईल तर तितकाच उणा रुो बाळाजीरायास पावेल. त्याची तनखा तुम्हावर केली जाईल व सरकारचा जितका ऐवज राहील, त्याची सर्जावली[1] त्यासच सांगु. एवंच पुर्ता रुो जलद पाठऊन देणे, ऐसें धमकाऊन लिहीलें आहे. परंतु जोपर्यंत आपल्याकडून लिहिले गेले नाहीं, तोवर त्याची खातरजमा कसी होते? जेटवड जवळ आली. जर या साली रघोजीचे अगर त्याचे फौजेचे निघणे होत नाहीं, हा निश्चय स्वामीस पुर्ता कळला असिला तर काय चिंता आहे? सलाह असलिया ज्याप्रमाणें हजरून लिहिलें आहे त्याप्रमाणें आपणहि लिहावे. नादरशहाकडील वर्तमान आलें कीं बगदादचा पातशा अहमदशा आहे, त्याच्या विद्यमानें रुमवाल्यासीं व नादरशाहासी सलुखा जाला. रुमेकडून खातरजमा जाली. इरानचा तो बंदोबस्त आहेच. दुरानेमधे कोण्ही कोण्ही थोडी बहुत लबाडी केली होती. त्यांच्या पारपत्यास्तव हिरात म्हणून दुराणचे शहर काबुलेपासून सतरा मजली आहे, तेथें नवरोजाकारणें म्हणजे छ ९ रबिलावलीं दाखल होणार होता. तेथुन सिकारपुराकडे म्हणजे अटकेपार दाऊद पोतऱ्याचा मुलुक आहे, त्याच्या व आणीख कोण्ही काबुलच्या जिल्ह्यांत पठाण आहेत, त्याच्या शासनास फौज पाठविणार. व गरज पडल्या हिरातेहून स्वताहि येऊन पावणार, ऐसे वर्तमान वरचेवर येऊन पावले. त्यास ऐसा जबरदस्त दोलक्षा

* * * * * * * *

तरतूद करून ऐसा वजिरानी अर्ज केला. त्यानंतर पातशहानीं फेरोजंगाकडे[2] पाहिलें. हे बोलले कीं, आसफजहापासी चालिस हजार फौज तो मुकरर बारमाही असते. काम पडल्यावर आणीखहि विजापुरी वगैरे दक्षणी तीस चालिस हजार स्वार जमा होऊ सकतात. एवंच सतर एसी हजाराची तो भरती तयारच

---

१ तगादा.

२ गाजी उद्दीन निजामुल्मुल्कचा वडील मुलगा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाणावी. याजवेगळे मन्हाठे तो कमबेश[1] लाख फौज आहे. हेहि असफजाहासी सलुख राखतात व त्यांच्या म्हटल्यात आहेत. समयास रफीक[2] होतील. आज्ञा जालिया त्यासहि लिहून पाठऊं. पातशहा बोलले कीं बरें; वर्तमान तो लिहा; व त्याची काय मसलहत ते लिहून आणवा. बहुधा फेरोजंगानें बापास लिहिले असेल. मग पातशहांनीं सफदरजंगाकडे पाहिलें. हे बोलले कीं, मजपासी जो खजाना व माल आहे तो हजरतच्या निसार[3] आहे. येथें व सुब्यांत व ठाण्यांत मिळोन चाळीस हजार स्वार मजपासीं मोजूद आहेत. समयास जो पैका आहे तोहि वेचून ज्यासमई हजरत * * उभे राहतील ते समई आपल्या जानमालासी तसदुक[4] होईन. फते देणे ईश्वराचे स्वाधीन आहे. त्याजमधें जर मन्हाठे माझे पुरते रफीक आणभाषपूर्वक होत असिले तर हजरतनी तसदी न करावी. मग मजला आणीख कोण्हाची गरज नाहीं. रजपूत वगैरे कोण्हीहि पाहिजेत नाही. एक फौज त्यांची व एक फौज माझी इतक्यानसीच जो प्रसंग पडेल तो समजून घेऊं. ऐसिया जी ही गोष्ट सांगितली, पातशहानी सर्वाची अनुमतें मात्र घेतलीं, कोण्हास कांही उतर दिधले नाही. परंतु नित्यानी च्यार च्यार सा सा घटका एकांत हाच मजकूर असतो. पातशहास कोण्हाचाहि भरवसा वाटत नाहीं. कांहीं अंधपुत्राचा मानितात; परंतु समयास सलुक करायास लागतो त्याजपेक्षा काहीक अधिक आपल्याकडीलहि घावादावाची लढाई नादरशहाच्या तुल्य मानितात. अद्याप या गोष्टीचा सरवा (सराव?) आम्हासी कोण्ही कांहीं सरवा (सराव?) केला नाही. परंतु वजीर सफदरजंग, गाजुदीखां, राजे अफजुखां वगैरे जेव्हा याचे घरास जावें तेव्हां हे बोलतात कीं, जर नादरशहा दक्षणेस परभारें गेला तर तुमचे लोक काय करतील. जर इकडे आला तर तुम्ही काय तरतूद करून दाखवाल. आम्ही पृथक पृथक त्यासी हेच बोलतो की, जर तो परस्परे दक्षणेस येतो तर या गोष्टीची चिंता ईश्वर इच्छेने येथें कांहींच नाहीं. येका(ल)कीं काय प्रसंग होतो. यावत्शक्ति त्यास कोण्ही जिवें सोडावें असे तर नाहीं. मग नकळे. आयुष्य असलियां निघोन गेला तर नकले. जर हिंदुस्थानांत आला तर इकडील तरतूद तुमच्या विचाराचे स्वाधीन आहे. ज्या प्राा तुम्ही सांगाल त्या प्राा करतीलच करतील. सफदरजंग व वजीर बोलले कीं, तुम्ही आपल्या तरफेने बाळाजीरायांस लिहून त्यांची काय सला व ते याप्रसंगी कसकसी तरतूद करतील तेहि आणवा, ऐसें या उभयतांनीं सांगितलें. ऐसियास नादरशाह लक्ष वाटे तो न ये. कदाचित आला तर स्वामीचा काय विचार? कांहीं तरतूद आपल्याकडून

---

१ मुकरर. २ मदतनीस.
३ स्वाधीन. ४ हजीर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बनून येईल किंवा नाहीं. जर आली तर कोण्या प्रकारें, कोणत्या स्थळीं, किती फौजेनसीं, कोण्या करारावर, कसकसें चितांत असेल ते लिहून पाठविलें पाहिजे. कीं रोकडे पातशहास अर्ज करावयास जागा होईल ; कीं तेहि याप्रमाणें बंदेगीस हजर आहेत व याप्रमाणें तरतूद करूं इछितात. पातशहाचे मनांत विश्वासहि आहे कीं, जे मऱ्हाठे बोलतील ते करतील. तर आपला मनोदय काय तो लिहिला पाहिजे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे. कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶ *This letter giving details of the discussions in the Emperor's Court, shews how the Peshwa and his agents quietly worked themselves into the Emperor's favour and how he came to depend upon the Marathas in case of emergency. There is also a mention of a threatened invasion by Raghuji Bhosle into Bengal.*

No. 5] [*3-5-1747*

श्री

पौ ३० जमादिलौवल.

श्रीमंत राजश्री.....बापु स्वामीचे सेवेसी

पोष्य चिंतो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी, येथील कूशल तागाईत छ ३ जमादिलौवल पर्यंत यथास्थित जाणोन स्वकीये कूशल लेखन आज्ञा करित असिलें पाहिजे. विशेष. माधोसिंग याची फौज राजसिंग घोडचढा व कनीराम व नंदलाल दिवाण व सुरतसिंग शिवब्रम्हपोता ऐसें तोफखाना ऱ्हेकले व सुतरनाळ व जिजाला व बाणाचे उंट यैसें जुंजाचें सामानासी हाडोती प्रांतांचीं ठाणीं उठविलीं. धुम फारच केली. ऐसें जाणोन राजश्री मल्हारजी होळकर आम्हास घेऊन निघाले. कूच दरकूच कोटे प्रांतास बारियासी आलों. आखेराम कोटेकर तोहि शामील जाला. दरकुच मांगरोळ प्रांत हाडोती येथें गांठ घातली. छ १ जमादिलौवलीं च्यार घटका मागील दिवसापासून च्यार घटका रात्र पावेतों गोळागोळीचें युध्य जालें. उपरांत रात्र जाली तैसेंच घेरा घालून कंबरा बांधून घोड्यावर च्यार प्रहर रात्र उभेच राहिलों. छ २ जमादिलौवलीं जुंज प्रातःकाळापासून अस्तमान पावेतों जालें. कछव्याची तमाम फौज बुडविली. लुटुन पस्त केलें. मोठे मोठे पटाईत कछव्याकडील कामास आले. मोठें यश स्वामीस आलें. तमाम हिंदुस्थानांत नक्ष बसला. सरकार पागेस शेंसवाशें घोडे व उंटें आलीं. राजश्री सुभेदाराकडील व आम्हांकडील कांहींक लोक ठार पडले

---

१ सेवेस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व जखमी जाले. घोडीं ठार पडलियाची याद मागून सेवेसी लिहून पाठउं. राजश्री मल्हारजी बावास डाव्या हाताच्या मनगटास गोळीची जखम लागली. चाटून गेली. हालकी जखम असें. ईश्वरें खैर केली. त्याची चिंता न करावी. राजसिंग घोडचढा व साळग्रामसा हे दोघे सरदार मातबर व मोठे पटाईत कछव्याचे मारले गेले. सेवेसी श्रुत होये. विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असों दीजे, हें विनंती.

¶ *Letters 5 and 6 contain a description of a pitched battle on 2nd May 1747 near Mangrol (in the territory of Bundi) between the brothers Ishwarsingh and Madhaosingh, two sons of Sawai Jaisingh, who were fighting for the throne of Jaipur. With the help of Malharrao Holkar and Jayappa Sinde, Ishwarsingh inflicted a crushing defeat on his brother. The affair is reported by one Chinto Krishna to Bapu.*

No. 6] *[7-5-1747*

श्री.

छ ३ जमादिलाखर

श्रीमंत राजश्री.....वापु स्वामीचे सेवेसी.

पोष्य चिंतो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ ७ माहे जमादिलौवल पर्यंत येथास्थित जाणोन स्वामींनीं आपलें स्वकुशल लेखन आज्ञा करित असलें पाहिजे विशेष. आमचें वर्तमान तर अंतरवेद प्रांताहून उजेनीस आलों; पुढें देशास यावें तों हाडोतीं प्रांतें माधोसिंगाचे फौजेनें तमाम ठाणीं उठविलीं. धूम फार केली. त्याकरितां राजेश्री.....सुभेदार यानी आम्हां समागमें * * * * कूच दरकूच मौजे मांगरोल प्रांत * * * * कछव्याचे फौजेस बारा कोस धा * * * * * * घातली. छ १ जमादिलौवलीं दिवस च्यार घटका * * * * * राहिला. त्यासमयीं गांठ पडली. युद्ध (च्यार) घटका रात्र पावेतों गोळागोळीचें जालें. उपरांत च्यार प्रहर रात्र पावेतों घोड्यावर बसलेच राहिलों. त्यास कछव्याची फौज राजसिंग घोडचढा * * * * व कनीराम व नंदलाल दिवान व सुरतसिंग शिवब्रह्मपोता यैसें फौज दहा बारा हजार व तोफा, ऱ्हेकले, जेजालाचे उट वगैरें प्यादे जुंजाचा सरंजाम सुद्धां होते. त्यास छ २ जमादिलौवली रविवारीं रुजू इंदुवारीं जुंज प्रातःकाळपासून अस्तमान पावेतों जालें. कछव्याची फौज दरोबस्त लुटून पस्त केली. तोफा, ऱ्हेकले, घोडे, उंटें, हत्ती सर्व लुटून घेतली. माधोसिंगाचे (लोक) मोठे मोठे पटाईत कामास आले. कितीक ज * * * * * सांपडलें, शें दोनशें पळुंन गेले. वरकड * * * * * * * विलीं. हिंदु-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

स्थान प्रांतीं मोठा नक्ष जाला. मोठें येश स्वामीस आलें. सरकार पागेस घोंडीं शें सवाशें आलीं व उटें आलीं व हत्ती येक आला. ईश्वरें मोठें येश दिल्हें. हत्ती कोटेकरास दिल्हा. कोटेकराचे लोक राजश्री अखेराम पचोली व जालमसिंग झाले, व धायेभाई वगैरें रजपुत दोन तीन हजार फौज होती ; त्यांनीं स्वामी सेवेसी अंतर न केलें. आम्ही व राजश्री खानाजी जाधव, डाव्या बाजूस राजश्री सुभेदाराच्या होतों. शिंद्याच्या निशाणास शब्द लागों दिल्हा नाहीं. आपले बाजूस अवघ्याच्या आधीं उठावणी केली, स्वामी सेवेसी अंतर न केलें. श्रुत होये. सदैव पत्र पाठऊन परामृष करीत जावा. विशेष काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.....

No. 7] [*1747*

श्रीशंकर.

साहेबाचे शेवेसी विनंती विज्ञापना यैसीजे. इकडील वर्तमान तरी फौजेचा मुक्काम मनोहरपुरा[1] संनिध आला. मुलुकास उपसर्ग बहुत होत आहे व दिवान कनिरामजीचीहि पत्रे आली कीं मर्जी हाती नाहीं. त्याजवरोन बहुत चिंतातूर जाली आहे. राजे कारभारी[2] बहुत विचारात पडिले आहेत. याजवरी इभरत बहुत गोंलप पडिली आहे. भट राजे सदासिवजी याजकडे आजी रात्री साहा घटका गेलो होतो ; तो बहुत विचारात बैसले होते. इतकियांत राजे माधोसिंगजी याचे हुजूरचे बोलावणे, चोपदार जलद आला कीं, बहुत जलद बोलाविले आहे. तैसेच तातडीने हुजूर भटजी गेले. आम्हासी बोलिले कीं दिढा प्रहरा दरबारास जातो, तुम्ही येणे, इतके बोलोन हुजूर गेले. दबाव बहुत पडिला आहे. साहेबाचे प्रतापें करून सर्व कामाचा निर्गम करून सेवेसी येत असो. आज्ञापत्र येईल त्याप्रोंच वर्तनूक होईल. राजे माधोसिंगजी यांनीं सावधता बहुत करविली आहे. अभेरीची बंदोबस्ती उत्तम करविली. जमाव किल्यावर पाठवितात. गुरसावक्षी याजला अभेरीस उतरावयासी पाठविले आहे. जागा जागा नाकेबंदी किलियाची व शहराची करितात. बरकंदाज ठेवितात. काली दो प्रहरा कबिला सर्व थोरले राणी देखील सर्व अभेरीस पाठविला. आपण सडे शहरात आहेत. आजि आशिर्वादास हुजूर भोजनग्रहात गेलो होतो. दोन घटका हुजूर होतो. बहुत विचारांत राजे पडिले आहेत. हरसाहेजीस बोलावणे गेले आहे. त्याजपासी पाच सात हजार फौज आहे. दो चौ दिवसात तेहि दाखल होतील. आनखी

---

१ जयपुरच्या ड. ४० मैल. २ भारी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हि तरतूद होते. परंतु त्याचा विचार सर्व साहेबास श्रुत आहे. दबाव सर्व प्रकारें उत्तम पडिला आहे. मर्जीप्रमाणें सर्व गोष्टी होईल. उदईक जो विचार होईल, येथील प्रसंग जो ध्यानास येईल, ते सविस्तर लिहून साहेबाचे सेवेसी पाठवीत असो. विशेष काय लिहिणे. कृपा वृधीमान केली पाहिजे हे विज्ञापना. राजश्री सटवाजी राजाले (?) याचे कारकून वसुलाचे ताकिदीस दिवान कनिरामजी बराबर आले. ते येथेच आहे भटजीकडे जात असतात. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाती.

¶ *This news-letter seems to be addressed to the Peshwa from the Maratha camp near Jaipur. It describes the great terror and anxiety the presence of the Maratha forces had created in the mind of Madhosing.*

No. 8] [*1-8-1747*

श्री

श्रीमंत राजश्री.....भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक कृष्णराव बापुजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ५ रजब पावेतो यथास्थित असे विशेष. स्मरणपूर्वक कृपापत्र प्रविष्ट होऊन सनाथ जाहालो. ऐसेच सदैव कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. नवल विशेष वर्तमान लिहिजेसें नाहीं. यात्रेदाखल येदाची मुलुख (गीरी) जाहाली. (दी) लीचे पातशाः नाचरागरंगामध्ये निमग्न आहेत. दुसरा नादरशाहाचा भाचा आदलशा म्हणून फौजेसह वर्तमान दिलीवर यावयाचे विचारें कंधारेस आला. पुढे काय होईल ते पाहावे. मजल दरमजल सेवेसी येतो. भेटी-अंती सविस्तर निवेदन होईल. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. बहूत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶ *Krishnarao Bapuji (Parasnis ?) writes to Bhausaheb news from the Court of Delhi and news about the threatened invasion of Nadirshah.*

No. 9] [पौ. *21-4-1748*

श्री.

छ ३ जालोवल.

पु।। तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी राजश्री बगाजीपंत यांचे पत्र छ १३ राखरचे छं २३ मिनहूस आपणास आले. त्या पत्रांतील मजकूर पातशाही वजीर व शाहाजादा व अमीर यांची व पठाणांची लढाई झाली. वजीर कामास आला. उभयपक्षी बहुत लोक

---

१ ११-४-१७४८.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मारले गेले. पातशाहाची फौज काईम राहिली. पठाणानीं सिकस्त खादली. हें साद्यंत वर्तमान आपण लिहिलें ते कळो आले. राजश्रीस तुमचे विचारें आलें तर निवेदन करणे. नाहीतर पुसतील तेव्हां सांगणे, म्हणून स्वामीनी लिहिले. तर बऱ्हानपुराहून कासीद आले. त्यानी जबानी वर्तमान राजश्री स्वामीजवळ सांगितलें कीं, दिलीची पत्रें नवाबास आली. त्याचा मजकूर कीं, पातशाहाजादियाची व पठाणाची लढाई वरजोर जाली. वजीर कामास आला. दुतर्फा लोक फार मारले गेले. पठाणाचा मोड जाला. हे वर्तमान सांगितलें. दुसरें वर्तमान सांगितलें कीं श्रीमंत राजश्री पंत प्रधान दिलीस गेले. पातशाहाची मुलाजमत जाहली. पातशाहानी श्रीमंतास पुसिलें, तुमचे काय मुदे आहेत ते लेहून द्यावे. त्याजवरी श्रीमंतानीं उतर केले कीं, हजरतीची फते जालियावर अर्ज करूं. आधी ज्या कार्यास आलों, ते फते जाले म्हणजे आमचे कार्य होईल यैसा अर्ज केला. त्याजवरून पातशाहा बहुत खुषवख्त जाले. हे वर्तमान राजश्रीनी श्रवण केल्यावर आम्हास पुसिलें. तुम्हाकडे कांहीं वर्तमान आले की काय? त्याजवर आम्ही विनंती केली कीं कागदपत्र अद्यापि आला नाहीं. परंतु जबानी खबर याप्रमाणेंच आईकतो. त्याजवरी राजश्री बोलिले. प्रधान पंतानी पातशाहासी बहुत उतम समर्पक उतर केले. आम्ही सांगितल्याप्रमाणें दिलीस गेले. पातशाहा संतोषी जाले. उतम गोष्टी केली. तीर्थरूपांचा स्तव फारच केला. समाधान पावले. आम्ही उतर केले कीं साहेबाचे पुण्ये प्रतापे सर्व गोष्टी होतात. साहेबांची पूर्ण कृपा राजश्री प्रधान-पंतावर. तदनरूप त्याचीही पातशाहासी जाबसाल केला. या मजकुरावरून राजश्री बहुतच संतोष पावले. दोन तीन वेळ तीर्थरूपांचा स्तव केला. सांप्रत आपण वर्तमान लिहिलें हेहि राजश्री स्वामीस निवेदन करूनः सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ New-letter sent from Delhi to Bhausaheb stating an account of the fight of the Emperor with Abdali, in which Vazir Kamruddin Khan was killed; and of the subsequent visit of the Peshwa to the Emperor who was highly pleased with the former's demeanour.

No. 10] [*May 1748*

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान
स्वामीचे सेवसी.

विनंति. नवाब अमीरखान जिवंत असतां आम्ही राजा रघुनाथदास हैदर-कुलीखानी याचा पुत्र लाला नरसिंगदास नवाब मशारनिलेच्या विचारानरूप

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बंगाल्यास पाठविला, तेव्हां महाबतजंगास[1] लिहिलें होतें जे पातशहाच्या आज्ञेप्रमाणें श्रीमंत स्वामीनी बंगाल्याच्या तहाची बोलीचाली राजश्री स्वामीसी ठीक करून राजश्री रघोजीबावांस बंगाल्यास जायाची मनाई पाठविली आहे. कदांचित आज्ञा उल्लंघन करून जाईल म्हणून वराडांत सत्रा लिगाडें त्याजभोंवतीं उभीं केलींत, व सरदारांस दोन तीन वार पत्रें पाठविलीं कीं, इतका प्रयत्न केला असतां कदांचित निघून बंगाल्याकडे चाललाच तर तुम्ही पटणे व गयाप्रांतीं आडवे होऊन तंबी करणें. त्यास श्रीमंतस्वामीच्या आज्ञेप्रमाणें सरदारानी तयारी केली. बुंधेलखंडाच्या सरदेवर आहेत. पटणे गयाप्रांती येतात. रकारनामक आला तर पारपत्य करतील. तुम्ही आपल्या नायबांस लिहून पाठवणे कीं, या फौजेचा कोण्हेहि गोष्टीचा संदेह न धरतां सुखरूप आपल्याले स्थलीं स्वस्थचितें राहात व पातशाही खजाना झाडियानसी पाठऊन देणेकीं कराराप्रमाणें पैका श्रीमंत-स्वामीचे विद्यमानें राजश्री स्वामीस पावे; व पुढें त्या मुलकाचा उपद्रव तुटे, यैसे आम्ही व अमिरखानानी महाबतजंगास लिहिलें होतें; व लाला नरसिंगदासा-हातींहि हेंच सांगून पाठविलें होतें. त्यास नवाब महाबतजंगानें थैल्या तीन पाठविल्या आहेत. त्यास सरदारांच्या थैल्या दोन पाठऊन सेवेसी बजिनस थैली पाठविली आहे. अवलोकनेनंतर जें लिहिलें असेल तें कळों येईल. आम्हांस तों इतकेंच लिहिलें आहे, व नरसिंगदासाहातीं लिहविलें आहे कीं, जेव्हां राज्या-सींच बोली चाली ठीक जाली; तेव्हां रघोजीबावाचा यावयाचा संशये किमर्थ? राज्यांचा चाकर आहे. मुलकाचा तह जाला. आतां बोलाऊन घ्यावा. यैसेंही असतां श्रीमंत स्वामीसारख्यांस जेव्हां तो जाईल यैसा संशये आहे. तेव्हां माझ्यानें फौज कसी दूर करवते व मुलुक कोण्याप्रकारें वस्ता होऊं पाहतो व झाडून पैका मी कोठून पाठऊं? असो मी युध्यप्रसंगास सिधच आहें. आला तर मारितच आहे. न आला तर अखरसालपर्यंत जो खजाना जमा होईल तो पाठऊन देतच आहे. तुम्ही सरदारांस लिहा कीं, जर रघोजी येणारच असला तर रामगड अथवा पचेट अगर उडेशा[2]च्या मार्गे बंगाल्यांत येईल, तुम्ही पटणे गया प्रांतीं बसून काये कराल? जर तुम्हांस आगाउ समाचार तहकीक पावला कीं रघोजी तत्वता वराडांतून निघाला व क्षेपनिक्षेप बंगाल्यास येतो यैसे तुम्हांस ठीक कल-ल्यावर तुम्ही न बोलावतां व न लिहितां नीट बंगाल्यास येणें. तुम्ही व आम्ही मिळून त्यांस मारूं. जर आम्हांस आगाऊ समाचार पावतो तर आम्हीच सरदारांस वर्तमान पावतें करितों. माझें पत्र पावेल तेव्हां त्यानी नीट बंगाल्यास यावें, यैसें माहाबतजंगानें आम्हांस लिहिलें. व नरसिंगदासाकडूनहि लिहविलें त्याचें

---

१ अलीवर्दीखान. २ ओर्छा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उत्तर आम्ही त्यांस तावडतोब लिहून पाठविलें कीं, लक्षवाटे रघोजीबावास श्रीमंत स्वामीनी दक्षणेंत गोवले आहे. यकूण वीस विश्वे त्यास येऊं देतच नाहींत. कदाचित येखादा वाटा चालला तर सरदार बुंदेलखंडाच्या सरदेवर जाऊन बसले आहेत. यांच्या दबावानें कदापि तों येणारच नाहीं. तथापि आलाच तर दरकूच जाऊन पारपत्य करितच आहेत. तुम्ही आपल्या जागां मात्र सावध राहणें व पातशाही खजाना झाडियानसी पाठऊन देणें. या प्रकारें आम्ही माहाबतजंगास उत्तर लिहिलें; व हजुरच्या उमद्याकडून याच प्रतीची द्रव्याविशईं ताकीद लिहविली आहे. स्वामींनीं थैलीचा जाब जो लिहावयाचा असेल तो सीघ्र आम्हांपासीं पाठविला पाहिजे. ईश्वरइच्छेने व स्वामीच्या प्रतापें रघोजीबावांचें येणें होतच नाहीं. यैसा भरंवसा असिला तर येतद्विषईं जे खातरजमा करून त्याहावयाची ते लिहावी व रुपयाविषईं बहुतसी ताकीद करून त्याहावी की तनखा हेप्रमाणें पांच लाख रुपये पत्रदर्शणी बापूजी माहादेवापासीं पावते करावे. व पातशाहीखजाना येकदाम बाकी न ठेवितां झाडियानसी दिलीस रवाना करा[illegible], म्हणजे करारापमाणें राजश्री स्वामीचे रुपये श्रीमंत स्वामीचे हातून सत्वर पाव[illegible] होत आणि पुढें उपसर्ग त्या मुलकाचा तुटे. रुपये सत्वर न पावल्या, पातश[illegible] आमचीहि तनखा तुम्हांवरच करिल व आपल्याहि खजिन्याची सजावली आम्हां[illegible] सांगेल. तेव्हां अम्हांसतो ज्यारीतीनें काम होय त्यारीतीनें सजावली क[illegible] लागेल. यास्तव पैका सत्वर पाठवावा. याप्रकारें द्रव्याविशईं ताकीद लिहि[illegible] जर यंदा रघोजीकडील खातरजमा असली तर माहाबतजंगास खोळून [illegible] कीं रघोजीस सहसा येऊं देत नाहीं. जिमा आमचा जाला. तुम्ही [illegible] दूर करणें व पैका झाडियानसी दिलीस पावणें. यैसें लिहिलेप्रमाणें [illegible] नरसिंगदासासाठींहि च्यार गोष्टी लिहाव्या कीं तो उमदा माणुस आहे. आम[illegible] जाबसालास तुम्हांपासीं ठिवला आहे. त्याचा गौर सर्व प्रकारें करित [illegible] यैसेंहि अगत्यरूप लिहिलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होये. बहुत काय लिहिणें. [illegible] केली पाहिजे हे विनंति.

¶ *Hingne from Delhi to Peshwa at Poona. Reports the fear wi[illegible] the Emperor entertains about Raghoji Bhosle invading Bengal and stopp[illegible] the Bengal revenues coming into Delhi.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान स्वामीचे शेवेशी

विनंति. स्वामीनीं अज्ञापत्री लिहीले कीं, आम्हास ईश्वरसिंगयाचे सर्व प्रकारे अगत्य. ईश्वरसिंग यासी काहीं दुसरा विचार नाहीं. ऐसे असोन जे करणें ते त्याचे हितावह व लौकिकास उचित आणि बहुत दिवस केलेप्रमाणें चाले तोच अर्थ योजून सरदारास लिहिणें ते लिहिले आहे. तेहि हेच गोष्टीवर कायम आहेत. दुसरा विचार करणार नाहीं. मलजीनी या गोष्टीचा संशये चित्तात न आणावा. सरदार सांगतील त्याप्रमाणे निकाल काढून, कलह तोडून, निखालसता करून टाकावी हे उचित असे. त्यास न कलेसे काय आहे? सांप्रत ईश्वरसिंगजी काय करितात? सर्व किरकोल व मोठे वर्तमान तुम्हाकडून वकील आहे त्यास लिहून तो वरचेवर येथें लिहून पाठवी यैसे करणे म्हणून पुरवणी पत्री आज्ञा केली. याचप्रकारे येकदोनदां सरदारानींहि लिा. स्वामीचे मर्जीनरूप व सरदाराच्या लिहिल्यानरुप आम्ही जैपूरकरास वरचेवरी पत्रे लिहिली. व गोविंदराव तमाजीकडून जे प्रत्यक्ष सांगावयाचे ते सांगविले. त्यानीं हेच उत्तर दिधले कीं हे गोष्ट यथार्थ. त्याचा आमचा स्नेह अलोलिक[1] व पिढीजाद आहे. महाराज बैकुंठवासी व श्रीमंतराऊ कैलासवासी यासी कोण्या प्रकारे इष्टत्व निभलें, महाराजानीं काय काय कामे श्रीमंताची केली, हे बाळाजीरायाच्या ध्यानांत नाहीं यैसे नाहीं. आताहि आम्ही सर्व प्रकारें त्यांच्या वचनावेगले नव्हतो. परंतु हा दायादांचा विचार आहे. त्याजमध्यें आम्ही राजे लोक. जे वंशपरंपरेने चालत आले असेल तेच केले पाहिजे. हा भुमीचा कजिया आहे. कसा देववतो? चाकरीच्या नात्यानें जे सरदारानीं पूर्वी देवविले ते दिधले आहे. आधिक द्या म्हटल्यास विनायुद्ध कसे अनकुल पडतें? सर्वा राज्यांत कनिष्टास विभाग देऊन आपल्या आगीं कपुतेपण[2] व नामर्दी कशी घेवते? असो श्रीमंत स्वामीचा व सरदाराचा हाच हेत. त्यास पहिल्यापेक्षां विशेष देववायाच आहे तर हे तो घडणे नाहीं. राज्य ईश्वराचे देणे आहे. ज्यास ईश्वर देईल तोच घेईल. परंतु पगडी बदलली. त्याची फलश्रुत इतकीयातच दाखविली. असो जे त्याणी केले असेल तेच उत्तम जाणूनच केले असेल. यैशी हटनिगृहाचीच उत्तरें युद्धापूर्वीच देत होते. अंती युद्धच करून आपला लौकीक केला. त्यास सवाईजीचा पुत्र

---

१ अमोलिक, अलौकिक?

२ कुपुत्रता.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अंबेरचे घराणे हमेशा राणा राठोड हाडे यासी छकड देत आले असतां, त्याची छक्कड ईश्वरसिंग खातें यैसेहि तो नाहीं. ज्याचे घरांत आजी कछवा हाच लाखी माणूस दुसरे सवाइजीपेक्षां हे रजपूतीची टेंक राखत असताहि स्वामीच्या घरास आपलेच घर जाणत होते; समयास यांणीं जे कामे केली ते दुसऱ्यानें केली न केली; हे हि स्वामी जाणतच आहेत. असो, जे होणार ते जाले. बदनक्षी बहुत जाली. पुढें पहावे काय काय होते. ईश्वरसिंगानीं झाडून फौज एकवट केली व करितात. सरदाराचा वसवास. या करितां मुलुक उजाड करविला. सरदार कालपी जवल आहेत. शेवेशी श्रुत हे विनंती.

¶ To Peshwa by his agent in Rajputana : Reports that Ishwarsingh has taken offence at the support the Peshwa gave to Madhaosingh.

No. 12] [*19-6-1749*

श्री

पो ८ सावान.

सेवेसी विनंति उपरि. दिलीकडील वर्तमान पातशाहा वजीर फेरोजंग इतजामत दौला हे दिलींत आहेत. मिरमनु लाहोरेस आहेत. इरानीदुरानी परस्परें विमनस्क आहेत. मकसुदाबादवाला यथास्थित आहे. राजे अभेसिंग, राजे इश्वरसिंग, राणाजी व हांडे आपापल्या मकानीं आहेत. नवल विशेष लिहिनेसें नाहीं. आम्हां येथील गुंता लोकांचा उरकल्यावरी सेवेसीं येऊं. विदित जाहालें पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶This and the following seven letters, all in the hand of Ramchandra Baba, addressed by Jayappa Sindia to the Peshwa from his return-journey to the Deccan from Delhi. The Sindia and the Holkar had accompanied the Peshwa in his previous year's expedition to Delhi. The Peshwa had an interview with the Emperor but had suddenly to return to the Deccan in view of Shahu's failing health, leaving behind Jayapa and Malharrao to complete the new policy which they had planned in concert with the Emperor. But the Nizam's death, May 1748, and the subsequent movements of Nasirjang towards north altered the situation. Jayapa and Malharrao are described as proceeding to Poona.

No. 12a] [*19-6-1749*

पौ ८ सावान.

श्री.

सेवेसी विनंती उपरि. होलकर येऊन राजश्री विठल सिवदेव, राजश्री अंताजी माणकेश्वर यांकडील बंदोबस्त जेथवरी जाहला तेथवरी कांहीं ठाणी बसऊन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिल्हीं. राणा जाट व नरवरकर याची खंडणी वसुलाचा निर्वाह करविला. तेथून शाहाबाजेस आलों. तेथील खंडणीचा वसुल घासदाणा बारा हजार केले. तेथून खिचीवाड्यांत आलों. निमे वसुल तूर्त व निमेचा वाईदा करून तेथून उजेनीकडे यावें तों नासरजंग अकबारपूरच्या घाटास येऊन पोहोचले. तेव्हां ते गोष्टीचा विचार केला पाहिजे. यास्तव मकुंददऱ्याच्या सुमारें कोट्याकडे पंधरा रोज राहिलों; तों नासरजंग माघारे गेले. आम्हीं येऊन उजेनिस दाखल जाहालों. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञाप्ति.

No. 12b] [*25-6-1749*

पो ८ साबान

श्री.

श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान.

स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक जयाजी सिंदे कृतानेक विज्ञापना. तागायत छ २१ रजब मुकाम उजेन स्वामीच्या कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. स्वामींचें आज्ञापत्र आलें, तेथें आज्ञा कीं कोठें आहां? काये मनसुबे करितां? देसी कधीं येणार? सत्वरी दर्शनास यावयाविसीं आज्ञा केली. त्यासी आशाढ शुध पौर्णिमा जालियावरी द्वितीयेस उजेनीस आलों. लोकांचा रवानगीचा गुंता उरकला पाहिजे. येदा अर्जबाब देखील लोकांस न पावली. लोकांची कटकटहि पडली आहे. यैवज करून लोकांची रवानगीचा निकाल करून सेवेसी येतों सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

No. 12c] [*1-7-1749*

श्री.

विनंति सेवक रामचंद्र मल्हार कृतानेक विज्ञापना. तागायत छ २७ रजब मुकाम उजेन स्वामीच्या कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री हरि विठल याणी स्वामीचे आज्ञेप्रमाणें चाकरी उत्तम रीतीनें केली. परस्पर सेवेसीं विदित जाहलीच आहे. प्रस्तुत धारेस राजश्री राघो केशव गेले. आण मशारनिले यासी सेवेसी रवाना केलें आहे. या प्रांतीचें व आपले वृत्त विदित करितील. कृपाळू होऊन सर्व प्रकारें ऊर्जित करावया खावंद समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञाप्ति.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 12d] [1-7-1749

श्री.

सेवेसीं विनंति उपरि. उजेनिस आल्यावरी लोकांचा गवगवा उदंड पडला. कां कीं, दुसाला लोकांचे राहणे यामुळें कर्जदारीहि जाहले. घोडीं पडलीं. कितेक गवगवे अर्जबाब रवानगी हे तो जरूर दिल्हे पाहिजे. त्यासच पैका जथल्यांविना निर्गम होत नाहीं. कमाविसदार जमा करून वाट करून लोकांची समजाविसी काढून सेवेसी येऊं. नवल विशेष या प्रांतींचें वृत्त त्याहावेसें नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाति.

No. 12e] [19-6-1749

पौ ८ साबान

श्री.

विनंति उपरि. नवाब वजिर याणी कितेक गोष्टी बोलल्यात आल्या होत्या; आणि नासरजंग दिलीस गेले, आम्ही उगेच राहिलों तर आमचाहि आब न राहे, आण पुढें ते कधीं आम्हास सुद पडों देणार? यास्तव यासी कटकट करावीच परंतु आपल्याच मुलकांत जुझल्यानें खराब मुलूख होईल, यास्तव राणाजी अथवा कोटेवाल्याच्या तालुक्यांत कटकट करावी. यास्तव कोट्याच्या तालुक्यांत पंधरा रोज राहिलों. तो नासरजंग माघारे गेले. त्याचा, आमचा व दिलीचा सर्वी गोष्टींचा भ्रम राहिला. उत्तम जाहालें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

[1-7-1749

No. 12f] पो ८ साबान

श्री.

सेवेसी विनंति उपरि. दिलीकडील राजकारण यथास्थित राहिलें आहे. नासरजंगहि दीर्घद्रीष्टीनें गेले. यामुळें हाहि प्रसंग यथायुक्त राहिला. वरकड बुधेल खंडातील जें येथाज्ञानें खावंदाच्या तेजप्रतापें घडोन आल्यानरूप कार्य केलें. वरकड राजश्री मल्हारबा आम्ही तीन च्यार महिने येक जागां आज्ञेप्रमाणे राहिलो.

---

१ मिळाल्याशिवाय.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येथाकदाचित रंगच राहोन उजेनिस आलों. ते इंदुरास गेले. सविस्तर कलावें यास्तव विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

No. 12g] [*1-7-1749*

पो ८ सावान.

श्री.

सेवेसी विनंति उपरि. आज्ञा पत्र आलें. त्यांत लिहिलें कीं, कांहीं वर्तमान कां लिहित नाहीं? यैसियासी जे कार्य जेव्हां करणे त्या आगोधर सेवेसीं विनंति लिहित गेलों. तें कार्य जाल्यावरी विनंति लिहित गेलों. कागद न पावले म्हणावे तरी जाबहि येत गेले. येक गोष्ट आहे कीं येथील विनंति पत्रीं मार्गी असतां आज्ञा पत्र आलें असेल. आम्हीं तो आज्ञा पूर्वी केल्याप्रमाणे सविस्तर लिहितच आहो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

No. 13] [*23-6-1749*

श्री.

छ १९ रजब

पुरवणी श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंति यैसिजे. नवाब निजाममुद्दौले नासरजंग यानी हजूर यावयाचा बया केला तो जाहीरदारींत तों पातशहाचे कदम पहावयासी यावें, आणि सलतनतीचा बंदोबस्त करावा, हेच मात्र माझी आस्जु आहे; आणि विजारत इंतजामुदौलाची इंतजामुदौलास द्यावी, आणि सफदरजंगास काढून द्यावे, हे तो भावाबंदास लिहितात. सफदरजंगापासी मखंदी वकील आहे त्यास लिहितात जे, मजला महज (?) एक मन्हाटी याची तंबीहि करणें आहे. यासी मी हूजूर येतो. तुम्ही आम्हावर तवज्जें करून दाक्षिण बाहाल करवावी. आणि मीरबकर्शागीरी जुलफकारजंगानीं घेतली. ते मात्र अम्हास देवावी. तुम्हीं आम्हीं एकचित्त होऊन सलतनतचा बंदोबस्त करावा. त्यासी हिंदुस्थान आवघी बालाजीरायानीं आटोपली आहे. त्यास हे बेइमान यैसे आहेत. तुम्हीं याचे भरवसियावर जाल तर दगा खाल. हे दगा देतील. एक रुपयाचे यास अशनां आणिक कोणीही गोष्ट मठ (ह) नजर नाहीं. तुम्ही मशीं कौल

---

१ बाह्य देखावा. २ मक्तदारी. ३ कृपा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहद करून बालाजीरायाचें तंबीचीच तजवीज करावी. म्यां तुमचे तांबेदार असावे. हे पत्रे बजिन्नस नवाबाही आम्हास दाखविली. नवाबाही सांगितले जे बालाजी-गयाचा विश्वास जैसा लिहितात, यैसा असिला तर मी नासरजंगासच स्नेही करीन. मग तुम्ही शेब्द न ठिवावा. आम्ही विनंति केली. दुरुस्त नवाब म्हणतात. परंतु नवाब या दुराणियाचे पाचा पेचास वाकफ नाहींत. पातशहास त्याप्रमाणें लिहितो; भावास त्याप्रमाणें लिहितो; नवाबास याप्रमाणें लिहितात. ते महज (?) येवढें गोष्टीं करितां जे नवाबासी बालाजीरायासी स्नेह याकारितां एक वसवास आहे. त्यासहि शत्रू केले म्हणजे एकच नवाबास केले. नवाब बोलले जे जर बालाजी रायाची आमची सत्य स्नेह आहे तरी सरदारांहीं आडवे नासरजंगास व्हावे; तुम्ही जाऊन या गोष्टीचा पका विचार करा. मीं खर्चासहि देतों. जर तुम्ही हें न केले तरी पन्नास हजार स्वार मजजवलहि आहेत. चहूंकडून फौज येकत्र जाली तरी एकदा पाहिजे तैसी लढाई करीन. स्नेहाची परिक्षा याच समई आहे. आम्ही मतलब लिहून दिधले, त्यांत कांहीं मंजूर कांहीं नामंजूर केलें. येथून ठीक करून सरदारांजवल गेलों. तेथील विचार पाहिला तो नासरजंगाची बिघाडा-याची मर्जी न देखली. त्यांनीं म्हटले जे रामेश्वरापासून दुराणी अटकेपर्यंत असे-ती यासी पातशहासहवर्तमान बिघडल्यानें परिनाम उत्तम नाहीं; आणि नवाब वजिरास नाहीं म्हणता न येत. यास्तव यैसे मतलब लिहिले जे, हे करूं न सकेत ते मतालब परभारे नवाबास कलले. त्यावरून बहुतच बर्‍हेम[1] जाले. मुख्य गोष्ट यासी स्वामीच्या स्नेहाचा भरंवसा होता. तो सरदारांच्या बोलन्यावरून पुचसा (पुष्कळसा) कलला. निगादास्त ज्यारी आहे. नवलरामास वगैरे चहूंकडून फौजा बोलाविल्या. पातशहा जाहीरदारींत यासी म्हणतात; शुके मनाईचे नासरजंगास लिहितात. परंतु अंतस्थे बोलावितात. त्यास पातशहाचे ह-रद्द मनास आणितां हेच जे, यांचा दबाव त्यास त्यांचा दबाव यासीं दाखवून दोघांचा परस्परे स्नेह करून एकास मीरबकसीगीरी, एकास विजारत देऊन, त्याच्या जागिरा देऊन, आजमेर, आगरे, इलाहाबाद या सुभेदाराच्या फेरोजंग, इंतजामुदौलेयासी द्याव्या; आणि बाहेर निघून रजपूत वगैरे सर्व मिलऊन बंदो-बस्त करावा. त्यासी बंदोबस्त म्हटल्यासी स्वामीचाच; आणिक कोणता बंदोबस्त आहे? ये समयीं फौजा हिंदुस्थानांत स्वामींच्या नाहींत. सरदार उलटे दक्षणेस चालले. येथील हद्द या प्रो जाली. ईश्वरसिंग कोटेवाले यांणीं नासरजंगाकडे जावयाची तयारी केली आहे. महाराजे ईश्वरसिंग यानीं बुंदी वगैरे जिला माधोसिंगास देविला, तोही उठवावा, कमाविसदार उठवून द्यावे, या गोष्टींत

१ खिन्न.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

परवर्तले आहेत. त्यासी हे सिवाये नासरजंगाचे वलगने वेगले करीत नाहींत. दुराणियाचे साहित्य केले नाहीं, त्याकरितां दुराणी अजुर्दा सफदरजंगास साफ जाबपेक्षां आधिक मतालब घातले असतां, तो अजुर्दा मथुरेसंनिध आले असतां, पातशहास काये काये उमेद सेवेसी दाखवून, सफदरजंग वगैरे सर्व बजिद असतां निघून दिधले. तैसेच नासरजंगाचे हे मनोरथ स्वामीच्या प्रतापे पूर्ण होतील. स्वामीच्या पुन्यें प्रतापे करून नासरजंगास इल्के करून नासरजंग हात चोलीत म्हणेत जे बालाजी रायाचे वकिलानीं मजला हजुरांत खर्फीद केले. नाहीं तर सलतनचा एखक्तियार माझा जाला होता. असो; आमलात येईल ते खरे. परंतु स्वामीनीं खासा स्वारीची तयारी होऊन दसऱ्यादिवालीपर्यंत तरी मजल दरमजल चालने होय, तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Hingne from Delhi to Peshwa at Poona. Reports Nasarjung's plans at the Emperor's Court.*

No. 14] *[2-8-1749*

श्री.

पो छ १० जिल्काद

पुरवणी श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना ऐसिजे. रजवाडे भूमिया लाहान थोर याची नजर फिरली. आधींच स्वामीची फौज न आली. दिवसगत आम्हां मामलेदारांस लागली यांजमुलें मनास येईल त्या खबरी उठविल्या होत्या. हलीं नवलराये मारले गेले. दिलीहून वजीर बाहिर निघाले. हेंहि सर्वांनी आईकोन आतीशयें करूं लागले आहेत. त्यास स्वामीचें येणें उत्तम. दुसरे वजिरावर येऊन मसलत पडिली आहे. या समई स्वामीची फौज येऊन वजिराची मदत जालियासी वजिर स्वामीचा पाडाव होईल जर करितां पठाणासी लडाई पडिली, वजिरशाहीं.....तर तमाम सर्वांचें सूत्र कमरदीखान याचे पुत्राचे व गाजदीखान व तमाम मोंगल व पठाण याचे येक आनुसंधान आहे. तेव्हां नासरजंगाचा पक्ष भारी पडेल. वजीर कायेम आहे आणि स्वामीनी वजिराची मदत केलियानें सर्व स्वामीची पातशाही आहे. त्यास स्वामीस

---

१ फजीत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दक्षणेंत कामकाज पडिलें आसिलें तर हें कार्य मातबर. या कार्ये जाहालियास सर्व कामें साधतील. त्यास स्वामीचें येणें न होये. सरदारास पाठवावें. त्याचें येणें न होये तर दाहा हजार फौज कोणी मातबर पाठवावे. आम्ही मामलेदार दोघे तिघे आहो. स्वामीचा नक्ष राखोन परंतु या कामास तिलमात्र विलंब न करावा. विलंब जालियास आटोपतां मुसकील आहे. या प्रांतीं सालगुदस्तां पाणी आशाड श्रावण मासीं बहुत आतीशये लागला. तेणेंकरून खरीप बुडालें. हस्ताचें पाणी या प्रांतीं येकवार न लागलें. मोहोटहि लागावी तेहि न लागली. येणे करून रबीहि बुडाली. इतकें आसोन धान्य स्वस्त जालें. त्याजला कोणी येकवार घेत नाहीं. त्याजमुलें रयेत बहुत हैरण जाली. पेरलें बीज रबित उपज जाली नाहीं. तमाम पाटील.....मोठी हैराणगत.....तेव्हां गांवेंगाव पेवे घालून ठेविली. सालमजकुरीं आशाड श्रावण पावेतों पाऊस लागला नाहीं. तेणेंकरून खिरिफ बुडाले. हलीं श्रावण वद्य अमवशेस पाणी लागलें आहे. या प्रकारें वर्तमान आहे. सारांश हा प्रांत स्वामीचा भारी आहे. इकडील माणूस मोठें बेईमान.....देसी आहे. त्यास स्वामीनी इकडील सत्वर सावधानी करावी. हे वर्तमान तें लिहिलें आहे. वरचेवर होत जाईल तें लिहित जाऊन. साल गुदस्तां निमे वसूल जाला नाहीं. मागाहून जें वर्तमान होत जाईल, ते सेवेसी लिहून. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *This and the following are letters addressed by Govind Ballal to the Peshwa describing the activities of the Rohillas, who were harassing Vazier Safdarjang whose agent Navalraya was killed in an action by the Rohillas at Khudaganj on 15th July 1749. The letters describe the unsettled conditions of the Doab. It was to crush the Rohillas that Safdarjang had to bring in the help of the Marathas.*

[*28-9-1749*

No. 14a]

श्री.

छ १० जिल्काद.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक गोविंद बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागायत भाद्रपद वद्य त्रयोदसी पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान

---

१ वळिवाचा पाऊस.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येथास्थित असे विशेष. कायेमखान बंगस यांसी व सर मुरादाबादवाला महमद-अलीखां पठाण याचे पुत्रासी पेशजीं जूज होऊन कायेमखान फौज लुटली गेली. त्याजवर नवाब मनसुरआलीखां येऊन फरकाबादेस ठाणें बसविलें. जागा तमाम घेतलियावर कायेमखानाची आई होती, व अहमदखान भाऊ होता, त्याणी नवाब मनसूरअलिखां याजकडे जाऊन रदबदल केली. तेव्हां त्याणी फरकाबाद वगैरे बारा गांव देऊन त्यांची स्थापना फरकाबादेस केली. नवाब दिलीस गेले. नवलराये बक्सी फौजेनसी अंतरवेदींत राहिले. त्यांजपासून कांहीं फौज निरोप घेऊन गेली. सात आठ हजार फौज नवलराय यांजबल राहिली. फौज थोडकी पाहून कायेमखान याचे आईनें व भावानें तमाम पठाण फरुकाबाद व महमद अलिखान यांचे पुत्रासी स्नेह करून, तमाम पठाण येकत्र आठा रोजांत पंधरा वीस हजार जमाव करून, ठाणी तमाम मनसूरअलिखानाचीं उठविलीं; आणि नवलराये कनवजेवर (कनोज) होते, त्याजवर चढोन आले. श्रावण शुध द्वादसीस खुदागंज येथें अहमदखानाचें व नवलरायाचें जूंज जालें. नवलराये मारले गेले. पांच हजार पठाण, रजपूत व प्यादे कामास आले. पठाणाची फते जाली. हें वर्तमान नवाब मनसूरआलीखान यांस कललियावर खासा दिलीहून कूच करून दोन मजली आले. हें वर्तमान अहमदखान पठाण यासी कललें. यावर हेहि त्याचे रोखें दोन मजली कूच करून गेले. हेहि जमाव करित आहेत. वजिरहि जमाव करितात. त्यास महमदअलिखान रोहिले त्यासी व फरकाबादवाले पठाण यास स्नेह जाला. पांच हजार फौज, दाहा हजार प्यादे यांचे मदतीस त्याणी पाठविले आहेत. वजिराबरावर तीस हजार फौज आहे. दिलींत फितुर जाला आहे. त्यास जें वर्तमान होईल तें वरचेवर सेवेसीं लिहीत जाऊन. या प्रांतीं गडबड बहुत जाली. पातशाहींत कजिया जाला आहे. अयोध्या प्रांतीं व लखनऊ व अंतरवेदींत तमाम जमीदारानी कजिया केला आहे. त्या समई स्वामीची फौज वीस हजार असती तर स्वामीचें कार्य होतें आणि तमाम नक्ष होतो. पातशाहींत कजिया, याजमुलें तमाम जमीदार लबाडीत आले आहेत. श्रीमंत महाराज छत्रपती स्वामी कैलासवासी जाले. या प्रांतें फौज व मामलेदार कोणी जेष्ट पावेतों न आले आणि या प्रांते फौज होती ते देशास गेली. श्रीमंत राजश्री नाना-स्वामीसी व श्रीमंत राजश्री महाराजासी कजिया जाला. आपसांतच कजिये लागले. या प्रांतें कोणी येत नाहीं हे सर्वानीं मनसुबे रजवडे भूमीये जमीदार याणी करून येमुना तीर प्रातें कजिया केला. गांव जागा बहुत मारली, लुटली, जालिली. आशाड श्रावण पावेतों कजिया यामुलें जमीन ... ते न ... ली. तमाम जमीनदारानी खराबी केली. राजश्री नारो शंकर याचेहि जागेयांत कजिया बहुत जाला.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हें साद्यंत वर्तमान पेसजीचे पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून विदित होईल. सारांश पातशाहींत गडबड जाली. याजवरून सर्वत्र गडबड जाली. त्यास आजि आसा समये होता जे, स्वामीची खासा स्वारी होती, तर मोठमोठीं कार्यें पातशहाचीं हातीं लागती. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

No. 15] [*8-12-1749*

श्री,

पुर्वणी श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी.

विनंति. राजश्री सवाइजीचे हरकाऱ्यांची जुबानी अर्ज जाहली कीं, मार्गश्वर शुध दशमीचे दिवसीं राजा रामसिंग व बख्तसिंग या उभयेतांसी मेरत्याचे समीप युधप्रसंग जाहला. दीड दोन हजार माणूस कामा आलें. शेरसिंग मेरत्या व अणखी येक दोनी उमदे मारिले, पडले; व बख्तसिंगाकडील यांत बिकानेर वाला मोठा सरदार व पांच साहा सरदार, जेरामसिंगजीकडून निमकहरामी करून गेले होते तेही मारिले, पडले; व खुद बख्तसिंगासी बर्छी व गोलीचा घाव लागून दोनी कोस हटला. शिकस्त जाहली. रामसिंगजीची फते जाहली. त्यासी पाहावें, मागती तहकीक कलमी काये वर्तमान येतें, त्या प्रमाणें सेवेसी विनंती केली जाईल. वजिराचीहि तयारी निघायाची लागून राहिली आहे. राजश्री मल्हारराऊ होलकर यांचा मार्ग लक्षितात. हेहि बुंदीचे जिल्यांत येऊन पावले आहेत. तिकडीलहि जाबसाल व राजारामसिंगजीकडील व बख्तसिंगजीकडील अत्रे[1] चौंकडील लागिलें आहे. पाहावें कोणे रीतीने कोणता रोख करितात. हाल तर राजश्री सवाईजी * * मुबलग बाकी व रामसिंगजी बाबत हवा (ला आ–) ..... टपला. याजकरितां दबाव दिधला; व ताकीदपत्रेंहि लिहिलीं आहेत. येथून सदाशिव दिक्षित व बकशीराम व जे—गोपाल मुनसी व गणेश यादव व यादो शिवदेव हे सकलहि त्यांजकडे घोडीं वस्त्रें व कांहीं निशापातीसहित बिदा केले आहेत. मजहि यां सर्वांसमागमें दिधलें आहे. पाहावें तेथें पावलियावर काये योजून येतें. वजीरजी तर पठाणावर जायास्तव बहुत बजीदी बाहशाहजिसी करितात. बादशाहजी उतावली न करणें म्हणून खातरदारी रक्षून पठाण व दुरानी यांजकडे अंतस्ती डौल देतात. चित्तश्रुधता पुर्ती दिसत नाहीं. जाट वजिरजीचे बोलावण्यानरूप दिलीसमीप गेला. वजिरजीचें भले माणूस सामोर आलें. किशनदासजीचे तळ्यापावेतों खुद येऊन जाटासी भेटून संभाशण शपथपूर्वक करून बिदा केलें. व खुद फिरून हवेली

---

१ सूत्र, अनुसंधान.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दाखल जाहले. अंतस्ती बादशाहजींनींहि जाटासी आपले मायेंत घेतलें आहे. पठाणानें कूल वजिराचे जिल्यात दरोबस्त अमल दाखल केला व करित जातो. ऐसें वर्तमान आहे. इतकीयावर पहावें काये घडोन येतें. कोटेवाल्याची मामिलत पाचा लक्षावर चुकली म्हणून वदंता आहे. राणाजीकडील व माधोसिंग व उमेदसिंग याजकडीलहि मातबर बोलीचाली निमित्य येऊन पावले आहेत. माधोसिंगजीहि नेणव्याचे मुकामी येऊन शामील होणार. नेणवे या ठिकाणीं ठाणें बसऊन कबजेंत आणावें; किमर्थ कीं, करारा माफिक न उतरला. किशनसिंगानें लबाडीवर चित्त दिधलें, याजकरितां हें करणें त्यासीं जरूर जाहलें. त्यासी जें कांहीं घडोन येईल तें मागून विनंती करीन. राजश्री सवाईजीकडे तर निघतात मुबलरावयानीं (?) शाकाये लवणाये प्रारंभ केला आहे. तेथें पावल्या नंतर पाहावे परिणाम कसा घडतो. पुरातन जे कोणी मुतसदी आहेत, त्यांस मोठा ऱ्हुद्रोग लागला आहे. त्यासी येक केशोदासजी त्याची तर ते गती जाहली. राहिला हरि गोविद व विद्याधर. हे असले नसले बराबर. व तोफखानियाचा दरोगा कदीम शिवनाथ भया म्हणून होता त्यासीहि सांप्रत कालीं जनबाच्यासुधां कैद केलें. व केशोदासजीचे स्त्रीवर सिपायांचा दंगा बहुत जाहला. सरकारांतून ढीलढाल अथवा दिवसगतीचा प्रसंग आडलला. याजकरितां वस्त्रपात्र देऊन सिपाईची तलब चुकाविली जाते. व तमाम जिला उद्वस होत चालिला असे. विदित होये. मागून जें कांहीं नवलविशेष होईल ते सेवेसी विनंती केली जाईल. हे विज्ञप्ति.

¶ *Civil war in Jodhpur between Ramsing and Bakhtsingh. Details are reported to the Peshwa by his agent.*

No. 16] [*1749*

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती. राजश्री राव केशवदासजीस राजश्री सवाईजिनी*आपल्याकडील फौजेस विलंब लागला व मीरबकशीजीसी जुंज ठहरलें, याजकरितां फौजेसहित सोपुराहून फिरून बोलाविलें हा तो विस्तार पूर्वी मुजरत कासिदा समागमे सेवेसी लेखन करून पाठविलें असे, त्याजवरून श्रुत जाहलें असेल. हलीं राजश्री रामसिंगजी

---

* Sawaiji is the title of Ishwarsing : he styled himself Sawai Ishwarsing.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

व सवाईजी या उभयेतानी येकत्र मसलहत करून युध्यच मिरबक्षिजीसी व बख्तसिंगजीसी घ्यावें. जयेदाता भगवान म्हणून राजश्री रावकेशवदासनी हरावल मुकरर करून दिवाण हरि गोविंद व सेखावत व नरुके वगैरे तोफखान्यासहित मुन्हेस ठहराऊन, चंडावल व दस्तरास व दस्तचाप सरदार व फौज न्येमून, सर्वांमागें आपण उभयेतां फौजेनसी बहिरबुनगा देस पाठीमागें घेऊन, छ ८ माहे मजकुरी अर्णुदयीं स्वार जाहाले; तों आदले दिवसी मीरबक्षिजीसहवर्तमान बख्तसिंगजीहि मेर्त्याहून कूच करून दोनी अडिच कोसाचे अंतराये रियाँ होऊन म्हणजे सवाईजीचे उजवेकडे पाऊन मुकाम केला कीं, समीपच पडून दबाव दिधल्यानें मामिलत चुकेल किंवा युध्य होईल. समीप मुकाम जाहालिया रामसिंगजी कडील रजपूत फोडिले जातील, म्हणुन भरभरून मीरबकशीस चढून आणिले. त्यासी हे ईकडून स्वार करून नीट चालिले. येतातसें जाणून त्यानीहि तयारी करविली. बहिर व बुनगाहे पुढें घालून, तोंडेसी उभे होऊन हदबदल दूर कांहीं बख्तसिंगजीसी टाकिली, कीं रांगडे सर्व येक, नकले कोणे समई काय करतिल, यास्तव आतां बख्तसिंगजीस आपले समीप हातीवर बसून घ्यावें. त्याजवरून बख्तसिंगजीचे लोकांनीं चित्त चोरिलें कीं तुम्ही कैद जाहाल्याने आमच्याने किमपी होणें नाहीं. याप्रकारें ते दिवशीं तर ती गोष्ट न बनली; व हे इकडून नीट चालून आलेच. फौजेचा तरतूद करितांच देहभान न राहिला, व न कोणी सरदार रामसिंगजीचे फुटले व न मामिलतदार पेश जाहाली व पाणीही लस्करांत नुन्य जाहालें. शिरावर माध्यान्य येऊन पावला. लोक पाण्यानच गारत होऊं लागले. तेव्हां सवाईजिस मीरबक्षीजीहि दसखत खास रुका लिहून पाठविला, कीं मीहून कांहीं लडाई इच्छित नाहीं. येक बख्तसिंगजीचा मामिला व रामसिंगजीकडील दुमदमा तो तुम्ही मध्यस्त होऊन चुकवालच. प्रस्तुत तर तुम्हांस हल्लेचा सलाह कीं हरावलासी पुढें वाढूं न द्यावें. आम्हीहि डेरा करितों. तुम्हीहि डेरा करा. सारांश या उभयेतांजवळ तीस पस्तीस हजार फौज व तोफखाना मातबर; या उभयतांसी येका बख्तसिंगामुले वैरत्व साधून नफा काये म्हणू? सौरस्यभावेकडून थोरपण भोगून, सन्मुखेहून उजवीकडे कातरतेंसें घेऊन, दोनी कोसाचे अंतराये जाऊन डेरा केला. यानीहि पाहिलें कीं राजारामसिंगजीची येसमई साह्यता करून फौजखर्च वरचेवरी मिळविला; व उभयतांवरी गाँलबता संपादिली; हेंच मुन्हे प्रथमता साधून महदयेशाचें कारण जाहालें. अतां खामखा हटनिग्रहे धरून जुंझ घ्यावें तर बादशाहजींसी कमरबंदी होऊन राठोडांतहि विरुध वाढतो.

---

१ आघाडी. २ मुन्हा = सामना.
३ रियां नांवाचें गांव. ४ वरचढपणा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दुसरें रामसिंगजीकडील उमदे रजपूत त्यांचे आचरणामुळें दुंदिले[1] होऊन आपलेले ठिकाणी निराले होऊन बसले. याजकरितां त्याजकडील तर बाजी हलकी, केवल आपल्याच अंगावर बिघाड, अगेंजून घेतलिया परिणाम बरा नाहीं, याजकरितां इतकाच उपर जाणून, मिरबकशीचेंच म्हटलें ऐकिलेसें करून, त्यांसच थोरपण येऊन, मौजे रीयाचें गीर्दपेशे[2] दाहा कोसांत पाणी नव्हतें म्हणून रियाचे डावीकडे कोसा दीडा दोच्या तफावतनें मीरबक्षीचे सामोरें मुकाम केला. आजि दोनी दिवस जाहले, कीं उभयपक्षीं रदबदल लागून राहिली व त्यांजकडील पाणी सरलें. पुढें त्यानी कूच करावें तर पाणी याजखाले, हे आडवे येतात, यास्तव मिरबकशीजीहि जेथील तेथेंच मुकाम करून बख्तसिंगासी बहुत लाजविलें कीं तुजमुलें खिफ्फत[3] खाल्ली. तुजकडून किमपि न जाहलें म्हणून तोपखाना कुल अपले डेऱ्या भवताले रचून, कोणीक मातबर माणूस मधें पडोन, फैसल करून स्वरूप रक्षी म्हणून मार्गप्रतिक्षा करितात. त्यासी कालीछ १० रोजी बिकानेरचा राजा दोनी हजार फौजेनिसी त्या समीप येऊन पावला. त्यानें त्यासी धीर देऊन इकडेहि सांगून पाठविलें कीं, आपण थोर आहांत ; बुर्ददारीच[4] करणें आपणासी योग्य. मीहि सेवेसी येऊन पावतों. तोंवर उतावळी न करावी. त्याजवरून यानीहि मुकाम केला. यांची वासना हेच कीं जे कांहीं दिधलें तें दिधलें; बाकीची निशा लिहून दिधली. ते पर्तून पायमलींत घ्यावी व मामिलतेंत तखफीक घेऊन नारनोर व आगरे याचा इजारा करून घ्यावा व रामसिंगजीचीहि मामिलत करून देऊन बख्तसिंगजीसहि येहसान[5] मंद करावें. दोघांसहि हातांत घ्यावें. त्यासी पहावें काये घडोन येतें, त्याप्रमाणें विनंती सेवेसी केली जाईल हे विज्ञप्ति. * * * * * *

¶*Report sent to the Peshwa of the Rajput war between Sawaiji and Ramsing of Jaipur with Bakhtsingh of Marwar.*

No. 17] [*1749*

श्री.

पुर्वणी श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान

स्वामीचे सवेसी

विनंती. राठोडाकडील वर्तमान तर राजा रामसिंगजी तर हा कालवर मेरत्यांत आहेत. व पेशखानें[6] नागोरच्या रुखें बाहेर उभा केला आहे; याजवरून

---

१ दोहींकडे चित्त. २ सभावार. ३ फजीती.
४ ..... ५ उपकारबद्ध. ६ तंबू वगैरे सामान.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बख्तसिंगजीनींहि पेशखाना बाहेर उभा केला. जे कांहीं रजपूत फुटोन बख्तसिंगजीकडे गेले होते, ते तों त्यांजवळच आहेत. व राजश्री सवाइजीकडीलहि पांच सातशें स्वारानिशी ज्यादोदास नामे वाणी महत तरिकें[1] त्यांसमीप आहे. हा कालवर कांहीं त्यां रजपुताचे जिल्ह्यांत रामसिंगजींहिं अमल दखल केला नाहीं. जगंनाथ पुरोहित पुष्करीं मुकामात करून फौजबंदी करितो, व अजमेरच्या किल्यासीहि मोरचे लाविले; परंतु अमरसिंग गौड त्यांत मजबूत आहे. त्यासी बख्तसिंगाकडील सूत्र लागलें आहे. या दिवसांत वर्तमान कीं बख्तसिंगजी सात हजार फौजेनिशी डेरे दाखल जाहले. मेरत्याकडे जाणार. येवंच तीकडेहि मागती कलहाग्नी प्रदीप्त जाहलासा आहे. जें कांहीं घडोन येईल तें सेवेसी विनंती करणेंत येईल. बाहादुरसिंग रूपनगरकराचा कनिष्ट बंधू रूपनगरांत मजबूत आहे. सावंतसिंगजी राजश्री सवाइजी समागमें येथें येऊन फौज व तोपखाना पाठवायानिमित्य बजीद जाहले; परंतु फौजखर्च त्यांजकडून नगद कांहीं न होऊं सकले; याजकरितां दोनी चारीशें स्वारांनिशीं येक वाणी किरपाराम नामें त्या समागमें करून दिधला आहे. त्यासी रूपनगरचे गिर्दपेशेंत तर कुली अमल दखल सावंतसिंगाचा आहे. किल्ला मात्र त्यानें हस्तगत करून मजबुती केली आहे. त्यासी साह्यता बख्तसिंगजीकडील विशेष त्याचा वचक सर्वांशी आहे. पाहावें काय घडोन येतें. हें विज्ञाप्ति

¶*Complications in Marwar reported to the Peshwa by his agent. The date of the paper deserves to be determined.*

No. 18] [*1749-50*

(मागील बंद गहाळ.)

हे पारहि देशास जातील मुलुक*राहील. या भावे उणियारवाले सरदारसिंग या * * * * मामलत तेरा लक्षावर ठहराऊन निशा घेऊन जागा त्यास दिधली. परंतु कांहीं ताकद सरदारसिंगांत न ठेविली. घर हवेली सर्व खोडून खराब करून जागा सोडली. हत्ती एक व पालकी घोडा वस्त्रे सिरोप दिधला. हेच निरोपिले जे, फौज सर्व घेऊन मालव्यात जा. याप्रकारे सांगून कनीराम दिवाण समागमे हजार दोन फौज देऊन नेणव्यावर तोफखान्यासहित पाठविले. व ताकीद हेच केली कीं, पंत हा सलुकाने जग़ा रिकामी करून देतील तर सरंजामानिशी त्यास चंबलपार करून देणे. न मानतील तर तोफखाना लावून मोरचे बंदी करून घेणे. त्यास

---

१ मदतीच्या प्रकारें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजेश्री कनिराम येऊन नेणव्यास लागले व माघून रायेसिग घोडचढाहि तनि हजार स्वारानशी नेणव्यावरं येऊन पावला. तोफा लाविल्या, व मोरचे कायम केले; तळे फोडले; उपद्वाप अतिशय मांडला. यास राा सदाशिव गोपाल सिंद्याकडील कमाविसदार यानी मुलकाचा जवाबसाल लाऊन ठेऊन राजेश्री सुभेदार यासी पत्रें लिहिलीं, पाठविलीं कीं, धणी उपार (उपकार) करतील तर सेवक * * * राहील व खर्चाचाहि पराम्रश करावा * * * जे राहतील त्यावरून सुभेदार यानीं ताकीद हेच लिहिली की, पाहा उतावलेपणाने बेहिमत होऊन जागा न सोडणे. कदाचित सोडाल तर आपली स्थिति उत्तम विचारणे आहे. दसऱ्याचे मुहुर्ते कूच करून टाकोटाक येतो व खर्चास वीस हजार रुपये देविले. पंत मजकुरानी आजपावेतोहि मथऊन नेणवे राखिले आहे व मोरचेहि जवलच जाऊन पावले आहेत. याउपरी चालीचे बळ न व्हावेसे आहे. माधोसिंग यानी कोटेकर महाराव यासी बहुतकरून सिष्टाचार लाविला जे आम्ही तुम्ही एकवचने चालावें व सर्व रजपुतानी आपली आपली जमियेत करून जागा रक्षून मालव्यात जाऊन बखेडा करावा; म्हणजे आपले आपूणच दक्षणी सलुक करतील व पेशकदमी करणार नाहींत. दक्षणेतच फिसाद वाढला आहे. त्यास आपलीच पडली तेव्हां या प्रांती येणार नाहींत; व शुजाउदवला शाहजादा यास म्हणजे अलीगोहरास कालपीचा घाट उतरून झांसी प्रांते देऊन तिकडील उंडेछे व दतिया व बुंदेले व नरवरकर हे सर्व राजे समागमे घेऊन येतो म्हणून आम्हास ताकीद पत्रे पाठविली. सर्वास म्हणजे सर्व लहान थोर बादशाही बंदेयासीहि ताकीद पाठविली आहे. त्यास विदीत हेच कीं, बादशाही चाकरानीं एकवाक्ये होऊन बादशाही चाकरी करून दाखवावी. यातच परिणामी उत्तम एकनिष्ठता दिसेल. यासिवाय विचार दुसरा विचारल्या तुरुक मुलुक सोडवितील. ज्यानी दक्षण्यास सिकस्त दिधली ते वरकडास केधवां न देतील? यास्तव सर्वांचे हिताची गोष्ट जाणून आम्हीहि फौजबंदी करून आलो आहो. जर तुम्ही सर्व रिफाकत द्याल तर बादशाही चाकरी करून दाखवू; म्हणजे आपला नकशहि तुरकाजवल वाढेल व सर्व उमदिगीस पाऊं. हाच विचार नाना प्रकारे भले मनुष्य पाठवून बिंबविला. त्यास कोटेकर माहाराव यानी दुरवरी दृष्टि देऊन माधोसिंगाचेच समाधानरुप आजपावेतो लावून घेतले. लौकिकी एकवाक्यता मात्र जाणविली. हा सर्व प्रसंग गोपाळराम व्यास याचे मध्यस्तिने होताच आख्येरा दिवाणाचा निश्चये सर्व प्रकारे आपले पायासी. यांनीं राजश्री सुभेदार यांचे मार्गप्रतिक्षेची वाट पाहिली जे,

---

१ हालचाल, प्रगति. २ ओर्छेकर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जर विजयेदशमी करून राजश्री सुभेदार इंदुराहून या प्रांते येतात किंवा परभारे देशास जातील. जर देशास जातील तर आम्ही लाचार आहो. माधोसिंगाचेच मरजीनुरुप यकास दाहा पंधरासे रावतानिशीं भले मनुष्य शामील फौज माधोसिंगाचे करून देऊन मग ते जे कर्तव्य करो. खासा जावे हे तर विदीत नाहीं. याप्रकारे महारावजीस बोध करून लाऊन घेतले. सुबेदाराची मार्गप्रतिक्षा केली. त्यास श्रीसुभेदारजी तर उतावलीनेच येतो परंतु गौतुमाबाईचा प्रकार वीस दिवस अवरोधाचा जाहला. तथापि दसरियाचे महुर्तें कूच केला. ते वीस हजार व मातबर तोफखान्यासहित येऊन मकुंददऱ्यांतून पाचा कोसावर येऊन पावले; व नेणवेकरास खातरजमाची पत्रे पाठविली जे आलो, जागा सांभाळून राहणे. दुसरे कोटेकरास लिहिले जे जर लवकर येऊन आपले सरहदेवर भेटताच कराराप्रमाणे ऐवज पावतां तर तुमचे मुलकांत उजाड न होऊन देता. तिसरे मुक्कामाने चंबलपार होऊन जाऊ. नाहीं तर मुलुक उजाडला म्हणून नालीस न करणे. या प्रकारे साफ पत्रे पावली. तत्क्षणीच महारावजीनी राजश्री आखेराम दिवाण यासमागमे हजार राऊत देऊन राजश्री सुभेदाराकडे छ १७ मजकुरी भेटीस पाठविले. दिवाण मजकूर थोडे बहुत साजसरंजाम फारफरमायेशीसहित गेला. बहुतकरून दऱ्याबाहेर जाऊन भेटला असेल. भेटीनंतर उत्तम मार्ग चंबला तीरास पुढे घेऊन येईल. त्याचा निश्चय आहे. उमेदसिंग बुंदीकर तर सर्वप्रकारे सरकारचा आहे. राजे माधोसिंग तर उणियारोखेस लागले. पाटण वगैरे जेऱ्हे केले. मातबर राजे साहेब फौज व दुसरे दीपसिंग, उमेदसिंग रावराज्याचा भाऊ माधोसिंगाचे जवल किसनसिंग, रावराजे दिलेलसिंग याचे पुत्रहि, त्याचेच आश्रये आज पाच सात वर्षापासून आहेत. ह्यास या गर्दीत समिधी[1] व करवर[2] माधोसिंगानीं दिधली. त्यानीहि पाच चारसे स्वार प्यादे जमा करून परगणे मजकूरी अमल केला व नेणव्याचा परगणा सर्व खराब करून टाकिला; व दीपसिंगास कापरण व परगणे गनोलीचे पन्नास गाव तोडून बुदीचे कुवर पदवीची जागा दिधली. यामुले रावराजा उमेदसिंग लाचार होऊन आपले पुत्रास चारसे रावतानिशी माधोसिंगा-जवल उणीयारेचे मुकामी पाठविता जाहला. लौकिक मात्र रक्षिला. परंतु अंतरंगी सुभेदार कधी येतील हेच इच्छा करित राहिला. त्यास भगवंते मागती सुभेदारजींस स्वामीप्रतापे या देशास आणिले. यामुले बहुतांस सुख उत्तम प्रकारें जालें. राजे माधोसिंग यास वर्त [मान] आलें जे सुभेदार आले. त्यानी नंदलाल दिवाण यासी पांच सात हजार स्वारानिशी पाटणास

१, २ प्रांताचीं नांवें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठविला. कोटेकरासहि ताकीद पत्रे लिहून दिधली जें, तुम्ही आपली मातबर फौज देऊन एकवाक्ये पुढे जावोन दरा बंद करावा. ताकिदीनें दिवाण पाटणास पाठविले. तोहि येऊन पावला. कोव्याहून पाटण पावेतो पलीकडे चंबलेचे डेरे करून राहिले आहेत व खासा माधोजी जरीदा[1] पंधरासे रावतानशी रणथंबोरास पाह्यास जातो. म्हणून उणयारीचे मुकामाहून गढास गेले. करोलीचा राजा व शिवापूरकर गौड हे व रावराजा उमेदसिंग याचा पुत्र समागमे होते. त्यास करोलीकर तर रुखसत होऊन करोलीस गेला. इंद्रसिंग गौड सिवपूरकर यास पाटणचे मार्गातून परभारे सिवपूरची वाट धरली. उमेदसिंग रावराजाचे पुत्रास निरोप न देता समागमे घेऊन गेले. उमेदसिंगानेहि निश्चय हाच केला कीं कदाचित माधोसिंग विचारतील कीं पुत्र ठेऊन घेतल्यानें उमेदसिंग स्वाधीन राहील व सुभेदारास न भेटले तर मजला चार आहेत त्यांतून एक मेला तर चिंता नाहीं. सुभेदार चंबलातीरास पावले म्हणजे आपले जमियतेंत जाऊं.

¶*This important paper, of which the first paper is unfortunately lost, gives details of the complicated situation of Jaipur and Marwad with reference to Maratha movements.*

No. 19] [*26-9-1750*

श्री.

पो २० जिल्काद

राजश्री.....पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

श्रीमंत सकल गुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य...स्नो मलारजी होलकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील कुशल आस्वीन शुध सप्तमी मुकाम नजिक बेटावद पावेतों साहेबाच्या प्रतापें करून येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविलें तें छ ३ सवालीं पावोन बहुत संतोश जाहला. मालवे प्रांतें जाऊन जमीदार गिरासे यांजला नतिजा पाऊन तो पावेतों राजश्री जयाजी सिंदे यांची रवानगी करितों. हेही येतील. आवघ्या फौजा येकें जागां होऊन पुढें रजपूत राजे वजिराकडील व गुजरात प्रांतें जावयाचे यैसीं राजकारणें उपयोगी पाहून करावीं. यैसे कितेक प्रकारें पत्रीं आज्ञा केली. त्यास आम्हीं वाफगांवींहून निघालियासी दोन मास होत आले. राजश्री जयाजी शिंदे यांचीं पथकें रवाना करणार. त्याची मार्गप्रतीक्षा केली. हिंदुस्थानचा कारभार भारी. तो भारीपणेंच करावा. अवघे येकें जागां आसावें. त्यास राजश्री येमाजीपंताच्या

---

[1] एकटा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कार्याकरितां राजश्री जयाजी सिंदे यास तिकडे जावयाची आज्ञा केली. त्याचें पारपत्ये करणें कांहीं साहेबास विशेष नाहीं. येक्या पथकास आज्ञा केली तर जाऊन त्याचे पारपत्ये स्वामीच्या प्रतापेंकरून करिल. येक्या कामाकरितां कितेक कामें तटवावीं यैसें नाहीं. राजश्री भाऊसाहेब प्रस्तुत तिकडे गेले तेव्हां तेथें कोन्हीं धम धरून डोई काढू सकतो यैसें नाहीं. साहेबाच्या प्रतापें करून सर्व मनसबे कामें नीट होतात. तेथें येमाजीपंताचा लेखा काय आहे? तथापि उपेक्षा कार्याची नाहीं. चाळणा करितच असावी. परंतु येकाच कार्यावर द्रिष्टी द्यावीसें नाहीं. हिंदुस्थानचा कारभार भारी याचाही विचार केला पाहिजे. येक वरीस फौजा त्या प्रांतें न गेल्या. त्यामुळें कितेक रजपूत राजे मोगल व जमिदार फडी धरितात. त्यांजला नीट करून नक्ष राखून लाभालाभहि विचारला पाहिजे. विजयादशमीहि होत आली. याउपरी येखादीकडे जाऊन कामकाज जाले पाहिजे. राजे ईश्वरसिंग व रामसिंग उभयेतानीं कापट्यभाव चित्तांत आणून केशोरायासि मारिलें. त्याचें पारपत्ये करणें जरूर. दिलीकडील वजिराचें राजकारण, तसेंच गुजराथचा बंदोबस्त करणें येविसीं पत्रीं आज्ञा केली. त्यास साहेबाच्या प्रतापेंकरून जे जे उपयोगी राजकारणें ते विचारें करून करावयाची ते होतील. दसरा जाला. याउपरी फौज जमा होऊन कार्यभाग जाला पाहिजे. राजश्री जयाजी सिंदे याची मार्गप्रतीक्षा आजी पावेतों केली. प्रस्तुत साहेबीं आज्ञा केली कीं, त्यांजला दसरीयासी रवाना करितों. सत्वर आलिया उत्तम आहे. त्याचा गुता न होतां निरोप देऊन व आणखी पथकें पाठवावयाची यैसी रवानगी सत्वर केली पाहिजे. *स्वामीनें पत्रीं मनसबियाचा विच्यार सविस्तर लिहिला, त्यास तो येथार्थच आहे. किरकोळ कामें तों स्वामीच्या पुण्यें करून सहजांतच आहेत. परंतु मातबर हा मनसबा आपल्यास उपयोगी भारीपणेंच केला पाहिजे. त्यास फौजा दोन्ही वगैरे पथकें आवघीं येके जागां होऊन, युक्त उपयुक्त सारासार विचार करून, कार्यभाग केला पाहिजे, येविशीं आपण सर्वज्ञ आहेत. जो जो विच्यार मनसबा योजेळ तो शेवेसीं लिहित जाऊन. साहेबीं वरचेवरि आज्ञापत्रीं बुधीवाद लिहित असिलें पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

मौर्तब
सुद.

¶*Malharrao Holkar, who is sent by the Peshwa to settle the disputes of the Rajputs, writes to the Peshwa from Khandesh asking him to send Jayappa Sinde at once and not detain him for fear of Yamaji Shivdeo in the South. The foresight of Holkar and a real grasp of the situation are evident in this letter.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 20] *[September 1750*

श्री

पुर्वणी श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. दिलीकडील वर्तमान तर वजिरुलमुमालक यानी अंतरवेदींत जाऊन पठाणासी जुंज टाकिले. जाट वगैरे सर्व जमिदार हरावलीस पाठविले; व आपण मागून तयारींत राहिले. जाटावरी म्हणजे हरावली फौजेवर जवं जव गाठ पडत गेली तशी तशी वरचेवर यानी हरयेक सरदारासी त्यांचे कुमकेनिमित्य बिदा करीत गेले. येथवर की, कुल सरदार व फौजेनिशी पुढे दोनी कोसाचे तफावतीनें पावले. खुद पाच हजार स्वार टोपीपोश व इसहाकखान व वजीरजीचा पुत्र वगैरे खांसे खांसे डेऱ्यात राहिलें. जमिदार दगा करितील, पळ काहाडितील म्हणून यानी सर्वांसी पुढें दिधले; व आपण पुस्तगर्मीस[1] राहिले. त्यासी त्यानी प्रथम मुन्हेमात्र[2] कांहींसी घेतली. जमीनदार सर्व एकमत होतेच. तन न दिधले. बनगडवाला रोहिलाहि ऐन समयात येऊन पावला. याजमुले हरावली फौजेवर येक मु॥ पठाणाही नमुदैकरून तमाम फौजेनिशी वजीरजी स * दा जाणून अरडून पडले. तोपखानियाकडील पिऊन हातघाई बरीशीच संभाळली. येथवर कीं, नवाब वजीरजीचा भाचा मिर्जा नसिरुदी महमद व नवाब इसहाकखान च्याहरुजा बकशी हे उभयेता मारिले, पडले. व नवाब वजीरजीचा माहावत ठार जाहला. सेवटीं वजीरजीहि स्वथा हाथीहुला (?) वजीरजीस गोली व तिराची जखम लागली. हाथी अवरेनासा जाहला. वजीरजीस मुर्छा आली. तेव्हा वरकड सरदारांच्यानें तग न धरवता चाल निघाली. तमाम फौज लुटीस पडली. हरोली फौजेस कलले की, पठाणाही पिछाडीवर जाऊन वजीरजीस मारून घेतलें. या रितीनें हंगामा होऊन तमाम फौजे गारत जाहली. खजाना व तोपखाना कूल विल्हे लागून चुकला. तेव्हा समागमचे मातबर होते त्याहीं पाहिलें कीं, वजीरजी तर मृत्यूप्राये जाहले. अतां पठाण गालेब[3]. मुडदाहि जाऊं देणार नाहीत. हर प्रकारे मुड्यास तरी सलामत घेऊन निघावें, म्हणून कोलजलेसरचा किला समीप होता. तेथवर येऊन पावले. येक रात्री त्या ठिकाणी कर्मिली. तों प्रातःकाली वजीरजी शुध्दीवर आले. बहुत काही प्राणत्यागीं हट धरिला. परंतु समागमच्यानी सावधता करून रक्षुन

---

१ मदत, राखीव फौज. २ सामना. ३ भारी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जे कोणी फुटकर येत गेले, त्या सर्वांस येकवट केलें. हजार पांच सहा फौजेनिसी तेथून वजीरजीस मेघांडबेरेंत घालून नीट दिलीस घेऊन आले. मग कलले की वजीरपुत्र[१] समागमे होते. यानी दगा करून लडाई बिघाडिली. सारांश, भावितव्यानरूप होऊन पठाणाची बाजी सरसी राहिली. तलावर तल येऊन केला. यांजकडील तमाम सरदार व फौज पलाली. पठाणाकडील सरदार बहूत मारिले पडले. येथाकिंचित दिलीस येऊन पावले. जखम अद्यापि बरी जाहली नाहीं. हवेली दाखल बादशाहजीनी बजिदीने[२] करविले. जखम बरी जाहल्यानंतर बादशाहजी येऊन घेऊन जाणार. अथवा हेच खुद मुलाजमती निमित्य जाणार. येवंच वजीरजीस तर हाच हट कीं मागती पठाणावर कमरबंदी करावी. याजकरितां खुद बादशाहजीसहि बाजीद आहेत. बादशाहजीही अंतस्ती अश्वासन दिधलें, व बाहियार्थी तुरानी यांचेहि मानस रक्षायास चुकत नाहीत. तुरानी तर परम प्रफुलित जाहले आहेत. परंतु वजीरसाहेब खजाना आहे. अद्यापिहि जाट वगैरे जे कोणी समागमचे शिकस्त खाऊन फिरून येऊन पावतात, त्यासी खर्चास देऊन दिलासा दिलबारी करून नित्यानी फौजबंदी करितात; व स्थलोस्थली ताकीदपत्रेंहि पाठवितात; व बादशाहजीही फर्मान बोलावयाचे नवाब नासरजंग व मीर मनू लाहोरचा सुभेदार वगैरे या सर्वांसी पाठविले आहेत; व अंतस्ती पठाणाकडील अर्जदास्त तकसीर माफीचा येऊन पावला. त्याचीहि खातरजमा करितात. मिरबकशीजी इकडून जाऊन पावले. मुलाजमत जाहली. हाथी, घोडे व मोत्याची माल वगैरे भूशण वस्त्रे जे इनायेत करायाची ते करून बहूत कृपासी जाणविली. यानीहि हलकाई पाहून तुरानीयांकडेच डौल दिधला आहे. तरी वजिराची इतकी बाजी खचली असतांहि सर्वांस वचक आहे. पेशखाना[३] तर बारापुल्यावर उभा राहिला असे. खजानियाची ममता न करावी म्हणून वरचेवर बादशाहजीस पूट देतात. पहावें इतकियावर काये घडोन येते. जाठहि हजूर जाणार आहे व पठाणाही तर कूल अंतरवेदींत काये (ल?) इटावा वगैरे खालसा माहाल बादशाही या जिल्ह्यांत अमल दखल केला, व करितात; व जमिदाराही काबू जाणून सर्वांठाई दस्तदराजी[४] मांडली आहे. समये हंगामचा त्रथा किमर्थ जाऊं द्यावा, म्हणून हर येकाही येथाशक्त प्रयेत्न मांडिला आहे. वजीरजी अपल्याकडील फौजेची व सरदारांची परम प्रतिक्षा अहर्निश करितात. याचा विस्तार तर राजश्री बापूजी महादेव यांचे विनंती पत्रावरून सर्व सो श्रुत जाहलें असेल. येथेंहि जे कांहीं ऐकणेंत आले

---

१ कमरुद्दीन खानाचा मुलगा, इंतिजामुद्दोला (?) पहा म. वि. २ पृ. ३२८.
२ आग्रहानें. ३ युद्धोपयोगी डेरे वगैरे सामान. ४ जुलूम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ते सो श्रुत व्हाया निमित्य विनंती केली असे. मागती जे कांही घडोन येईल तेहि विनंती करणेंत येईल. बहूत काये लिहिणे हे *विज्ञप्ती.

¶*Malharrao Holkar on his way to Delhi communicates to the Peshwa from Khandesh the news he had received of the defeat of the Vazier by the Rohillas and urges him to send Jayapa with reinforcements with all possible haste. The Peshwa in concert with Holkar and Scindia undertook this new venture in the North in the autumn of 1750.*

No. 21]

[*26-9-1750*

श्री.

श्रीमंत राजश्री सुभेदार साहबांचे सेवेसी.

पोष्य पंडे मुरारजी व नरेश्वर कृतानेक आशीर्वाद विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत अश्विन शुद्ध ७ सोमवासर[1] जाणौनु स्वामी यानी आपुलें स्वानंद लेखण आज्ञा करीत गेले पाहिजे विषेष. बहुत दिवस स्वामीकडील साकल्यवृत्त लेखण करून सेवकाचा परामृष न केला यास्तव चित्त चिंतनीं आहे. जेव्हां दर्शणाचा लाभ घडेल तो सुदिन असें. यानंतर, हस्तनापुर प्रांतींचें वर्तमान तर पठाणांनीं बहुत धूम उठविली. त्याजवर मनसुरअल्लीखानानें आपला बकसी नवलराये वीस हजार फौजेनसी पाठविला. लढाई जाली. बक्षीची फौज गारत जाली. मागाहून येक चेला दाहा हजार फौजेनें पाठविला, तोही शिकस्तीत आला. तेव्हां मनसुर-अल्लीखान खुद व जमियेत घेऊन पठानावर गेलेत. हरोली, सुरजमल जाट व हेमराज बक्षी निसबत इसरीसिंग यैसें उभयतां हरोल होते. परस्परें युध्यप्रसंग मातबर जालेंच. परंतु जय पठाणास आला ; आणि मनसुरआलीखान गारत जाला. याप्रकारचें वर्तमान जालें. दुसरें सलाबतखान जयनगर प्रांतीं आला होता. त्यासी इसरीसिंगासी सुला जाला. सलाबतखान दिलीस गेला व ईसरी-सिंग जेपुरास आला व बख्तसिंग नागोरास गेला; व रामसिंग मिरचेस गेला. ऐसें वर्तमान जालें. आपणास कळावें म्हणऊन लिहिलें असें. सेवेसी विदित होय. आपण सेवक पदरींचे असों. आगमनाची प्रतिक्षा चातकन्यायें करितों. दर्शनाचा लाभ घडेल तो सुदिन असें. विशेष काये लिहिणें कृपा वृध करीत जाणें. विषेष काय लिहिणे हे विनंती.

¶*This letter describes the crushing defeat inflicted by the Rohillas upon Safdarjung, who being wounded was removed from the battle-field in an unconscious state and who was consequently believed at the time to have been killed.*

---

१ सौम्यवासरः बुधवार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 22] *[2-10-1750*

श्री.

राजश्री.....पंत प्रधान साहेबाचे सेवेसी.

॥ श्रीमंत सकल गुणालंकर्ण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रीो मलारजी होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील कुशल आस्वीन शुध त्रयोदसी मुकाम कसबे थालनेर पावेतो साहेबाच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. कृपा करून आज्ञापत्र पाठविले ते पावोंन बहुत संतोश जाला. प्रस्तुत कोठे आहां, फौज कितेक जमा जाली, पुढे इंदुरी कितेक दिवस लागतील, मनसबा करावयाचा कोणता योजिला, ते सविस्तरें वरचेवर लिहीत जाणे, म्हणून आज्ञा केली. त्यास वाफगावीहून जलदी करून निघालों कीं फौज जमा करून च्यारी राजकारणे राखून उपयेागी ते करावे. यांस्तव त्वरेकरून खानदेश प्रांती आलो. राजश्री जयापा याची मार्गप्रतिक्षा करून मुकाम जाले. तो वर्तमान आले कीं राा येमाजी सिवदेव याच्या पारपत्यास राजश्री जयापास तिकडे जावयास आज्ञा केली. तेव्हा ते आलिया पुढे जावे. याजकरितां मुकाम करून शेवेसी विनंती पत्रे पाठविली. त्याची आज्ञा केली की, दसरीयास त्याजला निरोप देऊन रवानगी करितो. दसराहि जाला. त्याची रवानगी इकडे सत्वर केली पाहिजे; व सरकारची पथके इकडे पाठवणार तेही पाठवावी. आमचीहि फौज जमा होत आली. वरचेवर लोक येतात. आलीकडील मालवे प्रांतीची कामे करावी. जमीदार गिरासे याजला नीट करावे. तो मागून हेहि येतील. येकत्र होऊन पुढे मनसबा करणें तो करावा, यैसे कितेक प्रकारे लिहिले होते. त्यास आलिकडील कामे सहजात होतील. हिंदुस्थानातील विचार मनास आणिला पाहिजे. तरी राजश्री जयापा यांची व पथकें पाठवण्याची त्याची रवानगी सत्वर जाली म्हणजे येके जागा होऊन च्यारी राजकारणे मनास आणून लाभालाभ विचारून करणे ते सर्व साहेबाच्या प्रतापे करून होतील. दिलीकडील वजीर खासा फौजसुधा तयार होऊन फरोखाबादे-समीप गेले. तिकडून रोहिले पठाण येकत्र होऊन चालून आले. याचा त्याचा विसा कोसाचा तफावत आहे. मुकाबला होणार, यैसे वर्तमान आहे. आपणाकडील फौज न्यावी, यैसा त्याचा मनोगत विशेष आहे. तैसेच राजे रजपुत व बकसी येकत्र जाले, त्यांचीहि गुंज बलावणार. ये गोस्टीस आपला जमाव फौज येकत्र होऊन उपयेागी मनसबा तिकडे डोल देऊन करणे ते करावे. गुजराथ प्रांते जावयाचा मनसबा तोहि आधी करणे, कार्याची गोस्टी आहे. आवघें येकत्र जालिया उतम दिसेल ते करून. परंतु सर्व फौज येकत्र जमा असली आणि सर्वांच्या शहावर जवल असिलें म्हणीजे जेथे लाभकाळ दिसेल तिकडेच राजकारण

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करून. येसा विचार आहे. यास्तव्य साहेबीं वारंवार आज्ञापत्रें व फौजाची रवानगी करावी. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶Malharrao Holkar urges the Peshwa to despatch Jayappa Sinde to the North. The latter was engaged in the fight against the Pratinidhi at Sangola. The letter breathes a spirit of renewed vigour and ambition infused by the Peshwa, now freed from the shackles of a wavering master.

ले. *23*]

[*8-10-1750*

श्री.

राजश्री.....पंतप्रधान साहेबाचे सेवेसी

श्रीमंत सकळ गुणाळंकर्ण अखंडितलक्ष्मी आळंकृत राजमान्य...स्नो मलारजी होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील कुशळ आस्विन वद्य पंचमी मुकाम कसबे सेंधवे साहेबाच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित आसे विशेष. थालनेरच्या मुकामीहून शेवेसी विनंती पत्रें पाठविलीं आहेत. प्रविष्ट होऊन आर्थ श्रृत जाला आसेल हिंदुस्थानाकडील वर्तमान पठाणाही नवलराय याजला मारिलें, त्यावरून बळावलेच होते. त्यास नवाब मनसूरआलीखान यानी तमाम पातशाही तोफखाना रिसाला व आमीर तैनातीस घेऊन पठाणांवर चाळोन गेले. कमरूदीखान याचा लेक मिरबाका व सेरजंग आणखी उमराव दिलीचे समागमें घेऊन गेले. कुंवर सुरजमल जाट हारोळीस[1] होते. राजे ईश्वरसिंग याजकडील हेमराज बक्षीहि पांचा हजारानसी सामील होते. त्यास पठाणहि गंगेच्या दक्षण तीरींच होते. याचा त्याचा मुकाबला महूसमसाबादेवरते बारा कोस सोरामच्या घाटानजीक सिताकुंडापासीं जाला. छ २१ सवालीं याचा त्याचा युद्ध प्रसंग प्राथाकाळापासून तिसरा प्रहर पावेतों तोफखाना बाण जेजाळाचे जालें. नवाबाच्या हरोलीस जाट होते. पहिले दिवसीं जाटाचें कामकाज जालें. त्यामुळें नवाजीस[2] होऊन पुढें जाले. तिकडे पठाणाही बेहडीं[3]चे मोर्चे धरून मार देत होते. यैसें तोफखानियाचें युद्ध जालें. तेव्हां पठाणांही निवड करून पायेउतारा होऊन सा सात हजारानसी चालोन घेऊन जाटासी गांठ घातली. बाण बहुत, तेणेंकरून आधी मार केला; मग तरवारेचें जुंज जालें. तीन च्यारसें जाटाकडील तेथें कामास आले. तैसेच पठाणाकडीलहि तीनसें कामास आले. ते समई जाटानी सिकस्त खाऊन निघाले. पुढें टोपीवाले होते. त्यांची गांठ पडली. टोपीवालियानी कांहीं दम धरिला नाहीं. घर सोडून

---

१ आघाडी. २ तारीफ. ३ अडचणीची जागा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वाव दिला. नवाबाचें लश्कर पाठीमागें होतें. त्याचा पळ सुटला. टोपीवालेहि पळों लागले. खासी फौज नवाबाची त्यास पठाणांसी युद्ध जालें. ते समई नवाबाकडील हिसाबखान मातबर होता, तो कामास आला. तैसाच इस्मालखान चेलाहि कामास आला. आणखी महमद आदाखां व महमद जमाखां व घासडेकर बहादुरसिंग पिता पुत्र व खान दैजराचा लेक व चूडामण जाटाचा पुत्र महकुमसिंग व बलोच दोन सरदार व बळुजाट व त्याचा पुतन्या यैसे कामास आले. आणखी लोक बहुत मारले गेले व घायाळ जाले. पठाणाही निकट बहुत केली. नवाबाची फौज अस्ताव्यस्त जाली. तेव्हां नवाब हतीवरून उतरून घोडीयावर बसले. पठाणाही दाटी करून खासा नवाबास तीर व गोली लागोन तिसरे तरवारेच्या जखमेकरून तेथेंच कामास आले. मिरबाका व सेरजंग दोन्ही बाजूस दोघे होते. ते फितव्यांत होते. त्याजकडे गोली बाण चालली नाहीं. नवाब कामास येतांच तेथून पळोन दिलीस आले. सुरजमल जाट व हेमराज बकसी हेहि निघोन जरारे येमुना उतरोन आले म्हणतात. आद्यापि ठीक नाहीं. पठाणाची फते जाली. तमाम लष्कर तोफखाना त्यानी लुटून घेतला. उमदे उमदे लोक कामास आले. नवाबाकडे फौज भारी होती; परंतु येकदील नवते. फितुरामुळें यैसी गोष्टी जाली. प्रस्तुत अवघी इमारत वजिरावरच होती. आमीर थोर होता. पुढें पाहावें, पठाण दिलीस येऊन रुजू होतात कीं त्याच्या मुलुकांत सिरून बंदोबस्त करितात. याउपरी वजिरी कोणास होते. सलाबतखान आजमेरीस होते, तेही दरकूच गेले. राजे ईश्वरसिंग जैपुरास दाखल जाले. रामसिंग मेडत्यास आहेत. दिलीकडील कारभार अवघा नवा होणार. कोणे प्रकारें बंदोबस्त होतो, पठाण पुढें काये करणार, जैसें वर्तमान येईल ते सेवेसीं लिहून पाठवूं. याप्रसंगीं आपली फौज पुढें शहास असावी. राजश्री जयापाचीं व पथकें आणखी रवाना करावयाचीं त्याची रवानगी सत्वर केली पाहिजे. आवघे येके जागा होऊन पुढें गेलिया जैसा जैसा विचार मनसबा उपयोगीं देखूं तो करून. *सेवेसी लिहून पाठऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

मोर्तब
सुद.

¶*Malharrao Holkar sends information to the Peshwa about the reverse that the Vazir had sustained at the hands of the Rohillas.*

---

* याठिकाणीं मल्हारराबाचा शिक्का आहे. १ सफदरजंग.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 24]

[*October (?) 1750*

श्री.

शेवेसी विज्ञापना. श्रीमत राजश्री भाऊ सातारियाकडे गेले. तेथील बंदोबस्त कोणे प्रकारे जाला? करवीरवासी राजश्री याजकडील काये वर्तमान? राजश्री येमाजीपंत याचा बंदोबस्त कोणे प्रकारे जाला? ते सविस्तरे आज्ञापत्रीं लिहिले पाहिजे. हिंदुस्थानातहि बखेडा जागा जागा जाला. मनसूरअलीखान कामास आले. याजकरिता प्रस्तुत नवाच कारभार होणार. आपली फौज शहावर पुढें कोणी नाहीं. याजकरिता सारी फौज येके जागा होऊन पुढे जावें. मग जैसा मनसबा पडल, आपला उपयोगी, तो करावा. दसराहि जाला आणि दिपवाली आली. या दिवसात शहावर काहीम राहून जैसा मनसबा योजून येईल, तो विचारे करून करणें, तो करावा. सर्व खावदाचा प्रताप आहे. राजश्री जयापाची रवानगी सत्वर केली पाहिजे. *शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

मोर्तब
सुद.

¶*Malharrao Holkar writes to the Peshwa to despatch Jayapa Scindia urgently to the North. He was at Sangola with Sadashivrao Bhau.*

No. 25]

[*1750 (?)*

श्री.

राजश्री महादाजीपंत गोंसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रीं मल्हारजी होळकर दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशल लिहित असिलें पाहिजे विशेष. राजश्री त्रिंबक विनायेक याजला पूर्वी पत्र लिहिलें होतें. पत्रार्थ आपणापासी त्यानी निवेदन केलाच असेल. त्याचे प्रतिउत्तर अद्याप येत नाही. राजश्री राणाजीकडून * * * * * व गोविंद कृष्ण आपली पत्रें माधोसिंगाच्या राजकारणाची आणली, त्यावरून वचन प्रमाण देऊन खामखा कार्ये करोन द्यावे, पैका घ्यावा यैसा निश्चये. त्यासी राजश्री बावा * * * * जी पावेतो सोसिलें; परंतु येक खावंदाचे• काम बुडवावें आणि आपला लौकिक करून दाखवावा, यैसा अभिमान तेथे येके विचारें होऊन

---

* पत्र. मल्हारराव होळकराचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

खावंदाचें कार्य कैसे होऊन येईल ? हे काम तो मातबर. येथील प्रसंग या प्रकारचा. यैसे जाणून श्रीमंत स्वामीच्या पत्रीं सविस्तरे लिहिलें आहे ते अक्षरशाह ध्यानास आणून स्वहिताची गोष्ट जाणून खामखा हे राजकारण करून पैका घेणे. यैसे उत्तर आलिया कार्यें करितों. बुधेलखंडचे काम विल्हे लागोन पुढे माधोसिंगाच्याच राजकारणास लागतो. तो पावेतो आपलेहि उतर येईल. खावंदाचे श्वहित जाणूनच हे कार्यें खामखां करणे आहे. केवळ दुराग्रह करून नाश * * यैसे नाही. आपले कार्यें होऊन * * * यस्थास्थित वर्ततील यैसे करितों. आमचेविसी आपल्यापासी दर्शऊन सदरें घातली आहेत कीं उग्याच हाचवांगेपणाच्या गोस्टी, लटकिया, येकहि राजकारण खरें नाहीं यैसे बोलतात. राा बा * * * दुराग्रहपणाची ते कोट * * * धवी. आम्ही राजकारण आणावे ते लटके करून दाखवावे यैसा अभिमान. त्यासी हे राजकारण खरे करून पैका घ्यावा हे सिध आहे. आण प्रचीतीस आणून देतो. केवळ आम्ही श्वहित म्हणून आग्रह करीत नाहीं. खावंदाचें काम श्वहिताचे देखोन करितों. यैसे असतां राा बावाचाच आग्रह सेवटास न्यावा, आण आमचा अपमान करावा यैसे उतमात गोस्टी नाहीं. येक खावदाचे स्वहित जाणुन विस्तारें लिहिलें आहे. यामधें उचित ते करावें. * राजश्री गंगाधरपंत व रामाजीपंत यानी आपणास पत्र लिहिले आहे, त्यावरून सर्व आर्थ ध्यानास आणून उतर पाठविलें पाहिजे. लोभाची वृधी करावी हे विनंति.

¶Malharrao Holkar writes to Mahadoba Purandare details of his dealings with Madhosingh and other Rajput kings. Gangadharpant is Chandrachud and Ramajipant is the Scindia's Diwan appointed in 1750. The inner intrigues mentioned in the letter deserve to be cleared.

No. 26] [*7-11-1750*

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री.....भाऊसाहेब स्वामींचे शेवेसी.

विनंति सेवक अंताजी माणकेश्वर, कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत कार्तीक वद्य ५ पंचमी, मुक्काम खिचीवाडा, येथास्थित असें विशेष. राजश्री लक्ष्मण शंकर अद्यापि सुरंजेसच आहेत. आम्हाकडील फौज पांच सातशें जागां जागां त्यांनीं मागेंच रवाना केली आणि आम्हांस सांगितलें कीं, खिचीसी आम्हांस कजिया करावयाविसीं श्रीमंतांची आज्ञा आहे. तरी आम्ही सुरंजेस आहों. तुम्ही आपले फौजेनिशीं खिचीवाडियात जाऊन त्यांसीं कजिया करण. जुंज भांडण करणें. म्हणजे तो वकील आम्हांकडे पाठवून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

देऊन आमचे मतलब करून देईल. त्यांचें आज्ञेप्रमाणें खिचीवाड्यांत येऊन खिचीचा आमचा कजियाहि बहुत जाला. शेवटीं खिचीचे वकील येऊन, राजश्री लक्ष्मणपंताची रजावंदी जाली. मग लक्ष्मणपंताचीं पत्रें आलीं. त्याजवरून आजी खिचीवाड्यांतून कूच करून कचनारचे सराईस आलों. एकादों दिवसां लक्ष्मणपंत सुरंजेहून येणार. मग दरकूच राजश्री नारो शंकर यांजकडे जाऊन, मोठेंचें[1] ठाणें आधी फत्ते करून, मग पुढें बुंधेलखंडांत जाऊन. राजश्री बापूजी बाजीराव अद्यापी कालपीसच आहेत. स्वामींचीं आज्ञापत्रें त्यांस आलीं कीं, तुम्हीहि सहा महिने तिकडेच राहणें. हे गोष्टी फार उत्तम आहे. हिंदुस्थानांत फौज असावी हें फार उत्तम आहे. स्वामींचीं आज्ञापत्रें बानवर पारमोंरी येथिल जागीरदार पातशाई चोपदार यांचे विषयीं आली. ज्याप्रमाणें सातारा करार केला आहे, त्याप्रमाणें सात हजार रुपये मात्र घेणें. जाजती उपसर्ग न लावणें; व गोपाळपंत कमाविसदार दूर करून, दुसरा कमाविसदार ठेवणें; व मौजे अंबरोलची गढी तुम्ही दलेलसिंग गुजर यांजला देऊन, त्यांजपासून रुपये ६००० सहा हजार नजराणा घेतला. यैसें वर्तमान विठ्ठल सिवदेव यांनीं सांगितलें. तरी तुम्हांस सहा हजार रुपये घेऊन, गढी गुजरास घ्यावयासी प्रयोजन काये? या उपरी सहा हजार रुपये दलेलसिंगाचे माघारे देऊन, मौजे अंबरोलची गढी खालीं करून चोपदारांचे हवालीं करणें. दरबारीं बोलतां एक, त्याप्रमाणें वर्तत नाहीं हें गोष्टीं उत्तम नाहीं, म्हणोन विशादें लिहिलें. याप्रमाणें श्रीमंतांनीं व राजश्री बाबांनीं व राजश्री रामचंद्र बाबांनीं फजीत करून लिहिलें. यैसीयासी विठ्ठल पंतांनीं जें सांगितलें असेल तें प्रमाण. ते सरदार आहेत. स्वामींपाशीं सांगितलें असेल तें प्रमाणच सांगितलें असेल. आम्ही सहा हजार रुपये घेऊन, गढी दिल्ही असिली, अगर एक रुपया घेऊन दिल्ही असिली, अथवा फुका तऱ्ही दिल्ही असिली तरी हे गोष्टी तिलतुल्य जाली; तरी या सरंजामांतून स्वामींनीं दूर करावें, आणि सरकारचे गुन्हेगार व परस्परें चोपदार पातशाई लिहितील सेवेसी व सरकारचे जासूद जोडी हुजरून आली आहे ती सांगेल. आम्ही देशास गोलियाउपरी विठ्ठलपंतांनीं दलेलसिंग गुजरास आम्हांकडून फोडून, त्यांस पालखी देऊन, आमचे गांव बळाऊन, त्यांत नवी गढी बांधोन, त्यांस पाठीशीं घातला. त्यास आम्हांकडील बाबूराऊ कांहीं बोलावयासी लागले तरी यांची पाठ त्यांस जबरदस्त. विलाज नाहीं. आम्ही दूर देशीं. विठ्ठलराऊ संनिध. त्याहीमध्यें दरबारीं त्यांची मातबरी. ते जें जें सांगतील तें प्रमाणच आहे. आमची मातबरी सर्व स्वामींचे पाये आहेत. विठ्ठलपंत देशीं येऊन अदावत आम्हाविशीं नाना

---

१ मोठ=झांशीच्या ई० मैल ३०.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रकारची करीतील, हे विनंति मी पूर्वी सेवेशी केलीच होती. स्वामींनी अश्वासन दिल्हेंच होतें कीं, तुमचा त्यांचा हमेशा कजिया आहे, आम्ही कांहीं त्यांचें सांगवीवरी जाणार (नाहीं,) यैसें अश्वासन दिल्हें आहे. त्याजवरून आम्ही बेफिकीर आहों. आज्ञेप्रमाणें सात हजार रुपयेच घेऊन, गोपाळपंत कमाविसदार पहिला दूर करून, दुसरा ब्राह्मण तेथें ठेवून. चोपदारांचा राजीनामा मागाहून सरकारच्या जासुदासमागमें पाठवून देतों. अंबरोलची गढी मातबर बांधली आहे. खंदक भारी केला आहे. तो कांहीं सुप्रवर्ती गढी देत नाहीं. परंतु स्वामींचे आज्ञेप्रमाणें गढीस मोचें सुरूंग लावून गढी घेऊन चोपदारांचे हवालीं करून. परंतु हीं कामें करावयासी दोन महिने पाहिजे. येका दिवसानें होत नाहीं. परंतु अंतर सर्वथा पडों देणार नाहीं. आम्ही सेवेशी बोलावें एक, मागें करावें एक ऐसें सेवकाचें सामर्थ्य कायें आहे? विठ्ठलपंतांचें सांगीवरून स्वामींनीं इतराजी केली. फार अथवा थोडा पैका तो स्वामींचा. स्वामींची आज्ञा उलंघावयासी प्रयोजन काये आहे? राजश्री मल्हारजी होलकर यांस मनसूरअल्लीखान वजीर यांचीं पत्रें आलीं आहेत कीं, मातबर फौजेनिशीं सत्वर सामील होणें. जो मुद्दा असेल तो करून देतों. त्याजवरून त्यांचीं पत्रें आम्हांस आलीं आहेत. बरकडांसहि आलीं आहेत कीं, येऊन सामील होणें. याजकरतां मल्हारराऊ यांचीं पत्रें आलीं आहेत. सेवेशी विदित होय. राजश्री बापूजी बाजीराव यांस सहा महिने राहावयाची आज्ञा केली. फार उत्तम गोष्ट जाली. पूर्वी स्वामीची आज्ञाच होती कीं, जरी करितां बापूजी बाजीराव त्याप्रांतें राहिलेच, तरी आम्हांस लिहिणें. आम्ही बापूस लेहून पाठवून तुम्हीं व बापू मिळोन लक्ष्मणपंतांचीं कामें बरचेवरी करून, तुमचा सरंजाम सोडवणें. यैसियासी प्रस्तुत बापू इकडे राहिलेंच आहेत. स्वामींनीं एक पत्र राजश्री बापूंस पाठवून द्यावें कीं, तुम्ही व राजश्री अंताजीपंत मिळोन, अंताजीपंतांचा सरंजाम सुरळीत करणें. याप्रमाणें राजश्री लक्ष्मणपंत यांस एक पत्र द्यावें जे, तुमचीं कामेंकाजें सत्वर उरकून घेऊन, बापूंस व अंताजीपंतास निरोप चार महिने अंताजीपंतांच्या सरंजामांत जावयासी देणें म्हणून, पत्र एक लक्ष्मणपंतास व एक बापूंस जरूर पाठवून द्यावें. हेंहि काम सरकारचें स्वामींचेंच आहे. कदाचित् स्वामी म्हणतील कीं, राजश्री मल्हारजी होळकरच त्याप्रांतें आले तरी त्यांस सामील होणें, म्हणजे ते सरंजामाचें काम करून देतील. तरी ते कांहीं काम राजश्री सुभेदार करून देत नाहींत व त्यांस फावत नाहीं. उलटे आम्हांस व बापूंस जमा करून नेतील. यैसीयासी आम्हांस व बापूंस राजश्री सुभेदारांनीं मोठें कामासहि नेलें तरी तिकडील चाकरी करून येऊन. व राजश्री लक्ष्मणपंतांचाहि बोभाट कामाचा उरकून राहूं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

देणार नाहीं. परंतु उरल्याच दिवसांत तऱ्ही बापू व आम्ही मिळोन आमच्या सरंजामांत जाऊन. याजकरितां सेवकाची विनंति उदास न करावी. येणेंप्रमाणें तीन कागद अगत्यरूप पाठवावे. एक बापूजी बाजीराव यांस जें :—अंताजीपंताच्या सरंजामांत जाऊन तुम्हीं व ते मिळोन अंमल बसवणें व राजश्री मल्हारजीबावांस एक पत्र जें :—तुमचें थोरले काम जालियाउपरी राजश्री अंताजी माणकेश्वर यांच्या सरंजामाचा अंमल बसऊन देणें, यैसीं दोन पत्रें जरूर पाठवून द्यावी. मग जैसा जैसा कामाचा रंग पडेल, तैसेंच आम्ही वर्तों. परंतु हीं दोनीं पत्रें पाठवावीं व लक्ष्मण शंकर यांस दोन पत्रें पाठवावीं जें :—तुमचें कामकाज आटोपून घेऊन, राजश्री बापू व अंताजीपंतांस ग्वालियेर प्रांतास जावयासी चार महिने निरोप देणें, म्हणून पत्रें जरूर द्यावीं. आमच्या रोजमरीयाची नेमणूक राजश्री लक्ष्मणपंतावरी अखेर कार्तिकमासपरियेंत आहे. पुढें नेमणूक नाहीं. तरी पुढील रोजमरीयाची सनद पाठवावयासी स्वामी समर्थ आहेत. विनंति उदास न कीजे. विनंतिपत्र सविस्तर वांचून आज्ञा केली पाहिजे. सेवकांचें कुरण मौजे भिंवरीस आहे, तें सरकारांत घेणार म्हणऊन यैकिलें. त्याजवरून मागें दोन वेळा विनंति पत्रें सेवेशीं लिहिलीं होतीं. तरी कृपाळु होऊन, सेवकाचें कुरणाची मोकळचिट्ठी देविली पाहिजे व सालावाद-प्रमाणें वराता व शेतसनदा आमच्या देविल्या पाहिजेत. व कोठीचें दस्तक व लांकडे आणावयाचें दस्तक देविलें पाहिजे. हरएकविशीं विनंति तीर्थस्वरूप हरीपंत करतील ते उदास न करावी. विठ्ठलपंत कसबा ग्वाल्हेर येथिल फौजदारीचा अम्मल आजी दोन वरशें दरोबस्त खातात. स्वामींनीं ताकीदपत्रें तीन चार दिल्हीं, परंतु न मानलीं. व जमीदारांच्या नांवें ताकीदपत्रें दिल्हीं तें आम्हांपाशीं आहेत. शहर त्यांचें आमचें समाईक, मुकासा निमेनिम असतां फौजदारी त्यांनींच खावी हें उत्तम नाहीं. त्यांची फौज या प्रांतीं होती. आतां आम्हांस अंमल बसावयासी फौजदारीचा शहरांत अगादी काये आहे? परंतु स्वामींची आज्ञापत्राचीं वाट पाहतों. ऐसा कलह आपल्यांत आपण वाढवावा यैसें नाहीं. तेथें विठ्ठलपंत आहेत. स्वामींनीं कृपाळु होऊन त्यांस ताकीद करून त्यांचे मामलेदारांस ताकीद खामखा पाठवावी. जें मागें जालें तें उत्तम जालें. आतां तऱ्ही मुकाशाप्रमाणें फौजदारीचा अंमल निमेनीम चालवावा. येविशीं आपण हैगै केली तरी सरकतीचें दुःख एक प्रकारचें आहे. स्वामी मायेबाप आहेत. मायेबापास थोरलहान लेकरें सारखींच असतात. आपणच हैगै केली तरी आम्ही तुडवणीस पडतों. याजकरितां विनंति वारंवार लिहितों. सालगुदस्ता दोन वरसांची छावणी हिंदुस्थानची करून घरास आलों. तसेंच सातारां

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फौजेनिशीं दाहा महिने राहिलों. सातारांहून आलियाउपरी सवेच इकडे आलों. याजकरितां आगोटीस सेवकास पायांपाशीं यावयाची आज्ञा केली पाहिजे. माझा संवसार बहुत उणा पडिला आहे. तो अर्थ राजश्री सखारामपंत निवेदन करीतील. माझा अंगिकार केला आहे, त्याप्रमाणें सेवकाची विनंति ऐकोन विनंति प्रमाणें आज्ञा केली पाहिजे. विनंति उदास न कीजे. राजश्री विठ्ठलपंतांची इतराजी आम्हांवरी आहे हें स्वामी जाणतच आहेत. नेमणुके खेरीज दोनशें सिलेदार, स्वार आहेत व पागा सरकारची मातबरच जाली आहे. त्याची कांहीं नेमणूक नाहीं. सर्व अर्थ ध्यानांत आणावयासी स्वामी समर्थ आहेत. पत्र सविस्तर लिहिल्यावरी आतांच राजश्री नारोशंकर यांचीं पत्रें आलीं. मोटेचें ठाणें खालीं करून घेतलें. कामरगांवच्या मुकाशियासाठीं वणजारे मागती उत्पात राजद्वारीं करणार आहेत. याजकरितां सेवेशीं लिहिलें आहे. स्वामींनीं राजश्री नानांस व गोविंदरायांसी वरचेवरी लिहावें जे. कामरगांव सरकारांत पहिल्यापासून मुकासा पिलाजी जाधव यांस होतांच. मध्यें वणजारी यांस दिल्हा होता. राजश्री मृत्यु पावलियाउपरी वणजाराहि मेला. त्याजवरून गांव खालशास ठेवून अंताजीपंताकडे दिला आहे. पुन्हां वणजारा सातारां चिंतामण गुरव व लखमोजी खोजे यांचे हातें उत्पात करितात. तरी खोजे यास गुरवास ताकीद करून, वणजारे फजीत पावत यैसें करणे म्हणून सातारां राजश्री नानांस व गोविंदरायांस पत्र लिहावयासी स्वामी समर्थ आहेत. स्वामींनीं गांवांस रोखा करून खंडणी हुजुरून करून घ्यावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer Antaji Mankeshwar, one of the Peshwa's Sardars acting in the North, seems more free with his pen than with his sword. The details he gives will, however, help the reader much in clearing the general situation of the Marathas in the North.*

No. 27] [*28-11-1750*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे शेवेसी. विनंती सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम वर्तमान स्वामीचे प्रतापेंकरून ताा छ ९ मोहरमपावेतों कुषल असे. बहुत दिवस जाले. कृपापत्र पाठऊन सेवकाचा परामर्श न केला. याकरितां चित्त सापेक्षित असे. कृपा करून सांभाल केला पाहिजे. या प्रांतचे वर्तमान तरी वोडसे प्रांतचे हरामखोर सर्व येकत्र होऊन कुंवर भुपालसिंग राजे याचा कनिष्ट नातू यास सिरउपेस्छाई पुढें करून

---

१ अग्रेसर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खरगापुरवाले व उंझ्यानवाले व पलेरा व कठोर व धमना वगैरे पवार धंदेरे तीन च्यार सहस्र पांवलोक व पांचसातसे स्वार जमा होऊन दुंडी केली. वोडशाचे राज्याचा मुलुक ताराज केला. व सरकार खालशाचें गांव मउ-राणीपुरा कुरेछा वगैरे प्रांतचे चालिस पनास गांव मारून मुलकांत बखेडा बहुतच केला. देसीं नाना प्रकारची वर्तमान व पठाणाचे युध्याच्या लबाडीच्या अवाई उठऊन धूम केली. यामुलें सरकारचें नुकसान जालें. राजियास तों यवज येणें ठिकाणच नाहीसें केलें. मागील टोकपैकीं राजियाने निकाल करून मुलकांत यवज नेमून दिल्हा तो गर्दीस मेलविला. तेव्हां आम्ही फरोकाबाद प्रांतें होतों हें वर्तमान येकून या प्रांतें आलों. तों दिवस बरसांतीचे, यामुलें जागाजागा फौजा पाठविल्या. बंदोबस्त केला. तरी च्यार महिने दंगाच राहिला. उपरांतिक दसरा जाल्यावर राजियास समागमें घेऊन मुलकांत गेलों. हरामखोरांस परागंदा करून राजियाचे मुलकाचा व सरकारच्या मुलकाचा बंदोबस्त करूनं कुंवर भुपालसिंगास शाशन करून ठिकाणी ठेविलें. तो मागती राजश्री सरदारांची पत्रें आली कीं, पठाणानी बल केलें आहे, फौजे सहवर्तमान सत्वर येणें. त्याजवरून तिकडें दरमजल जावयाचा विचार केला. तों राजे पृथ्विसिंग यास वेथा जाली. सवेंच देवलोक जाले. राणी सुधां आकरा स्त्रियानी सहगमन केलें. मागती नवा मनसबा निर्माण जाला. तेव्हां कुंवर सांवतसिंग यांस राजतिलक मार्गशीर्ष शुध १० दशमीस सर्व राज्यांचे मतें जाला. सरकारचा नजराणा येणें प्रमाणें करार ठराविला. यैन पंचाहत्तर हजार, कारकुनीचे पंधरा हजार व मशारनलेस हती सिरपाव सरकारातून द्यावा त्याचे दाहा हजार येकूण येक लक्ष रुा ठराविले. यवजाचा विचार त्याचे घरचा कललाच आहे. दोन तीन सालांत राज्यांतून तजवीज करून घ्यावा, तेव्हां वसुलांत येईल. याप्रमाणें इकडील बंदोबस्त करून दरमजल राजश्री सरदारांकडे जात असों. राजे सांवतसिंग यास सिरपाव वस्त्रें पाठवावी. हती सरकारांतूनच दिल्हा, तरी दाहा हजार रुा नुकसान होणार नाहीं. नाहीं तरी रुा द्यावे लागतील. ये विषई आज्ञा कर्तव्य ते करावी. वस्त्रें व खातरजमेचें पत्र राजे मजकुरास पाठवावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणे. कृपा सेवकावरी करीत असावे हे विज्ञापना.

¶Naro Shankar writes to Bhausaheb at Poona how he has been exacting Maratha dues in Bundelkhand. He has been called away by the Holkar and the Scindia to join them at Delhi for helping the Vazir against the Rohillas.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 28] *[10-2-1751*

श्री

सेवेसी रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा छ २४ रविलावल येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन आलो त्या दिवसापासून आज्ञेप्रमाणे राजश्री जयाजी सिंदे आपा यांचे आज्ञेप्रमाणे वर्तोंन सुखरूप आहों. येथील सविस्तर अर्थ राजश्री आपासाहेबी लिहिला आहे, त्याजवरून विदित होईल. वजिराकडील वकील राजे जिगलाकिसोर व दिवाण रामनारायेण आले आहेत. बोली होत आहे. राजश्री मल्हारजी बावाची मर्जी वजिराकडेच जाण्याची दिसते. बोली ठीक जाहाल्यावरी जातील. राजश्री आपा व राजश्री सुभेदार येकाचित आहेत. सेवेसी कलावें याजकारितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Ramaji Anant Dabholkar, who replaced Ramchandra Baba in the Diwanship of the Scindias, accompanied Jayappa to Delhi, whence he writes this letter.*

No. 29] *[15-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान.

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत फाल्गुन शुद्ध प्रतिपदा पावेतों स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीचें आज्ञापत्र सादर जालें. सावकाराच्या तीन लक्ष वीस हजारांच्या वराता केल्या आहेत. तो यैवज वराते प्रमाणें ज्यांचा त्यास पावता करणें म्हणून आज्ञा. त्यास सरकारी यैवज देणें हें खरें. परंतु ईकडील विचार मोठा कठीण जाला आहे. येक तों चहुंकडे कजिया आणि स्वस्ताई बहुत ; गल्यास कोणी घेत नाहीं ; त्याजमुलें रयतेकडील पैसा येईना. कर्ज काढावें तर कजियामुलें सावकारांनीं तमाम दुकानें बंद केलीं. हुंडी तिलमात्र होत नाहीं, आणि कोणी कर्जहि देईना. मोठें कठीण यंदाचें वरीस आहे. निभाऊन घेणार स्वामी धणी आहेत. पठाणाकडील वर्तमान तर पठाणांनीं श्रीप्रयागास जाऊन शहर लुटलें, जाळिलें. बंदमवेशी करून श्रीगंगेसै पूल बांधोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

काशी क्षेत्रास उपद्रव द्यावयासी जाणार. या प्रांतीं चहुंकडे कजियाच आहे. तमाम जमीदार रजवाडे यांच्या नजरां फिरल्या आहेत. राजश्री मल्हारराउ होळकर यांचें लस्करी आम्हाकडील बाबूराव विष्णु सरकारी यैवजाच्या वसुलास (गेले आहेत). त्याणी जैनगरचें सविस्तर वर्तमान आम्हास (लिहिलें.) त्या पत्राची नकल करून स्वामीकडे पाठविली आहे. त्याजवरून सेवेसी निवेदन होईल. जयेनगरीं कजिया जाला. त्याजवरून तमाम रजवाडे भूमिये लबाडीस आले म्हणतात जे, रजपुतांनीं मराठे बहुत मारिलें आणि पलविलें. असा प्रसंग आहे. श्रीकाशीहून पत्रें आजीं आलीं जे, शहरावर पठाण जातात; पुढें ईश्वर काये करील पाहावें. राजे माधोसिंग जाले. हे बहुतच दुर्बुध्दि निघाले, विश्वास-घातकी निघाले. पुढें तेहि जमाव करीत आहेत. पैसा सुरक्षित द्यावा. राजीं बसविलें. सर्वस्वी अंगिकार केला. हें तिलमात्र चित्तांत न आलें. बेइमानीवरच नजर दिली. बंगालियाकडील वर्तमान तर राजश्री रघोजी भोंसले यांजकडील फौज त्या प्रांतीं होती. कांहीं नवीहि फौज ईकडून गेली व पठाणहि तेथें सामील होते. ते हे सर्व मिलोन मकसुदाबादप्रांतें येऊन कजिया केला आहे. आला-वर्दीखान आजारी आहे. वर्षभर आजारी आहे. बहुतच क्षीण आहे. वरकड वर्तमान लिहावेसें नाहीं. रजवाडे भूमिया आपले आपले जागा हरामजादगिरी करीत आहेत. मनसुबे नाना प्रकारें करितात. त्यास स्वामीचे पुण्यप्रताप समर्थ आहे. वर्तमान सेवेसी लिहिलें आहे. वरचेवर होत जाईल तें सेवेसी लिहित जाऊन. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

No. 30] [*19-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक गोविंद बल्लाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागायत फालगून शुा ५ पावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. अंतरवेदीकडील वर्तमान तर पठाण आपले फौजेनसी श्रीप्रयागास जाऊन शहर लुटले, जालिले, मदमेवसी केली. तेथून पुढें श्री कासीक्षेत्रास उपद्रव द्यावयासी जाणार. या प्रांती तमाम जमीदार रजवाडियाच्या नजरा फिरल्या आहेत, देहावर नाहींत. तिकडे जयनगराकडे माधोसिंगानेंहि कांहीं बेइमानीसी केली आहे. चहूंकडे कजियाच दिसतो आणि स्वस्ताई बहुत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गल्यास कोणी पुसत नाहीं. सावकारानीं तो जेथील तेथें दुकानें बंद केली. कोणी हुंडी एक पैशाची करीत नाहींत. गला स्वस्त, त्याजमुलें रयतेकडील पैसा येईना. गुदस्ताची बाकी व साल मजकूरचा पैसा यावा. त्यामध्यें अद्यापि चौथाई पैसा वसूल जाला नाहीं. कोणी पैसा देइनात. गांवाचा गांव पलतो. रयतेकडील पैसा येईना. साहूकारी कर्ज काढावे तरी चहूंकडे कजिये. त्याजकरितां सावकारहि कोणी कर्ज देइना. आणि अशामधें स्वामीनी सावकाराच्या वगैरे तीन चार लक्षाच्या वराता केल्या आहेत. इकडील वर्तमान तो या प्रकारचे. सरकारी एवज देणे हे तों खरेच. परंतु यंदाचे वरीस मोठे कठीण आहे. स्वामी निभाऊन घेतील तर स्थित राहील. वरकड सविस्तर वर्तमान चिरंजिव बाबूराव याजला लिहिले आहे. ते सेवेसी विनंति करतील. अम्हाकडील बाबूराव विष्णू राजश्री मलहारराऊ होलकर यांचे लष्करी सरकारी ऐवजाचे वसुलास आहेत. त्याणी जैयनगरचे सविस्तर वर्तमान आम्हास लिहिलेल्या पत्राची नक्कल करून पाठविली आहे. त्याजवरून सेवेसी निवेदन होईल. यंदा स्वस्ताई बहुत जाली. एक पैशाचा जिन्नस विकत नाहीं. त्याजमुलें इलाज नाहीं. मार्ग कोचमनवर प्रांतीचे मुतलख बंद जाले. जकाती बुडाली. मोठे नुकसान आहे. कोणेही इलाजे पैसा मिलत नाहीं. स्वामी धनी आहेत. ज्यामध्यें स्थित राहे ते स्वामी करतील तरीच आब राहेल. रयतेकडील पैसा चार रोज येत नवता, तर सावकारीयांत हुंडी अगर नगद कर्ज मिलत होते. यास दोनी समये येकदां जाले असा प्रसंग आहे. आम्ही कधी याप्रकारे स्वामीस लिहिले नव्हते. दक्षणेंत कजिया; हिंदुस्थानांत कजीया; याजमुले सावकारीयांत एकंदर काम चालत नाहीं. आहे वर्तमान सेवेसी लिहिले आहे. वरचेवर होत जाईल ते लिहित जाऊन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री नाना स्वामी व आप्रण खासा उभयेताची रात्रंदिवस चौकी उत्तम प्रकारे असो द्यावी. दहा वीस माणुस जवल इतबारी असो द्यावे. सारांश सावधानी उत्तम प्रकारे असो द्यावी. मोठ मोठे रजपूत ब्राम्हणभक्त त्याचा विश्वास राहिला नाहीं. याजकरितां विनंति लिहिली आहे. स्वामी तो सावध आहेत. परंतु आपले राज्यांत दरबार सहज आहे. याजकरितां बहुत सावधानी करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govindpant Bundele reports in the two letters to Bhausaheb about the unsettled conditions in the Doab. He says : The Rohillas have plundered Allahabad (Prayag) and are marching on Benares. People are flying into jungles. Collection of revenues has become impossible. Commerce has received a set-back.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 31] [*21-2-1751*

श्री

पत्र आलें त्याची नकल.

श्रीमत राजश्री गोविंदपंत
स्वामीचे सेवेसीं

सेवक बाबूराव विष्णू साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील वर्तमान तागायत माघ शुध ७ मुकाम जयनगर लस्करांत सुखरूप आहों. तुम्हांपासून स्वार जाहलों ते मजल दरमजल मार्गसीर्ष शुध १ दाखल लस्कर नजिक मुकुंदबारी येक मजल तेथें राजश्री सुभेदार[1]ांच्या व तात्यांच्या भेटी जाहल्या. पत्रें श्रीमंताची व आपलीं दिधलीं. वर्तमान साद्यंत सांगितलें. त्याणी उत्तर दिधलें कीं, येथें वराता अलाहिदा अल्या आहेत. विष्णू माहादेव येक लाख पंधरा हजाराच्या आहेत. व अंताजी शंकर दोन लाख व आणखी साठी हजाराच्या यैशा वरात परस्परें आम्हांवरी आल्या आहेत. मागती तुम्हांकडे यैवज देविला. आम्ही सांगितलें कीं, तीन लाख रुपये आम्ही भरून दिधले. आम्हावरी वराता या यैवजीं पंतावरी केल्या. त्याणी यैवज पंतापासून घेतला. याजकरितां तुम्हापासी आम्हांस पाठविलें. ते म्हणो लागले कीं उत्तम, यैवज तुम्हांस देऊं, नेनवेपावेतो चला, तेथें तुमची वाट करून देऊं. यैसे सुभेदार आपले रुबरू बोलिले. मग मजल दरमजल मार्गसीर्ष शुध ११ येकादशीस नेनवे यास आले. तेथें मोर्चे लाविले. तिसरे दिवशीं येऊन भेटले. ठाणे याच्या हवाला केलें. तेथें बाईको राजियाची होती, ती बाहिर काढून दिधली. तेथें ठाणे याणी आपले बसविले. परगणा मातबर आहे. बुंदीकर कमाविसदार बाळाजी शामराज यांच्या हवाला केलें. दाहा रोज मुकाम होता. तेथेंहि दोन तीन वेळां हटकिलें. परंतु यैवज नाहीं. कमाविसदारापासून रसद घेऊन द्यावी तों कमाविसदाराचेच रुपये दोन दोन लाख निघतात. याजकरितां आम्हांस म्हणाले कीं, तुम्हास येवज.....जैनगर प्रांतीं गेल्यावर देऊं..... नेनवे याहून मजल दरमजल जैनगरास चालिले. दोन तीन मजली जैनगर राहिलें, तों राजियास वर्तमान कललें. त्याणीं वकील व याचा.....गणेश मालीं राजे यानें दोन लाख रुपये देऊन पाठविलें. त्याची भेट जाली. सुभेदार इतराज जाहाले. कांहीं केल्या न यैकत. मजल दरमजल चालिले. वकिलांही लेहून पाठविले कीं हे यैकत नाहीं. केशवदास मारिला त्याचा सूड आपणांस

---

१ मल्हारराव होळकर व गंगाधर तात्या चद्रचूड यांच्या.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

घेणें आहे, यैसें लेहून पाठविलें. राजियाचे कारभारी जुने घरीं बैसले होते. हरगोविंद व विद्याधर दोघे राजियापासीं गेले कीं सुभेदार येतात. फौज आपली आणावी, बाहिर जाऊन लडाई करावी, अगर गावातून लडाई करावयाची असेल तरी मोर्चेबंदी करावी. तोफा बुरजेबुरूज ठेवावी, यैसें उभयेतानी सांगितलें. त्याजवरी इतराज राजा जाहला. त्याचे कारभारी नवे माहावत व येक नाहावी त्याजला बोलाविलें कीं, सुभेदाराच्या चित्तांत कीं केशवदास आपण मारिला, त्याचा सूड घेणार. याजकरितां तुम्ही सुभेदारापासीं जाऊन गोष्टमातें[1] करणें; च्यार पांच लाख रुपये मागतील तर देऊन वाटेस लावणें, यैसें दोघां कारभारी यासी सांगितलें. कारभारी म्हणाले कीं आम्ही येकंदर न जाऊं. आम्हास तो मारील. तुम्ही आपले हाते मारणें, परंतु आम्हांस तिकडे न पाठवणें. मग राजा उगाच राहिला. संध्याकाल जाहला. वर्तमान यैकिलें कीं सुभेदार येथून दाहा कोसावर आले. खिजमतदारास सांगितलें कीं काला नाग जित आणवणें व सोमलखार घेऊन येणे. औषध करणे आहे. त्याणी आणून दिल्हें. दोन प्रहर रात्रीस जहर राजे याणे घेतलें. नाग अंगास डसविले. पहाटे ईश्वरसिंग राजा याचा प्राण गेला. तिघी बाईकानी जहर घेतले. व येक कलावतिण इणे जहर घेतलें. यैसे चार बाईका व राजा यैसे जहर घेऊन प्राण दिधले. हें कोणास शहरांत टावकें नाहीं व कारभारी यांसीहि ठाऊक नाहीं. येक खिजमतगारास मात्र ठाऊकें होतें. पौष वद्य १२ सुक्रवार[2] प्रहर दिवसा फौज खंडेराऊ[3] व गंगाधरपंत ताल्या (चंद्रचूड) नगरावर गेले. सुभेदार व बुनगें तीन कोसावरी मागें राहिले. दोन प्रहर पावेतों कोण्ही गोले टाकिले नाहींत. फौज बाहिर उभी. कारभारी राजीयासी गेले कीं माहाराज फौज बाहेर येऊन लागली, आपण अजून निजलेसे काय? म्हणून उठवावयास लागले तों खिजमतगार म्हणाला कीं माहाराजानें यैसें कर्म केलें. मग आकांत शहरांत जाहला. जुने कारभारी हरगोविंद व विद्याधर याणी थांबाधांब शाहरांत करून मग बाहिर भेटीस आले. उभयतांस भेटले. सुभेदारासहि सांगोन पाठविलें. तिसरा प्रहरास कूच करून शाहराजवळ फौज सुधां राहिले. पाहावयास माणसें पाठविलीं, तों खरेंच जाहालें. मग याणी चौकीया दरवाज्यावर जागजागी ठेविलें. राजमंदिरीं चौकी ठेविली. राजेयाचा मुरदा च्यारी प्रहर दिवसपर्यंत होता. मग सुभेदारानी कारभारी आपले मातबर दोघे पाठऊन व सेला पाठऊन अगिनडाव दिधला. तीन बाईका व येक कलावंतीण यैसें जलालें. दुसरीया

---

१ गोष्टी करणें.

२ वार चूक असावा असें वाटतें. गुरवारला नवमी आहे असे पत्रांत आलें आहे. द्वादशी रविवारीं येते.

३ होळकर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिवशीं राजेयाचे हवेलीतून चौक्या बसविल्या आणि इकडे माधोसिंगास सांडणी-स्वार पाठविला. पत्र पाठविलें कीं जलदीनें येऊन पोहचणें आणि इकडे हरगोविंद व विद्याधर सुभेदारापासीं येऊन बहुत रदबदल करून शाहरचा व राजियाचे आपेश तुम्ही माथां न घेणे, राज्य भारी आहे, याची स्थापना करावी. मग सुभेदाराचे चितास येऊन जागजागा चौकिया बसविल्या होत्या. खंडणीचा करार करून चौक्या उठविल्या. यैसा करार मदार होऊन च्यार रोज जाहले. राज्याची येक राणी व वीस कलावंतीणी तेहि सती पडल्या. रुपयाच्या वसुलास लागले. तो माधोसिंग पंधरावे रोजीं आला. सुभेदार पुढें जाऊन भेटले. येक हतीवर उभयता बसले. तैसेच गावात जाऊन त्याच्या हवेलींत घातलें. सुभेदार माघारे आले. माधोसिंग आल्यावरी आठवे रोजीं राजश्री जायाजी सिंदेहि आले. आपण दोन तीन वेला सुभेदारास * त्यांस विचारिलें कीं आमच्या यैवजाची वाट काय ? तिकडे पंतास निकड लागली आहे, वरातावर वराता होतात, आमची वाट काय ? त्याणी सांगितलें कीं हे रुपये वसूल होतील, यांतून रुपये हुंडिया करून तुम्हांस रवाना करूं. यैसें उत्तर दिल्हें. आणप्रमाण केलें. वसुलास लागले. इतकियांत माधोसिंग याची फौज दाहा पंधरा हजार आली होती. सेखावन वगैर लोक जमाव जाल्यावर त्याची नजर फिरली. मग कुविद्या धरिली कीं सुभेदारास व जायाजी शिंदे यास जेवावयास करावें. अन्न अवघें विखाचें करावें. दाहा पांच हजार खासे होतील यांस जेऊं घालावें आणि मारावें यैसे केलें. यांजला बहुत प्रकारें विनंति केली. सुभेदार कबूल जाहले. जायापानी गोष्ट उडविली कीं, आपण येकंदर जात नाहीं. तुम्ही जाल तरी जा, परंतु आपण येकंदर जाणार नाहीं. मग राहिले. त्याणे पाच सात दिवस पकवाने केली होतीं. त्यांत अवघे वीख घातलें. पाणियांत वीख घातलें आणि ब्राम्हणांस पेढे विखाचे केले. सोमलखार दोन मण घेतला होता. यैसा प्रसंग केला होता. ईश्वरें सरदारांस वांचविलें. जायापानें मोडा घातला. व उभेदासिंग बुंदीवाले याणें मोडा घातला मग त्याणे अन्न मातीत पुरलें. याजला खबर नाहीं. दुसरे रोजीं दुसरा विचार केला कीं, गंगाधरपंत व आणखी कारभारी बोलाऊन आणून येथें मारावें. पहिले जात असत. दोन च्यार दिवस गावांत राहात असत. याजकरितां बोलाऊं पाठविलें. दरवाजेयावरी ताकीद केली कीं, चौघांच्या पालख्या येतील, आम्हांकडे येऊं देणे, मग शाहरचे दरवाजे लावणे. यैसे करार करून याजळा बोलाऊं पाठविलें. त्याजला सांगोन पाठविलें कीं आपण प्रहर दिवसांत येतों. तैसेच जायाजी सिंदे याजकडे गेले. तिकडे संध्याकाल पावेतों लागला. शाहरांत लोक दाहा पांच हजारी माणूस शहर पाहावयासी व उंटें व घोडीं.....सूत द्यावयासी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जात असत. ते दिवशीं जायाजी शिंदे यांजकडील खासे फार शहरांत गेले. च्यार पालखियाचे सरदार बसोन गेले. याणी म्हटलें कीं तात्या आले वर्तमान रा * सांगितलें. दरवाजे लाविले. माघ वद्य ९ रोजीं गुरूवासरीं राजियाचा हुकूम जाला कीं महराठे लोक अले कतल, यैसें सांगोन अगोदर लोकांस विसारत होती. होतांच राजा उठोन माडीवर जाऊन बसला. शहरचे दरवाजे लावले. दोन प्रहरापासून आपलेकडील माणसें मारीत होते. तों प्रहर रात्रपर्यंत माणूस कापिलें. तीन हजार माणूस कापलें व येक हजार माणूस जखमी जाहलें. जायापाकडील मातबर मातबर सरदार नामांकित हजार व सिपाय व चाकर वगैरे सुभेदाराकडील मातबर पंचविस व चाकर वगैरे हजार दीड हजार व ब्राम्हण शंभर व बटकी व पेंढारी व मुलें यैसें कापून काहडलीं. जखमी जे आले ते कितेक मरतात. सें पनास माणूस वगैरे कितेक जे गावांत वाचलें तितकें मात्र आलें. गांवकुसावरून उड्या घालून आले. त्याचे पाय मोडले व कमर मोडले. कितेक वांचोन आले. यैसा कहर शहरांत केला. येक हजार घोडे भलभले चांगले बसोन गेले होते तितकेहि गेले. सोनीयाची कडीं व मोतीयाच्या जोड्या व पैका वस्तभाव घ्यावयास गेले. इतके मानूस गेले. सुमार नाहीं. मारले फार गेले. त्यास जायाजी शिंदे याजकडील मातबर सरदार वगैरे फार मारले गेले. आमचा उंट दाडगे याणी नेला. मल्हारबाचे उंट ६ व सिलेदाराचे पांच व आमचा येक येकूण बारा चारा आणावयासी गेले होते. ते येके दिवशीं चांगले ओझे पडले याजकरितां बुधवारीं उंट आणावयास गेलें. गांवात उंट विकत घेऊन संध्याकाळीं आलें. गुरूवारीं भोजन करून उंटाच्या सरंजामासाठीं गावात जीन ठेऊन जात होतो. त्यास ईश्वरे काये बुधी दिली ते राहिलों. सरंजामासाठीं आमचा बारगीर व मल्हारजी जासुद सरकारचा गेला होता. तो दोघे मारले गेले. यैसें वर्तमान जाहलें. आमचें मरण; तुमचे पुण्येकरून वांचलों. मार्ग चालत नाहीं. कासीद देखील वाटेने मारले जातात. यैसें चौकडून रान नासलें आहे. याजकरितां तुम्हाकडे मानसें पाठवावयास अनुकूल पडलें नाहीं. गुरूवारीं पौष वद्य ९ रोजीं यैसा विचार जाला. शनवारीं शाहरापासून कूच करून आलिकडे तीन च्यार कोस येऊन राहिले. त्याचा वकील कनीराम व गणेशमाली याचा वकील व गोविंद तिमाजी वकील माहादभटाचा, यैसे गावातून आले. त्याणी कितेक प्रकारे समजाविले कीं आम्हांपासून गोष्ट जाली नाहीं. पोरासोरी जाहाली. जे जाहाली ते उत्तम. परंतु आतां कांहीं ते गोष्ट येत नाहीं. मारले गेले ते गेले.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पुढं सला करावा. याणी पाहिलें तों रान भारी.....खिलें इलाज उपाय चालेनासा जाहला. * जागा शहरे व गांव मातबर, जवल येऊं देणें नाहीं. यैसे प्रसंग पाहोन कबूल केलें कीं घोडीं द्यावीं. जे वस्तभाव गेली आहे त्याचा खंड घ्यावा व जे खंडणी पहिली केली * * यैसी सावकारी निशा करून देणें आणि आपण कूच करून जातों. वकिलाणी कबूल करून गावात जाऊन राजियास सांगितलें. आज उद्यां आज उद्यां करितां पंधरा दिवस जाहाले कीं आम्ही येतों, निशा करून देतों. रोज कागद येतात, परंतु त्याचा चित्तांत दगाबाजी आहे. सुधेपणें देत नाहीं. हे तो आशेस गुतले. पाहावें. आठा रोजांत काम काज उरकून कूच करून मजल दरमजल मनसूर आलीकडे जावें. वकील येऊन बैसले आहेत, त्याजकडे जावयास उतावेल जाहाले. परंतु येथें आटकाव जाहला. याजकरितां विलाज नाहीं. पांचा साता दिवसांत तह बसला. सावकारी निशा जाली. तरी लवकरच येमुनातीर प्रांतीं येतील. नाहीं तरी दोन महिने अटकाव होईल. लक्ष वाटे तह बसेल, चिंता नाहीं. पुरवी राजा मेला ते वेलेस पंचवीस तीस हती व पनास पावणसें घोडीं राजियाची आणिली आहेत. लस्करांत माहागाई तांदूल रुपयास च्यार शेर व तेल दोन सेर व तूप दीडसेर व पीठ रुपयास आठ शेर, दाणा च्यार पाईली सातु आहेत. येणेंप्रमाणें धारण आहे. रस्ता येऊं पावत नाहीं. लुटीचे दाणें येका दों दिवसीं येतात. येखादे दिवशीं येत नाहींत. यैसा प्रसंग आहे. मिरखान तुम्हाकडे आले म्हणोन सुभेदार सांगत होते. आपण लिहिलें कीं हा कालपर्यंत आले नाहीं. भगवंतानें मोठे येश सुभेदारांस दिधलें होतें. आतां अपेश आलें याजकरितां परमश्रमी आहे. देशामध्यें गडबड यैकितों. नासरजंगहि वारले. सत्यमिथ्य ठाऊक नाहीं. सुभेदाराचा कारभार वोढगस्त आहे, देऊं म्हणतात, यैवज हातास आलेवर वाट होईल. जैनगरचा यैवज आला तरी वाट सत्वर होईल. नाहीं तरी मग मनसूरआलीकडे काय होईल तें पाहावें. येथील प्रसंग या प्रकारचा आहे. यैवज (तिकडेच) देऊं म्हणतात. हातास येईल तेव्हां खरें. येथील काम काज उरकून आगरेप्रातीं जाणार आहेत. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना.

¶*An important news-letter addressed to Govindpant Bundele by his accountant Baburao Vishnu from the camp of Malharrao Holkar and Jayapa Scinde in the vicinity of Jaipur. The letter mentions the circumstances of the suicide of Ishwarsing and the horrid murders perpetrated upon the Maratha forces by orders of Madhosing. In this can be traced the enmity which the Marathas and Rajputs bore to each other.*

---

१ सफदरजंग.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 32] *[23-3-1751*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री.....भाऊ
स्वामीचे सो

विनंती सेवक दामोदर माहादेव व पुरुषोत्तम माहादेव कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ६ माहे जमादिलवल मुकाम लस्कर नवाब वजीर व सरदार जिले अंतरवेद नजीक काळी नदी स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष. जळेश्वराच्या मुकामीहून विनंती पत्र सो पाठविले आहे त्यावरून सविस्तर श्रृत हो(ईल). शादीलखां पठाण, अहमदखां बंगाशाचा मातबर सरदार, सिकंदऱ्या प्रांती चौ हजारा रावतांसीं व चौं हजार प्याद्यांनसी राहात होता. तो सरदारानी फौजा पाठऊन मोडिला. मुख्य अहमदखां बंगश प्रयागास लागला होता. तो फरुखाबादेकडे परतून येतो. नवाब वजीर व सरदार त्यास मारायास दरकूच जातात. हें सविस्तर वर्तमान श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे पत्री लिहिले आहे. त्यावरून [पुढील सुमारें चार पांच ओळी मजकूर फाटण्यांत गेला आहे.]

¶*Rohilla commander Shadilkhan was defeated by the Marathas.*

No. 33] *[Aug. 1752*

श्री.

राजश्री समेसर बहादर गोसावी यांसी.

ॐ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य...स्नो सखाराम भगवंत रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावें. विशेष राजश्री विठल सिवदेव याची फौज व राजश्री गंगोबा तात्या कडील लांबहाते वगैरे फौज व हुजरातची पथके बाबुराव हरी व सेव्याजी आइतोळे व कुकाजी सिवराम व महादजी खंडेराव वगैरे आजी पार उतरले. आम्ही व गाजदीखान वजीर यापारीच आहो. आपण तिकडून जलदी यावयाचे करावें. उसीर न लावावा.

---

* का. सं. प. या. ८५ वरून गाजुद्दीनखान सिंदे होळकरसहित दिल्लीहून नर्मदेवर आला. त्या। वेळचें पत्र. बरोबरच्या सरदारांची नांवनिशी आहे. बाबूराव हरी गुप्ते सखाराम हरीचा भाऊ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 34] [*5-3-1753*

श्री.

श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक जयाजी सिंदे, कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत छ २९ रबिलाकरपर्यंत येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें सादर जाहालें. तुम्ही पुण्याहून चांभारगोंद्यास गेला. तेथें किती दिवस राहून मालव्यांत जाणार तें लिहिणें. फौजेची समजाविस करून सत्वर जाणें म्हणोन आज्ञा, तर फौजेची समजाविस होत आहे. बहुतकरून जाली. राहिले लोक त्याची समजाविस करून फाल्गुन वद्य ५ पंचमीस कूच करून हिंदुस्थान प्रांतें जातो. आथःपर घरीं बहुत दिवस राहत नाहीं. राणाजीकडून प्राप्त फार थोडी आहे. जाताना गरमनरम होऊन पाचालाखाचा पटा घ्यावा, हें चित्तामधेंच राहिला आहे. त्याचा निमे मुलुक झर (जर ?) कोण घ्यावे म्हणोन आज्ञा तर दोही गोष्टीचें पारपत्य करावयाचें अगाध काय आहे? आजतागायत कोणाच्या अश्रियानें राहिलें आहेत हें सर्व आपण जाणतच आहेत. उभयेताचें पारपत्य चित्तापासून करणेंच आहे तर आज्ञा करावी. जें होणें तें स्वामीच्या प्रतापेंकरून होऊन येईल. श्रीमंत राजश्री दादासाहेबास उचित मनसबा दिसेल ते लिहित जाणें म्हणोन आज्ञा केली तर आम्ही हिंदुस्थान प्रांतें गेल्यावर तिकडे जसा मनसबा अढळेल तैसा त्यास लेहून पाठऊं. आपण त्यास लेहून पाठवावें कीं, तुम्हांस विनंतिपत्र लेहून पाठवितील तें कार्य चितावर धरून करणें म्हणजे सर्वहि गोष्टी होऊन येतील. आम्हास जसी श्रीमंत राजश्री दादासाहेब आज्ञा करितील त्या प्रमाणेंच वर्तणूक करूं. येविसीं येक दोन वेळ त्यास लेहून पाठवावें. शाहाबादेचेविसीं लिहिलें तर शह पडल्यास काम करून घेऊं इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री राव[१]साहेबीं लिहिलें आहे, त्यावरून श्रृत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Jayappa Scindia to Peshwa from Shrigonda reports that he would soon proceed to the North and join Raghoba. It seems Vishwasrao was with Jayappa.*

---

१ विश्वासरांव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 35] *[3-10-1753*

पौ छ ४ सफर

श्रीशंकर.

सेवेसी विज्ञापना. येथील मजकूर तरी राजश्री खंडेराव होलकर व सखारामपंत व गंगोबा यास सडे सात हजार फौजेनसी रवाना केले. येथे फौज नवती. परंतु काम तोडी आले. यास्तव आम्हाजवल व मल्हारबाजवल पाचसे फौज ठेऊन बाकी रवाना केले. तेथे येकादोहो रोजानी सलुख होणार होता. परंतु आमची आल्याची खबर कललियावरी राहिला. दताजी सिंदे याजवल दाहा हजार फौज होती. परंतु ते न आले. जयापाची वाट पाहात राहिले. जयापा तरी मागे राहिले. याणी तरी मूलपण केले. आम्ही फजीत पडावे या आशयाने दतबा राहिले नाहीं. परंतु मूलपण जाहाले. असो. आमची फौज तरी येता दिसतच नाहीं. असा मजकूर आहे. परंतु येथे आम्ही कांहीं रांगडे वगैरे राऊत मिलतील ते ठेऊन चालवीतच आहो. राजश्री मल्हारजी होलकर याजकडून रामसिंगाविसी दताजी सिंदे याजकडील राणोजी भोइटे आणून त्याची खातरजमा केली कीं हे काम खामखा करू. तथापि ते न आले. याजमुले मल्हारबा आमलसे खेंटे आहेत. सहजामध्ये बोलले कीं कामाचे वेलेस आले नाहींत हे त्यास उचित नाहीं. त्यावर आम्ही बोललो कीं दतबा मूल आहे. जयापा आल्यावरी लौकर येतील. ऐसे आहे. रा छ ७ मोहरम. बहुत काये लिहिणे हे विनंति.

¶This letter, all in Raghunathrao's hand, addressed to the Peshwa from Northern India, discloses the differences that were arising between the Scindia and the Holkar.

No. 36] *[1753 or 1754*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापु स्वामी शेवेसी.

पोष्यें अंताजी मणकेश्वर साष्टांग नमस्कार विनंती. उपरी येथील कुशल ता॥ कार्तिक वद्य पंचमी मुक्काम इंद्रप्रस्थ जाणुन स्वकीयें कुशललेखन करीत गेले

---

१. नाखुष.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाहिजे विशेष. स्वामीची पत्रें येक दोन पावली. साकल्य अर्थ ध्यानास आला. त्यास येथील साद्येत अर्थ श्रीमत राजश्री दादासाहेबांचें पत्री लिहिला. याजकरिता निराला तपसील न लिहिला. तेच पत्रें वाचताच सर्व अर्थ ध्यानास येईल. गुदस्तापासून श्रीमत राजश्री पतप्रधान यानी दाहावेला लिहित गेले की, तुम्ही सर्व गोष्टीची माहीतगिरी करणें. पुढें तेथील बंदोबस्त तुमच्या हाते करणे आहे. * * * * * * * * * * * म्हादी मिलत नाही. लोक तर कां सोडतील; परंतु आम्ही कर्जे कोठवरी घ्यावी. सरदारीच बुडवावी यैसा प्रसंग वकिलानी केला आहे. राजश्री नारोपंत मजुमदार यांस कार्तीक शुध येकदसी देवाज्ञा जाली. तेजदार तरवारेचे होते. मोठी आमची बाजू गेली. वीसदा तरवार त्यानी येंदा मारिली. ईश्वरे मोठे वाईट केले. मजुमदारासारखा माणूस आता कोठून मिलल. या उपरी आपणाखेरीज आमचे कोण आहे ? तरी वरातेच्या मुबदला वरात अंतरवेदीत गोविदपंतावरी देवावी. व अर्बाची नेमणूक नेमणूक नाल-बंदी रोजमुरियाची कोठे देवावी ते देवणे. विनंति उदास न करावी. साद्येंत वृत काडीने काडी सविस्तर लिहिणे. आपण कोठे आहेत पुढे काये कर्तव्ये हे वरचेवरी लिहित जावे. वकिलास नित्य पत्रे यावी, आम्हास न जावी, यैसी चाकरी केली नव्हती. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे.

¶*Antaji Mankeshwar's letter to Sakharam Bapu requesting to arrange about his allowances.*

No. 37] [*27-12-1753*

श्री.

पो बालाजी खंडेराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल ताा छ १ रौवल मुो कसबे पुट श्रीगंगाउत्तरतीर वर्तमान येथास्थित असे विशेष. आम्हास राजश्री दादांनी पूल बाधावयाची आज्ञा करून छ २६ सफरी रवाना केले ते छ २८ सफरी सोमवारी मुा मजकुरी पावलो. येथील पुल बाधावयाचे वृत तरी राजश्री भिवाजीपंत होलकरांकडिल आमच्या अगोदर दोन रोज आले होते. त्याणी गणमुक्तेश्वरच्या व येथील वगैरे जवलील येकूण नावा पंनास पर्यंत जमा केल्या आहेत. त्याज बाा तोफखाना आला होता. तो उतरोन पार गेला. सुतार लोहार वगैरे कारखान्यामुले काम चालीस लाविले आहे. दोनसे मजूरहि

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मेलविले आहे. मुर्जांची चराटे वलतात व छकडे लावून लाकडे आणविली. याप्राा सरंजाम होळकराकडील होत आहे. आम्हाकडील सरंजाम तरी सरकारची पत्रें काादारास होती. राउत देऊन मेरट व अनुपशहर व जाटाकडे वगैरे गंगातीराने पाठविले आहेत. आणिखी तूर्त पंचवीस तीस नावा आलियावर येक पुल तयार करितों. पावणासे असी नाव लागतीलसा आजमास आहे. आम्हांकडील सरजाम काादाराकडील आलियास सत्वरच तयार होईल. आपल्याकडील वृत सविस्तर लेहून पाठवावे. राजश्री शंकराजी नारायण अनुपशहराकडे पार उतरावयासी गेले होते. त्यास तेथील नावा तमाम बुडविल्या आहेत. त्यास तेथे कोण्ही उतरीना. याजकारितां माारनिले काली येथे आले. सिद्याकडील पागा अनुपशहराकडे गेल्या आहेत. तेथे नावा आजपर्यंत दाहाबारापर्यंत जमा जाहल्या आहेत, म्हणून सांगत होते. आपल्यास हे वृत श्रुत व्हावे, या करिता लिहिले आहे. बहुत काय लिहिणे. लोभ करावा हे विनंति.

सेवेसी सदाशिव रघुनाथ साष्टांग नमस्कार. लिखितार्थ परिसोन दया करीत जावी हे विनंति.

A bridge of boats was being constructed to lead reinforcements to the Vazir across the Ganges.

No. 38] [*1754*

श्री.

सेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली ते पावली. डिगेंतून फौज बाहेर निघुन गेली. याचा माार लिहिला. यैसियास फौज कोणीकडे गेली. यांचे तहकीक तों कलले नाहीं. परंतु त्यांची बातमी राखिली पाहिजे. यास्तव फौज कांही रवाना करावयाची तजवीज केली पाहिजे. काली रात्रौ फौज पाठवावयाची आज्ञा जाली होती. त्याजवरून येथून च्यार पांच हजार फौजेनसी चिरंजीव राजश्री दताजी सिंदे यास पाठविलें. येथून डिगे पावेतो जाऊन आसपास पाहून आले. त्यांची फौज कोठें आढळली नाहीं. *सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

¶*This appears to be Jayappa Scindia's letter to Raghoba in the campaign against the Jaths.*

---

१ मुंज गवत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीशंकर.

सेा कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आज्ञापत्र पावले. दोन रोज खानखानासीं बोलतो. परंतु याची कोण्हेहि प्रकारें खातरजमा होत नाहीं. याकरितां तीन प्रकार योजिले आहेत. वजीरास बोलून ठराऊन यावें.

एक तर लाहोरची खिलत देऊन त्या बाार तीन हजार फौज कुरुक्षेत्रा पावेतो द्यावी. आपुण गंगेकडे जाऊन पंध्रा विस दिवसांत माघारे येऊन जयेनगराकडे जावें. तो फौज ही येईल या प्रो.

हे गोष्ट नवाबास विचारिली. उत्तर दिधले कीं कुरुक्षेत्राकडे फौजहि पाठवणें आम्हास पुरवत नाहीं. व अतःपर आम्हीं फार चुलेंचुले जालों. नाकास जीव आला, महिनाभर गंगेस जाऊन माघारे येऊन मग जयनगरास जाऊ म्हणतात. हेहि या प्रांतीं कालहरण करून मुलुक बुडवावा व आम्हांस बाहेर पोट भरावयासहि निघुं न द्यावें हा विचार दिसतो. हेहि गोष्ट कशी आम्हासी पुरवेल? ऐसेच आम्हास खराब करावयाचे चित्तांत असले तर साफ सांगा. जे आमचे कपाळीं असेल तें होईल.

नवाब बोलले कीं आम्ही अंतःकरणापासून निर्मळ होऊन सरदारानें म्हटले ते देऊन खानखानास समजाऊन आणीत असतां नच येत, तर आमचा तो अपराध नाही. सरदार थोर आहेत.

जसें त्यास उत्तम दिसेल तसे करतीलच. खानखानानी सरदारांबराबर जावें, हे आमच्या चित्तांत सहसा नाहीं. नच राहात व जातीलच व सरदारहि नेतीलच तर आमचा यत्नहि न्यावे.

दुसरा विचार खानसामा, समशामुदौला यानी एकांती खातरजमा करून घेऊन जावें, म्हणजे यानेहि जावें. त्याजमधे कसर असली कामाचे नाहीं. विचार पाहतां हे खरेंच आहे. त्याची आंतस्ते खातरजमा नाहीं. तेव्हां जावें कसें? हे तुहीं बळकट असेल तर करावे, नाही तर यांत वजिराची लबाडी दिसते.

---

१ अधीर, अस्वस्थ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्नेह रक्षणे असले तर येथून उठून नीट दरकूच दक्षणेस जयनगराकडे जा. गंगास्नान पुढें करा. आतांच करणे असेल तर बाहीरबुणगा जयनगराकडे लाऊन द्या, व तुम्ही पांचा हजारा फौजेनसी सडे आठ दिवसा गंगाश्नान संपादून दिलीस न येतां जाटाचे तालुक्यांत यमुना उतरून जयनगराकडे जा. मनोहरपुरास पावल्यावर रु. देवउं. विश्वास नसला तर तुमच्या सावकाराची निशा देऊं कीं मनोहरपुरास पावल्यावर रुपये आपले सावकारापासून घ्यावे.

खान सामास तर बरे वाटत नाही. दरबारास येत नाहीं. समसामुद्दौला आले होते. त्यांची निशा पातशहानी वजीरानी अंतःकरणापासून केली. समसामुदौलानीं खातरजमा करून घेऊन खानखानास व स्वामीस व सुभेदारांस पत्रें लेहलीं, तें पहिले स्वामीपासी पाठविलीं आहेत. व विनंतीहि विस्तारें लेहली आहे. येथें तर शुधता व खातरजमा पुरती जाली.

तिसरी गोष्ट. सेवटीं काहींच नव्हे तर आम्हास खानखानास बरोबर घेऊन गेले पाा. तेव्हां त्याचा तूर्त निर्वाह होईल.

खानखाना उगेच चितात वसवास उत्पन्न करून संशयच काढीत बसतील तर इच्छा त्यांची. वरकड इकडून तो बळकटी जाली.

येणें प्रमाणें जाबसाल जाला. पुढें जे उत्तम ते करावयास स्वामी समर्थ आहेत. वैरणीची तसदी म्हणून झीलेवर जायाची तजवीज चितांत आली तर आतां सड्या व काठीचा भला येथून तेथें तेथून येथें मजा नाहीं. लागलेच विल्हे लावून कूचाची तजवीज केली पो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter is addressed from Delhi to the Peshwa at Poona, may be, by Trimbakrao Pethe, who had accompanied Raghunathrao in that expedition, and contains the several alternatives which were under discussion with the Vazier (Gaji-ud-din).*

No. 40] [*1753*

श्री.

विनंति उपरी. पुढें फौज पाठविली ती लुटावयास पाठविली कीं काय. इतका आगरह करून उठविले. ते लुटीतात; ताकीद मानीत नाहींत. सराई आरबाची तेथवर चिरंजीव बापू गेले होते. आरब दाहा हजार आहेत. त्यातील सरदार येऊन भेटले. भेटावयास आणिले त्यास परस्परे वळून आपल्याकडे नेतात.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जागाजागा सरदारी आहे. लांबहाते तो बोलून सांगतात कीं आम्हास रोजमरा नाहीं. आम्हासी लुटणे. हे गोष्टीचा बंदोबस्त करावा. नवाब गाजदीखान घाटावर निपट डेऱ्यासेजारीच आले, तेव्हा आम्ही हत्तीवर बसून जाऊन रामराम जाला. बोलिले की बापू सडे येका पालखीनसी पुढें नदीपार जाले. आम्हास संशय वाटला; याकरितां घाटावर आलो. घाटहि पाहिला, उतरलो हे बरें केलें. परंतु लूटफाट न करावी. लुटल्याने जे जो (?) लोक भेटणार ते त्यास अनकूल होतील, आपल्यास भारी पडेल. याकरितां लुटीचे मना करावें. शेहरांत लाखो माणूस आहे. त्यास मिलाले तर आपल्यास भारी पडेल. याकरिता ताकीद असावी हे उत्तम. पादशाहाचे बरे करणे; तेव्हा शहर तुमचा जे (जय) इच्छितो त्यास लुटावें म्हणजे ते दुःखी होतील. बेदुवा देतील. याकरितां रयतेचे रक्षण ते करावें. बाबूरायाबरोबर दाहावीस राहतात; नाहींतर दरोबस्ती लुगांरीला धावले आहेत. निमित्य आम्हावर घालतील. ये गोष्टीचा बंदोबस्त करावा. दुसरे, जेतागुजर यास आम्हाकडे घ्यावे. आज प्रहर येऊन मामलतीचा जाबसाल पुसोन पाठऊन देऊं. गेला तर त्याचा जाबसाल करावयाकरितां जरूर राा अंताजीपंत[२] नानास सांगून पाठवावा. त्यांचा तालुकाच; बनेल तर ठाणीच सोडून घेतली म्हणजे चिंता काय? आपले दरबारी भेटावयास येईल त्यास धरावें यैसे नाहीं. ये गोष्टी लोक वसवस खातील. असो, जे जाले ते जालेच. परंतु त्यास येथवर पाठवावे. आम्ही आपला जाबसाल करून पाठऊन देतो. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶*Vithal Shivdeo's stern rebuke against plundering by Maratha forces is contained in this letter.*

No. 41]

श्री.

विनंति उपरी. तेथून निघोन सडे स्वारीनशी सालिमार बागावर मुकाम केला. आलीकडील वर्तमान फौजेचे ठीक नाही, त्यास येथे रिकामे बसून काये करावे? राजश्री सुभेदाराकडे आबदुल हयांतखानाचे आनुसंधान आहे ते तरी बळावावे. तुम्ही जाब देविला नाही म्हणून सुभेदार म्हणत होते याचे कारण काये? आथःपर सुभेदारास लिहून त्यास लस्करांत आणवावे. बनले तर उतम, नाहींतर त्यास पावते करवावे. मोगलपुऱ्याचे मोगल कार्य करून देऊ म्हणतात. परंतु गाजदीखानाच्या हाते करवावे हे त्यांचे मानस. दरवाजा त्यानी मोकला

---

१ लुटीला. २ अंताजी माणकेश्वर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करून देऊं म्हणतात. परंतु तुम्ही मऱ्हाठे, आमचाच पुरा लुट्टू लागाल, मग बखेडा होऊन मोगल दाहा हजार तरवार धरतील तर काम बिघडेल. त्यास गाजदीखानाचे सामान पुढे करावे; दरवाजा ते घेतील. आपण मागून चालवें. हा परियाये उतमांत आहे. त्यास गाजदीखान (याजकडे?) नागरमल यास पाठवावे. आमचे सुभेदाराचे बुनगे पाठवावे. मोगलपुऱ्याचे पाठीमागे मुकाम करून अबदुल हयातखान यासहि सुभेदार आणवितील. मोगलाचेहि ठीक करून, पुढे मोगल गाजदीखानसुधा, आम्ही मागून, यैसे हेहि बनले तर करावें. त्यास आतांच गाजदीखानाचा हरकारा सोनपत करनालेहून आला. त्याने वर्तमान सांगितलें की संमदखान सात आठ हजार फौजेनसी सरदेहून कूच करून राज्याची सराई आठ कोस आलीकडे आला होता, परंतु माघारा गेला. तीन हजार त्याची फौज च्यार पांच सिबंदी यैसे सांगितले. फिरोन त्यास सुभेदारानी च्यार रुपये देऊन माघारा पाठविला, येणे प्राा वर्तमान आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*These two letters (40, 41) of happenings at Delhi deserve being more clearly explained. They seem to refer to the entry of the Marathas into Delhi under Raghunathrao in June 1754, before Gazi-ud-din Khan deposed Emperor Ahmadshah. The letter appears to be in the hand-writing of Vithal Shivdev and addressed to Sakharam Bapu. The words* चिरंजीव बापू *seem to refer to the writer's son, Shivaji Pant.*

No. 42] [*June 1754*

(पहिला बंद गहाळ.)

सिधांत भांडायाचा केला. नजीबखान रोहिला गंगापार १० हजार सेना घेऊन आला तो हरोळे[1] जाला. गाजीनगर सा कोस दिलीपासून तेथे पडला. पांचा कोसाचा मुकाबला[2] राहिला आहे. भूपति बाहेर होते ते दिलीत यमुनेचे किलियांत दाखल जालेत. भोवता बंदोबस्त करितील. गाजदीखानाचे डेरे येमुनावर पटपटगंजावर पडले आहेत. जेनसी[3] पार उतरली, पूल बांधला आहे. पुढे पाहावें. माधोसिंग निगाहदाश्त[4] करितो. जयापानी सांगोन पाा कीं दा-वीस लाख रुा पाा नाही तरी पारपत्ये करू. लांबेवाला रजपुताने वाट मारली. त्यासी कनिरामाबाा च्यार हजार स्वार देऊन पाा आहे. त्याचा भाऊ जयापापासीं आहे. सुबेदार इंद्रेत (?) हवेलींत उतरले (अपूर्ण).

¶*The second sheet of a letter which seems to refer to the entry of the Marathas into Delhi.*

---

१ आघाडी. २ सामना. ३ तोफखाना. ४ फौजेची भरती.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 43] [*1-9-1754*

श्री.

पो छ १८ जिलकाद

श्रीमंत सखारामपंत बापू
गोसावी यांसी.

ऽ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रो समशेरबहादर सलाम विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १३ जिलकाद मुकाम रेवडी जाणौन स्वकुशल लिहीत असिले पाहिजे विषेश. आम्ही देशास जावयाविशी श्रीमंत राजश्री दादासाहेबापासी आज्ञा मागितली, परंतु खावंद आज्ञेचा अनुमान चितांत आणून, न जावें या आशयें येक दोन वेल उतर जालें. आपणहि श्रीमंतासनिध नव्हते, स्वारीस आपणहि गेले आहेत. श्रीमंताचा आशय जे, राजश्री रामचंद्रपंत व राजश्री विसाजीपंत व राजश्री मानाजी पायेगुडे व रा महिपतराव (पानसे) तोफखानासहवर्तमान समागमे देऊन रेवाडीस रवाना केले. खासा स्वारी आठा दिवसा मागून येईल. आपणाकडील साकल्य वृत, आपले मुकाम कोणे जागा आहे हे लिहिले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. वरकड कितेक वर्तमान राजश्री रामचद्रपंती लिहिले आहे त्याजवरून कलेल हे विनंती.

¶*Samsher Bahadur asks clear orders from Sakharam Bapu as to whether he should go back from the Delhi campaign of 1754.*

No. 44] [*January 1755*

श्री.

दुसरा बंद—

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विज्ञापना.

कडें गेले. गोहदकराचा मुलूक, श्रीमंत राजश्री मल्हारजी होळकर याणी ठाणी घेतली होती ती व श्रीमंतानी ठाणी सोडविली तीं तसीच सरकारांत राहिली. खातरखा मामलत जाली नाहीं. आंम्हाकडील जिगणीचे ठाणे गोहदकराकडे होते ते श्रीमंत राजश्री साहेब जव्हारसिंगाचे मोहऱ्यावर आले तेव्हां राजश्री विठल सिवदेव यास पाठऊन ठाणे घेतले. आमचे कारकुनाचे स्वाधीन केले. पिपरसेव म्हणून गोहदकराचे ठाणे कुवारी नदीचे कांठी होते. छोल्याचे सराईचे आलीकडे दोन कोस त्याने गोळी वाजविली. ते श्रीमंतानी कापून काढिले. तेहि आमचे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कारकून नारो बचाजी तेथे आहेत त्यांचे स्वाधीन केले. आम्हास राजश्री गोविंद सामराज याची पत्रें आलीं याजकरितां माघ वद्यांत जाऊं. तिकडे जाऊन जसा सुमार पाहूं त्याप्रमाणे राहणें जालें तर राहूं. राजश्री विठल सिवदेव यास ग्वालेर प्रांती श्रीमंत ठेवणार व राजश्री नारो शंकर यास झांसी प्रांती ठेऊन खासा स्वारी जेनगरावरून देशी येणार यैसेहि म्हणतात. गोहदकरानी सिंद्याचे हाते सलुख केला. फौज उठोन गेल्यावर पैसा टका कांहीं ठरला होता तो दिल्हा नाहीं. येकून दंब (बंद?) राहिले. पुढे काय होईल? खर्च आमचा भारी. देशी आपला लाभकाल कोठे नाहीं ऐसे जाणोन जातो. चिरंजीव निळोपंत भाद्रपद मासीं भेटीस येतील. त्याचा सांभाल करावा. चैत्र मासचा हप्ता व जेष्ठ मासचा हप्ता यैसे येथें कोन्हाची वरात केली तर त्यास देतील अथवा तेथेंच करारास यैवज प्रविष्ट करतील. येथें देविला तर हुंडणावळीची रयात होईल.

¶*Second sheet of a letter addressed to the Peshwa referring to the capture of Gohad.*

No. 45] [*1755*

श्री.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंति. कुल पलोन बेहडात गेली. नाहीं तर कुल लुटून घेतली असती. नवी सिबंदी. लाख रुपये खर्च जाला. त्याचे सार्थक स्वामीचे पुण्यप्रतापे उतम जाले. जाटाची शक्ति सुटली असे. त्यास आपली फौज असती तर कितीक कामे होती. यास सुरजमलाचा असरा आहे. आम्ही दिलीस श्रीमंतास दाहा बारा पत्रे पाठविली, परंतु आमची फौज आली नाहीं. रागी करितो यैसेच लिहितात. त्यास राणा भीमसिंग याचा मुलूक साता अठा लाखाचा आहे. आमचे लाख रुा तो खर्च होऊन गेला. आम्ही मुलूक घेतो; राजश्री अंताजीपंताचा पैका राणा देतो; त्याप्रा मुलुक अम्ही घेतलियावर त्यास देऊं. या प्रांतात फार बदनक्ष जाला होता, परंतु नवीन सिबंदी ठेऊन नक्ष स्वामीचे पुन्येकरून उतम जाला. त्यास इकडे जाटमय जाले असे. त्याचे येक वेल पारपत्ये केलियावाचून हिंदुस्थानात नक्ष नाहीं. राणा भीमसिंग याचा मुलूक घेतला म्हणजे गालेरचा किला अनयासेच येईल, किंवा पूर्ववत किलेदारप्रा राहील. अण मुलूक साता अठा लाखाचा सुरलीत होईल. सुमेरशानें दुंडी उठविली, त्याप्रा दुंडी उठविली. तमाम जमीदार फिरले, ठाणी घेतली. त्यास फतेसिंग मारलियावर* दुंडी वारली. नक्ष स्वामीच्या पुणेकरून जाला.

---

* येथून अक्षर वेगळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्ही दिलीस यैसेच हे टाकून जात होतो. परंतु श्रीमंत दादासाहेबांची पत्रावर पत्रे आली कीं तुम्ही तो शेह सोडून न येणे. मागून फौजा पाठऊन जाटाचे पारपत्य करणे आहे, तुम्ही न येणं, त्यावरून राहिलो होतो. राहिल्या हे कामहि जाले. पुढें मुलूकहि सत्वरच सुटल्यास हे येक सरकार कामच जाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. जाटाचे लढाईत तागाईत कुंभेर से सवासे घोडे पडले आहे. समजावीस नालबंदीचा विचार हा कालपर्यंत कांहीं होत नाहीं. दिलीच्या पैक्यावर मात्र इमारत आहे लोकास रोजमऱ्याविसी वगैरे रवानगी नाहीं, आर्जबाब नाहीं. यामुळे सर्व फौज दिलीची हुजरातसुधा हैराण आहे. सेवेसी श्रुत होये हें विज्ञाप्ति.

¶Vithal Shivdeo's letter, second sheet, to the Peshwa about the conquest of Gohad. He refers to the mismanagement of affairs by Raghoba.

No. 46] *[29-5-1755*

श्रीसांब.

मसुदा गाजुद्दिखान.

* उपरि. तुम्ही पत्र पाठविलें त्यांत खुलासा कीं आपण माघारे जावयाची त्वरा न करावी. आम्ही जलद येऊन पोहोंचतों. शाहाचा पेंच पडला तरी रोहिले पठाण आपणांस सामील आहेत, या आशयानें लिहिलें, तें पावलें. ऐसियासी आम्ही शाहाची दहशत मनांत आणून जातों ऐसें नाहीं. आम्हांस बहुत कामें आहेत. यास्तव दुसरे जागा च्यार रुपये मेळवावे ऐसे विचारें कूच केलें आहे. तुम्ही महिना पंधरा दिवसाचा वाइदा करून गेलां. त्या गोष्टीस कमेंबेश नव दाहा महिने जाहाले. तुमचा भरवसा बहुत होता कीं, जलद रोहिले पठाणास घेऊन याल. आणि येक विचारें तमाम पातशाहीचा बंदोबस्त करूं. परंतु ती गोष्टी ईश्वरसत्तेनें न घटली. बरें, यासी तुमचा उपाय काये? अतःपर यमुना दक्षणतीरास आला असिला तरी बमैफौज जलद जलद येणे. खेचीच्या आसपास मुकाम आहेत. भेटी जाहल्यावरी तुमचे आमचे सल्हेनें ठहरेल तो मनसुबा केला जाईल. जर यमुना उत्तरतीरे असिला तरी नच येणें. उत्तर मात्र जलद पाठवणें. सारांश रोहिले पठाण यांचा स्नेह जाहला तो बराच आहे. कदांचित् आम्ही दक्षणेस आथवा गुजरात हर कोठें लांब गेलो तरी सरकारचे

---

* सर्व पत्र राघोबाच्या हांतचे आहे.

१ जवळजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरदार, कमाविसदार राहातील, त्याची कुमक करावी. तेहि तुमची करितील. जर याच प्रांतीं राहावयाचें मुकरर जाहालें तरी जो मनसुबा ठहरेल त्या कामास फौज बोलाऊन घेऊं. अपणास कळावें म्हणोन लिहिले आसे. उत्तर जलद पाठवणें. त्यासारिखी येथील मनसुब्याची योजना होईल. छ १७ साबान.

¶*Autograph draft of Raghoba writing to Gaziuddin asking him to join and help the Maratha forces, although he himself was returning to the Deccan.*

No. 47] [*18-7-1755*

श्री.

पो छ २१ जिलकाद

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक गणेश संभाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ ८ सवाल मु॥ कुलपाहाड येथे सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १० रमजानच आले ते छ ६ सवाली सेवकास पावले. तेथे आज्ञा की फौजसुधां राजश्री मल्हारजी होळकर याजकडे जाणे. त्यावरून आम्ही तयारी केली. तो त्यांची पत्रे आली कीं तुम्ही अंतरवेदींत उतरणे आणि तिकडील बंदोबस्त करणे. याजकरितां आम्ही येमुनातीरास जाऊन राजश्री गोपाळराव यास कुन्यास बसविले आणि तमाम ठाणियाचा बंदोबस्त केला. तैसेच राजश्री बाळाजी गोविंद याजकडील बंदोबस्त केला. पुढें जावें तो राजश्री मल्हारजी होळकर फौजसुधां निघोन स्वामीकडे गेले. तैसेच राजश्री बाबुजी नाईक व राजश्री गोपाळराव हे गेले. इकडे कोण्ही मातबर फौज राहिली नाहीं. त्यास स्वामीस फौजा काढून नेणे होते तरी इकडे ब्राम्हणाचे कबिले होते, पुढें घालोन न्यावयाचा बंदोबस्त करून न्यावे होते, न केले. ब्राम्हण कबिलेसुधां होते. त्यास उदक सोडले. ऐसे जाले. त्यास इकडील बंदोबस्त हा कालवर सेवकानी उत्तम प्रकार राखला आहे. तरी इकडील उपराळा करणे असल तरी सत्वर मदत स्वामिनी केली पाहिजे. नाहीतरी तैसीच सेवकास आज्ञा करावयाची असल ती करावी. वर्तणूक आज्ञापत्र येईल त्या प्रमाणे होईल. फौजा जातांच गव्हाराही[1] गडबड मांडिली आहे. कोटकिले आपले ब्राम्हण टाकून पळो लागतील. गड या प्रांतीचे गेलियानंतर मग आशा कशास ठेवावी? ऐसा समय प्राप्त जाला आहे. यासाठीं सूचनार्थ विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्या प्रमाणें वर्तणूक करीन. झासी प्रांताचा बंदोबस्त करणे म्हणोन हातरोखा-

---

१ गव्हार=वाईट, मवासी लोक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आला व राा बाबुराव लागू जाले आहेत. त्यावरून तेथील उपरालियास जातो. श्रुत होय. हव्यास जटाशंकर यास हिंदुपताने मोर्चे लाविले होते. त्यास विसाजीपंत सागरवाले याणी भोसले आणून मोर्चा मारून काढिले. आणि भोसले गेले असून वैर जाले आहे. त्यास या प्रांताची आशा नसली तर तैसेच त्याहावयासी आज्ञा जाली पाहिजे, म्हणजे उठोन येऊं. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Sambhaji (Khandeker) complains from the North to the Peshwa against the departure of Raghunathrao with his forces into the South.*

No. 48] *[16-8-1755*

श्री.

विनंती उपरी राजकी वर्तमाण तर वजीरासी व जाटासी कळ्ळासी[1] बसत नाहीं. जाट ८ लकार देतो. परंतु वजारतचे व सारभोमाचे बळ नाहीं. भुपती किलीयांत दाखल जालेत. अवघे सूत्र वजीरावर ?

माधोसिंगाकडे ऐवज सरकारचा निमित्य श्रीमंत दादाणी जोडी पाठविली. परंतु ते सांप्रत्य ऐवज देत नाहीं. रांगडे एकसूत्रमणी ? [रांगडे एका माळेंतले मणी.]

नागोरचे वर्तमाण जयापावर रजपुताणी दगा केला. विस्वास दाखऊन घर घेतले. रागडलोक णिरदय, दगाबाज. सरकारची पत्रेहि जयसिंगापासी गेली की ते जयापास देणे. मतलब कीं करारप्रमाणे ऐवज देतील. तुम्ही अजमेरी-पावेतो जाऊन उतरा. जर ऐवज न देतील तर पाहून घेणे. हे पत्र वकील घेऊन जयापापासी जाताना बोलला की ते पत्रे माणीत नाहींत. कासीयासी पाठविली जर म्हनाल तर जाऊन दगा करून मारीन. की मृत्यु पावल्यामागें लक्षाचा पटा कुटुंबास चालवणें. ऐसा करार करून एका घोडीयावर बसून येऊन, चौघे आणिक साधक घेऊन येऊन, जयापासी येऊन उत्तरनिरोतर करून संद गांठून दगा केला. चौघे तेहि मृत्यु पावले. मग लस्करात शंखनाद जाला. अवघे सिध जालेत. विचार द्रुढ केला. द्वाही जयापाचे पुत्राची फिरली. मोरचे कायम केले. नागोरची फौज नागोरेस व जालोरची जालोरेस व जोतपूरची जोतपुरास कायेम. अजमेरीस विचार यावयाचा जाहला होता तो राहिला कीं आता फुटून फळी उचलावी तर बोजी[2] जाते. हिंदुस्थानास तमाम इस्तकलाली[3] येईल. अवघे फितूर करतील. आतां खेळ मोडावा, शह न

---

१ जोड, सांधा. २ अब्रू. ३ इस्तकलाली=जोर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सोडावा. आतां दंद लागले. रांगड कापून काढावे ऐसा करार जाला. फौजा कायम जालिया ऐसी चिठी आतां आज छ ७ जिलकादी आली. कळावे. जयेनगरचे वर्तमान तर बावीस लाख रुपये जयापानीं लिहिले होते की पाठऊन देणे. नाहीतर आम्ही येतो. माधोसिंगाणे उतर सांगून पाठविले कीं तुम्ही काशास येतां, आम्हीच येतो. ऐसियासी जयापाचे वर्तमाण या प्रकारचें जाले, यामुळें तमाम रजपूत व जाट व मोगल वगैरे काये हिंदव, काये दक्षण खिरे? जाले आहेत. मारवाडकराणी धर्मयुध न केले. विस्वासघात केला. श्रीमंताचे प्रतापेकरून त्याजला शासन चांगलेच होईल. रजपूताचा विस्वास व दगाबाजी सर्व पूरवीच विनंती केलीच होती. परंतु कोन्हास विस्वास न आला १

लस्करचे वर्तमाण सरकारचे वकील व कविजंग निघाले. परंतु जवळ आले नाहींत. आलियावर विनंती केली जाईल. हैदरजंगासी भुवणगीरचा किला मकान ज्यायेनिसीन करून दिधले. जाफरखानास त्याचा ऐवज दुसरे स्थळ योजिले. ऐसी खातरदारी त्याची आहे. सरकार मेहेकर वगैरे जागिरा दिधल्या. त्रिवर्ग एके सूत्रे आहेत हे विनंती.

¶*News-letter giving details about the murder of Jayappa Scinde.*

No. 49] [*November 1755*

श्री.

शेवेसी विज्ञापना. बिजेसिंगाचे लोकास जेसलमेरकर भाटी व पोखरणकर सामील होऊन जालोराकडे गेले. जालोरवाले व आपण एकत्र होऊन जोतपूरच्या फौजेवर चालोन आले. हे बातमी येताच जोतपुरी राजश्री जगनाथ पुरोहित यास व राजश्री जानराव वाबळे व सटवोजी बांडे या त्रिवर्गास जमावसुधा ठेऊन राजश्री संताजी वाबळे व मालजी वलद शहाजी सिंदे व आम्हा कडील हुजरातीचे लोक व राजश्री जिवाजी पवार व तुकोजी पवारचे लोक असे त्याजवर पाठविले. त्याची याची गाठ गोदोजेवर पडली. त्याचे याचे युध्ये जाले. बिजेसिंगाचे लोकाचा मोड करून गोदोजेत घातले. त्याची माणसे मारलीं व जखमी जाली. बहुतच सिकिंदा करून गावांत कोंडला असे. आम्हाकडील लोक जुजाचे समइ जखमी वगैरे याचे वर्तमान तपसीलवार आले नाही. आल्यानंतर सेवेसी विनंती लिहून पाठऊं. गोदोजभोवत्या लोकांच्या चौक्या उभ्या राहून त्याची रसद व कही बंद केली असे. ते गोदोजेस गेले म्हणोनच वाचले, नाहीतर

---

१ बुसीचा कारभारी. २ वंशपरंपरा. ३ फजित.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लुटलेच होते. त्याचे लस्करात धारण दोन शेर अडीच सेर जाली आहे. दोचौ रोजांत स्वामीचे तेजप्रतापें करून त्यास लुटून घेतील. वर्तमान आल्यानंतर सेवेसी तपसीलवार विनंती लिहिली जाईल. जोतपुरी पुरोहित व जानराव वाबळे व बांडे वगैरे राहून तेथील बंदोबस्त पूर्ववत प्रो करून आहेत. आम्ही नागोरचा बंदोबस्त राखून रागडे जागा जागा हुलड करून डोकी उचलली होती; त्याजवर फौजा पाठऊन जेथील तेथे गाठ घालून त्याचे उपमर्दन स्वामीचे तेजप्रतापे करून पारपत्य केले. नागोरात बहुतच तंगचाई जाली होती. परंतु राजे माधोसिंग यानी अनरुधसिंगावरोबर फौज देऊन बिजेसिंगाचे मदतीस पाठविले म्हणून आजपर्यंत बिजेसिंगानी दम धरला आहे. नाहीतरी येथील कार्य मागेच जाले असते. स्वामीचे पुण्येप्रतापे करून अनरुधसिंगाचे पारपत्य येथयुक्त जाले. प्रस्तुत तों सलुखास येत आहे. येथे आल्यानंतर आमची त्याची भेट होऊन जो करारमदार कछव्याकडील व नागोरचा होऊन येईल तो तपसीलवार सेवेसी लेहून पाठऊं. कछव्याची फौज दिलीआसपास आली, आण आम्ही येथे राहावे ऐसे नव्हते. परंतु येथून गेल्यानंतर नागोरचा बंदोबस्त तुटतो यास्तव येथील येथेच मुकाम केला असे. नाहीतरी त्यासी गाठ घालून स्वामीचे आशिर्वादे करून त्याचे पारपत्य उत्तम रीतीने करून लुटून घेतला असता. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. *

¶*Dattaji Scinde's letter to the Peshwa describing the defeat his forces inflicted on Bijesing near Nagore.*

No. 50] [*28-10-1755*

श्री.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ २१ मोहरम मो नागोर स्वामीचे असीर्वादे येथास्थित असें विशष. कछव्याची फौज पंचवीस तीस हजार अनरुधसिंग रामगडाहून कूच करून मारवाडचे सर्देस आले. तेसमई आपलेकडील सरदार राजश्री नरसिंगराव सिंदे व खानाजी जाधव व राणोजी भोईटे याणीं पछाडीवर युध्य करून आठनवसे माणूस मारले व हजार बारासे घोडे घेतले, हे वर्तमान पुर्वी सेवेसी विनंती लिहिली आहे. प्रस्तुत अनरुधसिंग दरकूच दिडवाण्याचे रोखे चालों लागला, तेव्हां लोकांनीं निकड बहुतच केली. अडीच तीन कोस तीन प्रहर चाले. छ १४ मोहरमी तीन कोस मजल दिडवाणीयास आला. तेसमई पाणी च्यार प्रहर मिळालें

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाहीं. लोकांनीं युध्य करून दोनतीनसे माणूस मारलें व घोडे च्यारसे घेतले. तेथच हा कालपरयेत राहिला असे. पुढे कूच करून येऊ लागला तरी स्वामीचे तेजप्रतापें उत्तम प्रकारे पारपत्य होईल. राजश्री अंताजी माणकेश्वर अद्याप आले नाहीत * सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Scindia writes to Bhausaheb about the defeat at Didwan he inflicted on Anirudhsing sent by Madhosing of Jaipur to help Bijesing against Jankoji.*

No. 51] [*6-11-1755*

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ १ सफर मो नागोर स्वामीचे आशीर्वादे यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान व जोतपुराकडील व अलोराकडील व कछव्याचे फौजेचे अनरुधसिंग दीडवाणियांत येऊन दाखल जाल्याचें, तपसीलवार पुरवणीपत्रीं सेवेसी विनंती लिहिली असे. त्यावरून विदित होईल. सारांस गोष्ट स्वामीचे तेजप्रतापें रांगड्यानी अधिक करावें येसें नाहीं. सर्वहि पादाक्रांत होतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*The whole letter is in Jankoji's own hand.*

No. 52] [*28-9-1755*

श्री.

भाद्रपद वद्य दशमीस पत्रें आलीं मशारनिलेकडून.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री मुकाशीबावा व राजश्री बाजीपंत बावा व गणेशपंत दिवाणजी स्वामीचे सेवेसी.

पोष्य अंताजी माणकेश्वर, साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत श्रावण वद्य १३ त्रयोदशी, मुक्काम नजीक कोंच, येमुनातीर जाणून स्वकीयें कुशल लेखून करीत गेलें पाहिजे विशेष. बहुत दिवस पत्र येऊन

सबंध पत्र जनकोजीच्या हातचें.* जयाप्पा नागोरास ता. ३० जून १७५५ रोजीं मारला गेला त्यानंतरचें पत्र असावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर लिहावें. आम्हांकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री...दादासाहेबांनीं, राजश्री गोपाळराव गणेश यांस, कुराजाहानाबादेचा मामला अंतरवेदींतील, राजश्री गोविंद बल्लाळ यांकडे होता तो दूर करून सनदा देऊन आमचे हातीं दिल्हें जें...यांचा अंमल बसऊन देणें. त्यावरून आम्हीं दरकूच कालपीस गेलों. राजश्री हरीपंत बावांची भेटी जाली. अंतरवेदींतून राजश्री गोविंद बल्लाळ आले. त्यास गोविंदपंत मामला सोडीत नाहींत. दरबारास जाऊन फडच्या करून, यैसें बोलिले. आम्ही पार जावें इतकियांत राजश्री दत्ताजी शिंदे यांचीं पत्रें मारवाडातूंन आलीं जें, राजश्री जयाजी शिंदें यांस दगा जाला. तरी तुम्ही पत्रदर्शनीं स्वार होऊन दाहा हजार फौजेनिशीं येणें. मग पत्र वांचणें. यैशीं लागोलाग च्यार पांच पत्रें आलीं. त्यास वरकड कामें टाकावीं सारखीं जालीं. येक मारवाड सर जालें, तरी तमाम हिंदुस्थानांत बंद होईल. साहेबकाम भारी जाणून अंतरवेदींत न जातां दरकूच मारवाडांत चालिलों. आम्हीं देशींहून आलों तें समयीं पांच हजार फौज होती. ज्याजती विठ्ठल शिवदेव, नारो शंकर वगैरे यांकडील अडीच हजार फौज नवी ठेविली. येकूण साडेसात हजार व जाजती भदावरकर, शेंवढेकर व राजे गोपाळसिंग व जाठ वगैरें अडीच हजार फौज ठेऊन दाहाहजारांनिशीं बाराबारा कोसांच्या मजली करून मारवाडांत चालिलों. श्रीमंतांचे पुण्येंकरून ईश्वर उत्तमच करील. आपणांस कळावें म्हणऊन लिहिलें असें. राजश्री हरीपंत बावा कालपीस सुखरूप आहेत. वरकड दरबारचें वर्तमान सविस्तर लिहावें. राजश्री विठ्ठल शिवदेव येथून कंबर बांधोन आले आहेत. आपण घडीघडीची बातमी राखावी. चिरंजीव आपा व बाबूराव तुम्हांकडे येतील. त्यांस सालाबादप्रमाणें शेतसनदा व कोंकणचीं दस्तकें व वेठेबिगारी गवत कापावयाचे वगैरे जें सालाबादप्रमाणें असेल तें दप्तरीं रुजूं पाहून कागदपत्र, सनदा, वराता, सालमजकुरीं लिहून घेऊन मुलांचे हवाला करणें. राजश्री मल्हारराव बाबा रास्ते यांस पत्र पाठविलें आहे. तें त्यांस द्यावें. आमचें तीन महाल इटावें, फुफुंद, सुकोराबाद, अंतरवेदींत जागिरीचे आहेत, तेथील मख्ता श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं करून तेथील मामला गोविंद बल्लाळ यांकडे आमचे तर्फेनें दिल्हा असतां, राजश्री नारो शंकर, श्रीमंतांपाशीं रदबदली करीत आहेत; ज्याजती चड लावितात म्हणून ऐकिलें. त्यास आम्ही जागीर मुफत मेळविली नाहीं; कष्ट मेहनत करून मेळविली आहे, यैसें असतां नारोपंतीं चढ जाजती करावा हें उत्तम नाहीं. नारोपंतास रुपये बहुत जाले तरी दानधर्म करावा अथवा श्रीमंतांस नजर द्यावी. येविशीं श्रीमंतांस विनंति करून नारोपंतास निक्षून ताकीद करवावी. फिरोन आमच्या मामलियांचें नांव—हे सरदारी बाग

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तुमची आहे, दिला तरी नुकसान तुमची. कल्याण असिलें तरी तुमचें. दुशमन फार आहेत. सावध राहून थोरले येजमान भाशेस गोवणें हें विनंती.

¶*Antaji Mankeshwar writes to his agent at Poona from the banks of the Jumna about certain changes in the staff that Raghoba had effected in the management of the territory of the Doab. He adds he is proceeding to Marwar to succour Scindia's forces who had suffered from the murder of Jayapa.*

No. 53] *[6-11-1755*

श्री.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक दताजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ १ सफर मो नागोर स्वामीचे असिर्वादे येथास्थित असें. विशेष येथील वर्तमान जोतपुर व जालोर वगैरे कछव्याचे फौजेचे तपसीलवार पुरवणीपत्री सेवेसी विनंती लिहीली आहे त्यावरून विदीत होईल. सारांश रागड्यानी स्वामीचे तेजप्रतापापुढें अधिक करावे ऐसे नाहीं. सर्वहि पादाक्रान्त होतील. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति.

¶*Autograph letter of Dattaji Scindia encamped at Nagore States he is confident of victory.*

No. 54] *[2-12-1755*

श्री.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामींचे शेवेशी.

विनंती सेवक अंताजी माणकेश्वर, कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत कार्तिक वद्य १४ चतुर्दशी मुक्काम दिडवाण नजीक नागोर, प्रांत मारवाड, स्वामींचे कृपेंकरून येथास्थित असें विशेष. आम्हां-कडील वर्तमान तरी कार्तिक शुद्ध १ प्रतिपदेस आम्ही यांजपाशीं दहा हजार फोजेनिशीं पोंहचलों. राजे माधोसिंग जयेनगरकर यांस बिजेसिंग राठोड याणें कांहीं पैका दिल्हा आणि राजश्री जयाजी आपाचा काळ जाल्या दिवसापासून माधोसिंगानें तमाम फौज जमा करविली. सेखावत राजावतन रुके बिजैसिंगाचां. पुत्र व त्यांचे तर्फेचे राजे बिकानेरवाले व रुपनगरवाले ऐसें महिनाभर फौज पंचवीस तीस हजार जमा करून मारवाडचे सरदेस आले जे. राजश्री दत्ताजी पाटील शिंदे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यांस नागोराहून उधळून मारवाडांतून काढावें. तिकडून बिजेसिंगानें बाहेर निघावें. तेव्हां राजश्री दत्ताजी शिंदें याणीं खानाजी जाधव व राणोजी भोईटे चार हजार फौजेनिशीं यांवरी रवाना केले; रामसिंग याची फौज दोन हजार ऐसें सहा हजार यांचे भोंवते भोंवतें फिरत होते. ते भारी तीस हजार, तोफखाना भारी, यांस रेटून जबरदस्तीनें नागोरास चालले. पंचवीस कोस नागोर उरलें तों आम्ही जयेनगर प्रांतें दहा हजार फौजेनिशीं येऊन पोंहचलों. तमाम माधोसिंगाचा मुलुक मारून जाळून थोर थोर मजली करून चालिलों. राजश्री जनकोजी शिंदे, दत्ताजी शिंदे यांचीं पत्रें एका दिवसांत चार ऐसीं रोजचे रोजांत दररोज येऊं लागलीं कीं, नागोराकडे न येणें. बुणगें टाकून जयेनगरचे फौजेवरी येऊन, ते फौज तंबी करणें, म्हणजे सारें मारवाडचे मोहिमेचें येश तुम्हांस येतें. कैलासवासीं राजश्री आपांच्या स्नेहाचें सार्थक होईल. ऐसें नाना प्रकारचे कागद लिहिले. तेव्हां सोळा सोळा कोसांचीं कूचें करून प्रहर रात्रीस सडी फौज मुक्कामास दुमदारी सांभाळून येऊन, ऐसें करून दिंडवणीयावरी येऊन पोंहचलों. दुसरें दिवशीं फौज तयार करून, तमाम कही मारून, चारशें माणूस मारून, मोंगल सारा शहराच्या असन्यास नेऊन घातला. भोंवतें रात्रींदिवसा उभेच राहून सिकींदा केला आहे. दोन शेर गवत रुपयाचें व दोन शेर दाणे रुपयाचे आहेत. कौल मागून आपले आपले घरास जावयास निरोप मागतात. परंतु देतां येत नाहीं. सेवकाची फौज जयेनगरचा मुल्हक मारीत आली. चांगलीच फौज पोंहचली या (मुळें) तमाम यांचीं अवसानें गेलीं. आम्ही आलियाउपरी आठवे रोजीं नागोरांतून राजे बिजेसिंग तीनशें प्यादे, शंभर स्वार रात्रीं पळाला आणि या कछव्याच्या फौजेंत येत होता. मार्गी आमची फौज भारी या फौजे भोंवती होती. तो मागती फिरला तो बिकानेरास गेला. तेथें आतां जमाव करितो. जमाव करून मैदानांत या फौजेंत आला तरी चिंता नाहीं. सारे एक जागा करून सडकून मारून. आमच्या लष्करांत पांच शेर दाणे धारण आहेत. पाणी विहीरीचें खारें शंभर दीडशें हात दोर लागतो. असो. राजश्री जनकोजी शिंदे, दत्ताजी शिंदे नागोरीं आहेत. आम्हांस त्यांस अठरा कोस तफावत आहे. कासीद एका दिवसांत जातो. लष्करची वाट दों दिवसांची आहे. सारांश हे फौज आम्ही सडकून बुडवितों. स्वामीचा प्रताप समर्थ आहे. परंतु शिंद्यांची फौज मारवाडांत फार बुडाली. काळ मोठा. प्रस्तुत आम्हांवरीहि बेतली आहे. प्रथम आम्ही कालपी-पर्यंत कडाकोराच्या अंमलाबद्दल गेलों. तेथें राजश्री जनकोजी शिंदे, दत्ताजी शिंदे यांची पत्रें दररोज जोडी १ एक येऊन पोंहचों लागलीं कीं, राजश्री आपास दगा

१° हैराण.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाला. आमचा उपराळा कोठूनहि होत नाहीं. शत्रूंनीं बळ बांधून कछवे व तमाम राजे येकवट होऊन, तीर्थरुपांप्रमाणें आमची अब्रू घ्यावयास पाहतात. आम्ही तरी जिवाचा संकल्प करून बसलों आहों. तीर्थरुपांचा तुमचा रिणानबंध होता. आमचे म्हणवीत होता. तो समये आजी खरा करून दाखवणें. धातूपोषण[1] करून उगेच समाधान न करणें. आजीचें येहसान आम्हांवरी मोठेसें राहील. येविसीं श्रीमंत स्वामीहि बहुत संतोषी होतील. मागाहून श्रीमंतांचीं आज्ञापत्रें येतील. परंतु हा समयें सांभाळणें. आमची अब्रू आजी येऊन राखिली तरी, जोंवरी आमचें बरें तोंवरी तुमचें बरें. पूर्वस्नेहाचें सार्थक तेव्हांच. व जेथवरी स्वार मिळेल तेथवरी भारी फौज करून येणें. शिबंदी भारी जाली याची चिंता सहसा न करणें. आमच्या वचनावरी श्रीमंत स्वामी सर्व निर्वाह करून देतील. ऐसीं पंचवीस पत्रें नाना प्रकारें ममतेनें आलीं. तो विस्तार कोठवरी लिहावा? पत्रेंच त्यांची बजिन्नस आहेत. तेव्हां कालपीहून गोपाळरायांचा निरोप घेतला. तेव्हां राजश्री गोपाळराऊजी आपल्या मामल्यासाठीं फार श्रमी जाले. तें आम्ही मान्य केलें आणि फौज जमा करून ठेवीत ठेवीत ग्वालियेरप्रांतींपर्यंत आलों. झांसीस व जागां जागां माणसें पाठविलीं. कोणी पांच स्वार न येत. तेव्हां जे जेथें ज्याचे लोक होते तेच फोडून चाकर ठेवून आपली फौज कदीम पांच हजार चांगली होतीच, नवी तीन हजार मऱ्हाठी ठेविली. कांहीं अगोदर सुरजमलाचे कुमकेसाठीं ठेविली होती ते होतीच. कांहीं आणिक ठेवून आठ हजार फौज मऱ्हाठी व हिंदुस्थानी दोन हजार, त्यांत गोहदकर जाठ, गोपाळसिंग जाधव व करोलीवाले एक हजार स्वार व एक हजार फुटकळ पठाण वगैरे यैसीं दोन हजार, एकूण दाहा हजार फौज घेऊन, कुरोलीपासींच मळ नदी उतरावें, तों माधोसिंगानें, सुरजमलांनीं चंमळेचे घांट बांधलें. सुरजमलांनीं आपला पुत्र दाहा हजार फौज, आम्हावरी रवाना केला. माधोसिंगानें आपला बक्षी तयार केला. मग आम्ही हे वाट टाकून डांगेंतील वाट काढून दाहा दिवस पाहाडांत चालिलों. सोपरावरून इंद्रगड, खातोलीजवळ चंमळ उतरून लाखेरीच्या दऱ्यानें जयेनगरच्या मुलकांत आलों. नेवाईवरी जाऊन मुक्काम केला. दुसरा मुक्काम फागीवरी, जयेनगरा-संनिध साहा कोसावरी केला; आणि राजांस कागद पाठविला कीं, युद्धास येणें. मग त्यांणीं वकील पाठविला कीं, आतां त्यांचा आमचा सलूख करणें. त्याजवरून राजे गोपाळसिंग कुरोलीवाले व आमचे त्रिंबक मुकुंद, जयेनगरास पाठविले कीं, आमची व राजश्री दत्ताजी शिंदे यांची भेटी होईल; त्यांचे जे जे मुद्दे असतील ते त्यांस पुसोन लिहून पाठऊन त्याप्रमाणें करून देणें, मग सलूख होईल. आम्ही

---

१ कालहरण.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दत्ताजी शिंदे यांचे चाकर, निराळे सरदार नाहीं. हत्ती, शिरपाव पाठविला होता, तों फिराऊन पाठविला कीं, दिवाणकाम जालियाखेरीज घेणार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Antaji Mankeshwar writes in his usual boastful manner what exertions he had made to lead forces to the succour of Dattaji Scindia.

No. 55] *[Date of receipt 25-12-1755*

श्री.

छ २० सफर.

[1]शेवेसी विज्ञापना. राजे माधोसिंग जयेनगरकर याजकडें बिजेराम पुरोहित बिजेसिंगाकडोन जयेनगरास गेला आहे. त्यावरून त्यानी आपल्या फौजा जमा करून अनरुधसिंग याजबरावर नरायेणावर व रामगडावर जगंनाथ साहा याजबरावर फौजा व तोफखाना पाठविला. त्याचे मुकाबलियास येथून राजश्री राणोजी भोईटे पाठविलें होतें. परंतु त्याची फौज भारी, आम्हाकडील थोडकें, हें त्यानीं वर्तमान यैकोन अनरुधसिंग याने नरायेणाहून कूंच करून रामगडावर आला. जगंनाथ सा आपण येका ठिकाणी जालें. हे वर्तमान आम्हास कलताच येथून राजश्री नरसिंगराव सिंदे व खानाजी जाधव याजबराबर आपली फौज देऊन, व सवाईराम भंडारी रामसिंगाकडील, त्यासही समागमें देऊन, रवाना केलें. राणोजी भोईटे व हे येकत्र आल्यानंतर त्यानी संदर्भ लाऊन सळूखाच्या गोस्टी बोळू लागलें. त्याच्या याच्या भेटी आस्विन * * * *

¶Autograph letter of Jankoji Scindia (second sheet missing) with reference to the movements of Madhosing's forces.

No. 56] *[January 1756*

श्री

* * रबिलाखर.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान.

स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. या मोहिमेमुळें कर्ज फार जालें. आगरेंयांच्या सावकारात पत चांगली होती व रा॥ गोविंद बलाळ याणी उपराळां सरंजाम पैकीं व कर्जाऊ उभारणी केली, म्हणून मोहीम सिधीस नेली. सुरजमल जाटाच्या चितापासून आम्हास दगा करावा, पुत्र दहा हजार निवड करून व माधवसिंगाचा बकसी

---

१ पत्र जनकोजी सिंद्याचें. हस्ताक्षर सर्व स्वतःचें. एकच बंद एवढा उपलब्ध झाला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मिळोन कोटे तरी दगा करावा, ऐसे होते. परंतु स्वामीचा प्रताप थोर. सेवकानेंच त्यांचा मुलुक मारून त्यांच्या उरावरून आलों. त्याणीच सेवकाची दहशत खादली. स्वामीची कृपा चितापासून मजवरी आहे ते कृपेनें जेथं जाईन तेथें स्वामीचा नक्ष राखीन. स्वामीने खानजादावरी अधिकोतर कृपा करीत असीलिया सेवकापासून मोठी मोठी चाकरी होऊन येईल. खासगत वर्तमान तरी आमच्या फौजेत एकाच्या चितांत नवतें जे मारवाडांत जावें. मारवाडांत पाच सेर दाणे व एका रुपायाचें गवत एका घोड्यास पुरेना. पाणी दीडशे हातावरील व मार्ग कठीण. मध्ये आडवे जाट कछवे वगैरे फौजा. येवढे संकटात न जावें; अंतरवेदीत असावें; परंतु राजश्री जयाजीआपासारिखा सरदार मारिला गेला. रा॥ दताजी सिंदे यांची पत्रें नाना प्रकारचीं आलीं. मुख्य स्वामीचे निरोपाचे समईहि मजला आज्ञा केलीच होती व रा॥ आपाहि माझा हरएकविसीं भरंवसा राखीत होते. या गोष्टीवरी नजर देऊन आपले सर्व स्वार्थ एकीकडे ठेऊन जिवाचा संकल्प करून कर्ज जेथवरी मिळेल तेथवरी मेळऊन येऊन पोहोचलों. येथें आल्यावरी राजश्री जनकोजी बावा व दत्ताजी बहुत संतोषी जाले. स्वामीचा पुण्यप्रताप; तरी पुढें याउपरी उत्तमच मनसबा घडोन येईल. गोहदकर जाट याणी आतां आम्हांसी सळूख चांगला केला. फौज चाकरीस सांगाते दिल्ही आहे; व निमे मुलुक वांटून द्यावा, त्याच्या वाटण्या केल्या आहेत. याउपरी गोहदकराविसी तेथे कोणी पुण्य[1] वेचील तरी स्वामीनी ध्यानास न आणावें. भदावरकर राजे यांस टिका[2] करून हत्ती घोडा वस्त्रे सिरपाव श्रावणमासीच दिल्हा. हती घोडा सिरपावाचे परभारे दहा हजार निराळे करून, निवळ सरकारची नजर पंनास हजार रुपये करून, सहा महिनियांचे मुदतीने सावकारी निशा आम्ही करून घेतली. याखेरीज त्याणी आम्हांस कांही कबूल करून टीप जेष्ठ मासचे मुदतीची करून घेतली आहे ते मुदतीस त्यापासून घेऊन, तेहि कलम सरकारचे सरकारांत जमेस येईल. परंतु रा॥ नारो शंकर त्यासी आदावत करितील, तरी त्यास स्वामीनी ताकीद करून भदावर-करांस गौरसीचे पत्र पाठवावें. नारो शंकर यांचे कारकून आम्ही बोलाविले. त्याणी साफ उत्तर पाठविलें जे राजा भिकारी आहे, दाहा पंधरा हजार रुपये करार कराल तरी आम्ही येऊं, नाहीतरी तुम्ही जाणा ते जाणा. मग आम्ही परभारें केले. सरकारचे जाले तेहि सरकारचें व आम्हास देऊं केले तेहि सरकारचें. याप्रमाणें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This appears to be Antaji Mankeshwar's letter (first two sheets missing) describing his march towards Marwad to the help of the Scindia.*

---

१ पुण्य वेचणें = वाईट सांगणें, कान भरणें. २ टिका करणें = तिलक लावणें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 57] *[13-1-1756*

श्रीमोरया

राजश्री सखारामपंत गोसांवियांसी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो मल्हारजी होलकर दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. पूर्वी आपणाकडून पत्रें येत गेली कीं देशास यावें. इकडील मोगलाचे पारपत्य जाल्यानंतर आवघ्या फौजा हिंदुस्थान प्राते जाऊन बंदोबस्त होईल. यास्तव राजश्री गंगाधरपंतास वारंवार पत्रें पाठऊन त्यांस बोलाविले. त्यानीं तिकडील सारश जसे तसे राखून इंदुरास आले. तदनंतर देशास यावयाचा विचार करून कूच करायवयाचा निश्चये ठराविला. हे बातमी माधोसिंगास कलताच फौज रवाना केली, ते चमले तीरास आली. मागाहून आपण खासा येऊन मालव्या प्रांतीचा आमल उठवावा, येसा प्रसंग विलक्षण देखोन इंदुरीहून कूच करून पीडावियापरीयेत आलो. माधोसिंगाची फौज पुढें आली आहे. त्याचे सिष्टकृत्य करून पुढें फौज रवाना करून आम्ही देशास सत्वरीच येत आसों. माधोसिंग वगैरे रजवाडियांचे पारपत्य ईश्वरकृपेने सर्व होऊन येईल. आम्हांस श्रीमंताचे पायावाचून दुसरा विचार नाहीं. परंतु इकडील प्रसंग विलक्षण जाणून महिन्याभराचा गुंता जाला. हें कार्य उरकून अतिसत्वर देशास येत आसों. सविस्तरार्थ श्रीमंताचे पत्री लेखन केले आहे. राा छ १० रबिलाखर बहुत काये लिहिणें हे विनंति.

¶*Malharrao Holkar writes from Indore to Sakharam Bapu at Poona that he had been unavoidably delayed in carrying out his intention of going speedily to the Deccan ; he was first going to prevent the mischievous moves of Madhosing.*

No. 58] *[11-3-1756*

श्री

नक्कल बमोजीब असल.

राजश्री नारोपंत गोसांवियांसी.

ऽ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो जबकोजी सिंदे दंडवत विनंती. येथील कुशल ताा छ १७ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत आसावें. विशेष. प्रांत अंतरवेदीत सरकारच्या आमलास दिलीकडील मोगलानें व गवारानें फिसाद केली. त्यास तंबी करावयासी राजश्री गोविंदपंत व राजश्री हरीपंत हे उभयतां फौजसह जाऊन, मोगलास मोडून लुटून घेतला. परंतु

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आमलाचा बंदोबस्त उत्तम प्रकारे जाला पाहिजे, सबब आपण आपल्या फौजेसह-वर्तमान प्रांतमजकुरी जाऊन माारनिले व आपण एकत्र होऊन एका विचारें राहून अंतरवेदीप्रांतचा अमल सरकारचा, सुरळीत खुलासा होय तो अर्थ करावा. श्रीमंत स्वामी यांणीं आपणास मारवाडांत रवाना केले म्हणोन अंतरवेदीत जावयासी आनमान केलात म्हणून ऐकिले. तरी इकडे आपण तूर्त न यावें. आम्हीच इकडील गुता लौकरीच उरकोन आपणाकडे येतो. याउपरीं दिवसगत इकडे लागत नाहीं. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*In this and the following letter Jankoji writes to Naro Shankar from Marwar that he was soon starting to go to his help with his forces to effect order in the Doab.*

No. 59] [*15-3-1756*

श्री.

असल प्रमाणे नकल

राजश्री नारोपंत गोसांवी यासी

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रीो जनकोजी सिंदे दंडवत विनंति येथील कुशल ताा छ १४ जमादिलावल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत जावे विशेष. प्रांत अंतरवेद येथे सरकारचा अमल आहें त्यास हाली दिलीकडून वगैरे फिशाद जाली असें. त्याचा बंदोबस्त उतम प्रकारें जाहाला पाहिजें. सबब राजश्री गोविंदपंत प्रांत मजकुरी गेलेच असेंत. आपणहि आपल्या फौजेसहवर्तमान अंतरवेद प्रांते जाऊन, राजश्री गोविंदपंत व आपण सामील होऊन, येका विचारें राहून, प्रांत मजकूरचा अंमल सरकारचा खुलासा होय तो अर्थ केला पाहिजे. श्रीमंत स्वामी यांची अज्ञा अपणास जें, अम्हाकडें मारवाडांत कुमकेस जावें तरी तुम्ही तूर्त इकडे न येणे. इकडील गुंता थोडक्याच दिवसांत उरकोंन आम्हीहि प्रांत मजकुराकडेच येतों. कलले पाहिजें. पाा जलाली व पाा बिलराम कासगंज प्रांत अंतरवेदी हे माहाल पूर्वी राा बापूजी माहादेव व दामोदर माहादेव वकील याजकडे श्रीमंताकडून होते. हाली त्यांजकडून दूर करून राजश्री अंताजीपंत यांजकडे श्रीमंत स्वामीनीच दिल्हे अहेत. तेथे माानिलेनी अंमल राजश्री बाबूराऊ दामोदर यासी ठेविले अहेत. तेथील अमलाविसी जेणेप्रमाणे सांगतील त्याप्रमाणे साहित्य करून, सरकारचा अंमल खुलासा मशारनिलेकडे चाले तें केले पाहिजें. वकिलाची फिशाद दूर होय ते करावे. बहुत काये लिहिणें हे विनंति *

¶*Jankoji's letter to Naro Shankar, saying that he was shortly coming back towards the Doab.*

---

* पत्र नारो शंकरास असावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 60] *[16-3-1756*

श्री.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी विनंति सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत फालगुन शुध्द पौर्णिमा स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर सेवकाकडील वर्तमान तरी देसीहून दरमजलीनें झासीस अलो. महिनापंधरा दिवस राहून संस्थान सिवसे येथील मामलतीचा बंदबस्त करारवाकें स्वामीचे आज्ञेप्रमाणें केला. फौजेची समजाविश केलीं आणि मारवाडांत जावयाबदल कूच करून नरवरेंस अलों तों राजश्री समशेंर बहादर याजकडून पत्र आले त्यासमागमे स्वामीचा हातरोखा अला. तेथे अज्ञा जें, राजश्री समशर बहादर यांस सामील होऊन जाणें. त्याजवरून राजश्री समशर बहादर याचा मार्ग यथे कांहीं दिवस पाहिला. इतकियांत राजश्री दताजी सिंदे याजकडून दोन पत्रें आली. त्याणी लिहिले जें. मारवाडचा सला जाहाला. इकडील गुंता उरकून आम्हीच त्या प्रांतास येतो. तुम्ही मारवाडांत न येणें. अंतरवेद प्रांती बखेडा जाहाला आहे. तिकडे जाऊन मुलूकाचा बंदबस्त करणें. त्याजवरून अम्ही येथून माघारे फिरोन अंतरवेद प्रांतास जात असों. फालगुन शुद्ध सप्तमीस येथून कूच केले. वर्तमान सेवेसी कलावें याजकरिता लिहिलें. राजश्री दताजी सिंदे याजकडील दोनी पत्राच्या नकला करून सेवेसी पाठविल्या असेंत, त्याजवरून विदित होईल. पुढें स्वामीची अज्ञा होईल तेणेप्रमाणे वर्तणूक होईल. खिचीवाडेयाची मामलत स्वामीनी सेवकाकडे द्यावी यैसा विचार होतां. परंतु ते समई मर्जी न पाहिली. मामलतीचा बंदबस्त मनास अणितां कांहीं नाहीं. पेस्तरसालापासून मर्जीस अलें तरी मामलत सेवकाकडे सांगावी. अज्ञेप्रमाणें बंदबस्त होईल. सेवेसी कलावें. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. *

No. 61] *[16-3-1756*

वैशाख शुद्ध १०

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंति सेवक नारो शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञपना. येथील कुशल ताा. फालगुन शुद्ध पौर्णिमा स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचे वर्तमान येथास्तीत असें. यानंतर सेवकाकडील वर्तमान तरी देसीहुन दरमजलीनें झासीस

---

* मारवाडस्वारी उरकल्यानंतरचें पत्र.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आलों. महिना पधंरा दिवस राहून संस्थान सीवायें येथील मामलतीचा बंदबस्त स्वामीच्या आज्ञेप्रमाणें केला व फौजेची समजावीश केलीं, आणि मारवाडांत जाण्याबदल कूच करून नरवरेंस आलों. तो राजश्री समशेरबहादर यांजकडून पत्र आलें. त्या समागमें स्वामीचा हातरोखा होता. तेथें * * * * * * त्याजसमागमें सामील होउन जाणे. त्यावरून त्याच्या येणियाचा मार्ग काही दिवस पाहिला. इतकियांत राजश्री दताजी सिंदे याजकडुन दोन पत्रें एक जासुदासमागमें व एक कारकुनासमागमें आली. त्याणी लिहीले जें मारवाडची सला जाहला. इकडील गुंता उरकून आह्मीच त्या प्रांतास येत असो. तुह्मी मारवाडात न येणे. अंतरवेद प्रांती बखेडा जाहला आहे, तिकडे जाऊन मुलुकाचा बंदबस्त करणें. त्याजकडील कामकाज उरकले. न येणे ह्मणुन लिहीले असता उगेच जावें हेहि उतम नाही. याजकरितां राजश्री दत्ताजी सिंदे याच्या पत्रावरून आह्मी येथून माघारें फिरोन अंतरवेद प्रांते राजश्री गोविंदपंताकडे असों. फालगुन वद्य सप्तमीस येथून कूच केले. वर्तमान सेवेसी विदित व्हावें ह्मणुन लिहीले असे. राजश्री दताजी सिंदे याजकडील दोन पत्राच्या * * (नकला करून) पाठविल्या असेत. त्याजवरून * (श्रु) त होईल. याजउपरी स्वामीची आज्ञा येईल तेणेप्रमाणें वर्तणुक होईल. अंतरवेद प्रांतीचे वर्तमान राजश्री गोविंदपंताची भेट जाहालियावरि सविस्तर सेवेसी वर्तमान लिहोन पाठउ. कलावे बहुत काय लि॥. हे विज्ञापना.

¶*In this and the foregoing letter Naro Shanker writes from the North to the Peshwa that he was proceeding to the Doab in order to restore order in that province along with Bundele.*

No. 62] [*16-3-1756*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक दताजी सिंदे कृतानेक दडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ ९ साबान मो रुपनगर स्वामीचे आसीर्वादे यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र छ १७ जमादिलाखरच्चे पाठविलें ते छ ३ साबानी सादर जालें. तेथें आज्ञा, बिजेसिंग राटोड याचा तह जालाच असेल. नसल जाला तरी हरप्रकारे कार्यभाग उरकावा. अतःपर स्वारीचे दिवस राहिले नाही. सत्वर कार्ये उरकावे म्हणोन आज्ञा. ऐसियास बिजेसिगानी तह केल्याचे वर्तमान पूर्वी सेवेसी तपशील-वार लिहीलें आहे. त्यावरून विदित जाले असेल. आज्ञेप्रमाणे राठोडाकडील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गुंता उरकोन रूपनगरास दाखल जालो. मोर्चे लाविले आहेत * * * * * ले आहेत. त्यास आम्हास हातधोंडियाचे तफावत आहे. राजश्री समशेर बहादर येथें येऊन दाखल जाले. त्यांच्या आमच्या भेटी जाल्या. त्यानीहि मोर्चे लाविले आहेत. अतःपर येथील कार्यभाग स्वामीचे प्रतापेकरून थोडके दिवसात उरकोन मागाहून तपसीलवार सेवेसी विनंतीपत्र पाठऊन देऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

No. 63] *[9-5-1756*

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचें वर्तमान तागायत छ ९ साबान मुकाम रूपनगर स्वामीचे आसीर्वादें येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र छ १७ जमादिलाखरचें पाठविलें तें छ ३ साबानी सादर जालें. तेथें आज्ञा सावनुरांत राजश्री मुरारराव घोरपडे व मुजफरजंग आहेत. त्यास बाहेरून मोर्चे लाविले आहेत. बहुत तंगचाई धान्याची चारापाणीआदी करून जाली आहे. सलाबतजंगहि श्रीकृपेनें आम्हांकडेच येतील. सत्वरच कार्येसिधी होईल. आपणांकडील वृत्त तपसिलवार लिहिणें म्हणोन आज्ञा. ऐसियास मुरारराव यास तंबी उत्तम प्रकारें पोंहचलीच आहे. इतके दिवसांत नवाब सलाबतजंग आपणां सनिध आले नाहीं. इतकियांत त्याचें सिस्टकृत्य जालें असेल. कदाचित नसलें जालें तरी स्वामीचे पुणेप्रतापापुढें त्यानीं काये करणें? केल्या कर्माचा फलत्कार पावले असतील किंवा पावतील. वरकड येथील वर्तमान अलाहिदा पत्रीं कासिदाबराबर लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. प्रस्तुत रूपनगरास छ २२ रजबीं सुक्रवारीं मोर्चे लाविले आहेत. मोर्चे हातधोंड्या मानी गेले आहेत. राजश्री समसेर बहादूर वैशाख सुध शस्टी, बुधवारीं येथें येऊन दाखल जाले. त्याच्या आमच्या भेटी जाल्या. त्याचेहि मोर्चे लागले आहेत. अतःपर स्वामीचे तेजप्रतापेंकरून येथील गुंता थोडके दिवसांत उरकोन मागाहून सेवेसीं तपसीलवार लेहून पाठऊं * सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Sinde to Peshwa from Rajputana, Marwar.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 64] *[27-9-1756*

श्री.

पो. छ १६ जिल्हेज.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री तुबाजीपंत बाजी स्वामीचे सेवेसी पो. गोविंद बलाल कृतानेक सां. नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा. आस्वीन शुध त्रितीया जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. कुशलवृत कलोन संतोष जाला. यैसेच सदैव पत्री संतोषवीत असावे. आम्ही आपले आसो. या प्रांती वजिरानी बखेडा करावयाचा विचार केला होता. त्याजवरून आम्ही आगरियाकडे येऊन वजिरांसी सलूक करून माघारे फिरोन इटावेयाकडे आलो. इकडील बंदोबस्त करून देशास जाऊ. वरचेवर आपणास लिहित जाऊ. बहूत काय लिहीणे. कृपा लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Govind Ballal writes about his having settled his differences with the Vazir.*

No. 65] *[1-9-1756*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ ५ जिल्हेज मो आवंतिकापुरी स्वामीचे आशिर्वादे येथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र छ २० सवालचें पाठविलें ते छ १४ जिलकादी पावलें. तेथें आज्ञा, मिरजेहून दरकूच करून खासास्वारी छ २० सवालीं पुणेंग्रामीं दाखल जाली, व तुम्ही कोठे आलां, काय वर्तमान, कधी येणार, हे सविस्तर वृत लिहिणें, म्हणोन आज्ञा. ऐसीयास खासा स्वारी पुण्यास दाखल जाली हें वर्तमान एकोन परम संतोशावासि जाली. आम्ही मो मजकुरी लोकांचे समजाविसीचें कार्य चाली लाविलें आहे. तीर्थरूप राजश्री काका कोव्याकडे गेले आहेत. तेहि तेथील गुंता सत्वर उरकून येतील. तदनंतर कोव्याकडील सविस्तर वृत्त मागाहून सेवेसी लेहून पाठऊं व तीर्थरूप आल्यानंतर येथील गुंता राहिले लोकांचा उरकोन अति सत्वरच स्वामी दर्शनास येतो. सेवशी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Jankoji Scindia writes to the Peshwa from Ujjain—all in his own hand—that he was soon returning to the South and execute the wishes of the Peshwa to his utmost.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 66] *[15-10-1756*

श्री.

पौ छ ६ सफर

श्रीमत् मातुश्री सगुणाबाई साहेबाचे शेवेसी

विनंती सेवक आताजी माणकेस्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा आश्विन वद्य सप्तमी मुकाम येमुनातीर सुखी आसो. साहेबी कृपा करून आसिर्वादपत्र पाठविले, पावोन सतोश जाला. सेवकाकडील वर्तमान, मारवाडची स्वारी करून ग्वालेरीस आलो. सिदे उजनीस गेलें. तों दिलीहून पातशाहा वजीर आतरवेदीत उतरले. सरकारच्या मुलकाची अमल उठवावा, याप्राा पत्रे वजिराची आम्हास आली. वकिलानी आम्हास लिहिले. राा गोविदबलाल याची दाहा पत्रे आली. जरी तुम्ही देशास गेले तरी आतरवेदीचा अमल उठतो. त्याजवरून बुनगे ग्वालेरीस ठेवून सडे फौजनसी अगरियास जाऊन, तीन महिने राहून, पातशाहा वजिराकडे वकील पाठऊन, त्याची आपला सलूख केला. दाहा बारा हजार फौजनसी आम्ही त्याची चाकरी करावी, त्यानी सरकारच्या मुलुकास तिलमात्र ढका न लावावा याप्राा शफतपूर्वक लिहीलीपुसिली जाली. मग आम्हास आगरियाचे मुकामी पातशाहानी हती घोडा जवाहीर सीरपाव पाठविला. तो मस्तकी वदोन आम्ही फौजत ग्वालेरीस आलो. दसरा करून आता येमुनातिरास आलो. फौज बारा हजार आमची आहे. आम्ही पातशाहा वजिरापासी दाखल होतो. आतां बिघाडाची काडीमात्र चिता नाही. आम्ही त्याजवल असलियाने कदापि अतर पडत नाही. साहेबास कलावे. राा गोपालराऊ गणेश, हरी विठल, आजी दोन महिने देशास हा कजिया होताच निघोन गेले. राा गोविद बलालहि आता सलूख जालियावरी देशास आम्ही रवाना केले. नारो शंकर झासीस आहेत. समसेर बाहादर मालवियात आहेत. सिदे उजनीपर्यंत गेले. तों मागें कोटीयाचा राजा माहाराव मृत्य पावला. त्यास पुत्र नवता. मग येकतांच सडी फौज करून दताजी सिदे कोटीयास जाऊ वेढले. चालीस लाख रुपये नज़र केली. वीस लाख वसूल घेतला. विसाच्या वोंके घेऊन उजनीस आले. आता दिपावली करून देशास जाणार. श्रीमंत राा पंतप्रधान पुणीयातच आहेत. श्रीमत राा दादासाहेब

---

१ करारनामा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पुणीयातच आहेत. होलकर पुणीयातच आहेत. दिपावली करून हिंदुस्थानास श्रीमत राा दादासाहेब व होलकर येणार. आम्ही आखेरसालपर्यंत पाताशाहा-पासीच आहो. तेथे सर्व हुकूम साहेबाचाच आहे. जे आज्ञा सेवकास करणे ते करीत असा. मी हुकुमी चाकर. घरचे खानाजाद[1] आहो. साहेब खावंद आहेत. आज्ञा करावी. श्रीमंत राजश्री नाना साहेबाची आज्ञा छावणीस राहावयाची जालीच आहे. पुढे होईल वर्तमान ते सेवेसी वरचेवरी सविस्तर लिहीत जाऊन. कृपा करून पत्री सेवकाचा साभाल करावयासी स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar's letter to Sagunabai, widow of Peshwa's younger brother Janardan Pant. She was at this time on a pilgrimage to Benares. The letter mentions where and how the Maratha Sardars in the North were occupied. Samsher Bahadar was at this time in Malwa.*

No. 67] [*19-12-1756*

श्री.

छ २९ रबिलाखर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं.

विनंति सेवक बापूजी माहादेव व पुरुषोत्तम माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल तागायत छ २६ माहे रबिलौवल मुकाम इंद्रप्रस्थ स्वामीच्या कृपावलोकनेंकरून येथास्थित असे विशेष. इकडील वृत्त विस्तारें छ ११ रबिलावलीं विनंतीपत्रें पाठविलीं आहेत त्यावरून श्रृत होईल. हलीं येथील वृत. नाजिबखानाचा प्रकार दिसतो कीं सर्वांसीं वचन प्रमाणाची तजविज आहे. याचें कारण हेंच कीं कांहीं शुज्यातदौले व नजीबखानामधें नाखुशी जाली आहे व कांहीं पातशाहाची मर्जी नाहीं कीं, नजिबखां इत्का दिलींत मुखत्यार राहे हे गोष्ट उत्तम नाहीं. यास्तव हे आपले बंदोबस्तास लागले आहेत. तथापि ठरेल ते विनंति करूं. वरकड वृत्त सविस्तर पुर्वणीपत्रावरून श्रृत होईल. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*News-letter from Hingne to the Peshwa communicating the attitude of Najibkhan.*

---

१ नम्रसेवक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 68] [March 1757

श्रीपांडुरंग

पुा. राजश्री भास्कर मुरार स्वामी गो

विनंती उपरी. मुख्यपत्री व तुमच्या पत्री गुदस्तास कमी आदा खंडणी तपसीलवार लिहून पाठवणे, तरी गुदस्ताचा आकार असता तरी इतकी फिकीर करणेच न लागती. मग नारोपंतबाबास वाईट कोण कशास म्हणते? जमेस ठिकाण नाहीं. वसुलास ठिकाण नाहीं. बाकी काढुन कबजे घेउन गेले ते समई कबजे न घ्यावी तरी ठाणी न येत. मुलुख न ये. अखर आश्वीन. रयेत खरीफ खाऊन गेली. पुढे रबीवर काये करावे, यैसे अडचणीत येऊन कबजे दिली. बाकी भरून देऊ. यैसे मुख्याजवल विनंती करितात. तरी बारा वर्षे मनमानेसी पैदास्त केली. आम्हास त्या मामलतीप्रमाणे बारा वर्षे न लगेत. चौ वर्षात दाहा वीस लाख देउ. काळवाधार भदावर दोन्ही तालुके भारी. अबदली मथुरेवर. हे पलोन येऊन झासीतील काबीले काढावे. कौली मुलुक मारावा हा कोठील इनसाफ? जेथे गाव नाही, वस्ती नाहीं तेथील बाकी कोणास पुसावी? ऐवज जमा वसुल नाहीं, मग बाकी कोण्या हिशोबाची. आता ते म्हणतात जे बाकी भरून देतो. त्यास श्रीमंताकडुन आज्ञा करवावी. जे तिसाला देहविदेवी जमा खंडणी त्याचा वसूल तेरीखवार किर्दी सिलीकबंद आणणे. हिसेबमोजीब[1] तिसाला बाकी निघेल ते येथे रुबरु लिहून पाठवितो. वसूल करितील. येणेप्रमाणे तिसाला हिशोब आणवणे. हा मजकूर श्रीमंत स्वामीस परिछिन सांगणें. ठाणी गेली. मुलकांत फितूर जाहला. रयत माल खाउन गेली. सिबंदी खर्च ज्याजती पडला. हे नुकसानी पुसणे. ते म्हणतील जे ठाणी गेली तरी आम्ही काये करावे. तरी याच्या स्वाधीन ठाणी असोन मवासेनी[2] कसी घेतली, आमच्या स्वाधीन केली असती? मग जाती तरी आम्ही जाब करीतो पुा. वरून कलेल.

¶*The following letters describe the confusion in the North resulting from Abdali's invasion.*

---

१ बरहुकूम २ लुटारू.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 69] [*10-4-1757*

श्रीकृष्णो जयेती.

श्रीमंत माहाराज राजश्री रघुनाथ राऊ दादा स्वामीचे सेवेसी.

शुभचिंतक स्नेहाकित राजा केशवराऊ कृतानेक नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम ताा छ २० माहे रजब मुकाम झासी जाणुन स्वकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही श्रीमंतांचे विलेचें (?) श्रीमंताच्या फौजा दिलीस आणविल्या व त्या जाबसालांत आम्ही आहो. याजकरितां आम्ही आबदालीपासी वगैरी लोकापासी बदनाम होऊन चुकलों. जरी आबदालीचे हाती पडतो तरी प्राण व धर्म न राहाता. याजकरिता दिलीची घरें दारें भरली टाकून, प्राणमात्र घेऊन निघालों ते झासीस येऊन राहिलों. आतां जोवरी माहाराजाचा जये होऊन अबदालीचे निरसन होये तोवरी दिलीस आम्हास जाणें होत नाहीं. तेव्हाच जावे जेव्हा माहाराजाचे आधिष्ठान दिलीस होईल व आम्हास माहाराज बोलाऊन हवेलीया व जागा व खिदमता[1] यथापूर्वक देवितील. हा विस्तार राजश्री बलवंतराऊजी सागितील त्याप्रमाणें करून मजला लिहावें. तोवरी झांसीस आहे. अबदाली परतून गेला. मेला म्हणताती. स्वामीचे पुण्यप्रतापे हेहि होऊ शके. विश्वाचे भाग्य असेल तरी असेच होईल हे विनती.

¶*One Keshavrao, who had fled from Delhi to save his life from the atrocities committed by Abdali in Delhi, writes to Raghunathrao how eagerly he expects Maratha rule to be established there.*

No. 70] [*26-4-1757*

श्री.

छ १९ साबान.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक दत्ताजी सिंदे कृतानेक विज्ञापना. सेवकाचे वर्तमान छ ७ साबान पर्यत यथास्थित असे विशेष. आम्ही लस्करांत असतां स्वामीस विनंती केली कीं एक किला मुलें माणसे ठेवावयास आम्हाकडे द्यावा म्हणोन विनंती केली. स्वामिनीहि मान्य केले, कीं हरएक जागा नेमून देऊं. यैसियांसी आम्हापासून

---

१ सेवा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जवळ किला सिवनेर आहे. तर कृपा करून ते स्थळ आम्हाकडे नेमून दिल्हे पाहिजे, म्हणजे तेथील बंदोबस्ती आज्ञेप्रमाणे केली जाईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाती.

¶*Dattaji Scindia, at this time in the Deccan, asks the fort of Shivner from the Peshwa as a place of safety for keeping his family. This proposal apparently did not fructify, since later on the Scindias established their posts at Jambgaon.*

No. 71] *[1757*

श्रीकृष्णो जयेती.

सेवेसी राव बदरीनाथ सां नमस्कार विनंती उपरी. तीर्थरूपाचे लिहिल्यावरून सर्व वर्तमान विदीत होईल. महाराजाचे सेवेसी विनंती करणे ते करीत असतों. हिंदुस्थानचे काम पातशाही हलकी जाली, याकारितां बिगडत चालले. अबदाली प्रबल होऊन लूटून गेला म्हणून पठाण मात्र चहुकडे उपद्रव करितात. परिणामी अबदाली यांसहि भक्षील. एका पठाणास तरी जातीवेळेस भक्षिले. निजाबत-नामे रुहेला येती वेळेस लाहोरचे वाटेवर अबदालीस पहिलेच जाऊन भेटून आपला गढ किला व मुलूक त्याचे हातातून वाचविला होता. जाती वेळेस अबदालीने त्या गढास मोरचे लाऊन घेऊन वीसा लक्षाची दौलत घेऊन पुढें गेला. दुसरे महमद-शाहाच्या बायेका मलिकाजमानी व साहेबमहाल वगैरे त्याजबरोबर गेल्या. दोन-शत ऊट मालाचे आपले समागमे दिलीहून नेले ते द्रव्य व जवाहीरहि अबदालीचेच कपाळचे होते. ते गेले. अबदालीचे सरकारांत अठावीस हजार ऊट व हाथी व खेचरे व गाढवे व बईल व छकडे व गाड्या व यारेदी[1] मालाची लादली गेली. या शिवाय ऐशी हजार स्वार प्यादे त्याजसमागमे होते. त्यांही नेले ते वेगळे. च्यार शहरें दिली, आगरा, मथुरा, वृंदावन सारिखी त्यानें धून नेली. तेव्हां इतकी बारेबारदार[2] त्यास लागली म्हणोन कोणाचे घरी घोटा ऊट त्यानें सोडला नाहीं. परिटाचे गाढवहि सांपडले तेहि घेऊन गेला. त्याचे स्वार जातीवेळेस पाई गेलेत. आपले घोड्यावर माल लादून घेऊन गेलेत. तोपखाना जाटाचे गढ घेयास आणिला होता, तोहि बईल मालाखाले लादले गेले म्हणून सोडून गेला. तो जाटाने आपले गढात नेला. दिलीमधें कोणापासीं तरवार सोडली नाहीं. तोपखाना पातशाही किल्याचे बुरुजावर होता तो निवडून घेऊन गेला. बाकी

---

१ *यारीद f यारद्या=लहान घोडे.* २ ओझीं वाहून नेणारे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खाले टाकिला व मोडला. हिंदुस्थानचे पठाणाचाहि तो आशेनाव[1] नाहीं. दोन दिवस वाट कळायाकारणे व भेद पुसायाकारणे जो कोणी येऊन भेटला त्यास जवळ येऊ दिधले. पठाणाही त्याचे नावाने आपले आपले तालुकीयाकडे उपद्रव करून मुलुक लुटला. अबदाली जवळ त्याचे काहीं चालत नाहीं. ते याचेही भक्षक आहेत. कोण्ही आणीक हातास न आला तरी यांसच खाणार असे ते आहेत. तरवारेचे बल त्याजमध्यें फार. कावादावा त्यांस येत नाहीं. नीट चाळीस कोस धावणार. महिन्याभराच्या सीव्या नाना[2] खाणार आहेत. यावरशी तरी गेलेत. पुढे यावेसे आहेत. याचा उपाये माहाराजच करतील. याच वेळेस महाराजांही नीट कामाचा तरदूद केला असता तरी पुढें सोपे होते हे विनंती. *

¶*The writer Badrinath describes the havoc created by Abdali, adding that he did not even spare the Pathans (Rohillas) although they were responsible for calling him in.*

No. 72] [*Beginning of April 1757*

श्री

सेवेसी विज्ञापना. आतांच बातनीची जोडी आली. अबदाली दिलीसनिध झिलेवरी[3] गेला. तेथून कूच पुढे जाले. या उपर इकडे बतनीची चिठी आली सुरजमलाचे सांडणीस्वारहि झिलावरील कूच पलीकडे गेलीयावरी आली. या उपरी मग राजे जुगुलकिसोर व अबदालीचा येलची साता लाखा साठी ठेवून घेतले होते त्यास कपर्दिका न देतां वाटे लाविले. कवडी न दिली. त्यानी सुरजमलाजवळ कौल मागितला कीं आम्हास दिलीपर्यंत दगा न करावा आणि गेले. गाजदीखान अगोदर आलमगीराचे दोघे पुत्र हाताखाले तोरा[4] घालून अंतरवेदीत गेला. त्यासमागमे गाजदीखानाची फौज खासगत चार हजार होती. दोन हजार फौज अबदालीची चौकीस त्याजवरी होती-ते गाजदीखानापासून निघोन अबदालीस मिळावयास गेली. यानी चार हजार फौजेनसी कूच करून फरकाबादेकडे गेले. बहुधा आलमगीराचा त्याचा बिघाड. दोघे पुत्र तोरे हती धरून गेला. अबदालीचा सरदार जगबादखान दोन हजार फौजेनसी वजिरावरी

---

१ आशाव=स्नेह, सख्य. २ नानाप्रकारच्या शिव्या हा अब्दाली महिनाभर खाणार.

* ही अब्दालीची तिसरी स. १७५६-५७ ची स्वारी असावी. अब्दालीनें केलेली लूट.

३ झिल नावाचा तलाव. ४ शह, सूत्र.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चौकीस होता तो निघोन गेला, याप्रमाणे बातनीची चिठी आली. पुत्र खजिना घेऊन जात होता तो आला. जाटाने काही लुटिला. अबदाली खासा मृत्य पावला यैसे तहकीक नाही. परंतु कोणास पधरा रोज दर्शन नाही. तोफा मातबर व डेरे भरले टाकून दरकूच गेला याजवरून सर्व बोलतात. सवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The letter mentions news of the reverses Abdali met in his southern course and how he returned discomfited not having received a pie from the Jat.

No. 73]

श्री

विनंती उपरी. आपण चिठी पाठविली. तेथें पातशाकडील ग्रहस्त आला आहे, तो उद्या रवाना करावा म्हणून लिहिलें. ऐशास रा॥ विठलपंत जेथें आहेत तेथेंच आहेत. त्यास बलाऊ गेले ते येतो म्हणून उत्तर आले. आपण कोस आदकोस कूच करितो म्हणून लिहिले त्यावरून आम्ही सुस्त राहिलों. बरें चिंता काय आहे? आपण आज पालखीत बसोन सत्वर यावें. अंबारीहि आणावी. हे काम आजच करावें. दिवस जातो. उद्या आपल्या आमच्या विचारे जेथे राहावयाचें होईल तेथें राहूं. पाऊस नाहीं. चौघटकाचें काम आहे. आळस न करावा. जरूर यावें. मार्ग पाहतों. जरूर यावें. हे विनंती.

साहेब रायास निरोप आपण आलियाउपरी देऊ हे विनंती.

¶An autograph letter of Sakharam Bapu, most likely addressed to Raghunathrao. It refers to some ambassador who had come from the Emperor.

No. 74] *[16-5-1757*

श्री

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे शेवेसीं.

विनंती सेवक पुरुषोत्तम माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल तागायत छ २७ माहे साबान मुकाम इटावा श्रीयेमुना उत्तरतीर स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान पूर्वी सेवेसीं विनंती पत्रें पाठविलीं त्यावरून वृत्त श्रुत जालें असेल. हालीं स्वामीचें आज्ञापत्र

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आलें त्यांत मजकूर कीं पठाण रोहिले व वजीर येमुना दक्षणतीर आले असले तर मजल दरमजल सत्वर येणे. जर उत्तरतीरीं असले तर न आणनें. तुम्ही निरोप घेऊन उठोन येणें. त्यास फरूकाबादेहून कूच करून रोहिले पठाण व वजीर फौजासहित इटावियास येमुनातीरीं दाखल जाले. उतरावयास नावा राजश्री बालाजी गोविंदाकडून आणविल्या आहेत. इत्कियांत स्वामीचें आज्ञापत्र आलें. त्यावरून सेवकानें कूच केलें. त्यास वजिरानी आपला पुत्र पाठऊन आम्हांस फिरून आणून मुकाम करविला, आणि आम्हांसी बोलिले की म्या कोणेप्रकारें दोही सरदारासी हमेवार[१] करून श्रीमंताचे चाकरींत रुजू केलें. आणि जवाहिरसिंगानें दाहा लक्षाची हुंडी अहमदखानास व हाफीजास नजिबखान व नागमल व दलेलसिंग यांचे मारफतीनें पाठविली. असेंहि असतां आम्ही त्याकडे लागूं न दिधलें. श्रीमंत स्वामीचे शेवेंतच रुजू केलें. शाहाकडून व फिरंगी पातशाहाकडून या सर्वासी तोडून स्वामीकडे यासी केलें असतां स्वामीचा हुकूम या प्रकारें आला. त्यास मी तों स्वामीचा दोस्त आहे आणि स्वामीनी हिंदुस्थानचा बंदोबस्त केल्यावाचून दक्षणेस जावें हें योग्य नाहीं. या गोष्टींत आपला दबाव राहत नाहीं. म्यां बहुत राजकारणें दुरुस्त केलीं आहेत. राजे माधोसिंगास लेहून त्याची फौज स्वामीकडे शामसिंग नामें सरदार पाठविला तो स्वामीपासीं पावलाच असेल. माधोसिंगाचें खत वजिरास आलें तेहि सो. त्यानी पाठविलें आहे. त्यावरून श्रृत होईल. फिरंगियाकडे व पातशाहाकडे माझा भला माणूस गेला होता. तो सर्व कामें पोख्तगी करून शंभर स्वार व शंभर प्यादे तेलंगे घेऊन फरुकाबादेस आला. येका दो दिवसानी मजपासीं येईल. दुसरें वजिरानी सांगितलें की श्रीमंत दिलीकडे चालतील तर विसा लक्षाची टीप त्यानीं आपले खलित्यांत घालून पाठविली आहे. हे मान्य करून स्वारी ये प्रांती ये ते करावें. तिसरे अहमदखानासीं व हाफिजासी करार मदार करून घेतला कीं श्रीमंत स्वामी जाटाचे मुलकांत आले म्हणिजे जाटाचा मुलुख जप्त करून सरकारांत दाखल करूं आणि पठाण रोहिलेहि त्या मुलकाचे थोडसे उमेद्वार आहेत. स्वामीचें आज्ञापत्र आलें त्याजवरून वजीर बहुत दिलगीर जाले पनासा हजाराची रुपयांची तयारी करून येथवर आला. पुढें निगादास्त ज्यारी आहे. नावा येतील त्या वेलेस येमुना उतरून सेवेसीं हजर होऊं. हें राजकारण बहुत मेहनतीनें केलें आहे. श्रीमंत जर या रोखें येतात तर सर्वहि राजकारणें उत्तम होतील. नाहींतर भगवत इछां या प्रमाणें त्यानी सांगितलें. व विसा लक्षाची टीप लिहून दिधली ते सेवेसीं पाठविली असे. यांचें समाधान

---

१ हमवार = प्रसन्न.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करून आम्हीं निरोप घेऊन सेवेसीं येतों. सलाह असेल तें करणार स्वामी समर्थ आहेत. वजिरानी इतका विस्तार लिहिविला यास्तव सेवेसी विनंति लिहिली असे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञप्ति.

¶*Purushottam Mahadeo reports to Raghunathrao the keen disappointment that the Vazier felt on account of the changes that Raghunathrao effected in the management of the Emperor's affairs.*

No. 75] *[19-6-1757*

श्री.

पौ छ १४ सवाल

पु॥ चिरंजीव राजश्री दादा यासी आशिर्वाद उपरी. हिंदुस्थानांतील राजे यास कर्जपटीच्या ऐवजाविसी पत्रे पाठविली आहेत.

२०००००	वसूल निाा नारोशंकर————
१०००००	बोडसेकर राजा
१०००००	दतियेकर राजा
२०००००	
५०००००	जगतराज बुधेले वसूल निाा हरी विठल
६२५०००	अमानसिंग बुधेले वसुल निाा गोविद बलाळ
१०००००	भुपाळकर वसुल निाा रामचंद्र बलाळ भुसकुटे
५००००	खेचीकर राजा वसुल निाा विष्णु महादेव
१०००००	मंडलकर राजा वसुल निाा महिपतराव कवडे
१५७५०००	

येणे प्रमाणे पावणे सोळा लक्षाची पत्रें राज्यांस व सरकारचे कमाविसदारास लेहून पाठविली आहेत. त्यास कमाविसदार व राज्याकडील वकील आपणाजवळ आलेच असतील. त्यास कर्जपटीचा करार मदार करून वसूल घ्यावा. आपणाजवळ कोणी आले नसतील तरी या प्रमाणे पत्रे पाठऊन ऐवज वसूल करवावा. खेचीकरास राजश्री मल्हारबाकडून रगडून सांगितल्यावर रुपये देतील. * यावर ताकीद करावी. काहीं कार्य होईल. छ १ सवाल हे आशिर्वाद

¶*Sadashivrao writes from Poona to Raghoba in the North asking him to exact the various contributions mentioned in the paper from the various ruling chiefs in Malwa and Bundelkhand. The Peshwa, it seems, had levied special contributions to meet the expenses incurred in dri[illegible] Abdali.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 76] *[20-6-1757*

श्री.

पौ ४ शौवाल

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री सखारामपंत बापू
स्वामीचे सेवेसी.

पो बालाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता २ शौवाल मुकाम मौजे बरोली पो भुगांव जाणून स्वानंदलेखन कीजे. विशेष आपण छ २८ तारखेच पत्र पो ते छ मारी पावले. तेथें लिहिलें कीं छ २९ रमजानी कांसेगजावरी[1] मुकाम होईल. सुजावतदौले याजकडील वकील आपले यैसे त्याजकडेस पाठविले आहेत. आपण फरकाबादेस येतो. तुम्ही फौजेच्या दबावाने आपले काम करून घेणें. त्यास बहूत उतम आहे. फौजेच्या दबावानें काम करून घेऊन जें होईल त्यांस चुकत नाहीं. त्यांस येक काम जरूर करणें. रुरूचा राजा आहे. त्याचे त्याणे कुल पा फफुद परगणा घेतला. निवल पंधरा गांव राहिले. त्यास तमाम गढया बांधल्या. तैशाच सर्व जागा आह्मापासी सरकारी पथके आहेत. या फौजेने वरीसभर जुजल्याने हे काम होणार नाहीं. आपले येणे फरकाबादेस जाले म्हणजे हे काम सहजात व्हावे यैसे आहे. कदांचीत न जाले तरी येक मजल इकडेस रूख केला म्हणजे सर्व जाले यैसे आहे. आपण इकडेस यावयाचे केले. येणेकरून नेकसहि[2] जाला आणि सरकारी कामहि होईल. सुजातदौला पैकाहि देईल आणि सोबतीहि होईल. तेणे करून आपली मातबर कामे होतील. इकडील रागडेयाचे वकील तमाम लहान थोराचे लस्करी बसले आहेत. फौज कोणेकडेस जाती हें पाहातात. रुरूच्या राज्यानी आपले वकील राजश्री अताजीपंत नानाकडेस पाठविले आहेत म्हणून कलले. त्यास त्याणे चार परगणे दबाविले आहेत पा फफुद व पा तालगांव व देवमली व सकतपुर व पा इटे पांच परगणेयाची जागा दबाविली आहे. तमाम गढया बांधल्या आहेत. फरकाबादवाले यांची हिमाइती बहूत. तैसीच लस्करांतहि माणसे वकील पाठविले आहेत. असो इकडेस आलियावरी भेटीस येईन. सर्व वर्तमान सांगोन, त्याजवरून ध्यानास येईल तैसेच सर्वत्र जाले आहे. नवाब सुजावतदौले यांजकडीलहि वकील आपणाकडेस जावयासी आला. त्यास अजी प्रातःकाली रवाना केला. समागमे पंचवीस राऊत देऊन त्यास हाली आपणाकडून पत्र आले त्याजवरून त्यास इकडून आपणाकडे पाठवून देऊ. तो सीमहेर याच्या सुमारे गेला त्याजवरून त्यास

---

१ कासेंगंज. २ दबाव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बलाविला. वरकड मागाहून लिहून पाठवून देऊन जे काम होईल त्यास चुकत नाहीं. लिहित जाईन कलावें. आणीक जे वर्तमान होईल ते मुजरद जोडी पाठवितो. त्यावरून कलेल. आपण कासद जोडी पाठविली ती पाचवे रोजी पावली. बहूत काय लिहिणे. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govindpant Bundele proposes to Raghunathrao to come in person in the Doab so as to create an impression upon the rebels and befriend the Vazier.*

No. 77] *[1757*

श्री.

पु॥ श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे शेवेसी.

विज्ञाप्ति ऐसिजे. नजीबखानाने अबदुल अहमदखान याजबराबर राजश्री सुभेदारास सांगून पाठविलें त्याचा तपसील कलमे ४.

१ मी तुमचा फर्जद आहे. जैसी आज्ञा कराल तैसी वर्तनुक करीन. तुमचा उपकार मजवर बहुत आहे, आणि तुम्ही मजवर तरवार बांधावी हे गोष्ट उतम नाहीं. मजला सांगाल तर येमुना पार उतरोन जाईन. दिली व मुलूक ज्याचे स्वाधीन करावयाचा असेल त्याचे हवाला करावा. कलम १

१ दुसरे, मजला आज्ञा करावी. मी शहाकडे जाईन. तुमचा व त्यांचा सलूक ठराऊन हदहेदूद[1] बाधून ठीक करीन. शहाने आपले हादेत असावे. तुम्ही आपले हदेत हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा. कोणे गोष्टीचा कजिया राहणार नाहीं. कलम १.

१ तिसरे, माझा ल्योंक जाफेतेखान[2] पांचा साता हजाराफौजेनसीं तुमच्या जवळ ठेवीन. तुम्हासी मजसी संशय किमपि नाहीं. कलम १.

१ चोथे, इतक्या गोष्टीवर तुम्ही राजी नसाल, लढाईच करावी हाच मनोदय असल्यास पारचे रोहिले वगैरे सर्व मिळून एकदा लढाई उतम प्रकारे करून मग ज्यास श्री यश देईल तो सर्व राज्य करील. कलम १

४

सदरहु कलमे ४ या प्रमाणें सांगून अबदुल अहदखानास पाठविले आहे. तो राजश्री सुभेदारापासीं जावयास निघाला. तो जाटाचे खातरदास्त बहादरगडाहून सुभेदारानी माघारे फिरविला. श्रुत होय. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*This paper contains four alternative proposals addressed by Najibkhan to Malharrao Holkar on the subject of effecting a reconciliation between Abdali and the Marathas.*

---

१ मर्यादाहद्द. २ जवेताखान.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 78] *[1757*

श्री.

सेवेसी विज्ञापना. आज्ञा घेऊन स्वार जालियावर सालेमार बागावर मुकाम केला. समंदखान याची आवाईचे वर्तमान होते. त्यास येथे आलिया सोनपत पानपते पासून बातम्या आल्या कीं सरहंदे पावेतो फौज कोठे नाहीं. करनाळेस हजार स्वार आले यैसे वर्तमान होते. परंतु त्याचे ठिकाण लागत नाहीं. विशेष शहरचा मजकूर मोगलपुऱ्याकडील अनुसंधान आहे. ते गोष्टीस गाजदीखान, नागरमल पाहिजेत. त्यास पाठवावयाची आज्ञा करावी. येथे एक दोन मुकाम करूं. जी तरतूद होईल ते करूं. ये गोष्टीचे उत्तर सत्वर पाठवावयासी आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. बहादूरखान बलोच यासहि पाठवावयाची आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev's letter to Raghunathrao describing measures to oppose Abdus Samad Khan, Abdali's lieutenant, posted at Sirhind, who was threatening from the North.*

No. 79] *[3-7-1757*

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान तथा राजश्री भाऊसाहेब स्वामींचे शेवेसी

विनंती सेवक आंताजी माणकेंस्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान तां अशाढ वद्य २ द्वितीया मुकाम आनुपशहर गंगातीर येथून गड मुक्तेंस्वर बारा कोंस येथास्थित असे विषेषे. आबदाली गेला. श्रीमंत जेपुर प्रांती राहून अंतरवेदीतील आमल उठला तो बसवावा, नजीबखानाचा मुलूक जप्त करून नजीबखान दिलीहून काढावा, या उदेश रां सखारामपंत बापूंस श्रीमंत दादासाहेंबी तेवीस हजार फौजनसी जेपुर प्रांतीहून रवाना केले. समागमे विठल सिवदेव, आम्ही, हुजरात, गंगाधर येशवंत आलो. आगरियांस येऊन जाटाकडील बाकीचा फडशां करूंन अंतरवेदीत येऊन आपला आमल बसविला. व गाजदीखान शाहाजादे गंगा उतरून पार गेले. सुज्यातदौला व ते लढाईस उभे राहिले. आम्ही सुज्यातदौलाचा उपराला केला. त्यामुळे वजिराने सलुख करून मागती पार आम्हाकडे आला. आम्ही दरकूच गडमुक्तेस्वराकडे जाऊन पातशाहाचा मुलूक नजीबखानाने दाबला तो खालसा करून मग नजीबखानास दिलीतून काढू. नजीबखान आबदाली दोन नाहींत. आबदालीचा पुत्र लाहोरी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहे. नजीबखान त्याचा होऊन दिलीत आहे. वजीर पातशाहा आम्हाकडे आहे. सुज्यातदौला आपलें जागा आहे. आम्हास सामील व्हावयाचा नाहीं. हे सायंत सात बंद तपशीलवार वर्तमान सविस्तर आजी साहा दिवस वर्तमानपत्रें लिहून मुजरद माणसे ३ तीन रवाना केली. ती सेवेसी पावली असतील. त्याजवरून सर्व स्वामीच्या ध्यानास आलें असेल. याजकरिता हाली मागील तपसीलवार वर्तमान लिहिले नाहीं. अंतरवेदीत काडीचा फितुर न राहिला. सुज्यातदौलाची लढाई वजिराची होऊन दिल्ही. वजीर भांरीच होता, त्यास लुटून घेता. परंतु सुभेंदाराची मर्जी सुज्यातदौलाकडे म्हणोन त्याचाच उपराला केला. त्याने वजीर दबला. सलुख केला. वजीर शाहाजादे आहमदखान पठाण आम्हाकडे आले. येकादोदिवसी भेटतील. स्वामीस कलावे, यांजकरितां लिहिले असे. [अपूर्ण]

¶*Antaji Mankeshwar writes to the Peshwa that order had been restored in the Doab and mentions some pointed details of the Imperial situation after Abdali had left Delhi in the summer of the year.*

No. 80] *[4-7-1757*

(पो) छ ७ जिलकाद.

श्री.

पुा चिरंजीव राजश्री दादा यासी आशिर्वाद उपरी. अबदाली दिलीपलीकडे जलदीने गेला म्हणुन जलद लिहिले दिलीहून मनसारामाचे आले. आपलेहि पत्र रवाना जाहाले असेल. कासीद सरकारचे चाकर चालत नाही. सखत ताकीद असावी. आपली समीपता होत चालली. जाट जबरदस्त पाहून शहाणपण करून गेला. असो. यदा जाटाने बहुत केली. सर्व प्रकारें कृपाच दाखवावी. मारवाडांत कांही साध्य नाहीं. दिलीस तो कांहीच नाहीं. जयनगरची मामलत करून मोकळे होऊन आपले मुलुखची देखरेख कमाविसदाराचे पुर्तें तहकीक बारीक मोठे वर्तमान मनास आणावें. तुम्ही जेथे आहा तेथे आसपास पैका मिळावयाची जागा राहिली नाहीं. याउपर बाजतबरसात पटणे जरूर घेतले पाहिजे. मल्हारबाची जाटाची चित्तसुध अंतरी नाहीं. कदाचित कलह इछितील तर परिणाम होणे नाहीं. यंदाचे वर्ष तो सहसा जाटासी विरूद्ध न करावें. दतबास परिछीन एक दोनदा ल्याहावें कीं, अबदालीसाठीं जलद तुम्हास बोलाविले होते, तो तूत गेला, याउपर अमदाबाद घेऊन आपण यावे, ऐसे जरूर आपण लिहिलें पाहिजे.

¶*Balaji Bajirao's autograph letter to Raghoba asking him to befriend the Jat and lead an expedition towards Patna next year for obtaining funds.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 81] *[17-7-1757*

श्री.

पो २९ जिल्काद

आशीर्वाद उपरी. राजश्री दामोदर महादेव यांजकडे (काल्पी?) पीच्या माहालची बाकी आहे, त्याचा तपशील आलाहिदा पुरवणीत लिा आहे. त्यास माारनिलेकडे बाकीचा यैवज येणे त्यास ते म्हणतील कीं रा अंताजी माणकेश्वर याची वरात आम्हावर जाली आहे. त्या यैवजांत हा यैवज मजुरा मागो लागतील. ऐसियास माारनिलेकडे ऐवज आठा लक्षाची कुन्हाज्यानाबादची वरात व पटाणाबाबद आठरा लक्ष व जैनगराबाा पाऊण करोडीचा वसूल त्याकडेच आहेत. त्यांतहि जाला आहे. आणखी किरकोळ ऐवज त्याजकडे जमा होतच आहे. या खेरीज पातशाहा दरमहा फौजेस रोजमरेयास ऐवज दीड लक्ष रुपये दरमहा देतात ऐसे वर्तमान आहे. + + + ऐसे कितेक ऐवज त्याजकडे आहेत. त्या ऐवजी अंताजी माणकेश्वर याचे वरातेचा ऐवज पावेल. या ऐवजात मजुरा द्यावयाचा नाहीं. अंतरवदीच्या ऐवजास माारनिले हातपाय लावितील. तरी ते गोष्ट कार्याची नाहीं. तरी जो ऐवज बाकी निघेल तो करार करून लिहून पाठवणे. त्याप्रमाणे येथून कापडकरी सावकार याच्या वराता होतील. मातबर खंडण्या म(ल्हारबानीं) × × × केल्या आहेत. त्याचे बाकीचे व(सूल) + + + फौज गेलियावर होईल. परंतु आजपर्यंत वसुलावर अमलदार आहेत. त्याचे हिसेब तर तुम्हाजवळ यावे. ते तावार आणवणे. प्रा (?) अंतरवेदचा वसूल बाकीचा करार करून येथे भरणा करावा असे सारे मामलेदाराचा करून लेहून पाठवणे, त्याप्रो घेऊन. रा छ २९ सवाल [२] हे आशिर्वाद. (पत्र नानासाहेबाचें रघुनाथरावास उत्तरस्वारींत).

¶Nanasaheb's letter to Raghunathrao containing strict instruction for recovering all the dues from the Doab and not to accept excuses from Damodar Mahadeo Hingne.

No. 82] *[8-10-1757*

श्री.

पो २२ सफर

सेवेसी विज्ञापना. राजश्री दत्ताजी शिंदे यांस गुजराथ प्रांतीं पाठवावयाचा विचार स्वामीनी केला. उत्तमच आहे. परंतु अबदाली तूर्त येतो न येतो हें कांहीं तथ्य

---

१. येथून अक्षरे भाऊसाहेबांचें. २. येथून अक्षर नानासाहेबांचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाहीं. कदाचित आलाच तरी पेंच फारच पडेल; त्यास येविशी दत्तबास सांगावें कीं, अबदालीची बातमी राखोन आटक उतरतांच त्याणी जेथें असतील तेथोन येऊन आम्हास सामील व्हावें. अबदालीचें पारपत्यास फौज मातबर असावी, याजकरितां दत्तबा जरूर येत तें करावें. जरी अबदाली ईकडे न आला तरी दत्ताबांनीं स्वस्थतेनें गुजरातेचें कार्य करावें. अमदाबादेनें बदनक्ष केला आहे, याजकरितां मोमीनखानाचें पारपत्य करणें उचित आहे. रवाना छ २३ मोहरम बहुत काय लिहिणें हें विनंति.

¶*Raghunathrao to the Peshwa suggesting that Dattaji should be ready to return to the North as soon as news comes of Abdali's return.*

No. 83] [*17-11-1757*?

श्री.

छ २९ रबिलाकर

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विज्ञाप्ति येसीजे. दिलाराम दि॥ आदिनाबेग यानी पत्र स्वामीस व आम्हास लिहिली आहेत, तेच बजिनस सो पाठविली आहेत, ते प्रविष्ट होऊन श्रुत होईल. पत्रातील वर्तमान पंजाबाकडील वृत्त लिहिले आहे. शाह अब्दालीने आपले तर्फेने लाहोरात व द्वाबीयांत व सरहंद वगैरे जागा जागा नायेब ठेऊन गेला होता. त्यास सिखानी जमाव करून आमचे सल्लाह बमोजीब अब्दालीच्या अमलांत खलेल केला, आणि जागाजागांची ठाणीं उठऊन दिल्ही. साहादतखां आफरीदी यास द्वाबियात खराब केलें. द्वाब सारा लुटिला. जमीदारास बहकाऊन कढा (?) घो. नानकपंथी याचे रु. घेतले. शेवटी आफरीदी पाहाडांत उठून गेला. लाहोरांत खोजे उबेदखा सुभेदार याचे सांगाते फौज वीस हजार स्वार प्यादा घेऊन सिखांसी युद्धास आले जुंज जाले. सेवटीं खान मजकुराची सिकस्त जाली. बहुतेक सरदार मारले पडले. बाहीर बुनगे सर्व लुटून घेतले. तोफखाना शाह सोडून गेला होता तो सर्व लुटिला. काबलेस शाह आबदाली आहे. तेथून हरकारे शहाचे लष्करांतून खबर घेऊन आले. छ ११ रौवल पावेतो खबर तहकीक आली कीं शाह काबलेस आहे. कंधार आणि कसले लुटिला. शाहचा यांत इरानाकडून खलेल उठला आहे. त्यास आबदालीनें फौज आपली कधारेकडे पाठविली होती. ते आतां खबर येथें यावयाची बहुत आहे. चपर आपले फौज आणावयास कधारेस पाठविले होते. तोफखाना व फीलखाना आबदालीचा सर्व पिसेरे[2] व जलालाबादमधे आहेत

---

१. दस्तीखाना. २. पेशावर.

१ अंत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तोफखानियास ताकीद जाली आहे. हिंदुस्थानास रवाना करणार. तेच पत्रे बजिन्नस सोा पाठविली आहेत. वृत्त श्रृत होईल. उत्तरे सत्वर पाठविणार स्वामी समर्थ आहेत. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Raghunathrao's presence in the North has emboldened the Sikhs to rise against Abdali.*

No. 84] *[24-11-1757*

श्री.

पौ छ ११ रबिलोवल

सेवेसी विज्ञापना. आम्ही अंतरवेद प्रांते आलो. मुलकाची जती केली. याचे वृत्त तपसिले सेवेसी लिहिलेच आहे. विदीत जाले असेल. नजीब काढून दिल्हा. आबदालीचा बंदोबस्त दूर करून श्रीमंताच्या हातचा जाला. पुढील तह निमेचा करार ठरला. त्यात बावीस सुभ्याचा तपसील. सा सुभे दक्षण, माळवा, गुजरात, अगरे, आजमरे हे सुभे तर आपणाकडे आलेच आहेत. लाहोर प्रांती अटकपावेतो सा सुभे अबदालीकडे आहेत. बाकी पाच सा राहिले. त्यात प्रयागापैकी कडाकुरा वगैरे अंतरवेद आपणाकडे पहिली आहेच. आयोध्या, बंगाला, दिली, पटणे हे राहिले. त्यांत दिली खाले एक करोडीचा मुलुक सरदेपावेतो प्रस्तुत कांहीं कम असीनंवद पावेतो तर वसुलीच आहे. यापैकी निमे महाल चाळीस पचेताळीस पावेतो वाटून दो चौ दिवसात घेतील. बंगाल्याचे दरसाल पातशहास चौपन लक्ष येतात. आपले सलाबतीनें नवे जे साधतील ते साधावे. निमेनिम घ्यावे. या प्रमाणेच आयोध्या दोन जागे मात्र जो आकारेल तो निमेनिम घ्यावा. वरकड जाट तरी आगरे सुभ्यात आला याप्रों जाले. मेहनत केली तर लाहोर वगैरे हेहि सुभे सुटावयाजोगे आहेत. स्वामीचे पुण्य थोर आहे. काले करून सर्व होऊन येईल. सदैव कृपा कटाक्षे करून पत्री सांभाळीत असावें. आमचे पदरी लेकूरपण आहे. वारंवार शिक्षायुक्त लेखन केलिया उत्तम आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Sakharam Bapu's handwriting of this letter may indicate that Raghunathrao writes it to the Peshwa from the Doab, summarising the achievements of the Lahore expedition, 1756-58.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 85]

श्रीमोरया.

विनंती उपरी. भोजनोत्तर राजश्री बापुजी त्रिंबक याजला समागमे घेऊन येतो. पाऊस लागला तरी येतो. स्नान करून येत होतो तो महमदखान अहमदखान पठाणाचा पुत्र येथें आला आहे त्याची भेटी जालियावर सत्वर येतो. श्रुत होय हे विनंती.

¶Gangadhar Yeshwant's chit to Raghoba proposing that he was going to visit him with Mahamadkhan Pathan.

No. 86] *[1758?*

(पहिलें पान मिळालें नाहीं).

विज्ञापना.

× × × संग आहे. त्याचा जाबसाल त्याणी लिहिलें कीं मी सिबंदीचे स्वाधीन आहे. जो येईल त्याणे माझे रुपयाची वाट करावी. याप्रमाणें त्याणी लिहिले. त्यावरून जमातदार भीड सुधा येथें आहे. त्यास याजला एक आज्ञापत्र सादर करावें कीं रा॥ आपाजीपंताजवळ राहून ते सांगतील त्याप्रमाणें चाकरी करीत जाणें. तरी यांसी जरूर चिठी लिहावी. अम्ही यांस आपल्या जवळ ठेऊन घेतले आहे. सरकारचे कोण्ही ग्रहस्त येतील अथवा महूस पाठवावयाचें होईल तेव्हां आम्हांस लिहावें. आम्ही हे व आणखी जे आज्ञा होईल ते पाठवूं. परंतु तूर्त यासीं येथील चाकरीचे लिहावे. जाटाची फौज दरोबस्त इदृखी व माहाद्याचे कछारावर पडली आहे. लाहारेस सडी दौड जाली आहे. गुरे ढोरे वळून नेली. तमाम प्रांत उज्याड आहे. इकडील चिंता स्वामीनी न करावी. खावंदाचा प्रतापहास्त मस्तकी आं. तरी ईश्वर उत्तम करील. आमची एक-निष्टता असली तरी सर्व गोष्टी उत्तम होतील. सदैव कृपापत्री सेवकास सनाथ करावें. बहूत काय लिहिणें. लोभाची वृधी करावी हे विज्ञापना.

¶A mutilated letter describing the confusion created by the armies of the Jat.

---

१ अंताजी माणकेश्वराचा मावसभाऊ आडनांव अत्रे (?)

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 87] *[February 1758*

श्री.

यादी निसबत गोविंद कृष्ण रा॥ अजमेर :

२. साहित्यपत्रें राजश्री अंताजी मानकेश्वर व समशेर बहादर यास कीं मारवाड प्रांती बिजेसिंगानें दंगा करून ठाणे उठविली आहेत. आजमेरी × × × म्ही पत्र दर्शनी ते प्रांती जाऊन गोविंद कृष्ण याची मदत करून बिजेसिंगाचे पारपत्य करून ठाणी कायम राखवणे व गोविंद कृष्ण याचा उपराळा अजमेर किल्याचा करणे.

१. किल्याचे खर्चाची काही तूर्त वरात ते प्रांती गोविंद कृष्ण यांजकडे बेजमी करवावी.

१. गोविंद कृष्ण याच्या पत्राचें उत्तर आज्ञा करणे ते करावी.

¶*Orders are sent to Antaji Mankeshwar and Samsher Bahadar to proceed towards Ajmer to the succour of Govind Krishna, whom Bijesing was harrassing.*

No. 88] *[15-4-1758*

श्री.

अजमेर,

[illegible] राजाराम गोविंद विज्ञाप्ति ऐसीजे. इकडील वर्तमान तरी पूर्वी सविस्तर सेवेसी [illegible]देसी पाठविली त्याजवरून वृत श्रुत होईल. हाली वर्तमान विनंतीपत्रे सेवे[illegible]ीच येक दोन ग्रहस्त आहमदखानाकडे वगैरे रोहिलेयाकडे सरकारचे खलिते घेऊन [illegible]ीचा फिसाद पठाणाच्या चितात घातला की श्रीमंत आले. त्यानी कितेक प्रकारे [illegible]ल्या गोष्टीस वजीरहि माहित आहेत व दक्षिणे जातात म्हणून सांगितले. [illegible]काही आठ महिने बसून काम नमुदेत सेवकासहि कलले आहे. वजिराही व सेवक [illegible]तात त्याच्या मते की याचे केले आणिले आहे. त्यात जे ग्रहस्त फिसाद घाति[illegible]लगना केल्या आहेत त्या सेवेसी न होये ते करावे. ऐशा कितीक प्रकारे व[illegible] सारांश की फौज घेऊन आलो. आल्यावरी तपसीलवार निवेदन केल्या जातील. [illegible]करून आणखीकडे न जावे. छ स्वामीही वजिरास भेटल्याखो तेथून कूच [illegible]ऊन वजिरास व सेवकास रूकसत ६ साबानी आहमदखान वजिराचे येथे ये[illegible] शाहासीहि जुजावयाची आसिली केले व जबानी सागितले कीं श्रीमंताची मर्जी [illegible] प्रकारे तर आम्ही तयार आहो. मग वरकडाचा काय मजकूर? ऐसे कितीक [illegible]

× या मोहिमेचा उलगडा झाला पाहिजे. बिजेसिंगाची हयात सन १७५३-९३.

१ रजा दिली

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

भाषण स्नेहाची केली. तो विस्तार हजूर येऊन विनंती करू व हेहि बोलिले की आम्ही सर्वासी तोडून स्वामीचे जाहालो व स्वारी देशास जाणार म्हणून येथे कोणी सागतात तर गोष्ट न करावी. ये प्रांतीचा बंदोबस्त जाल्यावर जैसी मर्जी असेल तैसे करणार स्वामी समर्थ. याप्रमाणे सागितले ते सेवेसी विनंती लि॥ असे श्रुत होये. आम्ही उतर दिधले कीं, तुम्हास येथे लोक सागतात की श्रीमंत दक्षणेस जातात व श्रीमंतास कितीक अर्ज करितात की पठाण रोहिले याच्या फौजा येत नाही, उगेच लाऊन ठेविले आहे. त्यास त्या गोष्टीवर मदार काय आहे. अतःपर सत्वर फौजा पाठऊन स्वामीचे मनास तुमचे सत्यवादीपण दृढतर होये ते करावे याप्रमाणे उतर दिल्हे. त्यानीहि मान्य केले. विस्तारे हजूर येऊन श्रुत करू. वजिरानी पत्रे सेवेसी पाठविली आहेत. उतरी सनाथ करणार स्वामी समर्थ आहेत. इटावियासी नावाची परवानगी गोविंदपंताच्या पुत्रास पाठविली पो. इटावियाच्या नावा पाच सात आहेत. तेवढीयानें फौज उतरावयासी दिरंग लागेल. फौज उतरून नावा फिरोन आपले घाटास घेऊन जाणे म्हणून आज्ञापत्र सादर केले पाहिजे. दक्षेणेस जावयाचे हरगीज तूर्त न करावे. स्वामी दक्षेणेस गेले तरी मागे अबदाआली आल्यावर जाठ, माधोसिंग हे मालव्या प्राती धामधूम करतीलसे दिसते. स्वामी या प्राती आल्यावर आबदाआलीचाहि सळूक आहमदखानाच्या माा होईल. यास्तव याच्या फौजा व वजीर येऊन पावेतो पावेतो हरगीज[1] मागे फिरावयाचे न करावे. आठा दाहा दिवसी येऊन पावतो. मग जो विचार करणे तो करावा. याउपरी मर्जीस येईल ते खरे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer of the letter Rajaram Govind requests Raghunathrao not to leave Northern India. His presence was necessary to keep down the newly conquered provinces and rebellious rulers.*

No. 89] *[16-4-1758*

श्री.

पै॥ छ १७ साबान.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक पुरुषोत्तम महादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल ताा छ ७ माहे साबान स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर पूर्वी विनंती पत्रे सो पाठविली आहेत. त्यावरून वृत्त श्रुत होईल. हली वर्तमान तरी सरकारचे खलिते घेऊन एकदोन ग्रहस्त अहमदखानाकडे वगैरे रोहिल्याकडे आले. त्याणी कितीका प्रकार फिसाद पठाणाच्या

---

१ हरगीज = बिलकूल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चितात घातला कीं श्रीमंत दक्षणेस जातात म्हणून सांगितले. त्या गोष्टीस वजीरहि माहीत आहेत व सेवकासहि कळले आहे. वजीराही व सेवकाही आठ महिने बसून कामास नसुद केले आहे. जे ग्रहस्त फिसाद घालितात त्याच्या मते कीं याचे केले न होय ते करावे. ऐशास कितीका प्रकारच्या वलगणा केल्या आहेत. त्या सेवेसी आल्यावर तपसीलवार निवेदन केल्या जातील. साराउश की फौज घेऊन आलों. स्वामीही वजीरास भेटल्याखेरीज तेथून कूच करून आणखीकडे न जावे. छ ६ तारखेस अहमदखान वजीराचे येथे येऊन वजीरास व सेवकास रुखसत केले व जबानी सांगितले कीं श्रीमंताची मर्जी शहासीहि जुजावयाची असेल तर आम्ही तयार आहो. मग वरकडाचा मजकूर काय? ऐशी कितीक भाषणें स्नेहाची केली. तो विस्तार हजूर येऊन विनंती करूं व हेहि बोलिले कीं आम्ही सर्वांसी तोडून स्वामीचे जालों व स्वारी देशास जाणार म्हणून येथे कोणी सांगतात. तर हे गोष्ट न करावी ये प्रांतीचा बंदोबस्त केलियावर जैशी मर्जी असेल तैसे करणार स्वामी समर्थ आहेत. या प्रमाणे सांगितले. ते सो विनंती लिहिली असे. श्रुत होय. त्याउपरी आम्ही उत्तर दिधले कीं तुम्हास येथें लोक सांगतात कीं श्रीमंत दक्षिणेस जातात व श्रीमंतास कितीक अर्ज करितात की पठाण रोहिल्याच्या फौजा येत नाहींत. उगेच लाऊन ठेविले आहे. त्यास या गोष्टीवर मदार काय आहे. अतःपर सत्वर फौजा पाठऊन स्वामीचे मनास तुमचे सत्यवादीपण दृढतर होय ते करावे या प्रमाणें उत्तर दिधले. त्यानीहि मान्य केले. विस्तार हजूर येऊन श्रुत करूं. वजिरानी पत्रें सो पाठविली आहेत. उतरी सनाथ केले पो. व इटावियापासीं नावांची परवाणगी रा॥ बाळाजी गोविंद यास पाठविली पाहिजे. इटावियासी यांच्या नावा पांच सात आहेत. तेवढीयानें फौज उतरावयासी दिरंग लागेल. फौज उतरोन नावा फिरोन आपले घाटावर घेऊन जाणे म्हणोन आज्ञापत्र सादर केले पो. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञप्ति.

¶*Purshottam Mahadeo Hingne writes to Raghunathrao about the negotiations that were being carried on with the Rohilla chiefs for joining Marathas against Abdali.*

No. 90] [*12-6-1758*?

श्री.

तीर्थस्वरूप राजश्री नानास्वामी वडिलाचे सेवेसी.

अपत्येसमान गोपालराव गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ ५ सवाल मुा॥ मोहेरा क्षेम असे विशेष.

---

१ फरूकाबादेच्या उत्तरेस.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपण पत्र पाठविले ते पावले. लि॥ की आपला मजकूर व राजश्री बापूचा फर्काबादेस यावयाचा जाहाला होता. तो त्याचा सल्लक जाहाला म्हणून तिकडील मनसबा राहिला. सिकंदऱ्याकडे जावयाचा निश्चय जाहाला म्हणून लिहा व मला सुज्यातदौलाकडे जाणे म्हणून लिहा. त्यास मी उदैक जातो. त्रिंबकदासास आथवा भवानीदास यास आज येथे येऊन पावते करावे. भिंडेस ऐवज आला आहे. तो सिकंदऱ्यास पावता करणे म्हणुन लिहा होते. त्यास यैवज येऊन सत्वर पावेल. भवानीदासास निरोप देऊन सत्वर पाठवावे. सुज्यातदेवलाकडे सल्लखास पाठवीत होता. तो सल्लख तो जाहला. आतां तेथे जाऊन त्यासी काय बोलावे, कसे करावे, ते आपण घराऊ लिहून पाठवावे. त्याज प्रो वर्तणूक करूं. बहुत काये लिहिणे व मी लिहा असे न कल्ल द्यावे. व सहजात श्रीमंत राजश्री बापूसहि पुसावे की याने काये बोलावे असे सहजात पुसोन उल्लेख करून खुलासा काहाडून लिहिला पाहिजे. परंतु असे कदाचित पुसल्यावर न जाणे म्हणुन म्हणतील तर बालाजी गोविंद याचे तैनातीस राहावे लागेल. यास्तव सुज्यातदौलाकडे तर जाणे होये हे ठहरावे. परंतु तेथे काये बोलावे, काये मनसबा ठहरावा, तो लिहा पाहिजे. व त्रिंबकदासास अथवा भवानीदासास सत्वर पाठवावे व तीर्थस्वरूप राजश्री गंगाधरपंत तात्यास आह्मी पत्र लिहा होते त्याचे उत्तर पाठवावे. असे सर्व लिहायाची उतरे जरुर तपसीलवार लिहा पाहिजेत. फिरोन साडियांबरोबर उत्तर पाठवावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री तात्याबा व तथा राजश्री दाजीबा यासी अनेक आसीर्वाद. लिहा परिसीजे. हरघडी पत्र पाठवून संतोषाते पावित जाणे. लोभ कीजे हे आसीर्वाद.

¶*Gopalrao Ganesh Barve writes this letter to one Nana who cannot be identified. It mentions that an agreement had been effected with Suja-ud-daula. To what period this agreement refers, it is difficult to ascertain. Further light requires to be thrown on this affair.*

No. 91] [*1758*

श्री.

सेवेसी विज्ञापना. राजश्री बापूजी माहादेव याची वस्तभाव हती घोडी सर्व तेथे राहिली असेल. त्याची कूल जफ्ती करून जमा करून ठेवणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे कारकून माणसें पाठऊन कूल वस्तभाव जप्त केली. चौकी बसिवली आहे. रोख यैवज काहीच सापडला नाहीं. घोड्यांस पांच दिवस दाणा हतीस

---

१ सांडणीस्वार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

रतीब नाही. जागा आहे. घोड्यांची माणसे प्यादे बारगीर आहेत. ते बेदील होऊन चाकरी सोडून जाणारसे दिसतें. परंतु तूर्त त्याची दिलासी करून बंदोबस्त करून ठेविला आहे. घोड्यास माणसें पाहिजेत. बारगीर आहेत त्यास ठेवावे. तेव्हा खर्चासहि दिल्हे पाहिजे. घोडी उटे हती यास चंदी पाहिजे. त्याची आज्ञा काय ते करावी. माणसे चाकर फरास सारवान प्यादे आहेत. त्याचे समाधान करून ठेवावे की जातील त्यांस जाऊ द्यावे याची आज्ञा केली पाहिजे. पत्राचे उतर येईतोपर्यंत त्यास ठेविले आहेत. जसी आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणुक करूं. तपसीलवार उतर पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter mentions the punishment the Peshwa inflicted upon Bapuji Mahadeo Hingne, the Maratha Vakil at Delhi.*

No. 92] [*1758*

श्री.

विनंती उपरी. आपण आम्हा उभयतास दोन चिठ्या पाठविल्या त्या पावल्या. त्यातील मजकूर नजीबखानाचा खजाना मेरटेवरून पार जाणार याकरितां येथून जनार्दनपंत[1] व लांबहाते तात्याकडील रवाना केले. आपण उभयतानी जावे. नाहीं तर राजश्री अंताजीपंताची फौज व तुम्हाकडील विठल आपदेव पाठवावे. त्यास आमचा विचार जाला होता की तुम्हाकडील पथके येत न येत परंतु आपण गुरुवारी बुनगे पाठीमागें टाकून दरकुच गडमुक्तेस्वरास जावे. त्यास हली हे बातमी आली. उत्तम. उदैक बुधवारी प्रातःकाली चिरंजीव बापू व विठल आपदेव पुढे लांब मजलीनें जातील. आम्हीहि तडक बुनगे घेऊन पाठीवर जातो. जवल राहिल्यास आम्ही सडे त्यात मागून सामील होऊं. बुधवारी द्वादसी × आम्हास थोडासा गुता, याकरिता येका दिवसाचे अंतरे सडी फौज पुढे रवाना केली. सनद अनुपशेहरची पाठवितीलच. पावले खर्चास यैवज दरमाहाचा भर रोजमरा जरूर पाठविला पाहिजे. बारगीर चाकरानी आडविले आहे. राणोजी देवकरास मलबानी आश्रा दिल्हा आहे हे उत्तम नाहीं. जावे तर त्यानें येकल्यानें जावें. बारगीर सिलेदार × स न्यावयास प्रयोजन × (नाहीं). त्याच्या हरामखोऱ्या

---

१ परंडे ?

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फार आहेत. हरामखोरास रागे भरावे. दुसऱ्यानें आश्रा द्यावा हें उत्तम नाहीं. बहूत काय लिंहिणें हे विनंती.

¶Vithal Shivdev's handwriting. He seems to address this letter to Raghunathrao on the subject of Najibkhan and complains about Malharrao Holkar.

No. 93] *[19-8-1758*

श्री.

राजश्री जनकोजी सिंदे

गोसावी यांसि

॥ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रीो रघुनाथ बाजीराव आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. अबदाली पठाण याची यावयाची अमंद गरम आहे. त्यास तो आला नाही तो आपण भारी व्हावे म्हणजे उतम आहे. तरी तुम्ही लौकरी यावें. यैसी पेशजी तुम्हास पत्रे लिहिलीच आहेत त्याजवरून तुम्ही तयारी करून येतच असाल. हालींहि लिहीले असे. तरी फौजसुधा लावलाब मजली करून त्वरेने यावे. रा॥ छ १४ जिल्हेज.

¶Raghunathrao asks Jankoji Scindia at once to proceed to the north, which was being threatened by the Abdali.

No. 94] *[September 1758*

श्री.

पो॥ छ ४ सफर ऊर्फ अश्विन

सन तिसा.

पु॥ श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी.

विज्ञापना यैसीजे. पत्रे सिध्द जालियावर वर्तमान आले कीं राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जनकोजी सिंदे यांची भेटी जाली. येकांती व लोकांत हा (वि) चार ठरलाकीं पूर्वा प्रो जे काम करणे ते ब(श)क करावे. या प्रकारे विचार जालियावर ज्या मुकामी होते तेथून कूच करून जैनगरच्या रस्त्यावर

---

१ दाट अवई.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येऊन पडले. कछ(च्या)च्या राज्याकडील जावसाल व मुलतानाकडील मामलत आणखी येकदोन राजकारणी आली आहेत. विजेदशमी जालियावर येक गोष्ट ठरेल तेथे तीर्थस्वरूप राजश्री पुरुषोत्तम माहादेव आहेत ते सविस्तर वर्तमान शेवेसी विनंती लिहित असतील. बहुत काय लिहिणें. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Hingne reports to the Peshwa the visit of Malharrao Holkar to Jankoji and their reconciliation.*

No. 95] [*21-9-1758*

श्री.

छ २२ मोहरम सु॥ तिसा.

सेवेसी महिपतराव लक्षुमण साा नमस्कार विज्ञापना एसिजे. येथील कुशल ताा छ १७ मोहरम जाणून स्वानंद लेखनास आज्ञा केली पाहिजे. विशेष. हिंदुस्तानाकडील वर्तमान जबाणी कासद पातशाह व वजीर नजीक पाणिपत गेले आहेत. पातशाहजादा येमुणेचे पार कमाऊचे पाहाडात नजीबखान रोहिला आहे त्याजपासी जाऊन पंचवीस तीस हजार फौज रोहिल्याणे जमा करून पुडे ठेवितच आहे. जमाव होतो. पातशाहासी व पातशाहजाद्यासी साठी कोसाचे अंतर आहे. याजपासी तीस हजार फौज आहे. पुडे काये होईल वर्तमान येईल ते विनंती लिहून. राजश्री मल्हारराव होलकर व जनकोजी सिंदे उभयेतास वजिराही बोलाविले म्हनून शाहापुरचा फैसला चौ लाखास करून पुडे गेले. मालपुरापावेतो पोहचले. जबाणी सांगत होते. सत्यमिथ्या ईस्वर जाणे. आयेकिले लिहिले. पुडे जैसे वर्तमान येत जाईल ते लिहित जाऊन. हैदराबादेकडील वर्तमान आले आहे कीं नबाब सलाबतजंग व बसालतजंग छ १७ मोहरमी कूच करून कलबुर्गप्रांती येत आहेत. नबाब निजामआलिखानास बोलाविले. तेहि जानार आहेत. प्रस्तुत तो निजामआलिखानाही सिपाह (ई) लोकास तनखा जाफराबादेपावेतो देऊन स्वार तहसिलेबदल आले आहेत. पुडे वासिम परगन्याहून कूच जेव्हां करतील, वर्तमान येईल तेव्हां लिहून. निजामआलिखानाकडील मोगल हुजुर येतो त्याजबार देवाजीपंत सैदलस्करखानी आहेत. येक दोन दिवस येथे होते. शामजीपंत टकले पुडे टोक्यास गेले होते. ते व हे मिळून हुजुर येत आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्रीमंत राजश्री दादासाहेब कासारीचा घाट चहडून देशास गेले म्हनून येथे वर्तमान दरगाहकुलिखानास हरकऱ्याही दिधले. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶Mahipatrao Panse writes to the Peshwa about the troublesome situation of the Emperor, his son and his Vazier after Raghunathrao had returned to the Deccan.

No. 96] *[7-10-1758*

श्री.

छ २८ सफर सन तिसा

श्रीमत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक अताजी माणकेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा आस्विन शुद्ध ५ मुकाम कोटपुतली सुखी असो विशेष. या प्रांतीचें वर्तमान व नजीबखान व दुदेखान शाहजादा याचे बखेडियाचा तपसील पुर्वी सेवकाने तपसीलवार सेवेसी लिहिलाच आहे व राजश्री जनकोजी बाबानी लिहिला आहे. सारांश येथून सहा मजली त्याची फौज. सेवक जाऊन जें चाकरी घडोन येईल ते करीलच. आदिनाबेगखान छ १२ मोहरमी [१६-९-१७५८] मृत्यु पावला. मारवाडची मामलत जाली. जैनगरचीहि जाली. कोटियाचा नवा राजा मृत्यु पावले. त्याचेहि ठरले. परतु दताजी बावा आल्याखेरीज जनकोजीबाबा दिल्लीकडे येत नाहीत. मुख्ये आजी गाठ घालून पारपत्ये करितो. निर्मूल करणे, झाडून बुडणे तरी सिंदे आलियाउपरि होईल. बंगालियाकडे आस्विनमासी जावे परंतु रोहिलियाच्या हगामियामुले कार्तिक मासावरी जाणे गेले. बारीक मोठे या प्रांतीचे तपसीलवार वर्तमान तीन बद श्रीमंत राजश्री दादासाहिबचे पत्री विनती लिहिले. ते स्वामीस विनती करितील. साराश गोष्टी, सेवक हरामखोरी करणार नाही. मोठीच चाकरीन, खावदहि कृपा करितील. मी घरचा खानाजाद. मजला लोकादेखता वारंवार जनात वाईट बोलावे. त्यामुळे कवडीचे माल होतो. ते स्वामीचेच नुकसान. अभाव पडिला असील त्यास येक वस्त्रानसी घराबाहेर निघोन. जे असेल ते स्वामीचे, कोठून आणिले नाही. जे आहे ते सर्व स्वामीचे. परतु पचवीस तीस लाख देणे आजी साहुकारी असता उलटा आभाव आणिकच जाला. कच्चा धागियाची रयेत. स्वामीची आखेरसाली आली. यावरी जीवप्राण हजीर आहे. वतनी चाकर जाते पलते नाही. आपल्या मुखे इतराजी फर्मावितीयावरी सेवकाचे कल्याण काये ? काही सेवकाची विनती श्रीमत राजश्री दादासाहेब करितील. ते करावयासी स्वामी समर्थ आहेत. रा. सुभेदारानी दीनाबेग सदीपबेगास पत्रे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लिहून वजिराच्या हिश्यात दोन चार लाखचे मात्र खलेल करविले. वरकड बटा चालविला तो वजिराच्या द्वेशाकरिता. तरी वजिराकडे जामिनीचा पैका फार फौज ठेवली त्याचा फार. ऐसे भारूड खलेल याची रुपयास नसावे. कौलात अंतर. पुढे पुर्वेचत्या कामात खलेलच्या. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Antaji Mankeshwar communicates to the Peshwa the serious situation of Delhi and requests him to remedy it.*

No. 97] [*5-11-1758*

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामाजी बावा

गोसावी यांसी.

स्नेहपूर्वक अंताजी माणकेश्वर, कृतानेक आशीर्वाद, विनंती उपरी. येथील कुशल तागाईत कार्तिक वद्य ९ मुक्काम खिचीवाडा जाणून स्वकीये लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपणांकडून आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी यैसें न करावें. सदैव पत्रद्वारें सांभाळ करीत असावें. यानंतर श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान स्वामींस व श्रीमंत राजश्री भाउसाहेबांस पत्रें पाठविलीं आहेत. तरी आपण उत्तम समय पाहोन अक्षरशाहा पत्रें वाचून दाखवावीं. मजकुराचा मजकूर सांगोन त्याचा जाबसाल उत्तम रीतीचा लिहून पाठवावा. आपण दरबारीं आहेत. याजकरितां आम्ही बेफिकिर या प्रांतीं आहों. राजश्री विठ्ठल शिव देव दरबारीं आले आहेत. त्यांची आमची स्पर्धा आहे. तें आपणास ठाऊक आहे. आम्हाविशीं नानाप्रकारच्या आदावती सांगतील. त्यास दरबारीं आमची वगवशिला सर्व आपण आहेत. आपले मांडीवरी उसें ठेऊन दूरदेशीं या प्रांतीं आलों आहों. सर्व भरवसा आपला आहे. आम्ही वारंवार लिहावें यैसा अर्थ नाहीं. आपलें थोडें बहुत तुलसीदल द्यावें, तें तीर्थस्वरूप राजश्री हरीपंत दादा यांजकडून देविलें आहे, तें आपणांस पावतें करितील. सर्व भरवसा दरबारीं हरयेकविशीं आपला आहे. आम्ही लिहावें यैसें नाहीं. बहुत काये लिहिणें. या प्रांतीची कांहीं शें दोनशें रुपयेपर्यंत फरमास आपली असली तरी आम्हास ल्याहावी. प्रविस्ट होईल. आमच्या पथकाची वकिली स्वामींकडे आहे. नुन्यें पूर्ण सांभाळित असावें. विस्मरण पडों न देणें. बहुत काय लिहिणें. कृपा आसो दीजे हें विनंति.

¶*Antaji Mankeshwar writes from the North to Ramaji Bawa (Chitnis) asking him to speak in his favour to the Peshwa about the dispute he had with Vithal Shivdeo.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 98] *[7-11-1758*

श्रीपांडुरंग.

पौ छ २० रबिलोवल

कार्तिक तिसा.

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान

साहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक रामराऊ निळकंठ कृतानेक सिर साां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा कार्तिक शु॥ सप्तमीपर्यंत महाराजांच्या कृपा कटाक्षे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. माहाराजानी कृपावंत होऊन आज्ञापत्र पाठविलें तें सादर होऊन सिरसा वंदिलें. पत्री आज्ञापिले कीं अंताजी माणकेश्वर याजपासी फौज किती रांगडी व देसची मिळोन गणती चौकशी बेमुलाहिजा करून करणे. पूर्वी नवा हजाराची गणतीप्रमाणे न करावे. दुसरे अंतरवेदीचे महाल त्याजकडे कोणकाणते आहेत व हवाल्यापैकीं वसूल काय आला तो लिहिणे, व राजकी मनसुबे पटणे सोडवावे, पैका मेळवावा, नाही तर लाहोर प्रांते अमल बसलाच आहे पुढें अटक पावेतो जाऊन पैका मिळे ते करणे. कर्जाची चिंता सर्व राजश्री × × × सच आहे म्हणोन आज्ञा केली. त्यास अंताजी माणकेश्वर प्रस्तुत दिलीस आहेत. त्याच प्रांतास जात असो. आपण आज्ञा केली त्याचप्रमाणे बेमुलाहिजा करूनच चौकशीनें गणती घेऊ. नवे माहाल व हावाल्या-पैकीं वसूल कोणते परगणे त्याजकडे आले, वसूल काय पावला, तो लेहून पाठऊं. माहाराजाच्या आज्ञेशिवाय त्याचा मुलाहिजा धरून प्रतरणापूर्वक सेवेसी विनंती लिहिणार नाहीं. पूर्वीचे नव हजाराचे गणतीचे लिहिले. ऐसियास येविसीच्या वर्तमानास सरकारचे फडणीस अंताजीपंताकडे रूपनगरच्या मुकामी आले होते त्यास हे वर्तमान दखल आहे. आणि राजश्री पाटीलबावानी सेवेसी विनंतीपत्र लिहिले होतें रूपनगरीहून तेहि हजूर असेल; आणि हली विनंतीपत्र राजश्री पाटीलबावांनीं सेवेसी लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. वरकड राजकी मनसबे पटणे लाहोर वगैरे प्रांतीं जाऊन पैका मेळऊन कर्ज वारे ते करावे म्हणोन आज्ञा. ते चिंता रात्रंदिवस निजध्यास राजश्री पाटीलबावास आहे कीं, दीर्घ प्रयेत्न करून धण्याची कृपा संपादावी तेच करावे. क्लेश बहुळ केले आणि परिणाम द्रव्य प्राप्त नाहीं, तरी वृथा श्रमच मात्र होतो. त्यास सर्व प्रताप तेज माहाराजाचे करणार आहे. सेवक लोकाची एकनिष्टता आणि मेहनत यांत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अंतर नाहीं. त्या प्रांती गेलिया नंतर घडोन येईल तें खरें. सांप्रत्य विनंती विशेष काय ल्याहावी ? राजश्री पाटील बावाचे चित्त सर्व आपले चरणी एकनिष्ठ आणि धण्याची कर्जाची चिंता सदैव मानसीं वागविता (त.) ईश्वर घडवील तो सुदीन की आपले आज्ञेप्रमाणें घडोन येईल हेच इच्छितात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Letter from Dattaji Scindia's agent to the Peshwa at Poona with reference to the punishment to be inflicted on Antaji Mankeshwar and the Scindia's desire to meet the wishes of the Peshwa.*

No. 99] [*30-8-1758*

श्री.

पौ छ २४ जिलकाद

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना यैसीजे. पत्री आज्ञा आली की तुम्ही सरकार कामे करावी. इतबार आपला वाढवावा. तो न वाढविता गमाविला. यादी तुम्हाजवळ दिल्ह्या होत्या. यादी प्राा कामे गया वगैरे करून पाठवावी ते आद्यापि कामे जाली नाहीत. म्हणून आज्ञापत्री आली त्यास ज्या प्राा स्वामीची आज्ञा यादीची आहे त्या प्राा कामे करून मजुरा करून दाऊ. परंतु स्वामी कृपा विशेष जालियावर हिमतीने कामे बहूत होतात. त्यास यांजला येथे मातबर दबाव बसलियाखेरीज डोले उघडत नाहीं. दुसरे खासा स्वारी देशास गेलियावर मागे यानी दंगाच केला. याजमुले कामे करावयास फुरसत न जाली. वरकड सर्व प्रताप स्वामीचा आहे. स्वामीचा तेजोप्रकासे करून हिमालयपरयेत छत्र फिरते. तेथे येथील कामे आशक काय आहे ? स्वामीचा वरदहस्त आमचे मस्तकी आहे. तरी यादी प्रो कामे सर्व होऊन येतील. दिवसगत दगियामुले लागेल. सर्व प्राा कृपा करणार स्वामी समर्थ आहेत [१] सेवेसी श्रृत होये हे विनंती. [२]

---

१ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा. अक्षर फार कापरें आहे.

२ इ. स. १७५८ ना नंतरचें पत्र असावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 100] *[3-5-1759*

श्रीवरद.

पौ छ १५ सवाल ऊर्फ
जेस्ट वद्य २

श्रीमंत राजश्री दादासाहेब
महाराजाचे सेवेसी

आज्ञाधारक बाळ गोविद दडवत विज्ञापना. येथील कुशल ताा छ ५ माहे रमजान मुकाम इद्रपस्त यथास्थित जाणून स्वानदोछव लिही ती अज्ञा केली पाहिजे विशष. बहूत दिवस जाहाले. माहाराजाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणे करून चित सचिंत असे. तर सर्वदा पत्री साभाळ केला पाहिजे. यानतर इकडील वर्तमान तर, राा जनकोजी सिंदे माछीवाडीयावरी आहेत. राा शाबाजी पाटील यासी लाहोर प्राती पाठविले होते; त्यास त्याजला बोलाऊन घेतले. राा नारो शकर यासी लोहोर प्रातीचे कामकाज सागितले. आपण माछीवाडीयाहून माघारे फिरले. यैसी वदता आहे. राा गोविद बलाल दिलीस आले होतेत त्यास पातशाहा वजिराची मुलाजत जाली. आठ दाहा मुकाम केले. उपरातिक छ २ रोजी दिलीहून कूच करून राा जनकोजी सिंदे याजकडे गेले. राा आताजीपंतहि सिंदीयाचे लष्कराहून दिलीसमीप आले. येका दोन दिवसा दिलीस येतील. माहाराजाचे भेटीस बहूत दिवस जाहाले. त्यास हेत बहूत आहे. त्यास ईश्वरसत्याने ते प्रांतीच सत्वरच येऊन भेटी घेऊं. कृपा करणार माहाराज समर्थ आहेत. बहूत काये लिहिणे हे विज्ञाति.

¶*The writer Bal Govind reports to Raghunathrao the arrangements made by the Scindia in the Punjab.*

No. 101] *[15-5-1759*

श्री.

छ ५ सवाल तिसा

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी विनंती सेवक जनकोजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ताा छ १७ साबान मोकाम शतद्रु स्वामीचे कृपावलोकनें करून येथास्थीत असे विशेष. सरकारचे आज्ञापत्रें छ १५ जमादिलावलचे पाटविलें ते छ २ रजबी सादर जालें. तेथें आज्ञा राणाजीकडील

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मामलतीविसी व कोट्याकडील व मारवाडप्रांतीचा बंदोबस्त सत्वर करून लाहोराकडील व बंगाल्याकडील मनसबें मातबर असता पुष्कराभोवती बहुत दिवसे लाविलें, काये काये कामें केली, त्याचा तपशील खडणी वसूल काये, हे काहीच लिहिलें नाहीं. मोघम लिहिलें तरी सविस्तर लिहीत जाणे म्हणोन आज्ञा. ऐसियास आज्ञेप्रमाणे राणाकडील व कोट्याकडील व मारवाडचा बंदोबस्त जो जाला त्याप्रमाणे पूर्वी सेवेसी विनंती तपशीलवार लिहिलें असें ती पत्रे पावली असतील त्यावरून विदीत होईल. लाहूरचे वर्तमान आलाहिदा पुरवणी पत्री विनंती लिहिली असें. त्यावरून श्रुत होईल. येथून कूंच करून पुढे जो कर्तव्य अर्थ मनसब्याचा जेसा योजून येईल त्याप्रमाणें सेवेसी मागाहून लेहून पाठवू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाति.

¶*Jankoji Scindia's letter describing his doings in Rajputana.*

No. 102] [*4-6-1759*

श्री.

पौ ८ सवाल

पु॥ श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सो.

विनंती. राजश्री गोविद बलाल अंतरवेदीहून सरदाराकडे यावे याजकरिता सिकंदऱ्यासमीप येऊन पावले. तेथे नजिबखानाचा अमल होता त्यास उठऊन देऊन त्या प्रांती अमल करून तेथील बंदोबस्त केला. हे वर्तमान ऐकून नजिबखानाने मिरापुराहून कूच करून, गुलावटी म्हणोन हापडेजवळ जागा आहे तेथे येऊन पावला. रा गोविंदपंतहि हापडेजवळ पावले. उभैतामध्यें पांच साहा कोसाचा अंतराय राहिला. राजश्री अंताजीपंतानी सरदारासी बहूत बाजिदी केली की, या माहालावरी श्रीमंताचे ऐवजाचा तनखा आहे तेथे गोविदपंतानी हंगामा केलिया नजिबखां पैका कैसा देईल? त्यास साफ मनाईची चिठी पाठऊन देणे की नजिबखानाच्या परगण्यांत खलखल न करीत, त्यासी रस राखून, फितूर न करिता तुम्हाकडे येत. त्यास अंताजीएंताची भीड जरूर जाणून गोविंदपंतास वरचेवरी पत्रे पाठविली. त्याकरितां नजिबखानासी सलूख केला. त्याजकडून सुजानराऊ म्हणोन ग्रहस्त व मेघराज वकील पंतमजकुराजवळ आले. काही दाणाघासास देऊ करून उभैतासी सख्यत्व करून दिधले. वजिरानी गोविंदपंतास आणावयासी आम्हाकडील कारकून बालाजीपंत म्हणोन ग्रहस्त होता त्यास पाठविले. त्यानी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाऊन गोविंदपंतास नीट दिलीस आणिले. छ २२ शाबानी राजघाटावरी आले. छ २३ रोज रविवारी जलालुदीखां व दलेलसिंग व मेहदीकुलीखां पार जाऊन त्यास घेऊन आले. नवाब वजिराची भेट घेतली. येक घटिका खासा नवाब सिवगोविंदपंतासी खिलबत जाली. पंतमजकुरास सा पार्‍[1]च्याचा खिलत व जवाहीर दोन रकमा व येक घोडा व तिघा पुत्रास खिलत जवाहीर व खिलत समागमचे लोकास दिधले. गरमनोसी करून डेर्‍यास गेले. मागती येक भेट अणखी होणार आहे. पुढे जे ठहरेल ते सौो विनंती लिहूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Govindpant's overtures to Najibkhan and Vazier Gajiuddin.*

No. 103] [*1759*

(पहिला बंद गहाळ)

ष्टीसहि याकूबआलीखानाने जाबसाल साफ दिल्हा की, शाहाने खिलत दिल्हा होता तो तुम्हास दिल्हा; आणिक बगरहुकूमसिवाये आमच्याने होत नाही. तुम्ही आपल्या जोराने जैसे कलेल तैसे करणे. आजपावतो सर्व मथुरेस आहेत. मरजी अवघ्याची आहे की नजीबखानास मधून दरमीयान उठऊन बदस्तूर[2] साबीक गाजुदीखास करावे. आवघा येख्तीयार सलतनतचा ठाकूर सुरजमल याचा होये यैसी मर्जी सर्वाची व ठाकराची आहे. बाकी मजकूर आहे की आयुधेकराकडून व पटिणाकडून व रोहिल्याकडून प्रांत सरकारचा सोडऊन ठाकरानी पडद्यांत आपण घ्यावे हे मरजी ठाकराची आहे. यास्तव आयुध्येकराचे व रोहिल्याचे वकिलानी साफ जाब दिल्हा की जाठाचे ताळूक करून आम्हाकडून सोडवायाचे कराल तर सोडणार नाही. याप्राा त्यानी उतर दिल्हे व खातरदास्त ठाकराचे आपले खाविंदास लिहितो म्हणौन सांगितले व बोलतात. वजिराने व ठाकराने आपले रफीक[3] करावयासी हाफीजरहमत व दुंदेखा व सादुलाखां यासी लि॥ आहे. टेकचंद वकील हाफीजाचा आला होता. त्यास आपले रफीक करावयासी हाफिजापासी पाा आहे. परंतु हाफीज वगैरे गोष्ट खुलून करणार नाहीतसे दिसते. व नजीबखां सोनपतावर आहे. जाठ वजिराचे मानस पातशाह दुसरा करावा. यास्तव आलीगौहरचे मायेने रोहिल्यास लाऊन घेतले आहे. यास्तव दिसता प्रकार यैसा दिसतो की. फिरून खलसा[4]ची जड कायेम होते. शाहवलीखां खुद सर्वा गोष्टीचा येख्तीयार स्वामीच्या करून गेला आहे. याकूबआलीखां स्वामीपासी पोहचलियावर बाद सलुकाचे वजे स्वामी करतील

---

१ पार्चा—वस्त्र, पोशाख. सा पार्चाचा खिलत—सहा वस्त्रांचा पोशाख.

२ बदस्तूर साबीक=पूर्वील वहिवाटीप्रमाणें. ३ स्नेही. ४ तंट्याचें बीज.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ते प्रमाण आहे. स्वामीचे सो श्रुत व्हावे यास्तव मजकूर सो विनंती केली आहे. आतां बोलावणे याकूबआलीखानाचे, येख्तीयार स्वामीचा आहे. जर बोलावणे सलाह आसेल तर कृपापत्रे सन्माने तसलीची[1] याकूबआलीखानाचे नावाची पाठवावी व समाधान मित्रत्वाची पत्रे गाजुदीखानास व ठाकरास व राजे नागरमल व दरेलसिग व जलादुददौले व नवाब मजदुददौले आवदूल हयादखानास इनायेत[2] होत. याकुबआलीखानास हजूर बोलाऊन सर्वा गोष्टीचा सफा करून शाहासी येकोपा पका करून मग तेथून बसून हिदुस्थानचा बदोबस्त जैसा करणे तैसा करणार स्वामी समर्थ आहेत. बंगालियाचा सुबेदाराची खबर आली की बंगालेवाल्याने व फिरंलियाने आलीगौहरास किले पटणियात ठेविले आहे. हे खबर कितीक दिवस येतच आहे. या दिवसात नाजमसी व आलिगौहरासी सलूक जाला. आहे आणि आलीगौहरानें कूचहि हिदुस्थानाकडे केले. फिरंगी सांगाते आहेत. इकडे येतो यास्तव पूर्वी विनंती लिहिली आहे. त्याप्राा आर्जदास्त जरूर पाठविणार स्वामी समर्थ आहेत. हाली लाहोराहून शाहाचे चपल दोघे याकूब-आलीखानास तालीकं[3] कच्या घेऊन आले की तुम्ही लौकर श्रीमंत स्वामीपासी जाऊन सर्वा गोष्टीचा सलूक करून येणे. त्यास नवाब याकूबआलीखानास घेऊन आम्ही सो दर्शनलाभ घेयासी येतो. मागाहून वृत होईल ते सो विनंती लिहू. कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*This is an important document of which the first sheet is not forthcoming. It seems to be addressed to the Peshwa at a critical juncture in the situation at Delhi when Shahajada Ali Gouhar had taken flight to Patna and put himself under the protection of the British. The distracted condition of Delhi as much distressed Ahmedshah Abdali as the Peshwa who had taken upon himself the responsibility of protecting the North. Abdali was evidently anxious to come to an understanding with them and thus end the confusion. For this he sent his ambassador Yakub Ali Khan to negotiate terms. The writer asks the Peshwa his permission to visit him with the Abdali's agent.*

No. 104] [*6-8-1759*

श्री.

छ १२ जिलकाद सनसितैन.

सेवेसी विज्ञप्ति. आज्ञापत्र छ २४ रजबचे पाठविलें ते छ २९ साबानी पावलें. तेथें आज्ञा, वजिराचा महद अन्याये जाला; तरी त्याचे पारपत्य करावें. क्षुल्लक गोष्टीसाठी चितावर न घेणें. नजीबखानानी श्रीमंत राजश्री दादासाहेबासी

---

१ खातरजमेचीं. २ पाठवून देणें. ३ कच्चे मसुदे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिलीस असता त्यानी येथास्थित वर्तणुक केली नाहीं. त्याचे पारपत्य करावें आण पुर्वेस जावयाचा विचार करून बंगाल्यास जाऊन मातबर पैका मेलऊन कर्ज वारावयाची तजवीज करणें, वजीरास समागमे घेऊन बंगाल्याचे काम करून घेणे. त्याच्या जाण्याचे प्रकार फार आहेत व पेच फार आहेत म्हणोन त्याचे येणे न जाहले तरी सुज्यातदौल्यासच हाती धरून पूर्वेची कामें करून घेणे म्हणोन आज्ञा.

आज्ञापत्र पावतांच शतद्रु नदीहून कूच केले. पूर्वेस जावयाचा मनसबा केला असें दिलीस गेल्यावर वजिरास समागमे आलातरी घेऊन जात आहों. त्यांनी आमचे मुद्दे मान्य केले तरी बराबर नेऊ.

१. प्रयागचा किला द्यावा.
१. श्रीची सनद द्यावी.
१. पटण सरकारांत द्यावें.
१. द्रव्य मिळेल ते दररुपयास.

।= साहाआणे वजिरानी घ्यावें दाहाआणे आम्ही घ्यावें

यैन वाटा चौथाई वा
॥ ८=

येणेप्रमाणे आमचे मुद्दे त्यानी कबूल करून सनदापत्रा करून दिल्या तर त्यास घेऊन जात आहो. समागमे न ये दिलीस राहून स्वामीच्या कार्यास कांही कुविद्या करू लागला तर पूर्वेस गेल्यावर सुज्यातदोल्यासच हाती धरून पूर्वेकडील काम जैस दृष्टीस पडल तैसाच मनसबा करून स्वामी कार्य केले जाईल. छावणी पूर्वेस करावयाचा विचार केला असे. प्रजन्य काळीच बंगाल्याचे काम केले जाईल. स्वामीचे पुण्यप्रतापे करून सर्व उत्तम होऊन येईल.

नजीबखान याचा वकील येथे येऊन करार करून गेला आहे कीं फौज सुधां बराबर पूर्वेस यावें याप्रमाणे करार केला आहे. फौज सुधां समागमे येऊन येथास्थित वर्तणूक करू लागला. गेला तर उतम जाले. बराबर न ये तरी त्याचे पारपत्य केले जाईल. येमुना उतरते समयी येऊन केल्या कराराप्रमाणे फौजसुधा आला तर उतम जाले. न ये तरी आज्ञेप्रमाणे त्याचे पारपत्य करून तेथील बंदोबस्त करून पूर्वेस जाऊं. याचे कामास गुंतावे तरी दिवसगत लागेल. थोरल्या कामास अंतर पडल. गंगापार जावयास अवकाश थोडका यास्तव त्याची समजावीस काढून बराबर न्यावयाची तजवीज काढली असे १

अंतरवेदीतून जातां मुलकाची रखवाली करून गंगेस पूल बांधोन सुज्यात-दौल्याच्या मुलकांत जातो. तेथील जमीदार व भूमे हाती घेऊन जैसे दृष्टीस पडेल तैसा बदोबस्त केला जाईल.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सुज्यातदोला यांनी शहाजाद्यास दोन लाख रुपये देऊन बराबर आपली फौज देऊन मिरजाकोचलास (?) देखील दिल्हे असेत. पटण्यास गेले. पटणवाल्याची याची कटकट जाली. शहाजाद्याचे ठिकाण लागले नाहीं. दुसर मागल करारपेकीं त्याजकडे बाकी येणे आहे. कासीची सनद जाली असतां अमल दिल्हा नाहीं. ऐसे निमित्य त्याजकडे आहे. हरएक निमित्य त्याजवर येऊन स्वामीकार्य करून घेतले जाईल.

कर्ज वारावयाची चिंता असो द्यावी म्हणून आज्ञा केली तरी कर्जाची चिंता आम्हास आहे. पूर्वेस गेल्यावर * * मनसब्यामध्ये द्रव्यविशेस मिलल, अण कर्जवारे तेच केले जाईल. स्वामीस कर्ज जाले आहे त्याची काळजी रात्रंदिवस लागली असे. कायाकस्टे करून मिलल ते सेवेसी पाठऊन देऊ.

० लग.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*An important letter of Dattaji Scindia to the Peshwa describing how faithfully he was acting up to the instructions he had received from the latter.*

No. 105] [*1759*

श्री.

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक विठल सिवदेव कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तााा छ १७ माहे जिल्हेज मु॥ इंद्रप्रस्थ येथे स्वामीचे कृपावलोकने करून वृत येथास्थित असे विशेष. राणोजी देवकर यानी लबाडी करून पागा दरोबस्त टाकून घोडी रानात सोडून राजश्री अंताजीपुत्राच्या समागमे देशास आले आहेत. बोलीचालीचे अनुसंधान त्याजकडे लाविले आहे. याखेरीज सिलेदार व बारगीर फिताऊन नेलेच आहेत. त्याच्या थोरपणाची रीत सेवेसी ल्याहावी येसे नाहीं. राजश्री अंताजीपंताचा व आमचा करार कीं त्याजकडील सिलेदार व बारगीर आम्ही ठेऊ नयेत. व आम्हाकडील त्यानी ठेऊ नयेत येसे असतां ते अपल्या कर्तुत्वास चुकत नाहीत. बरे थोरच अहेत. येसियासी राणोजी देवकराची माणसे पुरी आहेत. तेथे स्वामीनी हुजरे पाठऊन त्याची मुलें माणसें कैद करून

---

१ हा मिर्झाकोचला कोण?

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विंचुरास पाठवावयाची आज्ञा करावी. तेसे अलीमहात व नुरखान हे आम्हापासी बहुत दिवस होते. ते चाकरी टाकून राजश्री अंताजीपंताच्या पुत्रासमागमे देशास आले आहेत. त्यांजकडे दोन हजार रुपयेपर्यंत फाजील आहे. त्याचे घर मौजे राशा[१]मधे आहे. तेथे स्वामीनी चौकी बसऊन त्याची मुले माणसे विंचुरास पाठवावी. स्वामीनी याप्रा शिक्षा केलिया धास्त बेसोन दुसरा कोणी बदफैल करणार नाही. * महातानी दरोबस्त कारखाना टाकून अताजीपंती फिताऊन नेले. कारखाना सरकारचा. माहातानी बदमामली करावी येसे नाही. त्यांस शासन जाल्याखेरीज सरदारात कैद राहात नाही. तूर्त त्यास अताजीपंताचे पुत्र लपऊन ठेवितील. त्याची रांडापोर राशात आहेत. ते कैद करावयाची आज्ञा करावी. राणोजी देवकर लबाड. पागा राणात सोडून बेकैदी करून गेला. त्याचे घरी चौकी बसऊन त्याचे पारपत्य करणार स्वामी समर्थ आहेत. देसच्या माहालचा येवज कर्जास तरी नेमून देवणार स्वामि समर्थ असेत. चांदवडच्या किरकोल खेडीयाचा येवज दरोबस्तचा ठेवीदेखील आद्यात ल्याहावा, येसे यादीवार करार आहे. त्याप्रों तेथील येवज चाकरी सुधा पंधरा हजार होईल. त्यात टांक [सा] लीस दोन हजार तोटा आहे. आद्यात च्यार हजार तनख्या प्रों धरले. आकार दोन हजार केला आहे. ये गोष्टीची चौकसी पाहून तोटा मजरा देऊन बाकीचा येवज आघात धरवावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo complains against Antaji Mankeshwar to Bhausaheb. He was later severely punished at the end of 1759.*

No. 106] *[11-11-1759*

श्री.

छ २९ रबिलाकर

पु॥ श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी.

विज्ञाप्ति ऐसीजे. अब्दालीचे चपेर[२] काबुलेहून छ २० रोवली दिलीस पोहचले. तालीकचे व रकम याकुब अलीखानास व नजीबखानास व राजे माधोसिंग व राजे बिजेसिंग वगैरी यास आले आहेत की आम्ही फौज जमा करून हिंदुस्थानास यावयाची तयारी केली. येऊन पोहचतो. तुम्ही साफ लिहिणे कीं पातशहाची

---

१ रासें—जि. नगर. २ चपराशी, दूत. * अक्षर भिन्न.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अतायेतमध्ये रोहिल्यांत व राज्यात कोण कोण आहे? श्रीमंताच्या घराची काय हकीकत अहे? शाहअलम व शुज्यातदौले कोणे फिकिरींत आहेत? वजीर व सुरजमल काय करितात? ठाकूर सुरजमल व नजीबखानाचे काये जाले. मुफसल लिहिणे. ज्याहनरुवा सरदार पुढें रुखसत केला आहे, तो सत्वरच येऊन लाहोर दाखल होईल. याप्रो तौलिकच्या याकूब अलीखानास अला आहे. व नजीबखानास लिहिले आहे कीं हिंदुस्थानचे सलतनतचा नजराणा वाजबी आहे, तो सालबसाल पोहचावणे येविशयीं उजूर करील त्यासी समजून घेऊ. या प्रो सर्वांस लिहिलें आहे. श्रृत होये कृपा केली पाहिजे. हे विज्ञप्ति.

¶*Abdali's messengers came to Delhi with dispatches for Najibkhan, Madhosingh and others.*

No. 107] [*10-12-1759*

श्रीकृष्णोजयेती.

पौ छ १६ माहे जमादिलावल
सन सितैन पौश मास
मुकाम नगर

श्रीमत माहाराज राजश्री पंडित प्रधान
बालाजीराव नाना स्वामीचे सेवेसी.

पो राजा केशवराव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ राालाखर झासीत जाणून स्वकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. दिलींत वजिराने आलमगीर पातशाहास छ ८ रोज माहे राालाखरी मारून दुसरा पातशाह कामबक्षाचा नातू किकियात कैदेत होता त्यास काढोन तख्ती बसविले. आपण दिलीहून कुशलरूप कूच करून सिंदीयाचे लस्करात गेलो. मागे हे काम करविले. हे करावयास मूल, अबदाली लाहोराकरून दिलीकडे येणार व फौजा त्याच्या सिरहिंद पावेतो आल्या, हे जाणून, पातशाहाचे त्याचे सूत्र येक जाणून, वजिराने हे काम केले. व खानखाना वजिराचा सखा मामा पूर्वी वजीर होता त्यास वजिराने कैद करून घरदार लुटले होते त्यासहि जिवे मारून टाकिले. मूल आलमगीर पातशाह जो दिलीत होता त्याचे जागा दुसरा पातशाह जाला. व अल-मागिराचे कबिलियांत लोक पाठऊन त्या सर्वास लुटले व बाहीर काढले. आतां अबदाली दिलीस अगर रोहिल्याचे कुमकेस जातो हे पाहावे. रोहिले व शुजा-उदौला येक होऊन सिंदीयाचे मुकाबिलीयावरी आहेत. अबदालीहि त्यात

---

१ तालिकचा—आज्ञापत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मिलाला तरी तिघे येक होतील. त्या तिघासी सिंदे मुकाविला घेतील. इतकियांत राजश्री मल्हारराव होल[कर] सुबेदार प्रस्तुत माधवसिगासी त्यासी प्रसंग आहे. जुंजहि मोठे जाले. इकडील काम उरकोन सिद्याकडे जाऊन कुमकेस पावायास तफावत फार आहे. माहाराजाचा प्रताप सर्वास सहाय आहे. विशेष काये लिहावे. माहाराजास वर्तमान चहूकडून पावतच आहे. आम्हीहि वरचावरी विनंती पत्रें आज्ञेप्रमाणे पाठवीतच आहो. विदित होये व आज्ञेप्रमाणे सिंदे सरदारासहि वरचे वरी लिहावयाचे लिहितों. विदित होये हे विनंति.

¶*Raja Keshav Rao writes to the Peshwa the arrival of Abdali's forces against Dattaji and Jankoji Scindias.*

No. 107a] [*30-4-1757*

श्री.

नकल

राजश्रिथाविराजित राजमान्य राजश्री केशवरावस्वामी गोसावी यासी.

पो बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. अबदालीचा मजकूर व कर्तव्यमनसुबा याचा अर्थ विस्तारे लिहीला तो कलला. येशास चिरंजीव रा. दादा व रा मल्हारजी होलकर त्या प्रांते आहेत. उचित मनसबा त्यासही लिहीत जाणे आणि आम्हास तिकडील वर्तमान वरच्यावर लिहीत जाणे छ ११ साबान बहुत काये लिहीणे हे विनती.

No. 108] [*16-12-1759?*

श्री

छ २९ राखर

पु।। श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञाप्ति यैसीजे. ठाकूर सुरजमल व नजीबखान यांच्या भेटी जाल्यावर हे उभयेता व राजे नागरमल अवघी मंडळी पा * * * हजवळ जाणार. नवाब याकुब आलीखा(न) [पुढील येक ओळ फाटली आहे] यावयाचे महकूब केले. परतु ताकीद शाहाची व शाहावलीखानाची हमेश येत आहे. परंतु स्वामीचे आज्ञापत्र आल्यावाचून तिकडे येणार नाहीत. खलिता याकूब आलीखानाचा पत्राचे उत्तर पाठविले आहे. त्यावरून श्रुत होईल कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Negotiations continued between Abdali and the Marathas through Yakub-khan, his agent.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 109] [*21-12-1759*

श्री.

छ ४ जमादिलाखर
माघ सीतैन

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विज्ञापना येसिजे. राजश्री जनकोजी शिंदे व राा दताजी सिंदे नवाब वजिरुल्ममालिक बाहादुर यांसहित शुकुरतालाहून निघाले. ते दरकूच * छ २७ रविलाखरी कुंजपुऱ्या-पासी यमुना उतरलें. तेथें बातमी ठीक आली कीं तैमुरशाह अबदाली जाहान-खानासहित व शाहवलीखान व समंदखां वगैरे सर्व सरदारासहित चालसापंन्नासा हजारा फौजेनसी मौजे कलडु व बनोरा व छत येथें येऊन छ २४ माहे मजकुरी शनिवारी दाखल जाला. अंबाल्यापर्यंत हरोलाची फौज उतरली आहे. अंबाला सिरहिंदीहून अलाकडे वीस कोस व कुंजपुऱ्याहून चालीस कोस आहे. डावे उजवे बाजूने व अगाडीकडे फौज ताराज करीतात व दाहादाहा वीस वीस कोस राण सोडवीत जातात. यैसी ठीक बातमी अल्यावर राजश्री दताजी सिंदे यानी दोन फौजा केल्या. येक फौज तो भेल[1] घोडियें नामी नामी सरदार व कामाची माणसे भरोशाचे लोक जेरारी[2], पाल पडतल तंबू कनात बराबर नसे येसे निवडून पंचवीस तीस हजार आपल्या बा॥ घेतली व राा जनकोजी सिंदे याजला बाकीची फौज व तोपखाना घेऊन व नवाब वजीरुल्ममालिक यांस त्यांचे फौज व तोफखान्यासहित आपल्यापासून बारा पंध्रा कोसाचे अंतरें मागे पुस्तगर्मीवर ठिवले. व याजमागें आपली व नवाबाची बहीर ठीवली कीं बहीरेचेहि संरक्षण होय व काम पडल्यावर आपलेहि कुमकेस पोहचते. कदाचित अबदाली कावा करून डावे उजवे येखादी फौज घाबरे करायासाठी बहीरेवर पाठवितील तर हे उभयेता पारपत्य करीत. येसी तजवीज व नेमणुक करून छ ३० राखरी शुकुरवारी आपण जरारी फौजेनसीं अबदालीच्या मुकाबल्यावर गेले व राा जनकोजी सिंदे व नवाब वजीर बहीरसहित कूच करून करनालेकडे आले. अबदालीचे अगाडीचे लोकासी व रो दताजी सिंदे यांच्या आगाडीचे लोकासी नजरनजर चोटफेटी[3]हि जाली. जुजास प्रारंभ जाला. उद्या परवा खासा दताजी पाटील ह्यांच्या मुकाबल्यावर जाऊन त्याचा घावदाव व जुंजाची तर्तूद पाहून बळाबळ तोलून जुंजात जलदी करीतात किंवा धीमेपणे जुंजतात या सर्व गोष्टी व

---

* १८-१२-१७५९.

१ शिलेदारांचीं घोडी.

२ सडे.

३ हातघाई झीटपीट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तऱ्हे व त्यांची इंगितें पाहून तदनुरुप आपुणही जुंजाची तर्तुद करणार. मागाहून जसजसे वर्तमान होईल तसतसें विनंती करीत जाऊं. बहुत काय लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶News-letter giving Dattaji Scindia's preparations to meet the onslaught of Abdali's forces, showing that Dattaji did not enter rashly into the conflict.

No. 110] *[27-12-1759*

श्री.

पौ छ ६ जमादिलावल साईंकाल

+ सेवेसी विज्ञाप्ति. येथील कुशल ताा छ ६ जमादिलावल मुाा भांडेर दोन प्रहर दिवस येथास्थित आसे विशेष. फौजेचा मोहरा येथून जुडला आहे. आपल्या सामानाहून त्याचे सामान भारी आहे. दुसरे काली गुजरहि जाऊन सामील आले आहेत. त्याची आमची लडाई जुडली आहे. दुसरें शाहरास बहीरकोंटा नाहीं. गाव आफाट. यैशास मोर्चेबंदी केली पाहिजे. यास्तव बेलदार शंभर पाठविले पाहिजेत. सदरहु संभर बेलदार जरूर पाठविणें. जाटाकडील फौजेचे कुच होऊन मौजे बारेच येथें मुकाम होणार आहे. त्याचें आमचें कोसाचें अंतर. मोहरा जुडला आहे. यैसियासी बुधसिंग व हरीसिंग आले असतील. त्याची बिदा पत्र पोचतां करावी. लढाईचा वखत आहे. त्यास दारुगोली आधी पाठविली पाहिजे. दारुगोळीस ढील न होय. दारुगोली सत्वर पाठवावी. बहूत काय लिहिणे हे विनंती.

राजश्री आपास्वामीस व समस्तमंडलीस साां नमस्कार लिाा परिसोन लोभ कीजे हे विनंती.

¶May this letter refer to Jeta Gujar mentioned in Bhausaheb's bakhar? If so, some more light is necessary.

No. 111] *[28-12-1759*

श्री.

छ २२ जमादिलाखर सुाा सीतैन

श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक दताजी सिंदे कृतानेक दंडवत विज्ञापना. सेवकाचे वर्तमान ताा छ ७ जोवल मो कुजपुरा परयेत स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असें विशेष. • सरकारची आज्ञापत्रे छ + सफरची पाठविली ती छ ९ रोखरी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सादर जाली. तेथें आज्ञा कितेक मनसब्याचा अर्थ वजिराचे स्नेहाचे वर्तमान व सुज्याउदौला याजपासून माहाक्षेत्रे घ्यावयाचा अर्थ व रोहिले यांचा मजकूर व पुर्वेकडे जावयाचा मनसवा वगैरे कितेक तपसिले आज्ञापिले ते कलले. ऐसियास येतद्विशईचा अर्थ अलाहिदा पुरवणीपत्री तपसीलवार सेवेसी विनंती लिहिली असें त्यावरून विदीत होईल. सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति[1].

¶Dattaji's letter to the Peshwa showing how anxious he was to carry out the Peshwa's instructions to march into Bengal with Suja-ud-daula and take charge of the holy places of the Hindus.

No. 112] [*3-1-1760*

श्री.

पौ छ १३ जमादिलाकर

शेवेसी विज्ञापना आज छ १३ जमादिलावली दिलीहून बातमीची पत्रे आली की राजश्री दताजी सिंदे कुजपुरियाहून सडे होऊन पुढे गिलज्याचे तोडावर गेले. राजश्री जनकोजी सिंदे व राजश्री गोविंदपंत व वजीर येसे बुणगियांत तेथेच राहिलेहेत. दताजी सिंदे यांसी व गिलज्याची फौजसी घाट पडली. च्यार साह घटका परस्परे युद्ध प्रसंग जाले. उपरांतिक उभयेता आपलाले ठिकाणी कायेम राहून मुकाम केले. तो तेच दिवसी गिलज्या रात्री कूच करून बुढियापासी येमुना उतरोन आंतरवेदीत गेले. पुढे नजीबखान हे येकत्र होणार. शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

No. 113] [*1-1-1760*

(वरील भाग गहाळ)

फौज वीस हजार ज्याहनखान व संमदखान वगैरे सरदार शतद्रु नदी उतरोन आलीकडे आली. याजकरितां आम्ही नजीबखानाचा शह सोडोन कुजपुरियापासी येमुना उतरोन वर आलो, तर आपणहि तिकडील कामे टाकून इकडे सत्वर यावे म्हणून लिहिले. त्यावरून आम्ही उचित मनसबा जाणून तोफखाना माघारा लाविला. इकडील कामे मागे पुढे करावयासी कार्यास येतील. मागे दुसाल

---

१ ह्याच मजकुराचें जनकोजीचेंहि पेशव्यास एक पत्र आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नुकसानी जाली. पुढे येकसाल होईल ते पुरवली; व स्वामीचीहि आज्ञा की तिकडील इकडील विचार पाहून मनसबा कर्तव्य तो करावा. म्हणून. त्यास काल छ ११ जमादिलावली कूच केले. आथःपर या प्रांती कोठे येकक्षण न गुंतता मोठाल्या मजली करून गिलज्याचे पारपल्यासी जात आसो. होईल वर्तमान ते वरचेवर विनंतीपत्रे सेवेसी लिहीली जातील. तिकडील वृत्त सर्वदा लेखन करावयांसी आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar to Dattaji Scindia, proposing to proceed immediately to meet the latter.*

No. 114] [*15-1-1760*

श्रीवरद.

राजश्रियाविराजित राजमान्य राा महिपतराऊ दाजी स्वामी गोा. स्नेाा पुरुषोतम माहादेव कृतानेक असीर्वाद विनती उपर. येथील क्षेम ताा २९ जमादिलावल मुाा कोटपुतली लस्कर राा जनकोजी सिंदे व राा मल्हारजी होलकर जाणून स्वक्षेम लिहणे विशेष. इकडील सविस्तर व्रत श्रीमंत स्वामीचे सोा लिाा आहे त्यावरून विदित होईल. तात्पर्यार्थ हाच की दिलीजवल अवदाली व रोहिल्यासी जुंज झाले. राा दताजी सिंदे ठार पडले. जनकोजी सिंदे यासि दंड फोडून गोली गेली. तेथे आम्हास मांडीवर गोली जेजालेची लागली. वरकड तेथे दाहाबारा बारगीर पडले. गवताचे दाटीमुले यमुनेचे काठी निकड जाली. फौजेचे तोड न लागले. तसेच सतर कोस चालले आलो. त्यानीं वीस कोस पाठलाग केला. प्रथम सरदारासी गाठ पडल्यामुळे फौजेस तेज न राहिले. अतांच बाधवाई खबर आली की राा दताजी सिंदे जिवंत जखमेत चूर आहेत. ते मागून येतात म्हणोन लुटलेली माणसे येत्यांत ते सागल्यात. शुभवार्ता जाणून लिाा असें. ये समई आमचे समागमे पाचसात हजार माणूस असते तर श्रीकृपेनें श्रीमंत स्वामीचे सेवेंत चाकरीचा मुजरा दिसोन येता; व येईल तो श्रीकृपेने सुदीन करणे अर्ज करणे हे व्रत श्रीमंत स्वामीचे सेवेसी विनंती लिाा नाहीं यास्तव अर्ज करणे. कृपा करणार धणी समर्थ आहेत. भेट होये तो सुदिन. तिलशर्करायुक्त पाठविले आहेत. भक्षून उतर पा॥वे व पावते करणे. हरप्रकारे खाविंद कृपासागरता करीत ते करणे. जिणे थोडके व सेवाधर्मी तत्पर. श्रीमंत कृपा करोत हे विनंती.

¶*Hingne to Mahipatrao Chitnis. Writes details of Dattaji Scindia's fight and death at the battle of Delhi.*

१-१-१७६०

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 114a] [*23-1-1760*

श्री.

छ ४ जमादिलाखर माघ सीतैन.

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी विज्ञापना ऐसीजे. पश्चमे कडुन आबदालीची दाटी जाली. याकरीतां राजश्री दत्ताजी सिंदे व जनकोजी सिंदे सुकुरतालाहून कांहीहि दार मदार न करतां वाहियात्कारे सी सुजाउदौला व पारच्या रोहील्यासी व नजीबखानासी स्नेहसंदर्भ न करतां उठुन आबदालीवर आले. याजकरतां रोहिले व सुजाउदौला केवल इकडल्या (स)लुकांसी ना उमेद जाले व चितांत पूर्ण जाणलें कीं हे आबदालीची फते केल्यावर आम्हांस व आमच्या मुलकास सहसा सोडीत नाहींत. आबदाली तों आपलाच बोलाविला आला आहे. अतःपर त्याचीच पुर्ती रफाकैत[1] करावी व [स र्व मि] ळून यांच्या पराभव ऐ * * * * * * हिंदूस्थानातून यांचा पाय नीघे. बलकी[2] येथे * * हि विचार घाटीतात कीं याचा पराभव * * * यावर तैमूर-शाहास दिलींत आणुन पातशाह करावे, सूजाउदौलाने वजीर व्हावे, नजीबखानाने मीरबक्षी व्हावे, व दिली हिंदूस्थान कायेम करावें. कां कीं तैमूरच्या औलादी[3]त कोण्ही पातशाहत राखीसा नाहीं व आपल्या हातींहि नाहीं. वजीर तर केवल मऱ्हाट्यांचाच. मऱ्हाटे व वजीर यांचा बोलबाला जालियाने आम्हास जागा नाहीं, याकरतां सर्वात्मना आबदालीसच बलवावे येथ पर्यंतहि मनसबे घाटले. सुजाउदौलानी व पारच्या रोहील्यानीहि मनसबा बरा आहे म्हणुन मानिला. परंतु इतके परीछिन वादें नागवे उघडे होऊन आबदालीची रफिकत करावी व शामील व्हावे. यास राजी न (जाले. पार) चे रोहीले तर पारच्या कांठीच अहित. सुजाउदौला दोन तीन मजली पलीकडे जाउन * * * * हे जोंवर आबदालीची व मऱ्हाठ्याची गो [ला गोली] तवी होय तोवर तेथेंच राहतील * * * खाही छ २९ राखर पावेतो सुकुरतालातच आहे. परंतु त्याची वासना व उत्कृष्ट हेत आहे कीं मऱ्हाठ्या फौजा व वजीर यमुनापार गेल्यावर, आपण फौजे सुधा धावून, बुडियाचे घाटे येमुना उतरून, अबदालीस शामील व्हावे, ऐसा त्याचा बेत फार आहे. बलकी येथवरहि त्याचा बेत कीं जर मी पावल्याअगोदर मऱ्हाटे अबदालीवर शेर जाले व आबदाली बुडियाच्या घाटे येमुना उतरून अंतरवेदीत आला तर निदान पारचे रोहिले व आपण शामील

---

१ मैत्री. २ बलकी=किंवा बहुना. ३ औलाद=कुल:

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होऊन जुजावें. जर पळून मागती अटकेकडे गेला तर अलीगोहर शाहजाद्यास पटण्याहून आणून पारवाले व सुजाउदोला व बंगालेवाला त्याचे रफीकें[1] होऊन फितूर उभा करावा. ऐसा नजीबखा बहुत वलगना व खटपट करू इछितों. पहावे ईश्वर इछा काय आहे. यद्यपि मनसवा तर भारीच पडला * * आहे. रजपुताकडे राजश्री मलारजी होळकर (गुतले) * * * चहुंकडून दुशमान फौजाही भारी व सारे अमित्र. परंतु स्वामीचा पुण्यप्रताप व थोर प्राक्तन सिकंदर तालि[2] व सिंदे मोठ्या हिमतीचे माणूस जवांमर्द शूर पराक्रमी. येवढे आवडंबर आले असतां किमपि भय अगर चिंता किंवा कसे होईल हा उद्योग ज्याच्या मुखश्रीवर दिसतच नाहीं. श्रीमंताच्या पुण्यप्रतापे मारूनच घेतो हेच तोंडावाटे अक्षरें निघतात. श्रीस्वामीची फते व बोलबालाच करील. श्रुत होय. बहुत काय लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*This appears to be Ramaji Anant Dabholkar's (?) letter to the Peshwa giving vivid details of the situation of the Scindia's forces when Abdali advanced against him.*

No. 115] [*25-1-1760*

श्रीमोरया.

× छ १३ जमादिलाखर.

सेवेसी विज्ञापना. इकडील वृत सर्वदा पत्री लिहिले आहे. पूर्वी लाकोडेस रांगड्याची फौज च्यार हजार व पायेदळ जमा होऊन त्यास मारून लुटून पस्त केले. जोतेसिंग नाथावत व राजावत व सेकावत व चव्हाण वगैरे वीस सरदार मारले गेले. त्या दिवसापासून रांगडा कोणी जमाव करून बाहर निघेनासें जाले. जागा जागा थांगा धरोन राहिले. पूर्वी राजश्री जनकोजी सिंदे याजकडील पत्रे आली होती. त्यावरून आम्ही तोफखाना माघारा लाऊन सडे होऊन दरमजल त्या प्रांतास जात होतो. तेणेंकडोन रांगडे बहुतच वारा प्याले. 'आम्ही व पुढील फौजा जे दिवसी एकत्र जालो तेच दिवसीं राजश्री जनकोजी सिंदे याजकडोन पत्रे आली. त्यात गिलज्याकडील बहुतसी गर्मीचा मजकूर नवता, आणि इकडील रागडीयांनी जमाव करून * * * *

(पुढील मजकूर फाटला आहे).

¶*This mutilated letter seems to be from Malharrao Holkar to the Peshwa.*

---

१ रफीक=दोस्त स्नेही. २ ताले सिकंदर=उच्चग्रह.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 116] *[1-2-1760*

श्रीमोरया.

पो. छ १३ जमादिलाखर.

श्रीमंत स्वामीचे शेवेसी.

कृतानेक सां. नमस्कार विज्ञापना. स्वामी हस्ताक्षर आज्ञापत्र पाठविले ते पाउन आमृंतोल्हास जाला. ताा पुंस वद्य १ मुा. झीलाये सेवकाचे वर्तमान येथास्थीत असे विज्ञप्ति. माधोसिंगाने बहूत कृतघ्नता केली. थोडसें पारपत्य जाहालें. पुर्ते पारपत्य करावें तों राजश्री जनकोजी सिंदे व राजश्री दताजी बावा पाटील यांचे पत्रें आली. आबदालीची दाटी फार जाहाली आणि नजीबखानाची गांव लढाई केली. आणि साबाजी सिंदा आवई ऐकुन पळाला तो तहद लस्कारास अंतरवेदीतच आला. ठाणें सरहंद वगैरे होती तेथे दम न धरिला. तेणेकरून आबदाली सेर जाहला. नजीबखान आबदाली येक होणार, चौकडुन माधोसिंग व मुसलमान यांचे कान आबदालीकडे. यैसे बहूत जड दिसतें. परंतु राजश्री सुबेदार येकनिष्ट खावंदाच्या (पा) यासी तेणें करून कांहीं चिंता नाहीं आ (पले) प्रतापेंकरून पराभवाते शत्रु पावे. (फी) कीर नाहीं. राजश्री सुबेदार यांची (दुरं) देशी बहूत. यांच्या तजवीजने वर्तणुक केलिया मनसबा धको पावत नाही. शरमीने[1] हरयेक गोष्टीनें मागे बारीक दृष्टीने याचे मनोधारण राखणार स्वामी समर्थ आहेत. आवंदा फौज मातबर विशेष ठेविली. सर्व निर्वाह करणार स्वामीचे पुण्य आहे. मुजपरगाडदीयाने विस्वासघात केला होता. चांडाळास नतिजा देऊन मारून टाकिला. येणें करून बहूत संतोष जाहला. स्वामी पुण्येश्लोक आहेत. तेथे काये होणे आहे! परंतु ईभरामखान गाडदी निजामआलीकडील ठेविला आहे. त्याचाही विश्वास अतिनिकट धरीत न जावा. स्वामी तो सुज्ञ आहेत. राजश्री सुबेदार व राजश्री सिंदे येकत्र करितो. येकत्र जालियावर साहेबकाम उत्तम होईल. कर्जा बाा कार्तिक मासचा वाइदा बहूत प्रयेत्ने केला कीं स्वामीस सचोटी यावी. वरकड सदैव सेवकाचा सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gangoba Chandrachud addresses this letter to the Peshwa in his own hand and asks him to follow the advise of Holkar in the struggle against Abdali.*

---

१ होळकराची शरम किंवा मान ठेवून.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 117] *[3-2-1760*

श्रीमोरया.

छ १५ जमादिलाखर.

सितैन माघ.

सेवेसी विज्ञापना. साहेबी छ २५ रबिलाखरीची पत्रे आली ते छ १२ जमादिलावली पाऊन बहुत संतोष जाला. नगरचा किला घेतला. मोगलाकडीलहि किल्याच्या सनदा व जागिरीची यादी निवडून पाठविली. ते खरल खोचल (?) जागा आहे. हैदरखान गाडदी दूर करून मुजफरखानास त्याचे ठाई ठेवणार होतों. तो आपले कर्मानरुप फल पावला. सांप्रत हैदरखानास सरकारात ठेवितो. इकडील सरदारास दाबाव आस (?) * * * म्हणून स्वारी गंगातीर पावेतो आली. तुम्हाकडील वृत्त प्रस्तूत काये? गिलज्या आलियामुळे राजश्री जनकोजी सिंदे तिकडे गेले. त्याजला मनसबा, तुम्हास इकडे मनसबा, यैसे नसावें. उभयेता येक जागा होऊन भारीपणे जे काये करणे ते सेवटास न्यावे. सुज्यातदौला वजीर कोणे ठिकाणी? वजिराची बुध्धी सुधी नाहीं. उभयेतांसहि हाती राखून जाटास हातीं घेऊन भारी मनसबा करून सिध्धीस न्यावा. पठाणाचा मनसबां भारी तो आधी सेवटास नेऊन तिकडील बंदोबस्त करावा म्हणजे रजपूत सहजात सुरलीत होतील. माधवसिंगाने किला द्रेऊन सुरळीतपणे वर्तला तर पुढे तिकडीलच विचार मनास आणावा. पठाणाचे दहशतीनें दिलीतील वजीर आदिकरून सर्वांचे कबिले बाहेर गेले तर तुम्ही त्याचे कार्यासी जाऊन कार्यसिधी करावी आणि पैदरपै वर्तमान लिहित जाणे. त्याप्रो इकडील मनसब्यास नेट देऊन करूं म्हणून विस्तारें आज्ञा केली. यैसियास इकडील वृत्त पेशजी सविस्तरें लिहिले आहे. लाकोडेस रागड्याची फौज बुडविल्यापासोन कोण्ही बाहेर जमाव करून निघेनासे जाले. परंतु जागाजागा आसरियाने राहून लबाडीस चुकेनात. आम्हास राजश्री जनकोजी सिंदे याजकडील पत्रे निकडीची आली की आम्ही गिलज्याकडे जातो, तुम्ही जलद येणे. त्यावरून आम्ही कोटेजैपुर वगैरे सर्व मामलत मनसबा सोडून तिकडे दरमजल चाललो. थोर तोफखाना बाा होता, तो फिरोन रामपुरीयास लाऊन दिल्हा. हे वृत्त रागड्यात कलल्या. बहुतच श्लाघा आरंभल्या. आम्ही जैपूर टाकून पुढें गेलो म्हणजे सर्वानी एक होऊन धूम करावी. त्याचे पारपत्य जाले पाहिजे. त्यासी पुढील फौजा आम्ही सामील जालो तेच दिवसीं रा॥ जनकोजी सिंदे याची पत्र आली. त्यांत गिलज्याचे गर्मीचा मजकूर नवता आणि आलिकडे आलियाची आवईहि नाहीं. नजीबखानावरच मोरचेबंदी करून होते. तिकडील अवसर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाहून येथील रागड्यास जरब आठ पंधरा दिवस राहून द्यावी. यैसा विचार करून थोर तोफखाना आणून बलवाडा ठाणे भारी जोम राखीत होते त्याजला मोरचे लाऊन जेर केले. वित्र(क्र?)मादीत वगैरे राजावत व सेकावत सुलतानवत ठाण्यात होते ते बहुत बजीद होऊन कौल मागू लागले. त्यास आपल्या राज्याची रीत शरणास निग्रह न करावा यैसे जाणून त्यास जिवानसी काढून देऊन ठाणे आपले कायम केले. येणेकरून तमाम जागाजागाचे रजपूत भयाभीत जाले. उन्हेर सरदे सेवाड झिलाये आदीकरून सर्वाची राजकारणे येऊन मामलतीचा प्रकार बोलू लागले. त्याजकडे आमचा हाडोतीचा मुलूक आहे तो सोडून द्यावा. त्याची वतनाची जागा त्यास देऊन मामलत करावी. हे कार्य आठापंधरा दिवसांत करून पुढील मनसबा बातनी येईल त्याप्रो करावा यैसे होते. त्यास छ ७ जाावली (28-12-1759) फिरोन राजश्री जनकोजी सिंदे याजकडील पत्रे आली कीं आम्ही नजीबखानाकडील मनसबा सोडून गिलज्याकडे जातों. कुजपुरीयापासी येमुना उतरोन आलों. तुम्ही तिकडील सहश्र कार्य टाकून जलद यावें म्हणून बहुत निकडीने लिहिले. त्यास तिकडील कार्य आधी कर्तव्य. इकडील महालची वगैरे मागे दोन साले नुकसानी आली. त्याप्रमाणें तिसरें साल जाले ते पुरवले. सर्व अर्थ पाहून मनसबा करावा म्हणून स्वामीची आज्ञाहि आली. गिलज्याचे पारपत्य आधी करणे उचित जाणून छ १३ जाावली (3-1-1760) कूच करून मुकाम मजकुरास आलों. तोंफखाना जुन्याकडे माघारा लाविला. इकडील मनसबा सर्व सोडून थोरथोर मजली करून गिलज्याचे पारपत्यासी जात असो. सांप्रत बातमीची पत्रे आज आली कीं आबदालीखासा मागेच आहे. ज्याहानखान अबदुल समधखान मातबर फौजेनसी कुरुक्षेत्राआलीकडे आला. राजश्री दत्तबा सडे फौजेने पुढे गेले. राजश्री जनकोजी सिंदे व वजीर याजला बुनगेसहवर्तमान मागे ठेविले. गिलज्या ठाणेश्वरीहून आलीकडे आला. पहिले आपल्या त्याच्या हरोलीची[1] झटपट जाली. मागाहून दतबाहि जाऊन पावले. याचे त्याचे एक जूज उत्तम प्रकारे होऊन नजीक बुढिया मुकाम जाला. आपल्या फौजाहि मुकाम करून राहिल्या. रात्री गिलज्या घाट मजकूर येमुना उतरोन पार अंतरवेदीत गेला. आपली फौजहि मागाहून उतरोन जाणार यैसे वर्तमान आले. सुज्यातदौला आपले हदेवर आहे. नजीबखान वगैरे रोहिले श्रुत्रताला-वर आहेत. जाटाकडील रूपराम आपल्या फौजेत होता तो सांप्रत दिलीकडे नागरमला बाा आला. खासा आपल्या जागावर आहे. वरकड रजपूत आपलाले स्थली आहेत. आमच्या जाण्यामुळें माधवसिंग थंडेसे जाले. गिलज्याकडे

१ आघाडी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सूत्र लाविले आहे. त्याजला इकडे यावयासी मोठे अनुमोदन नजीबखान माधवसिंग उभयेतांचेच आहे. वरकड दुरोन आहेत. प्रस्तूत काले कोणाचेहि कपट राहणार नाहीं. ज्याचे जैसे चलण त्याप्रमाणे निदर्शनास येईल. तदनुसार फल पावतील. इकडील कर्तव्यार्थ मनसबा होणे स्वामीचे प्रतापे उत्तम होऊन येईल. देशी नगरचा किला वगैरे येकदोन ठाणी घेऊन जागिरीचा तह होत आहे. बहुत उत्तम आहे. पुढील विचारहि सर्व साहेबाचे मनोदयानरूप होऊन अमित्र पादाक्रांत होतील. वजीर सांप्रत राजश्री जनकोजी सिंदे याजपासी आहे. त्यास त्याचे पदानरूप चलण नाहीं आणि शाश्वत काडीमात्र नाहीं. श्वता सामर्थ्य कलतच आहे. परंतु बट्टेबाजीची वर्तनूक टाकीत नाहीं. भेट जाली म्हणजे अणुप्राय होऊन केले कर्म परिमार्जन करितो. अस्तु. आपल्या कर्तुत्वान-रूप फळ पावल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Malharrao Holkar's letter to the Peshwa in Gangadhar Yeshwant's handwriting from Rajputana. It gives very useful details which explain why he did not hurriedly proceed to the rescue of Dattaji when he was attacked by Abdali.

No. 118] *[5-3-1760*

श्रीकृष्णोजयेती.

श्रीमंत महाराज राजश्री पंडीत प्रधान बालाजीराव नाना स्वामीचे शेवेशी.

(राजे केशवराव ?) राव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम तागायत छ १६ रजब मुक्काम झांसी जाणून स्वकुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी विनंतीपत्रे अबदाली व राजश्री मलहारराव होलकर सुबेदार व राजश्री जनकोजी शिंदे सरदाराचे वर्तमानाची वरचेवरी पाठविली असेती त्यावरून सर्व विदीत जालेच असेल. सांप्रत राजे माधवसिंगापासी अबदालीचे येलची गुरबक्षराये व हरजसराये व महताबराये दिवान नजीबखान रोहिलाचा जाबसाला कारणे आले आहेत. माधवसिंगानें सिष्टाचार करून कांहीं कापड व जवाहीर व सलुकाची लिहिली अबदालीस पाठविली असतां त्यानें कबूल न केली. मार्गीहून वस्त्रे व जवाहीर परतून माधवसिंगापासी पाठविले. व पैगाम पाठविला कीं भेटीस येणे. नाहीं तरी मातबर माणूस व फौज पाठवणे व पैकाहि विशेष मागणार याजवरोन

---

१ पत्र गंगाधर यशवंताचे असावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजे मजकूर विचारांत पडले आहेत. आबदालीचे कौलाचा यैतबार नाहीं. प्रस्तुत अबदाली जैपुराहून ४० चालसा कोसावरी बासईवरी मेवातप्रांती आहे. व मलहारराऊ होलकर * * * * प्रांती आहेत. कानोडीहून दहा हजार रुपये दाणा घास घेऊन सडी फौजेनें आहे. मुकाबिला काबू पाहून करीतील व अबदालीनें कढके खोबरी वगैरे राजे माधवसिंगाचा मुलुक मारून कत्तल केला. काहीं पातशाही करायाची रीति व ढंग नाहीं. जरी कौल नीट असतां तरी सर्व राजे जाऊन भेटते. परंतु मुकाबिला घेण्यासहि हिंमत कोणात नाहीं. अबदाली परतूनहि जाणार परंतु नजीबखान व सर्व रोहिले त्यास जाऊ देत नाहींत कीं तुम्ही गेलियावरी मन्हाठे सरदार आम्हास राहू देणार नाहींत. याजकरितां त्याचे तजविजेनें अबदाली आजमेरेस जाणार. व तेथें गेलियावरी व राजे राठोड व राणा व बडे व कच्छवा हे रुजू होतील. मग जे करणे ते करावे. किंबहुना रोहिले यासी संकट व तजवीज असी आहे कीं, प्रजन्यकालहि अबदालीनें या प्रांती करोन दसरा जालियावरी दक्षण व गुजराथेकडे जावे. परंतु अबदालीचा जुल्म फार व कौलाचा नीट (नाहीं) * * * * त्याचे राहावयास राजी नाहींत. हे दीर्घ रोग आहे. लाहोर व दिल्ली हे दोन्हीं मुल्क तरी खराब जाले. आतां आजमेर पुढें कोणे थरास जाते पहावे. महाराजाचा प्रताप सर्व विश्व इच्छित आहे. मोगलाची पातशाही दिल्लीची तो शेवटास आलिशी दिसते. नांवास पातशाह जादा आली गोहार पट्टणीयास पाऊन तेथील राम नारायेण सुबे याचा नायेब होता त्यास जुंजात जखमी केले. फौज लुटली. व तो पलोन गेला. व पातशाहजादा तखतावरी बसला. त्या प्रांती पठाण व जमातदार मिलोन वीस हजार स्वार त्याजबरोवर आहेत. गुजरान लुटीवरी असे. सुजाउदौलास आबदालीनें बोलाविले व पातशाहजादियासहि बोलाविले आहे. शुजाउदौलास अबदाली पैका फार मागतो. तोहि भयास्तव त्याजपाशीं जायास अनमान करितो. त्याप्रमाणें अहंमदखान बंगरश व सुरजमल जाठ यास पैगाम आला असतां जाबसाल वरचावरी * * * * व सरदार व अबदालीचा निवाडा काये होतो याचाहि मार्ग * * * * (पाहत) दोहीकडे सलूख ठेवितातो. परस्परे इतमाम करून मारिते तरी अबदाली व रोहिले दोघासहि समजाविते. महाराजास चहूकडून वर्तमान पावतच असेल. जे पारपत्य करायाचे व फौज वरचेवरी सरदाराचे कुमकेस पाठविणें ते पाठवितील. ज्यापक्षीं धण्यातून कोणास पाठवावयाचे असले तरी सामान भारी असला पाहिजे. तोफखाना सिंदीयाकडील तिकडे गेला व अबदाली व रोहिलीयाकडे तोफखाना फार; त्यांत रोहिलीयापासीं बाणाचा सामान बहुतच आहे. अशे कामास फिरंगीयाचा तोफखाना जरूर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

असला पाहिजे. आम्हास सुचले ते विस्तार लिहिलियावाचोन राहावेना. अंतरवेद व बुंदेलखंड व मालवा धरून कमाविसदार अबदालीचे भयास्तव सुचित नाहीं. सर्वांची नजर मलहार.....स्वस्थ अबदालीचा काये निवाडा होतो याजवरी असे. हे विनंती.

पैवस्ति छ १३ सावान सन सितैन.

¶*This letter of Raja Keshavrao addressed to the Peshwa gives valuable details of the political situation in the North created by the presence of Abdali : The devastations of Scindia's forces and the flight of the Emperor's Son. " The fate of India now hangs on Malharrao."*

No. 119] [*Pre-Panipat--Peshwa Balaji Rao*

श्री.

यादी तेथील सरदारास पत्रे.

कि॥

१. बाबूजी नाईक व अबाजी नाईकास पत्र कीं, पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. सविस्तर लिहित जाणे. बहुतां दिवशीं मातबरे झुंज पडलें. श्रीकृपेनें विशेष कामकाज होऊन आलें. येणेकरून बहुत संतोष जाहला.

१. समशेर बहादरास पत्र कीं, तुम्हास बुद्धिवाद रगडून लिहिला. तुम्ही जाऊन दोन वेलेस कामकाज विशेष केले. येणे करून संतोष जाहाला. तुम्हाजवलून हमेश सर्वाहून मेहनत मर्दुमकी अधिक व्हावी यांत आम्हास बहुत संतोष.

कि॥

१. बाजी हरीस पत्र कीं तुमचें पत्र येऊन वर्तमान कलले नाहीं. जखम बरी जाहाली किंवा नाहीं ते लिहिणें.

१. सदाशीवपंत पागा यासहि बाजी हरी प्रमाणें.

१. विसोबा बिनी. तुम्हाकडून पत्र आज यावें. येऊन वर्तमान कलले नाहीं. सविस्तर लिहिणें. सत्वर जाऊन आधीं सरहद्दीकराचे पारपत्य करणें.

---

१ स्वस्थ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१. सदाशीव रामचंद्रास पत्र कीं तुम्ही गेलिया तागायत पत्र पाठविले नाहीं. तुम्हाकडील लोकांचें व स्वता कामकाज विशेष जाहालेंच असेल. सविस्तर वर्तमान लिहिणें.

१. येशवंतराव पवारास पत्र कीं पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं. यंदा स्वता मेहनत मर्दुमकी विशेष केली हें वर्तमान श्रवणे संतोष जाहाला. तुम्ही सर्वाहून अधिक करावें. योग्यच आहे.

१. सोनजी भापकर व शहाजी भापकर यास येशवंतराव पवाराचे पत्राप्रमाणें पत्र.

१. दमाजी गाईकवाडास पत्र कीं जखम अगदी बरी जाहाली किंवा नाहीं. यंदा स्वता कामकाम उत्तम केलें. तर ह्या गोष्टी योग्यच आहेत. कनिष्टपक्षीं पांच सात हजार फौज असावी. कामकाज विशेष व्हावें उत्तमच आहे.

१. द्वारकोजी राऊ पाटवणकर खंडेराव दरेकर यास पत्र कीं तुमच्या जखमा बऱ्या जाहालियाचे वर्तमान लिहिणें.

हरबा

रायाजी पवार

विठल सिवदेव.

¶*This paper appears to contain the Peshwa's orders for writing letters to several officers who were proceeding to the North with Bhau Saheb. The wounds referred to in the case of Damaji Gaekwad must have been those he received in the Udgir fight.*

No. 120] [*1-3-1760*

श्रीमोरया.

छ १५ साबान सन

सितैन चैत्र वद्य २

श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

विनती सेवक गंगाधर येशवंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ १२ रजब साहेबाचे कृपा कटाक्षेकरून सेवकाचे वृत येथास्थित आसे विशेष. स्वामीनी छ ५ जमादिलाखरचे आज्ञापत्र पाठविले ते छ ९ रजबी श्रीयमुनातीरचे मुकामी पावोन, लेखनाभिप्राये अवगत जाला. जैपूरचे कार्यास न गुंतता आविलंबे दिलीकडे जाऊन, गिलज्याचे पारपत्य करावे म्हणून पत्री आज्ञा. त्यास याजपेक्षा दुसरी गोष्ट विशेष नाही. यैसे जाणून, दर मजल

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिलीकडे अलो. राजश्री जनकोजी सिंदे, आम्ही येकत्र होऊन, सविस्तर वृत येक दोन कासीद पत्रे देऊन रवाना केले आहेत; ते पावले अस्तील. सांप्रत आपली थोडी बहू फौज मोगलाच्या शहवर ठेऊन, काल मुकाम सिकंदरियासि केला. जर गिलजे रोहिले येमुना उतरून आले तर श्रीगंगाचे * * पार रोहिल्याच्या मुलकांत लढा * * * वी. कदाचित इकडे नच येत, तर रोहिल्याचा मुलूक पारचा व आलीकडील मारून, वैराण करून, फिरोन येमुना उतरोन, अबदाली रोहिले यांच्या मुकाबलियासि जावे; व या उद्येशे इकडे आलो. येका दो दिवसांत मोगलाचा रूख ध्यानास येईल. त्याजप्रमाणे तजवीज केली जाईल. तजविजीने शत्रूवर आपली दहशत बसऊन आपले लोक सेर केले पाहिजत. थोड्याच दिवसांत ईश्वर सतेने व स्वामीचे पुण्यप्रतापे करून आमित्राचे पारपत्य होऊन येईल. * शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना

¶*Gangadhar Yashvant writes to the Peshwa an account of his activities against Abdali.*

No. 121] [*13-3-1760*

श्री.

पौ छ १८ साबान सन सितैन

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक पुरुषोत्तम माहादेव कृतानेक साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २४ माहे रजब मु॥ सारोट नजीक मौजे बयाना स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित असे विशेष. या प्रांतीचे तपसीलवार वर्तमान श्रीमंत स्वामीस विनंतीपत्रीं लिहिले आहे त्याजवरून श्रृत होईल. सारांष अबदालीस दमवावे व रोहिल्याचा अंतरवेदीतील व गंगापारील मुलुक खराब करावा या इराद्याने सरदार अंतरवेदीत जाऊन सिकंदराबाद लुटून पस्त केली. दाहालक्ष रु॥ खजाना नजीबखानाचा गंगापार त्या कांठपरियेंत अनुपशहराजवल आला होता म्हणोन गंगापायांब पाहावया निमित्य शोधक पाठविले. तेथे तीन च्यार दिवस मुकाम केले. अबदालीस हे वर्तमान कलताच जैपुरचा रूख सोडून दिल्लीस गेला; तेथून जहानखानास व नजीबखानास तिसापसतीसा हजारा जरीदे फौजेनसी अंतरवेदींत पाठविले. रा गंगाधर येशवंत सरदाराहून च्यार कोस पुढे होते. तेथें येऊन

---

१ पलीकडील.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जुंज घेतले. दोनच्यार घटिका * * * गले जुंज जाहाले. तेथें राा आनं * * राम व शेटाजी खराडे व त्याचा पुत्र यैसे तिघेजण कार्यास आले. तेव्हां राा गंगाधरपंत माघोरे फिरले. सरदार आगऱ्याच्या मैदानात आले व पंतमजकूर मथुरेस गेले. तेथून भरतपुरास येऊन नवाब वजीर यांच्या विद्यमाने हाफीजरमतखानाचे सलुखाचा जाबसालाचा मजकूर पूर्वी सो लिहिला आहे त्या प्राा त्याचे वकिलास बोलाऊन पाठविले. आम्हासहि डिगेहून बोलाविले. आम्ही भरतपुरास येऊन हाफीजरहमतचे वकिलास राा गंगाधरपंतासी भेटविले. हाफीजरहमताने सरदारास येऊन भेटावे व अबदालीस मार्गस्त करावे व फौजे-सुधा शामील व्हावे. नजीबखानाचे पारपत्य होईल. त्याची कुमक न करावी. सरदारानी त्याच्या वाटे न जावे व त्याच्या मुलखासी मुजाहिम[1] न व्हावे. या प्रकारे करार होऊन आणभाष शपथ देऊन वकिलास रुखसत[2] केले. सरदारहि भरतपुराजवळ पंधरा सोला कोसाचे अंतराने आले. तेथे सुरजमल येऊन भेटला. सरदारानी बेलभंडार गंगाजल आणभाश शपथ दिल्ही. पुर्वी जे जे करार केले होते, ज्यांत सरदाराची मर्जी असेल तेच गोष्ट करावी. सुरजमलास वस्त्रें प्रावर्णे देऊन रुखसत केले. तो भरतपुरास गेला. सरदार कुच करून दाहाकोस मौजे बयानाहून सारोटास आले. पुढे निदर्शणास येईल ते सो विनंती लिहूं. कृपा केली पो हे विज्ञप्ति.

¶Purushottam Mahadeo Hingane gives a description of a skirmish between Gangadher Yeshwant and Najibkhan and mentions details about the negotiations which the Scindia and Holkar were carrying on with Abdali through Hafij Khan on the point of Najibkhan being held in check.

[31-3-1760

No. 122]

श्री.

पौ छ १३ शाबान

चैत्र सु सितैन

श्रीमंत राजश्री.....पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक नारो बाबाजी सां नमस्कार विज्ञापना. ताा छ साबान पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर हुजुरचे आज्ञापत्र सादर जाहाले. तेथे आज्ञा कीं स्वारीतील जिनस सरला.

---

१ प्रतिबंध करणारा. २ निरोप.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हिंदुस्थानाचे स्वारीस जिनस जंगी पाठवावयासी पाहिजे. याजकरिता सरंजाम येणे प्रमाणे किले नगर येथील जकिऱ्यापैकीं रवाना करणे. बित॥

गोळे तोफाचे व॥ फरम्याची याद

सुमार

१९०००

सिसे वजन पके खंडी

१०

कागद फिरगाणी रजमे सुमार

२०००

साल मजकुरी दारू नवी आली आहे. वैजापुरपैकीं वगैरे त्या दारूपैकीं दारू वजन पके खंडी

४०

गारा फतरी सुमार

१००००००

सदरहू प्रमाणे जिनस रवाना करणे. दारू सिसे आणावयासी येथून पाचसे बैल पाठविले आहेत. याजवर रवाना करणे. तोफाचे गोळे बैल भाड्यानें करून फर्म्याप्रमाणे पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास हुजुरून बैल पाचसे खिजमतगारास-मागमे आले, व आम्ही नगरी भाड्याचे बैल करविले अडिचसे. येकूण साडेसातसें बैलावर जिनस भरून रवाना करितो. बित॥

तोफाच्या गोळ्याची नेमणूक येकुणीस हजारपैकीं हुजुरचे फर्मे आले, त्याप्रमाणे किल्यात होते, ते गोले सुमार

८१८४

सिसे खंडी नेमणूक दाहा त्यापैकीं सिसे खंडी

५ पुण्याहून सिसे किल्यात आलेपैकीं होते ते सिसे

३ खो पैकीं

८

दारूची नेमणूक चालीस खंडी त्याप्रमाणे दारू वजन पके खंडी

४०

गारा फतरी नेमणूक येक लाख पैकी रवानगी गारा सुमार

९९१९०

जकिरा=कोठार सामुग्री.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फिरगाणी कागद रजमे नेमणूक दोन हजार पैकीं शहरात शोध केला. फिरगाणी कागद मिलत नाहींत. साठसतर रजमे मिळाली ती पाठवितो. आणिखी तलास करितो. जी मिलतील ती पाठवितो.

येकूण गोळे आठहजार येकसे चौऱ्यासी व सिसे खंडी आठ व दारू खंडी चालीस व गारा नव्याणव हजार येकसे पनास, व फिरगाणी कागद मिलतील ते, असे बैल भरून, वाटेन प्रज्यन्याकरिता पाले व दारूच्या बैलावर चवाली देऊन, रवाना करितो. बैल भाड्याचे बराणपुरपावेतो केले. भाड्याचे बैल न मिलत. मोठ्या प्रेत्ने बैल मिळाले. वाण्यानी करार करून दरम्यान मध्यस्त घेतला कीं, बराणपुरापुढे न न्यावे. दर बैली बारा रुपये प्रमाणे भाडे केले. म्हणून नगरीहून राजश्री धोंडो माहादेव याणी लि॥ आहे. त्यावरून आम्ही त्यास लिहिले कीं बैलास भाडे फार पडते. यात रुपया दोन रुपये दर बैलास कम करून बैल करार करावे. हिंदुस्तानाचे स्वारीचा जिनस बैल भरून छ १२ साबानी गंगेवर येतील. यासिवाय हुजुर दारू व गोळे सिसे आणविले आहे. फर्म्याप्रमाणे गोळे भरतील ते व सिसे दोन खंडी खोपैकीं व दारू असे च्यारसे साडेच्यारसे बैल भाड्याचे करून जिनस भरून तेहि बैल येकादोदिवसाचे अंतरेयाने येतात. हिंदुस्तानाचे स्वारीच्या जिनसाचे भाड्याचे बैल बराणपुर-पावेतो गेलियावर तेथे दुसरे बैल भाड्याचे करून या भाड्याचे बैलास माघारे यावयाची आज्ञा देविणार स्वामी समर्थ आहेत. दारू पंचवीस खंडी तीस खंडी किल्यात नवी होती ती व जुनी दारू चांगली केली होती ती असी रवाना केली आहे. किल्याचे बेगमीचा जंगी जिनस दारू व गोळे व सिसे होते तेहि हिंदुस्तानाचे स्वारीस व हुजुर रवाना केले. किल्याची बेगमी जकिऱ्याची करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Naro Babaji Nagarkar, Kiledar of Ahmednagar, submits a list of ammunition to be approved by the Peshwa to be despatched with the armies proceeding to the North. The details of the list will be serviceable in determining what kind of ammunition was being manufactured here.

[1760?

No. 123]

श्री.

शेवेसी विज्ञापना. राजश्री नारो शंकर याची फौज राजश्री मनोहरपंतासमागमे दिल्ही होती. येथेहि फौजेचे प्रयोजन आहेच. भरतपुरीहून रसद कुंभेरीस येणार. त्या मार्गाचा बंदोबस्त त्यांजकडून करवावा. राजश्री मनोहरपंता समागमे याच्या फौजे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

खेरीज लोंक नेमून दिल्हेच आहेत. याच्याहि फौजे पैकी सेपनास स्वार देणे तर देवावे आणि वरकड त्याची फौज बोलवावी म्हणजे भरतपुरच्या मार्गाचा बंदोबस्त राखतील तर त्याची फौज बोलाविली पाहिजे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Shanker is asked to keep the Bharatpur road safe for supplies.*

No. 124] *[12-6-1760*

श्री.

राजश्री विष्णु महादेव गोसावी यांसी.

छ अखांडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो मलारजी होलकर दंडवत सु॥ इहिदे सितैन मया व अलफ. तुम्ही पत्र टोक्यांचे मुकामीहून पाठविले ते पावोन लेखनार्थ अवगत जाला. ताा कोन्हाळे येथील व चांदवडच्या कुरणाचा मजकूर व सुरतराम महता याजकडील यैवजाचा माार तपसिले लिहिला तो सर्व कळला. यैसियासी श्रीमंत राजश्री भाऊ साहेबहि चमेल उतरोन आले; सत्वरच भेटी होतील. त्यासी विनंती करून कोन्हालियाच्या कमाविशदारास व आपाजी हारि चांदवडकर यासी ताकीद पत्रे घेऊन पाठवितो. यैवजाविषई सुरतरामास ताकीद केलीच आहे. रुपये पावते करील. इकडील वर्तमान तर प्रस्तुत आपला मुकाम प्रांत जटवाडा येथे गिलज्या कोलेवर अंतरवेदीत आहे. नजीबखान व ज्याहान इटावियाकडे गेलेत. गिलज्याच्या फौजेतून हाफीजरहिमतखान रोहिला भरतपुरासी आला. आपले राजश्री गंगाधरपंत आहेत. रोहिलीयाने सल्हखाचा संदर्भ केला, परंतु आपल्या विचाराणरूप बनत नाही. श्रीमंतहि संनिध आले. अवघ्या फौजा येकत्र जालिया श्रीइच्छेने शत्रूचे पारपत्य होऊन येईल. तुम्हीहि श्रीमंतास विनंती ताकीद पत्राविशई करोन होईल कार्य ते करून घेणे. सर्वदा पत्र पाठऊन वर्तमान लिहीत जावे. राा छ २७ सवाल बहुत काय लिहिणे हे विनंती.*

मोर्तब सुद.

¶*Malharrao Holkar's letter to Vishnu Mahadeo Gadre, Banker of Poona, giving details of the situation of the Maratha and Mussalman armies and adding that Hafiz Rahmat has come from Abdali with proposals of peace and that Gangadharpant was sent on to interview him.*

---

* ता. ६ जुलैस होळकर व सदाशिवराव यांच्या भटी झाल्या. त्यापूर्वीचें पानिपत मोहिमेचें पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 125] *[11-5-1760*

श्री.

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री बाबूराव राम
स्वामी गोसावी यांसी.

पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. उजनी व इंदूरच्या हुंड्या

रुपये.

१२५००० तुम्ही पुण्याहून पाठविल्या.

२५००० अंताजी नारायण याजवर इंदूरची १

१००००० उजनीच्या

२५००० लखमीचंद अजबसिंग यावर १

५०००० बलभ सुदर १

६००० कळु संकरसा १

१९००० मोहनजी नाथुराम ३

१००००० ६

१२५००० ७

६३००० भगवंत भैरव थथे याजकडून तुम्ही रवाना करविल्या त्या.

१६५०० इंदूरच्या

५००० हरचंद किसनचंद यावर १

४००० नानासा दुलभसा २

४००० हसराज देवराज २

२५०० नाना महता २

१००० रूपसा देवीलाल १

१६५०० ८

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

४६९०० उजनीच्या

१००००	हरचंद किसनचंद	३
१९००	नाना महता	१
७०००	गोपाळदास गोकुळदास	२
७०००	मोहनी नाथुजी	१
४०००	मोहनी विठलजी	१
२०००	पुंज्यासा अमोलक	१
१९०००	चिंतामण हिराचंद	१
४६२००		१०
६३०००		१८
१८८०००		२४

येकूण चोवीस हुंड्या एक लक्ष अठ्यासी हजार रुपयाच्या पाठविल्या त्या सिरोजच्या मुकामी पावल्या. येथून सावकाराकडे उजनी इंदुरास रवाना केल्या आहेत. सावकारांकडील मुदतीप्रमाणें ऐवज वसूल जालियावर तुम्हास लेहून पाठवूं. र॥ छ २४ रमजान सु॥ सितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sadashivrao Bhau acknowledges the drafts of money supplied by Babuji Naik.*

No. 126] *[June 1760*

श्री.

विनंती उपरी. उद्यांपासून जाटाचा मुलुक लागला याजकरितां कोणतेहि गावास आग लाऊं नये. उपसर्ग येकंदर करूं नये ऐसें आहे. याजकरितां आपण आपले गोटांत ताकीद करून उपसग लाऊं न देणे. पारपात्य केलें जाईल. याप्रमाणें परिछिन्न ताकीद करावी.

¶*Appears to be Bhausaheb's strict orders to his subordinates to desist from molesting the territories of the Jath, which they are to enter the next day.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 127] [*27-6-1760*

श्री.

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी.

पौ छ १६ जिल्हेज सन

इहिदे सितैन-अधिकश्रावण.

विनंती सेवक बापुजी बलाळ सां नमस्कार विनंती ता. छ १३ जिलकाद मु॥ नजीक आगरे यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी सरदाराच्या श्रीमंताच्या भेटी जाल्या. सुरजमल जाट याची येथें दो रोजी भेट होईल. आबदालीचा सलुखाचा मजकूर होता. त्यास सुज्यातदोलाकडे नजीबखान व ज्याहानखान गेले. त्यांणीं त्यास कांही राजी केले. यामुळे सलुख लांबणीवर पडला. आपली पत्रे सुजातदौलाकडे जातात. मातबर माणूसहि पाठविणार आहेत. येदा पठाणांची छावणी जाली असें दिसते. येमुनेस पाणी आलें. गुंज बळावत चालली. मनसबा भारी दिसतो. श्रीमंताचे प्रतापें सर्व पार पडेल. स्वामीस कळावें म्हणून लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bapuji Ballal Phadke, brother of Haripant Phadke of later times, writes from Agra about the overtures of peace which Abdali was making. The fate of peace depended on the attitude of Shuja-ud-daula who was being courted by both the parties.*

No. 128] [*19-8-1760 ?*

श्री.

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती शेवक त्र्यंबक कृष्ण व जनार्दन राम नि॥ गंगाधर बाजीराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता छ ७ मोहरम मुकाम अहीरवं पा मइनपुरी प्रांत अंतरवेद स्वामीच्या कृपावलोकने करून वर्तमान यथास्थित असे विशेष. अंतरवेदीत आल्यावर सविस्तर वर्तमान पुर्वी शेवेसी विनंती लिहिली आहे त्यावरून विदित जाले असेल. सांप्रत आजपर्यंत अंतरवेदीतील दोनतीनशें गढी मवासी हस्तगत जाली. त्यामध्यें कांहीं सरकारी ठाणी ठेविलीं, कांही पाडून टाकील्यां, याप्रमाणे अमल सुरळीत स्वामीच्या प्रतापें अंतरवेदींत होत आहे. फार करून अंमल सुरळीत जाला; कांही राहिला आहे तोहि थोडक्याच

---

१ जमाव.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिवसांत सुरलीत होईल. विदित असावें. ये विसीचा सविस्तर अर्थ राजश्री गोविंद बल्लाळ शेवेसी लिहित असतील त्यावरून विदित असेल. पथकांतील अर्थ आजपर्यंत शंभर माणूस जखमी व मयेत वीसपंचवीस याप्रमाणें वर्तमान. पर्जन्य-काल, फिरती छावणी व कुंभेरीवरीलहि हैरानगत, लोकांस मेहनत भारी पडली. पुणियांत समजावीस भारी निघाली, त्याजमुळे नालबंदी कमी पावली. स्वारीत रोजमरा झाडून न पावला. याजमुळें आदा थोडा जाला. बाकी फार निघाली. नेमणुक छावणीस रवानगी जाली तेसमई कोती जाली. ये विसीचा सविस्तर अर्थ पूर्वपत्रीं विनंती लिहिलीच आहे. त्यावरून जाजती ऐवजाची सनद गोविंदपंतास रवाना जालीच असेल. कदाचित सनद रवाना जाली नसेल तरी हली सेवेसी विनंती लिहिली आहे. जाजती ऐवजाची सनद राजश्री गोविंदपंतास पाठविली पाहिजे, म्हणजे लोकांची स्थीत राहील. छावणीचा कारभार विदितच आहे तेथे शेवकलोकांही कायें लिहावें. शेवेशी विदित होये हे विज्ञापना.

¶*Trimbak Krishna Kanitkar, the Peshwa's accountant residing with Govind Ballal Kher, writes to Bhausaheb about Maratha activities in the Doab and the troubles of Govindpant Bundele.*

No. 129] [*26-8-1760*

श्रीशंकर.

विनंती उपरी. आज आम्ही उतारावरून नदी उतरून आलिकडे आलों. ढाला व डेरे आगोधरच आले होते. व ताकपीर व नागरमल आलिकडे आले होते ते माघारे पलीकडे गेले. याचा विचार काय आहे? वजीर आज सिकंदऱ्यास आले. त्याचे भेटीचा विचार काय केला आहे हे ल्याहावे. आम्ही उदईक पटपट-गंजावर जावें की काय? रोहिल्याची फौज अलीकडे आली होती ते माघारी गेली. पटपटगंजावर गेलियानें त्यांस दशहत पडेल. कदाचित लाहोराकडे रोहिले जाऊं लागले तर सडे होऊन त्याचे पाठीमागें जावे लागेल; तर याचा विचार करून ल्याहावे. वजीर आले तर आम्ही पटपटगंजावरोन माघारे भेटावयास येऊं व उदईक श्रावणी आहे तर याचा विचार करून ल्याहावें. उदईक आपला मुकाम पलीकडेच होईल कीं अलीकडे होईल. आलीकडे येणे तर लागलेच पटपट गजावरी जावें. वजीरास सामोरे येणे हे नदी पावेतो यावें. मेरटेचे काम यावर लांबणीवर पडत नाहीं. फौज उतरली ह्या आश्रयावर दम धरला होता. याउपर ठाणे दम धरीत नाहीं. कदाचित दम धरला तर मग जे तजवीज करणे ते करावी. श्रीमंताची पत्रे आज आली त्यांचा भाव कांही उत्तम नाहीं. भेटीनंतर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बोलणे ते बोलूं. उतर पाठवावे त्याप्रमाणे कूच मुकाम करणे तर करूं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The hand-writing shows the letter to be from Vithal Shivdeo to some other officer, both at some distance from the main camp. The letter as it is, cannot be fully explained.*

No. 130] [*15-9-1760*

श्री.

राजश्रिया विराजित राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्य बापूजी बलाल सां॥ नमस्कार विनंती. येथील कुशल त॥ छ ९ सफर मु॥ दिल्ली येथास्थित असे विशेष. आपले पत्र आले पावोन आनंद जाला. इकडील वर्तमान तर यमुनेचे पाणी उतरावयास महिना पंधरा दिवस पाहिजेत. उपरातिक लडाई होईल. सला होता दिसत नाही. लस्करात मोठ मोठे माणसास फाके जातात. घोड्यास दाणा ठाऊक नाही. लस्कर गलाले. कर्ज कोठे मिलत नाहीं. अशी तर्वाई[1] आजपर्यंत कधी गुदरली नव्हती. घोड्या माणसात जीव राहिला नाही. श्रीमंताचे दैव थोर आहे. परिणाम कठीण दिसतो. याचमधे सर्वाची आबादी दिसोन आली. सर्व गोष्टीने असे साल पाहिले नव्हते. सदैव पत्री सांभाळ करावा. चिरंजीव तात्यास आमचे जागास आपण अहेत. सर्वप्रकारे सांभाळ करावा. विस्तारे लिहिणे नलगे. बाळकृष्ण पंताविसी काळजी न करावी. बहुत काये लिहिणे. तातडीने पत्र लिा. मागाहून सविस्तर लिहून पाठऊं. राजश्री धाकटे नानास पत्र आपण लि॥ त्याचा जाब प॥ आहे हे विनंती.

¶*Bapuji Ballal Phadke writes from Delhi to Naro Appaji at Poona and communicates the awkward predicament of Maratha forces owing to starvation, full five months previous to the final battle.*

No. 131] [*15-9-176*0

श्री.

पौ छ १४ रबिलावल सन इहिदे आश्विन.

तीर्थरूप राजश्री..... बाबा वडिलाचे सेवेसी.

आपल्यें बाळाचे साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ सफर मुकाम इंद्रप्रस्थ येथास्थित असें विशेष. ईकडील वर्तमान तर दिल्ली

१ तवाई=संकट.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

किल्ला श्रीमंतांनीं घेतला हें पूर्वी लिहिलें आहे. त्यावर अबदाली अनुपशहराकडे होता, तो दिल्लीजवळ पलीकडे येऊन राहिला. त्यास पाणी यमुनेस फार, उपाय नाहीं. नावा सर्व होत्या त्या आपले हातीं लागल्या. तेथेंच मुकाम करून राहिला आहे. श्रीमंत अलीकडे आहेत. सर्व फौज दिसतें. सुज्यातदौला नजीबखान सर्व रोहिले मिळाले आहेत. सलुयाचा मजकूर सुज्यातदौला बोलतो तो लबाड आहे, परिणाम नाहीं. आपली फौज भारीच आहे; परंतु पोटास नाहीं. घोडीं दाणा खावयास विसरलीं. माणसांस अन्न मिळतां कठीण दिवस इतकेंच मात्र संकट आहे; त्याची तजवीज माहालकरियांकडील ऐवज येईल तेव्हां फौजेस पोटास मिळेल. कर्ज तों कोठें मिळत नाहीं. फौज आपली भारीच आहे. महिन्याभरां पाणी उतरेल. लढाई मातबर व्हावी असा विचार दिसतो. त्याजमध्यें दम दिसतो. आपली सारी फौज येकदिल आहे. श्रीमंतांचें प्रालब्ध थोर आहे. सर्व अरिष्टें वारतील. पारपत्य लौकरच होईल. पुढें होईल मनसबा तो लिहून पाठऊं. बहुत काय लिहूं. कृपा करावी हें विनंती.

¶*Nana Phadnis's letter to his uncle Baburao, saying negotiations of peace had failed and that the issue depended upon a final fight.*

No. 132]

[*October 1760?*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिंतोपंत स्वामी गोसावी यांस

सेवक गोविंद बलाल नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. फर्काबदबाल्यांनी अकबरपुरच्या जमीदारास चिठ्या लिहिल्या कीं तुम्ही गुंळु[1] करून ठाणे उठउन देणे म्हणजे आम्ही येतो. केवल आमचे ठाणे असतां त्याच्याने येवत नाहीं. ते बदनामीस आमचे ठाणे उठवित नाहीं. युक्तीने गवरांकडु ठाणी उठऊन म(ग) आपण तुमची ठाणी उठोन गेली म्हणून बसविलें असें म्हणतात. यास्तव आमचे ठाणे असतां ते येत. जमीदारांस मात्र पठाणाने लिहिले त्याजवरून जमीदार हुलकावितील तर सावधानी ठाण्याची करून राहाणे. जमीदारांचा कोणाचाहि विस्वास न धरणे. आम्हीहि समीपच आहो नजीबखान माघारा सरकला म्हणजे आम्ही पुढे मोहऱ्यावर येतो. च्यार रोज सावधान राहाणे. बहुत काये लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Govindpant Bundele's letter to some Chintopant as regards Maratha outposts being deserted.*

---

१ गुळुन्दंगा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 133] *[26-11-1760*

श्री.

शेवेसी नारो गंगाधर कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा कार्तिक वद्य चतुर्थी मु॥ सिधटेक वर्तमान स्वामीच्या आसीर्वादे येथास्थित असे विशेष. इकडील वृत तर खासा श्रीमंत हिंदुस्थानांत जाणार. बंधूसहितहि जावे येक विचार येक प्रकार त्याजबाा दाहा पाच हजार फौज देऊन देशी ठेवावे, आपण खामखा जावे. निजामअलीस बाा घेणार असेहि आहे. त्याणे उगेच राजकारण लाऊन ठेविले आहे. कागदीपत्री ममता दर्शवितो परंतु लबाड कारभार. हिंदुस्थानच्या मनसब्यावर त्याची द्रिष्ट आहे. तिकडील काय होते हे पाहातात. तूर्त यासी सलुखाने लिहिण्या पुसण्यात दर्शवितात. श्रीमंत लग्न मार्गसीर्ष मासी आपले निश्चयरूप करणार. वधुविचारणेस जिकडे तिकडे पाठविले आहेत. कऱ्हाडे, देशस्त, चिपोलेणे यात जी अनकूल पडे ती करावी हा निश्चय. लग्न जाल्यावर वराडातून चांदे देवगडच्या मार्गे प्रयागास जावे हा सिधांत. हिंदुस्थानच्या ग्रहस्तांची तो कालजी अगदी सोडली. त्यांचे स्मरणहि नाही. त्यांचे साहित्याची चर्चाहि करणे अनकूल पडत नाही. प्रस्तुत सिधटेकाहून कूच जाले म्हणजे तोफखाना व काही फौज बाा सखारामपंत असे नगरावरून धारूरचे सुमारे लावणार, आपण करमलेयास जाणार. जानोजीचा लेक येथे आला आहे. करमलेयास जरूर जाणार. वरकड प्रकृत तो दिवसे दिवस येक प्रकारच होत चालली त्याचा विस्तार काय ल्याहावा? माहालकरी पथके पागा यांस दरबार खर्चाच्या यादीविसी पुरसीस चालली आहे. यादी कुल जमा करितात. तूर्त पोतेनिशिची घालमेल जरूर होणार. सवा लाख इजारा जो करील त्यांस देणार. जुनेयांस तो ठेवित नाहीत. असा निश्चय आपले जागां करून ठेविला आहे. कुशाबांचे गला फार फार पडले आहेत. तो कबूल करीत नाही. इजारा होईना म्हणतो. परंतु फार गलाच पडले आहेत. शेवटास जाईल ते खरे. श्रीमंत राजश्री मोरोबादादास यास च्यार दिवस थोडकासा ज्वर आला. त्यामुळे दरबारास न गेले म्हणऊन परभारे श्रीमंत रायांस चिटी लि॥ की हे आमचे म्हटले आइकत नाहीं, तूर्त बरे वाटत नाही. यांस फजित करून लिहिणे की आमचे आइकत जात व तूर्त घरी घेऊन जाऊन ओषध देऊन बरे होऊन पाठऊन देणे असे लि॥. निमित्य तो काही दिसत नाहीं. काय चितात आले देव जाणे. अशे प्रकारचे तमासे जाले आहेत. वर्तमान कलावे म्हणोन लि॥ असे. कृपा करावी हे विज्ञापना. मागाहून सविस्तर लिहून पाठवीन.

¶This is an important letter of Naro Gangadhar despatched from Sidhtek near Poona, probably to Bhausaheb. It gives details about Peshwa's marriage and his culpable indifference to affairs in the North.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 134] *[6-12-1760*

श्रीगजानन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

गोपालराव गणेश स्वामी गोसांवी यांसी,

पो सदासिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणे विशेष. तुम्ही छ १३ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिले वर्तमान सविस्तर कललें. आज्ञेप्रमाणे आपले फौज सुधा पार उतरतों, सरकार काम यथास्थित करून लिहितों, जमीदार आदीकरून सिधच आहेत म्हणुन लिहिले, ते कललें. यैसेयासी उतम आहे. सत्वर पार उतरोन सारे जमीदार हातीं घेऊन लिहिल्याप्रमाणे कार्य करून दाखविल्याने तुमचे चाकरीचा मजुरा आहे. नाहींतर बोलावें फार, होऊन कांहीच न ये, असें जाहाल्यानें आहे विचार तो कलतच आहे. तरी जपून सर्व येथास्थित सत्वर बज्याऊन दाखवणे. तुमची फौज राजश्री गोविंद बलालाबरोबर होती, ती तुम्हाकडे येईलच, व राजश्री गणेश संभाजी याजलाहि तुम्हाकडे यावें अगर फौज पाठऊन कुमक करणे म्हणोन पत्र पाठविलें आहे. त्याकडे पाठऊन फौज आणवणे. तुम्ही याउपरी येकंदर दिरंग न लावणे. इकडे आबदालीचाहि आवभाव कलोन गेला. येकदोन लडायाहि सरदारांकडील किरकोळ फौजेसी जाहल्या. त्याचा मोड करून गोटांत साऱून घात (त) ले. याउपरी त्याचा दम चालून येऊन लडाई कराव्याचा राहिला नाहीं. सरकारच्या मोर्च्यास त्यांच्या मोरच्यास बाणाबाणाची तफावत होती. ते सरकारच्या मोर्च्यापुढे जेजालेच्या गोलीवर धमधमा बांधून त्यावरी तोफा ठेऊन मार दिल्हा. तो त्याच्या डेऱ्यापावेतों लस्करांत लागू होऊन माणसें घोडीं मरूं लागली. त्या भयानें त्याणी तेथून कूच करून दोन कोस मागें सरून गेले. आपले मोरचे देखील उठऊन नेले, हे त्याची हिमत आहे. लौकरीच पुर्तें पारपत्य येथास्थित होईल. दिवसेंदिवस कमहिमती होत चालले. सत्वरीच चांगलें पारपत्य होईल. तुम्ही लिहिल्या गोष्टी करून दाखवाल, तेव्हांच फौज ठेविल्याचें, पैका खर्च केल्याचे, व उमेदगी[1] मनात आणून लांबलांब लिहितां व बोलत होतां त्याचें सार्थक आहे. ही संध फिरून येणार नाहीं. सर्व हातीं घ्यावें. त्याचा अमल उठऊन आपला अमल करावा, हे खबर पाठवणे. जाणिजे. छ १९ राखर पार जमीदारानी दंगा केला होता. त्या दिवसांत आपली फौज न गेली. आतां जमीदार सुजातदौलाचे मातुश्रीने बेणीबाहादराने

---

१ उमेदवारी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

समजावले. असो जमीदारांस हालमाजी[1] पाहिजेच. तुम्ही पार जाऊन दमाने जमीदार हाती घेऊन आपण तूट सोसून जमीदार न दुखावितां कार्य करणे. सर्व सामील होतील. ज्यास पत्रें पाहिजेत ते लिहिणे. पाठऊन देऊं. मोगलाची फौजहि सुम्यांत जमीदार तुम्हासी बिघडले तरी पेच पडेल. सारा बंदोबस्त जालियावर बारिक बंदोबस्त होईल. तूर्त सर्वांस सुखलगाम रजावंदी[2] उमेदवार करून भारी जमाव करणे. सामील होतील त्यांवर कारकुनी तूर्त न काढणे. जागीर मनसबाविसी उमेदवार करणे. दिलीपर्यंत डांक बसवणे. आजुरा पडेल तो खर्च करणे. प्रतापगडवाले व बलवंतसिंग वगैरे सर्व हातीं घेणे. कासीमधें अमल होऊन जमीदारांमुलें उठला तसे न करणे. आपण उपास करून त्यास रजावंद करून मोठे काम करून दाखवणें. मेहनतीनेच सर्व थोर जाहले. ईस्वरे थोर यश दिल्हें तरी थोरपणहि होईल. सत्वर जाऊन काम करणे. रा छ २७ राखर हे विनंति. गंगापारचे रोहिले यांचे मुलकांतहि दंगा जमीदारांपासून होई हे जरूर करणे. जमीदार उमेदवार करावे तेव्हां सर्व होईल हे विनंती

¶*Bhau's instructions from the field of Panipat to Gopalrao Ganesh who along with Govind Balal was acting in the Doab.*

No. 135] [*March 1760*

श्री.

राजश्री महिपतराव यांसी.

× आशीर्वाद. गाडदी उतरले उत्तम. इभरामखान सुधा येथेंच राहवणें. तोफा कोसावर गेल्या. मागील थोरल्या ओढ्यावर तेथे जाऊन समाधान करून सकाळीच सारे येई असे करणे. अथवा दोन तीन थोर तोफा व गाडद्याच्या तोफा व गाडदी आम्हाजवळ राहत असे एकजण त्यांत कारभारी असे चादण्याचेच येऊन राहावे. या प्रमाणे करणे आशीर्वाद.

¶*The hand-writing of Sadashivrao Bhau shows this letter to contain his instructions about the camping of Ibrahim Khan Gadadi.*

---

१ हालामाजी=बेकैद, बेबंदशाही २ रजावंदी=खुश, संतुष्ट.

× सदाशिवराव पानपतचे स्वारीस निघतेवेळचें पत्र महिपतराव चिटणीसास.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 136] *[1758 ?*

श्री.

विनंती उपरी. आम्ही आज कूच करोन सालेमार बागा आलीकडे मुकाम केला. त्यास इकडून पाणिपतापलीकडोन चाळीस पन्नास कोस बातनी आली कीं कोठें फौजेची आवाई नाहीं. परस्परें आपल्याकडेहि बातन्या आल्या आस्तील त्यास उदैक मंगळवारी आमचा मुकामच आहे तर आपण बहादूरखानास व नागरमलास इकडे पाठवावे. बनेल तर नवाब गाजुदीखानासहि इकडे पाठविले पाहिजे, म्हणजे मोगलपुरी याचे सूत्र ठीक करोन कार्य करूं. नवाबाचे मारफातीचे मोंगल पुरियाचे सूत्र आहे याजकरितां नवाबांनी तेथे येऊन ठीक करावें. इकडे आम्हीहि जवळच आहे. तर आतःपर सुस्ती न करावी. बहुत काय लिहिणे हे विनंती.

No. 137] *[Date of receipt 12-1-1761 ?*

श्रीशंकर.

पैवस्ति छ ४ जमादिलाखर.

राजश्री गणेशपंत व बाबूराव यांस.

विनंती उपरी. जाटाकडील फौज येमुनेचे घांटाने जागा जागा थोडी थोडी फौज उतरती, व तिकडे रोहिले पठाण यांची फौज गंगा उतरून फरकाबादेस येती. ऐसें वर्तमान येथें चहूंकडून येतें. त्यास तुम्ही आपली फौज सावधपणें आसो देणें. जागा जागा माहालांत स्वार पाठविले असतील ते कार्या कारण मात्र थोडे थोडे ठेवणें. वरकड सर्व आपले जवळ आणून ठेवणें. येथून जे क्षणी जसे पत्र जाऊन पोहोंचेल तसे ते क्षणीच करणे लागेल. यास्तव लिहिल्याप्रमाणें तरतूद आसो देणें. रोहिल्याची फौज गंगापारीहून फरकाबादेस जमा होती. तुम्हावर तेथून दगा होणार म्हणून बातमी ऐकतों तरी बहुत सावध राहणें. फरकाबादेची बातमी चांगली राखणे. तुमची फौज माहालो माहालीं बहुत गेली आहे ते आपले जवळ बोलाऊन मजबुदीने राहाणे. माहालाचे स्वार सारे उठून आणिल्यानें लौकिकांत वाईट दिसेल तरी तसें तरी न करावें. कार्याकारण राउत ठेऊन वरकड सर्व बलाऊन घेणें. चारणीस गेले असतील तेहि आपले जवळ आणवणे. रवाना छ ३ जमादिलौवल बहुत काय लिहिणें हें विनंती.

पैवस्ति छ ४ जमादिलाखर.

¶*In the absence of further details about the writer, the addressee and the date this and the next letter cannot be properly deciphered. The mention of Gaziuddin Khan may refer this letter to an earlier date, i.e., the monsoon of 1758.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 138] [*18-1-1761*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

स्वामी गोसावी यांस.

* * *

साष्टांग नमस्कार विनंती. येथील.

* * *

लिहित जाणे विशेष

* * * * * *

साहेबाची पत्रे आली कीं भाऊसाहेबानीं

* * * * *

अबादालीस मारून लुटून गर्दस मेलविला. श्रीमंताची फत्ते जाहाली. यास्तव तुम्हास * * *

हे पत्र लिहिले आहे. तरी पत्र पावते क्षणी तोफाची तीन वेला सरबती करणे. आबादाली पलोन गेला. फौज आमचा पाठी लागली. आहे एके जागा घेरला आहे. धरतील अथवा मारून टाकीतील. या प्रमाणे वर्तमान श्रीमंतानीं लिहिले आहे. तिकडे लष्करांत ही पत्रे * * * * * तरी जलदीनें आम्हाकडे रवाना करणे * *

सरबल्या तोफाच्या करणें मामाच्या नांवें पत्र

* * नाना साहेबांचे * * * कांहीं संश.

नाहीं * * * तिकडे लष्करास परभारे येतील *

* * येतील. त्याच वेलेस चार माणसे देऊन रवाना करणे.

संतोषास जोडा नाहीं. तुम्हास कलावे म्हणून लिहिले आहे. सर्वास सांगणे

रवाना छ १० जमादिलाखर सन इहिदे सितेन. बहुत काय लिहिणे. लोभ अ

दीजे हे विनंती.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

(मथाळ्यावर आडवा मजकूर)—

चिरंजीव राजश्री आपाजीपंत यास आशीर्वाद लिो परिसीजे हे आशीर्वाद.

¶This paper is unfortunately found in a mutilated condition. It mentions how Sadashivrao Bhau gave a crushing defeat to Abdali and advises the addressee to announce the victory with a discharge of three vollies from the guns. The writer is not present at Panipat, and the news is despatched to him from some place, not mentioned ; but it evidently reached the writer from the field of action long before the final battle of January 14th, 1761, and must therefore be taken to refer to one of the earlier actions that were fought with the Abdali.

No. 139] *[1-2-1761*

श्री.

शेवेसी राजे बखतसिंग भदौरकर विज्ञापना एसीजे, आम्हास सुभेदार व जनकोजी सिंदे यानी आज्ञा केली की तुम्ही सिवबंदी ठेऊन नाकेयाचा (बंदो)बस्त करणें. सिवबदीचा ऐवज मजुरा दिल्हा जाईल. त्यावरून नजीबखान व ज्याहान-खान इटाव्याकडे आले ते समई सिबंदी ठेऊन नाकेयाचा बंदोबस्त केला. सिबंदीचा आकार रु. २६००० सवीस हजार आकार जाला त्यापैकीं सुभेदार व जनकोजी सिंदे यानी रु. १६००० सोला हजार मजुरा दिल्हे. बाकी रु. १०००० दाहा हजार राहिले ते हाली द्यावयाची आज्ञा. सरकारची मामलतीची बाकी तुम्हाकडे आहे. त्यापैकीं दाहा हजार रुपये मजुरा घेणे म्हणून सनद देणे.

छ २४ जाखर सन इहिदे सितैन पौष वद्य येकादसी.

¶Charges of Bakhatsing Bhadorkar's troops for guarding military posts from the enemy.

No. 140] *[February 1761*

श्री.

सौभाग्यवती पार्वतीबाईचें पत्र रात्री आले. अम्ही वाचले. भाऊ रूपनगरी दाहा सहस्र फौजेनिशी ग्वालरीस एणार. बाईपासी आठ हजार सैन्य आहे. सुखी आहेत. तुम्ही दयारामाचे घरची साखर दों रुपयाची घेऊन भोजनोत्तर येऊन अम्हास नेणे. ×

¶This bit of a paper mentions how Parvatibai was expecting Bhausaheb to arrive at Gwalior with a force of ten thousand.

× कोणा भिक्षुकाचें पत्र दिसतें. अक्षर मोठें बालबोध जुन्या कागदावर आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 141] [*18-3-1761*

श्री.

पौ छ १० साबान फाल्गून.

शेवेसी लक्ष्मण नारायण सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ साबान मुकाम सिरोज येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असे विशेष, स्वामीनी छ २४ रजबचे पत्र पो ते छ २ साबानी पावले. पावोन परम संतोष जाहला तो पत्री काय लिहूं. स्वामीस यासमई जे दुख जाहले आहे तो एक परमेश्वर जाणे. परंतु काय करावे. आता सारांष हेच की चिताचे विवेके करून शांतवन करावे. आणि श्रीमंत राजश्री दादा स्वामीनी एक दोन वेळा पत्रे लिहिली आहेत त्याअन्वये जरूर करावे. दादास आपली काळजी बहुतच लागली आहे. ती काय ल्याहावी. दादाचा आग्रह आपण एकवेळ येथे यावे. मग जो मनसबा कर्तव्य तो करावा. श्रीमत सौ मातुश्री पार्वतीबाई बो यावे, हा पोक्त विचार दादानी आपली पालखी व सामान वासुदेवपंत दि॥ विनायक गंगाधर नि॥ त्रिबकराव शिवदेव याज बाा छ २ साबानी रवाना केले आहे. सत्वर पावेल. श्रीमत राजश्री दादा साहेबा बाा हरीपत फडके बाबूराव केशव गणोबा बेहरा या प्रो गेले. बाकी गुरुर्जीबावा, महादाजीपंत तात्या, महादाजीपंत जोशी, बाळाजीपंत लेले, आम्ही बावाजीपंत व माणकोपत व केसोपत या प्रो बरोबर आहो. नारोपत पालदे बरे वाटेना सबब पुण्यास गेले. हे विज्ञापना.

¶This letter from Sirouj mentions how Raghoba was anxious about the Peshwa's health and what persons were returning to Poona.

No. 142] [*27-4-1761*

श्री.

चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीपंत यासी नारो गंगाधर कृतानेक आशिर्वाद उपरी. येथील कुशल चैत्र कृष्ण अष्टमी मु॥ पुणे कुशल असो विशेष. शरीर-भावनेचा प्रकार तर आद्यापवर आहे तेच आहे. उपाय करीत आहो. फळ-देता श्रीहरी आहे. श्रीमंत राजश्री यजमान स्वामी बुराणपुरास आले. कांही दिवस त्यास्थळीं मुकाम होतील. श्रीमंत नारायणरावजी यास देवी निघाल्या आहेत. उत्तमच आहेत. पाणी घातल्यावर तेथुन निघोन येतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब पुणेयास दाखल जाले. श्रीमंत मुख्य कांही दिवस गंगातीरी येऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वास करणार असा मनसबा आहे. मुंज नारायणरावजीची करावी असाहि अर्थ आहे. घडेल ते खरे. वरकड हिंदुस्थानचा अर्थ तर राजश्री गोपाळराव, जानोजी भोसले खेचीच्या पारपत्यास ठेविले. ग्वालियेरी राजश्री मल्हारजी होळकर व नाना पुरंधरे वगैरे मुतसदी सरदार फौज दहापंधरा हजार व श्रीमत सौभाग्यादिसंपन्न पार्वतीबाई देखील तेथें आजवर होती. सांप्रत श्रीमत माघारे फिरता त्यास आज्ञा गेली कीं मल्हारबांनीं व बाबुजी नाईक याजसमागमे फौज गेली ते सुधां राहावयाची आज्ञा केली. वरकड सर्वांनी श्रीमत सौ पार्वतीबाई सहवर्तमान यावें या प्रों आज्ञा गेली. त्याजवरून तेथून अवघे निघून बाईसह खेचीच्या मुलखांत आली. तेथें श्रीमत बाईनी आग्रह आरंभिला कीं श्रीमताचे ठिकाण काय लागले. आज तीन मास मार्ग पाहिला त्याचे सार्थ काय जाले? आम्हांस तोंड दाखवावयास पुणेयास परिछिन येणे नाहीं; अति दुराग्रह करून उजनीस राहिली. समागमे राजश्री सदासिव बाबाजी व फौज ऐशी ठेऊन वरकड सर्व श्रीमंताकडे येता बुराणपुरावर भेटी होतील. अबदालीकडील मजकूर तर अबदालीच्या मुलकांत सिखांनी व ईराणियांनी बहुतच दंगा केला. बहुत खराबी याची जाली. त्याजवरून हा तिकडे निकडीने जाणार. छ ११ साबानी निघोन गेला म्हणोन वर्तमान आले. तीन दिवस जाल्येसमई दिली लुटून घेऊन गेला. सुजायेतदौला नजीबखानहि आपलाले जाग्यास निघोन गेले. प्रस्तूत दिलीमधें अलीगोहोर पाछाजादा पटण्याकडे आहे. त्या (चा) लेक श्रीमत भाऊसाहेबी दिलीमध्यें कायम केला होता त्यासच याणी ठेऊन गेले. वरकड कोण्ही नाहीं. दिलीहि केवळ फकीर होऊन गेली. कांही आब राहिला नाहीं याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें होईल ते खरें. मल्हार वगैरे याची कस्त[1] मागती दिलीकडे जाण्याची आहे. श्रीमंतानी उजनीस आले तेव्हा सिंद्याच्या कारभाऱ्यापासून पैका अकरा लक्ष रुपये घेतले. कांहीं कापड जवाहीरहि घेतले याप्रमाणे मजकूर त्याचा. यशवंतराऊ पवार वारले. त्याचाही सरंजाम जप्त करविला. ये * * कास सार्थकाची जात चांगले तऱ्हेनें दिसोन आली. पुढें उमेद धरावयास जागा असो रिणानबध प्रमाणे होईल ते पाहावें. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे आशीर्वाद.

¶Naro Gangadhar writes from Barhanpur to Bajipant the details of the situation at Delhi after Abdali's departure and about the confiscation of the estates of several Sardars.

---

१ कस्त=विचार हेतु.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 143] [*May 1761 ?*

जिलकाद इसने

पुरवणी राजश्री कुकाजीपंतस्वामी सेवेसी. तुम्ही श्रीमंत राजश्री दादासाहेबासी विनंती करून रायापासून आजपर्यंत चालवीत आहेत त्याप्रमाणें पुढें असावें. यांत सरकार कामें फार. व यांच्याहि स्वरूपासी योग्य. स्वामी कार्यावर राजश्री जनकोजी सिंदे यांच्या अशा गती. वरचेवर कुशलतेचीं वर्तमानेहि येतात. असें असोन कांहीहि ध्यानास न आणितां त्यांच्या स्थळासी जाऊन करावयाचें नवतें तें केलें. साहेब चाकरीवर राणोजी बावा, जयापा, दतबा कामावर आले तें ध्यानांत आणून खावंदानी सर्फराजी करावी ते येकीकडेच ठेऊन नवेच अडकत येते, येणेंकरून राजश्री सुभेदार साहेब म्हणतात कीं चाकरी केल्याचें सार्थक हें. अशा कितेक कल्पना चितांत आणितात. येणेप्रमाणे आसताहि सेवा करावयास चुकत नाहींत. फौज इकडे श्रीमंतानी ठेविली नाहीं आणि बंदोबस्त तो पत्रीं आज्ञा येती कीं सर्व हिंदुस्थानचा देखील करावा. गोष्टीनेंच होत नाहीं. तीर्थरूप राजश्री तात्या मथुरेस ठाकूर नवाबासुधां येके ठिकाणींच * * * * * यजमानानी ठेविलें * * * * * फौज या प्रांता * * * * * * बंदोबस्त होऊन ये * * * * * पूर्वी येजमानानी विचार केला होता कीं आपणच ग्वालेर प्रांतीं राहावें म्हणजे आंतरवेदीचा वगैरे मुलकाचा बंदोबस्त होईल. परंतु श्रीमंतानीं इकडे बखेडा केला, याजकरितां येणेसं येजमानास जालें. श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे विचारास आलें तर प्रस्तुतच पर्जन्यकाळाचे अगोदर च्यारपांच हजार फौज या प्रांतांत आलिया उत्तम आहे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The writer reprehends the Peshwa's action in attaching the Jagirs of Scindia and Holkar.*

No. 144] [*26-5-176*

श्रीशंकर.

छ ११ जिलकाद सन
इसने जेष्ठ मास

श्रीमंत राजश्री दादा साहेब स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक रामचंद्र तुकदेऊ चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्का विनंती विज्ञापना. येथील क्षेम ता॥ वैशाख वद्य ७ सप्तमीपरियेत साहेबाचं

१ गंगाधर यशवंत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रतापे करून मु॥ जयेनगर येथास्थित असे. यानंतर बहूत दिवस जाले. आज्ञापत्र सादर होऊन साप्रत आज्ञापत्री साभाल न जाला. याजकरिता बहूत चितातुर असो. तरी सदैव कृपाळू होऊन आज्ञापत्री कुशल वर्तमान लिहून साभाल करावयासी साहेब धणी समर्थ आहेत. वरकड या प्रातीचे वर्तमान तरी पठान आबदाली लाहोरापलीकड दोन मजली पावलियाचे वर्तमान आले. तेथे छावणी करणार यैसे वर्तमान आहे. दिलीस राजे नागरमल याजकडचे दल मामलीतीच्या यैवजाचे ताकिदीस पाठविले. ते दिलीस येऊन दाखल जाले आहेत. दिलीचा बदोबस्त नजीबखान यानी पातशाहजादांयासी सर्व प्रकारे मायेत घेऊन, बहूत मजबुती व बदोबस्ती करून, फौज पाच सात हजार ठेऊन, आपण आगरियावरी शेह द्यावयासी कूच केले आहे. दबाव जाटावरी टाकिला आहे. मुसेखान बहादरखान बलोचे दोन च्यार हजार फौजेनसी नजीबखान रोहिले यासी दिलीस येऊन सामील जाले आहेत. जाठ सुरजमल यानी आगरियाचा तमाम शेहरपन्हाचा[2] बदोबस्त करून किलीयासी मोर्चे लाविले आहेत. किला जेर आहे. सरजाम थोडा बहूत आहे येक हला जाठाचा मारोन काढिली. याजकरिता शहर काही लुटोन घेऊन किल्यास मोर्चे लाऊन बैसले आहे. काही फौज पार बदोबस्तास उतरली आहे. गाजुदीखान मथुरेस आहे. आफज रहिमत यासी पैगाम लाविले आहे. त्याच्या याच्या भेटी होणार यैसे वर्तमान आहे. राजश्री गंगाधरपंत तात्या दोन च्यार हजार फौजनसी जाठापासी आहेत. जाठास प्रस्तुत अगरियाचा घ्यावयाचा मजकूर भारी पडिला आहे. पुढे जो विचार होईल ते लिहित असो. शाहाआलीगोहर पातशाह पाच मजली आलीकड पटणियाहून आला आहे. नवाब सुज्यावतदउले पुढे सामारे आनावयासि लखणेहून गेले अहेत. ते दर मजल येऊन दिलीस दाखल होणार येसे वर्तमान. शाहअलम याचा गाजुदीखानाचा विचार सर्व साहेब जाणतच आहे. याजकरिता परसपरे सधेह आहे. पुढे जो विचार ध्यानास येईल ते सविस्तर साहेबाचे शेवेसी लिहित असो. राजे माधोसिगजी याजकडील वर्तमान (या पुढील बंद गहाळ)

¶A mutilated letter ; it shows how the Holkar and other Maratha Sardars tried to save the various Maratha stations in Northern regions.

---

१ जवानबख्त. २ शेहरपन्हा=तटबंदी, कोट

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 145] [*17-6-1761*

श्री.

पौ छ १३ जिल्काद

ज्येष्ठ इसने

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञाप्ति. कीं येमुनापार अंतरवेदातील मुलुक सरकारचा आहे. त्यास अयुध्येकर व रोहिले व पटाण याची ठाणी बसली आहेत. ते त्याजकडून काहाडून ठाकराकडे द्यावी यैसे त्यास कलले. ते न सोडीत. त्याजवरून राजश्री गंगाधरपंत याची पत्रें आयुध्येकरास व रोहिले व पठाणास गेली कीं मुलुक आम्ही कोणास देत नाहीं. आम्हीच घेऊ. हे वर्तमान छ मजकुरींच जालें. ते सेवेसी विनंती लिहिली आसे. पुढे होईल ते विनंती करूं. कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*The writer informs the Peshwa how he was trying to garrison the posts in the Doab in the Maratha interests.*

No. 146] [*17-6-1761*

श्री.

पो छ १३ जिल्काद जेष्ठ इसने.

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

[१]विज्ञप्ति कीं, नबाब याकुब अली खानास ताकीद शाहची लाहोरापासून आली की तुम्ही श्रीमंत स्वामीपासी जाऊन सर्वा गोष्टीचा तहरह करून सख्य करून मग दिल्लीस येणे. त्यावरून याकूब आलीखां व तीर्थस्वरूप रा बापूजी महादेव येथे मथुरेस आले. येथील मंडली वजीर व ठाकूर सुरजमल वगैरे सर्व मिळून त्यास सांगीतले कीं श्रीमंत स्वामीकडे कोण्या गोष्टीसाठीं जाता. जे होणे ते येथेंच होईल. या गोष्टीवरून येथे राहिले. वीस रोज होत आले, परंतु काम कांहींच जाले नाहीं. बखेडाच राहिला. याकूब आलीखां आज उदईक दिलीस जाणार. आलीगौहर फौजेसह वर्तमान वारानसीस दाखल जाले. मजल दर मजल दिलीस येतात. नजीबखां बागपतावर आहे. वजीराचे व जाटाचे मानस आहे कीं आलीगौहरासी सख्य करावे. या विचारांत आहेत. शाह येरावती

---

१ पत्र हिंगण्यांचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नदी लाहोरा पलीकडे आहे, तेथवर जाऊन पोहचला. पुढे चालला जातो. सो कळावे म्हणून विनंती लिहली आहे. मागाहून वृत होईल ते सो लिहू. याकूब आलीखा दिलीस जाऊन स्वामीच्या पत्राची मार्गप्रतीक्षा करील. जेव्हां आज्ञापत्र येईल तेव्हा सो येऊन पोहचल. श्रुत होय कृपा केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Hingne writes to the Peshwa about the arrival at Delhi of Yakub Alikhan, Abdali's envoy, to effect a reconciliation with the Marathas.*

No. 147] *[8-7-1761*

श्री.

श्रीमंत राजश्री नाना फडनिवीस स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक दादो हरि चरणावरी मस्तक ठेऊन स॥ नमस्कार विनंती. त॥ छ ९ जिल्हेज पावेतो जंजिरे विजयदुर्गी क्षेम असों विशेष. स्वामीचे दर्शनाची मोठी उत्कंठा लागली आहे. श्री पूर्ण करील तो सुदिन. प्रस्तुत यावयास सिध जाहालो. निघालो तो थोरले वर्तमान अवतार समाप्त जाहालियाचे आले. तेणेकरून सर्व शोकार्णवी पडलो आहो. केवल कैलासच कोसललेसे वाटते. येशास स्वाक्षरामृतवर्षणे संजीवन करणार आपण खावंद आहेत. कधी आपले चरण दृष्टीस पडतील हा निजध्यास लागला आहे. सत्वर श्री सेवकाचे मनोरथ पूर्ण करील. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडील प्रस्तुत नूतन तहकीक वर्तमान काय आले आहे ते स्वहस्ते ल्याहावे. सेवेसी श्रुत होय. दरबारचेहि वर्तमान पुढील बंदोबस्त कोणाचे माथां हे सायंत ल्याहावे. सलगीने लिहिले आहे. कृपा करावी हे विनंती.

सेवेसी दामोदर रघुनाथ स॥ नमस्कार विज्ञापना. स्वामीच्या दर्शनास यावे हा फार मानस आहे. श्रीकृपे लवकरीच दर्शनास येऊ. आल्यावर सविस्तर निवेदन होईल. पूर्ववत प्र॥ कृपा करीत असावे. पदरीचे स्थापित आहो हे विज्ञापना.

¶*The writer Dado Hari (?) writes to Nana Phadnis how shocked he was to hear the news of the Peshwa's death and sends his condolences.*

---

१ लेखक दादो हरि हा कोण?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[24-2-1761

No. 148]

श्रीसांब शिव प्रां.

श्रीमंत रा॥ पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

पो काशीराज शिवदेव दि॥ नवाब शुजाउदवला कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना यैसीजे : येथील कुशल जाणून स्वामीहीं निजानंदवैभवलेखनास आज्ञा करित असले पाहिजे विशेष. येथील प्रसंग आपले सैन्यांचा व गिलज्यांचा मुकाबिला होता. कालचक्रानुसार विपरीतार्थ निदर्शनास आला तो परस्परें सौ विनंती जाली असेल. येजमानांचा आपला स्नेह अविछिन आक्रित्रीम आहे तोच आहे. अगतिकत्वें येणे जालें. यथाशक्य सोरस्यास मनोदये होता, परंतु भगवतसत्ता यैसीच होती. त्यास उपाये काये. जुंज मोडलियां माहा-येवनेछा विपरीतभावे होती. त्यास आम्ही ब्राह्मण व आपले सेवक असतां असा अर्थ व्हावा हे अनुचित जाणून येजमानांस बोध करून महतायासें श्रीमंत भाऊसौ व श्रीमंत रावसौबांची शवें रणांगणीहून आणून ब्राह्मणमंडळीचे सहित चंदनादि उपचारें संस्कार केला हेहि त्यांचेंच पुण्यसहाये जालें कीं यैसा योग जाला असतां संस्कार येथाविधि जाला. जे शर्तमर्दीची ते केली का नसे आपले आंश होते. येजमानांस या प्रसंगामुलें बहूत खेदावह जाले. स्वामीराजांसहि परम दुखावह होईल. परंतु भगवत इच्छेस उपाये काये. स्वामी सर्वज्ञ आहेत. विज्ञापना करावी यैसा अर्थ नाहीं. सेवकास दासवर्गीत जाणून सदैव आज्ञापत्रीं सनाथ करित जावें. बहूत काये लिहिणें. कृपा निरंतर आसो दीजे हे विज्ञापना. माघ कृष्ण १२ मुा दिली.

Kashiraj Shivdeo informs the Peshwa how through the good offices of his master Suja-ud-dowla, the dead bodies of Vishwasrao and Bhausaheb were recovered after great effort and cremated with proper ceremony. The whole letter is in the writer's hand, who seems to be a Deccani Brahmin in the employ of the Vazeer of Lucknow and whose famous Bakhar on Panipat is already well known. This letter will serve to settle the doubt whether Sadashivrao Bhau's dead body was at all recovered.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रोजकीर्द
सुा ईहीदे

राजमंडळ.

स्वारी राजश्री पंतप्रधान

माहे रबिलावल.

तेरीख. १

(१) तसलमात हरी विश्वनाथ [भावे] याजकडे चिरजीव सौ लक्ष्मीबाई श्रीत्रिबकेश्वरी आहेत त्यास खर्चाबदल पाा राजश्री नाना; रसानगी रामाजी विश्वनाथ बर्वे; जबानी कृष्णाजी माहादेव चिपोळणकर कारकून सिलेदार रु. ३०००

तीन हजार रुो पाा नासिक नि॥ मोरो विनायेक व त्रिबकराव सदासीव [दीक्षित पटवर्धन] याजकडून देविले. रु.

[याच बाबतींत पुढें एक दफातेपत्र बार आहे]

[9-12-1760

स्वारी राजश्री पंतप्रधान.

जामदारखानापैकी

छ ३० माहे रबिलाखर

बाजीराव माणकेश्वर याची मूल पा हावयासि आणिली होती. त्यास नि रोपसमई पाा खासा रसानगी नारो अ पाजी ताा दामाजी रंगाजी कारकून सि लेदार सनगे यो आख खासगत राजश्री नानाकडे टोपी कोल्याच्या कातड्याची आहे त्यास अस्तर गुाा नागू सिदी जामेवार पस्मी ८÷

आंख ४०

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१६०

[17-12-1760

छ ८ जमादिलोवल

खर्च पोतापैकी,

१०० नवऱ्या मुली आणिल्या; त्यास तूर्त घरास जावयास निरोप दिल्हा; सबब खर्चास रसानगी विरेश्वर दीक्षित रुपये

५० उचेगाव पाा आबाड येथील कुलकर्णी याची मूल आणिली तीस.

५० नारायण नाईक वाखरे पैठणकर याची मूल आणिली तीस.

जामदारखानापैकी

इनामखर्च अजूरदार कासीद यासि. दिलीहून बातमीची पत्रे घेऊन येत होते, त्यास पठाणाने धरून नेऊन बसविले होते परंतु आपला बच्याव करून निभाऊन आले, साा पाा रुबरू राजश्री नाना चिठी छ मजकूर

आख

२० रामचंद्र
२० संतोख
२० बसता
२० गोविद

ताा न्याहार कासीद
[सनगांचा तपशील]

[18-12-176

छ ९ जमादिलोवल

खर्च पोतापैकी

१५० स्वार दिमत गोविद हरी. रवाना पुण्या तुलाजी आगरे यास आणावयासि असाम २५ येकून दोन आठवड्याबदल प रुबरू राजश्री नाना रु

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ १० जाावल

खर्च पोतापैकी

९० नवऱ्या मुलीस खर्च. बाबुराव ठकार नादेडकर यांची कन्या लस्करात पाहावयासि आणिली होती ती माघारी पाठविली; साा मुलीस खर्चास पाा राजश्री नाना; रसानगी बालाजी वामन दामले शागीर्द रुो

[ही मुलगी पुण्याहून बाबुराव राम फडणीस यांनीं पाठविली होती असे या खालच्या नोंदीवरून दिसते; तेव्हां हे 'नांदेडगांव' पुण्याजवळचेंच धरलें पाहिजे]

[29-12-1760

छ २० जमादिलोवल

खर्च पोतापैकी

७९ रामभट बर्वे वाडीकर दिमत विरेश्वर दीक्षित मनोहर आश्रित याचे सासरे. यास निरोप समई रवानगी रसानगी यादी [तपशील]

२०४॥ लग्नखर्च राजश्री नाना. देणे सोइऱ्याकडील ब्राह्मणास दक्षणा वगैरे; गुाा नारो बाबाजी रसानगी यादी [तपशील]

८३॥ जासूद जथेहाय गढेमंडल्याकडे वाट पाहावयास जातात सबब.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ २२ जमादिलोवल [31-12-1760

खर्च पोतापैकी

४०१ विरेस्वर दीक्षित याचे लग्न जाहाले त्यास सामान बाा रसानगी याद [तपशील]

२९ धर्मादाव देणे. वसुघेद्र स्वामी याजकडून वस्त्रे घेऊन ब्राह्मण आला, त्यास बिदाइ रसानगी याद [तपशील]

२० इनामखर्च देणे अजूरदार कासीद पुरु षोतम माहादेव याजकडून दिलीहून पत्रे घेऊन आले साा पाा राजश्री नाना रसानगी लक्ष्मण विश्वनाथ बर्वे रुा

छ १७ जमादिलोवल [26-12-1760

खर्च पोतापैकी

२९ नवरीमूल सावताचे वाडीहून आणिली आहे. तीसमागमे माणसे वगैरे आल आहेत त्यास खर्चास रसानगी याद.

छ १८ जमादिलोवल [30-12-1760

खर्च पोतापैकी

१२ काशीद जथे निगाई, खाना विसाजी कृष्ण याजकडे पत्रे घेऊन जातात त्यास रोजमरा येकमाही रुा [तपशील]

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१२ कासीद जथे रायमल; रवाना त्रिबकराव
विस्वनाथ याजकडे पत्रे घेऊन जातात
त्यास रोजमरा येकमाही रुा
[तपशील]

जामदारखानापैकी

लग्नखर्च विड्याकडे ताा
जंगनाथ सुभराव रुमाल
[तपशील]

[31-12-1760

छ १९ जमादिलोवल

खर्च पोतापैकी

१६३६७॥ धर्मादाव दक्षणा लग्नाची राजश्री खासानी
केले त्याची, रुपये
१५५६० विाा जनार्दनभट गाडगीळ,
ब्राह्मण आसामी ३११२ दर
आसामी ९ प्रो
८०७॥ विाा विश्वासराव त्र्यंबक, बायका

[4-1-1761

छ २६ जमादिलोवल

खर्च पोतापैकी

३११० निळकंठ माहादेव कारकून याजकडे
दक्षणेबद्दल पाा राजश्री नाना; रसानगी
वेकोजी माणकेश्वर पोतनीस खो चिठी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ २८ जमादिलोवल [6-1-1761

खर्च पोतापैकी

४९॥– गुा विठल कृष्ण, कारकून सिलेदार, नरसिंगराव नारायेण लेले याजकडील नवरीमूल आणावयासि जमखडीस मारनिलेस पाठविले; त्यासमई सरकारची घोडी वगैरे होती, त्यास खर्च जाला तो; रसानगी यादी इा छ ३० राखर ताा छ १६ जमादिलोवल रोज १७ येकून [तपशील]

[27-1-1761

खर्च जामदारखानापैकी कापड

देणे नारोबा नाईक वाखरे पैठणकर सोइरे यासी. छ १८ जावली लग्नानिमित्य सनगे देविली ती छ मजकूरी खर्च पाा राजश्री नाना, रसानगी नारो बावाजी. खासगत खर्च सौ राधाबाईकडे छ १८ जावली लग्नात सनगे नेली ताा अंताजी मल्हार वाकेनीस सनगे

		आख		
४९३	पातले	जरी	पौ	
	९०	२८८	७५	
		४९३	३	
६६	दुपटा	पौ	१	
१०७॥	पितांबर जनानी		१	
३८२	वोढण्या बादली			
	१४२	२४०		
		३८२	२	
३२५	शाळा थरमे			
	१५०	१७५		
		३२५	२	
९७॥	पाटाऊ जनानी		१	
१४३१			१०	

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

छ ६ माहे साबान

खर्च पोतापैकी

४० जयनगराहून रामचद्र तुकदेव याजकडून पत्रे घेऊन आले. त्याचा करार विसा कोसास दोन रुपये अजुरा द्यावा. त्यास भेलेशास कासीद पोहचले त्यास अजुरा.

१० नंदलाल
१० भंवानी
१० उंदा
१० नंदराम

४०

१०० गुलराय वकील दिमंत आबदली यास मेजवानीबदल; पाा राजश्री नाना रसांनगी कृष्णराव बापूजी पारसनीस; जबानी व ताा रतन वलद कलमण चोपदार; राा जासूद जथे हाय यास इनाम.

१९२६०≡ छ १७ रजब (23–2–1761) राजश्री विश्वासराव याचे उतरकार्यास प्रारंभ केला होता त्यास, विाा नारो त्रिबक देशमूख.

[खर्चाचा तपशील]

खर्च जामदारखाना

खिजमतगार निाा खास जिलीब स्वारी राजश्री भाऊ. ग्वालेरीहून आले; लुटले आले, त्यास राा यादी चिठी छ २९ रजब आख

[तपशील]

सवस्थान भूपालकराकडील माणसास परदरबार खर्च इनाम रसानगी यादी चिठी छ १ साबान कापड आख

[तपशील]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[17-3-1761

छ ९ सावान

खर्च पोतापैकी

४४ पथक दिा नीलकठ माहादेव मौजे टंक पा खेचीवाडा येथे जखमी जाहले त्यास खर्चास बा यादी
[तपशील]

[19-3-1761

छ ११ सावान

खर्च पोतापैकी

१९२ जासूद जथे गगाजी नाईक; जानोजी भोसले याजकडे भगवत विष्णु याजबा बातमीचे कामास आहेत; सा नेबाद तिसाचे रु
[तपशील]

१२० कासीद जथे हाय रवाना अबदालीकडे वकिलीबराबरी जातात; सा रोजमरे दोन महिने रुपये
[तपशील]

जामदारखानापैकी

वैजनाथपुरी गोसावी दिा राजश्री कासीद दिा गाजदीखान वजीर परदर-जानोजी भोसले सेनासाहेब सुभा यास बारखर्च सदरेस सनगे रुबरू खाशानी निरोपसमई वस्त्रे सदरेस दिा राजश्री दिल्ही.
नाना. सनगे आख

[तपशील]

[तपशील]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[22-3-1761

छ १४ साबान.

खर्च पोतापैकीं

४००० मिर अनवरुलाखान त्रिबककर; रवाना अबदाआलीकडे सां रसानगी यादी रो

[तपशील]

३६ अजुराखर्च; कासीद पत्रे वकिलाकडून घेऊन आले त्यास बा पत्रे वकील रा

२० दिलीहून बापूजी महादेव याजकडून छ ८ साबानी आले; त्यास रा

१० सेटू.

१० अगडी.

१६ डिगेहून पुरुषोतम माहादेव याजकडून छ ८ साबानी आले त्यास

८ जोगी.

८ रतीराम.

१६

३६

जामदारखानापैकीं.

जासूद दिमत प्रतापसिग राजे सा चंदावर याजकडून पत्रे घेऊन आले होते, त्यास निरोपसमई इनाम आख

९ सुभानजी नागोजी.

९ तुकोजी धारोजी.

१८

ता खुद, सेले व जोट ३ दर ६ आख १८

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[24-3-1761

छ १६ माहे साबान.

जामदारखानापैकीं कापड.

परदरबार खर्च. शाहा अबदली यास वस्त्रे दिलीस पाठविली विा राजश्री नाना, बरोबर मिर अनवरुलाखान त्रिंबककर; सनगे
सनगे यो आख

२५७८॥ खासा अबदाली
१३३० कारचोबी पोशाख.
यो आख
[सनगे ५ तपशीलवार]
७३९॥ बादली पोशाख
[सनगे ६ तपशीलवार]
८८ तिवट चुनडी १
२५० पा पैठणी १
१७ सेला कलसपाकी १
२५७८॥ १४
२१८९॥ वजीर शावली
[तपशील]
परदरबार खर्च दिमत सां भूपालकर रोहिले यासि वस्त्रे पाठविली. बरोबर कारकून गोपाल विठल आख
[तपशील]

खासगत सौ राधाबाईकडे कोतवाल सनगे बाधावयासि बेत गुा बनाजी सिपी सनगे आख

मीर अनवरूलखान त्रिबककर सिलेदार यासी रवाना अबदलीकडे दिलीस जातात सा आख
[तपशील]

छ २६ साबान. [3-4-1761

जिरातखानापैकीं.

नुकसाने खर्च.

टंकेचे गढीवर खास जिलेबिकडील लोकाचा मोर्चा होता. तेथे गोल्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लागो [न] मोडल्या वगैरे नुकसान
जाहाले. ते पाा राजश्री नाना रसानगी
बालाजी कृष्ण ठोसर.

सुमार

[तपशील]

[4-4-1761

छ २७ माहे साबान.

जामदारखानापैकीं.

तुलाजी पवार खिजमतगार स्वारी राजश्री नाना
भाऊचे लस्करांतून लुटून आले साा बक्षीस
पाा खासा राा राघोजी पठरा चिठी छ माार
आख
२९

[6-4-1761

छ २९ माहे साबान.

जामदारखानापैकीं.

दिमत राजश्री मल्हारजी होलकर याच्या नात-
वास वस्त्रे सदरेस विाा राजश्री नाना सनगे
याो
आख
४६१ मालोजी होलकर नातू
[सनगांचा तपशील]

जिनसखानापैकीं खाजगत खर्च.

मेजवानखर्च. सौा गौतमाबाई, मल्हारजी होलकर
याची स्त्री डेऱ्यास आली त्यासमई वजन तोले.
[जिनसांचा तपशील]

खर्च पोतापौा.

९० कृष्णाजी गोपाल हेजीब, नारो शंकर
याजकडील, यास मागे चिरजीव राजश्री
भाऊकडे यैवज देऊन रवाना केले होते;
ते हाली हुजूर आले त्यास रोजमरा
दीडमाही हालीचा छ १ रमजानचा
229

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[29-5-1761

छ २३ सवाल [चालू]

जामदारखानापैकीं.

झावरोजी वाग पोर्गा दिमत पागा हुजूर याणे हिंदुस्थानचे लढाईत सिकस्त जाहाली ते समई सौ पार्वतीबाई समागमे कस्त मेहनत फार चागली केली; सरकार कामास आला. साा बक्षीस रसानगी चिठी छ २१ सवाल आख

१५ तिवट १
२० सेला १

[2-6-1761

छ २८ (२७?) माहे सवाल

जमा पोता.

बाा स्वारी सौ गोपिकाबाई चिरंजीव राजश्री नारायेणराव यास देवी निघाल्या होत्या, तेव्हां नर्मदा तिरी मागे राहिली होती इा छ ११ रमजान ताा छ १२ सवाल जमा रु॥ [तपशील]

खर्च पोतापैकीं.

१ छ ११ रमजान निबाजी रासकर यास सौा पार्वतीबाई यांजकडे रवाना केले; साा वाटेने खर्चास बाा मुाा राा बाल्होजी बिबवा पावलोक

२ छ २३ रमजान सिदोजी बाळूज खिजमतगार सौभाग्यवती पार्वतीबाई याजकडून पत्रे घेऊन आला, सबब इनाम पाा सौ बाई राा व ताा राघोजी चव्हाण

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१००० छ २९ रमजान जानोजी भिताडा खिजमतगार स्वारी राजश्री भाऊ, सौ पार्वतीबाई यास घेऊन आला; साा बक्षीस पाा सौ बाई राा बच्याजी विश्वनाथ बरवे

[3-6-1761

छ २८ सवाल

खर्च पोतापैकी

११८÷ गुाा आपाजी चिमणाजी, कारकून निाा दफ्तर स्वारी भाऊ, टोक्याहून स्वारीचे दफ्तर घेऊन पुण्यास आले; त्यास येते समई खर्च जाहाला तो बाा यादी इा। छ २६ सवाल ताा छ २ जिलकाद रोज ७ पौ वजा छ २८ रोजी नारो बाबाजी याजकडून पाा पारनेरपैकी दाणा घेतला बाकी रोज ६ येकूण.

[तपशील]

९९ देहेनगी देणे बाजंत्री व कर्णेकरी साल मजकुरी श्रीमंत नाना साहेबांचे लग्न हिरडपुरी जाहाले. ते समई बाटणी बाा आपूजी अनंदराव याचे तसलमातीस पोत्याहून रुो दिल्हे होते; त्यास माारनिलेनी बाटणी करून जमाखर्च न करितां पुण्यास आले. त्यास त्याची हाली माानिलेनी बाटणी आणिली ते रुो

७९ बाजंत्री

१० बेकू विज्ञानेश्वरकर गुरव

[वगैरे तपशील]

१६२ रत्नशाळेकडे राजश्री नीलकंठ माहादेव याचे लग्न हिरडपुरीवरी जाहाले. तेसमई

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रुईचे लग्नास वस्ता बाा तसलमातीस
नेल्या त्या खर्चे पडल्या नवत्या; सबब
हाली मोहरा नाणे १२ दर १३॥ प्रमाणे

कामाठी दिाहाय यास रोजमरे राा यादि रुा
५३२२ खासा स्वारी होते त्यास आा ६६६ रुा.
१८२५। स्वारी राजश्री भाऊपैकी आले २९९
९६५
त्यास आा

[3-6-1761

छ २८ सवाल

खर्चपोतापैकी

कामाठी दिमतहाय दिा तोफखाना स्वारी राजश्री भाऊपैकी आले त्यास
येकमाही रा यादि

[इसम ६७ व रक्कम रुपये २६६]

खर्च जामदारखानापैकी कापड

विठल नारायेण वाखरे, कारकून सिलेदार यासी रा चिठ्या ३ चिठी छ २९ रमजान आख १७५

नारो अपाजी दिमत सुभा प्रा पुणे यासी रा चिठी चिठी छ १८ सवाल आख ३४०

[तपशील]

[तपशील]

नारोबा नाईक वाखरे पैठणकर सोइरे यासि मेजवानी बाा पा राजश्री नाना; रसानगी धोडो रामचंद्र कापड आख १०००

ताा विठल नारायेण वाखरे

[तपशील]

इनाम खर्च. खासास्वारी आसेरीवरी गेली ते समई सनगे यो आख

[तपशील]

देणे सिलेदार स्वारी राजश्री भाऊपैकी चाकरीस हजीर जाहाले त्यास मोघम लुटले आले; साा रसानगी यादी चिठी छ मजकूर आदा छ १६ साबान कापड. आख

[तपशील]

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

छ २८ सवाल [3-6-1761

खर्च जमदारखानापैकी

(१) गुा रामाजी कासी वाकेनंस श्रीक्षेत्र टोके गंगातीर येथे गोसहस्र माहादान केले; विद्यमान राजश्री नाना छ १२ सवाल
[तपशील]

(१) दुवेर्जी खर्च, स्वारी राजश्री भाऊ याजकडे फौज विा राजश्री नाना पुरंधरे याजबरोबर आली, त्याजकडे ग्वालेरीस कापड बाबुराव सदासीव याजबरोबर पाठविले ते खर्च बाा पटी अलाहिदा सनगे
[तपशील]

[येकूण]

३९२४१०८≡ ११९६४।.

[18-3-1761

(१) तारीख १०. रोज फाल्गुन शुा द्वादसी शके १६८२ सौम्यवासरे

जमा जामदारखाना.

कमावीस भेट सनगे येकून किमत

१४० राजश्री नानास हा. आबदली.
गुलराज वकील याजबरोबर वस्त्रें प
तो गुा. साखरोजी उदरा. स.
४० चीरा बलासी
१०० कुडतीस दाना केस
१४०

(२) २० साबान शनिवार. (२८ मार्च १७६१

१४९०७६ तसलमात कृष्णाजी गोपा
सिलेदार याज हा चिरंजीव
कडे दाहा लक्ष रुपये र
त्यास ऐवज चिरंजीवाक
मार्गी राहीला, त्या पैक
कृष्णाजी गोपाळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[

नारोबा

नाना;

ताा

[त

इनाम खर्च.

यो

[तपशी

देणे सिलेदार स

मोघम लुटले आ

छ १६ साबान का

[तपशील]

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नारे

नान

ता

इनाम खच

यो

[त

देणे सिलेदार

मोघम लुटले

छ १६ साबान

[तपशील